# मराठी वृत्तपत्रांतील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्या शाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंज्ञापन विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

**जयंत दामोधर गायकवाड**

Registration No. 03313007587

मार्गदर्शक

**प्रो.डॉ. सुधीर वामनराव गव्हाणे**

**पत्रकारिता व जनसंज्ञापन विभाग**

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**


**जानेवारी – २०२०**

# **प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, **जयंत दामोधर गायकवाड** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे च्या आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्या शाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंपर्क विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर केलेल्या **मराठी वृत्तपत्रांतील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास** या शोधप्रबंधासाठी केलेले संशोधन कार्य माझ्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

प्रस्तुत प्रबंध मौलिक संशोधन करून स्वतंत्रपणे लिहिला आहे. या विषयातील केलेले संशोधन कार्य मूळ आणि अस्सल असून ते पीएच. डी. पदवीसाठी योग्य आहे. माझ्या माहिती व विश्वासानुसार संबंधित संशोधन कार्य हे त्यांनी इतर कोणत्याही विद्यापीठाच्या कुठल्याही परिक्षेसाठी/पदवीसाठी सादर केलेले नाही.

संशोधन मार्गदर्शक

ठिकाण : औरंगाबाद

**प्रो. डॉ. सुधीर गव्हाणे**

दिनांक :     /०१/२०२०

# संशोधकाचे प्रतिज्ञापत्र

मी **जयंत दामोधर गायकवाड** टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे च्या आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्या शाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंपर्क विषयातील पीएच. डी. (विद्या वाचस्पती) पदवी अभ्याक्रमाचा PRN - 03313007587 नुसार संशोधक विद्यार्थी आहे. मी प्रतिज्ञापुर्वक नमूद करतो की, **मराठी वृत्तपत्रांतील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास** हा शोधप्रबंध माझे मार्गदर्शक **प्रो. डॉ. सुधीर गव्हाणे** यांच्या मार्गदर्शनात मी स्वतः संशोधनपूर्वक लिहिलेला आहे. त्यातील सर्व मजकूर माझ्या अभ्यासावरच आधारलेला आहे. प्रकाशित, अप्रकाशित असलेल्या उपलब्ध संशोधनाचा पूर्वाभ्यासात आढावा घेऊन योग्य ठिकाणी संबंधित मान्यवरांचा उचीत उल्लेख करण्यात आलेला आहे.

मी हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या आधुनिक शास्त्रे आणि व्यावसायिक कौशल्ये या विद्या शाखेंतर्गत पत्रकारिता आणि जनसंपर्क विषयातील पीएच. डी. (विद्या वाचस्पती) पदवीसाठी सादर केला आहे. हा शोधप्रबंध अन्य कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवी अथवा पदविकेसाठी अन्य कोणत्याही स्वरूपात मी सादर केलेला नाही. विद्यापीठाचे सर्व प्रकारचे नियम, अधिनियम, अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला बंधनकारक आहेत. त्यामुळे मी खाली स्वाक्षरी करीत असून या संदर्भात भविष्यात कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर अडचणी उद्भवल्यास त्यासाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे नव्हे तर नियमानुसार मी स्वतः जबाबदार असेन याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी :


**पत्ता :** इन्स्टिट्यूट फॉर मीडिया रिसर्च अँड डेव्हलपमेंट, (I.M.R.D.)

पहिला मजला, स्मृती, त्रिशूलनगर, श्री स्वामी समर्थ मंदिर रोड, राहाता,

जिल्हा – अहमदनगर ४२३ १०७

**फोन नं. :** ९४२०६०८०८० **E-mail :** jayantnews@gmail.com


**दिनांक :** /०१/२०२० **ठिकाण :** पुणे

# ऋणनिर्देश

विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीच्या  पुर्तीसाठी 'मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास' हा शोधप्रबंध सादर करीत असताना मला अतिशय आनंद होत आहे. अनुभव हाच खरा मार्गदर्शक गुरू या उक्तीप्रमाणे सुरूवातीस अवघड वाटणारे संशोधनाचे काम माझे मार्गदर्शक तथा प्रसारमाध्यम उच्च शिक्षणातील तज्ज्ञ तथा औरंगाबाद येथील एम.जी.एम. विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू आदरणीय प्रो.डॉ. सुधीर गव्हाणे सर यांच्यामुळेच पूर्ण झाले. संशोधन कार्यात विषय निवडीपासून ते आजपर्यंत आलेल्या प्रत्येक समस्येतून तत्काळ मार्ग काढणारे गव्हाणे सर यांचा मी आयुष्यभर ऋणी राहील. त्यांच्या ऋणात राहण्यात जेवढे सुख आहे तेवढे आभारात नाही.

अहमदनगर जिल्ह्यातील दैनिक 'सार्वमत' येथे उपसंपादक पदावर कार्यरत असताना शेती विषयावर 'कृषिमत' या नावाने स्वतंत्र पानाचे संपादन केल्यामुळे अनेक विषय, माहिती वाचकांना देता आली. पुढे 'ई.टी.व्ही. मराठी' साठी हैदराबाद मुख्य कार्यालयात मला संपादकीय मंडळात काम करण्याची संधी मिळाली. तेथे महाराष्ट्र राज्य पातळीवर पत्रकारिते बरोबरच कृषि क्षेत्राचा मोठा आवाका आला. त्यानंतर मुंबई येथे 'मी मराठी' या वाहिनीसाठी राज्याचा वृत्तसंपादक म्हणून कार्यरत असताना 'बळीराजाचा बळी' ही शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवर आधारीत डॉक्युमेंटरी फिल्म प्रसारीत करता आली. 'बळीराजाचा बळी' चे कौतुक तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासरावजी देशमुख आणि तत्कालीन गृहमंत्री स्व. आर.आर. पाटील यांनी मुंबईच्या षण्मुखानंद हॉल येथे केले. घरची शेती असल्याने कृषिविषयक समस्यांचा अभ्यास झाला. सन २००८ मध्ये प्राध्यपक पदाची सेट परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाल्यावर शेती आणि शेतकऱ्यांसाठी उपयोगी होईल असे संशोधन करण्याचा निश्चय केला. या दरम्यान नागपूर विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ व अहमदनगर याठिकाणी पत्रकारिता, जनसंपर्क, जाहिरात, जनसंज्ञापन, वार्तांकन, संपादन, इलेक्ट्रॉनिक मीडिया आदि विषयांचे अध्यापन करताना अनेक विद्यार्थी घडविता आले. संपर्कात आलेल्या सर्वांचेच आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू माननीय डॉ. दीपक टिळक सर, अधिष्ठाता तथा विभागप्रमुख प्रो.डॉ. गिताली टिळक मॅडम, ख.उ.ड.ड.ठ. मुंबईच्या प्रमुख प्रो.डॉ. डॉली सिन्हा, मुंबई विद्यापीठातील प्रा. डॉ. सुंदर राजदिप, प्रसिध्द माध्यमतज्ज्ञ प्रा.डॉ. केशव साठ्ये, डॉ. प्रविण

जाधव, प्रा. रामदास नेहूलकर, प्रा. सागर गोखले, प्रा.डॉ. सुरेश पठारे, प्रा. सुरेश पुरी, डॉ. गणेश सानप, प्रो.डॉ. अताऊल्लाह जहागिरदार यांनी मार्गदर्शन केले. त्याबद्दल त्यांचे आभार.

नेहमीच पाठीशी उभे राहून मदतीसाठी कृतिशील तत्परता दाखविणारे मुंबई येथील प्रसिध्द पत्रकार–लेखक तथा माझे मित्र कमलेश देवरूखकर आणि सौ. रीमा वहिनी, ज्येष्ठ पत्रकार अशोक पटारे, संतोष गोरे, प्रा. सचिन बनसोडे, डॉ. मिलिंद आठवले, डॉ. सचिन सदाफळ, डॉ. पी. केनेडी, डॉ. समीर इनामदार, डॉ. इर्शाद अहमद मक्कूभाई, 'पुण्यनगरी'चे वृत्तसंपादक विकास अंत्रे, 'सकाळ'चे अरूण सुर्वे, 'लोकमत'चे संपादक सुधीर लंके, कुंदन सावंत, प्रमोद आहेर, इंजिनियर दादासाहेब गायकवाड, बाबा ढाकणे, स्व. प्रदिप राजगुरू, फादर ओवीड परेरा, फादर प्रकाश राऊत, प्रा. जक्कन मधूकर, नजीर सय्यद, रामनाथ सदाफळ, मनोज गाडेकर, राजू बनकर, संतोष मोकळ, सुमेध गायकवाड यांचेही संशोधक आभार व्यक्त करतो.

ज्यांनी सतत पाठपुरावा करून हा शोधप्रबंध लिहिण्यास प्रोत्साहन व आशीर्वाद दिले ते माझे वडील तथा सेवानिवृत्त प्राचार्य डी.एस. गायकवाड सर आणि आई तथा सेवानिवृत्त आदर्श शिक्षिका सौ. डी.डी. गायकवाड यांची तळमळ होती म्हणूनच हे कार्य यशस्वी होऊ शकले. तसेच भाऊ, बहिणी, मेहुणे समीर त्रिभूवन, साडूभाऊ इंजिनियर संतोष राजगुरू, इंजिनियर अभिजित भालेराव, प्रा. चंद्रकांत देठे यांचे सह सर्वच शुभचिंतकांचे आभार मानतो.

गेल्या साडेसहा वर्षात विविध प्रकारचा व्याप सांभाळून हे संशोधन पूर्ण करणे शक्य झाले त्याचे सर्वाधिक श्रेय माझी पत्नी सौ. निता हिच्याकडे जाते. तसेच व्हर्सटाईल पर्सनॅलिटी असलेली ज्येष्ठ कन्या हर्षिता आणि बडिंग आर्टिस्ट श्रृती यांनी सुध्दा मला सतत प्रोत्साहन देऊन प्रत्यक्ष मदत केली. या तिघींनाही आभार आवडणार नाही तरीही त्यांना धन्यवाद देतो.

'गुरूकृपा'चे रमेश व दादासाहेब नेहे पाटील, 'ओम प्रिंटर्स'चे विकास तांबे पाटील आणि डि.टी.पी. सुबक रितीने करणारे नारायण हरिभाऊ प्रधान यांचे मनापासून आभार मानतो. तसेच संशोधन कार्याच्या प्रारंभापासून ते पुर्ततेपर्यंत ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत मार्गदर्शन केले अशा अनावधानाने राहून गेलेल्या सर्व हितचिंतकांचे संशोधक मनःपूर्वक ऋण व्यक्त करतो.

**– जयंत दामोधर गायकवाड**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ | I |
| | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| | संशोधकाचे प्रतिज्ञापत्र | III |
| | ऋणनिर्देश | IV-V |
| | अनुक्रमणिका | VI-VII |
| | तालिकासूची | VIII - XI |
| | आलेखसूची | XII – XIV |
| | संक्षिप्तरूप सूची | XV |
| **पहिले** | **प्रस्तावना**<br>अ) मराठी वृत्तपत्रे व कृषि पत्रकारितेचा इतिहास व प्रगती<br>ब) भारतीय शेती व्यवसायाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व<br>क) अहमदनगर जिल्हा – एक आकलन | १ ते ७८ |
| **दुसरे** | **संशोधन पूर्वाभ्यास व संदर्भ साहित्याचा आढावा** | ७९ ते १०२ |
| **तिसरे** | **संशोधन पद्धती** | १०३ ते १३९ |
| **चौथे** | **तथ्य विश्लेषण व चिकित्सा**<br>अ) कृषि पत्रकारिता : आशय विश्लेषण<br>ब) शेतकरी वर्गाचे सर्वेक्षण | १४० ते २४० |
| **पाचवे** | **निष्कर्ष व उपाययोजना** | २४१ ते २६४ |

| | | |
|---|---|---|
| | संदर्भसूची | २६५ ते २७३ |
| | परिशिष्टे | २७४ ते २९५ |

# तालिकासूची


| तालिका क्र. | तालिकेचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| १.१ | सकल राष्ट्रीय उत्पादनात कृषि क्षेत्राचा शेकडा वाटा | ३२ |
| १.२ | जागतिक उत्पादकता व भारत (क्विंटल/हेक्टर) २०१४ | ३३ |
| १.३ | भूधारण क्षेत्र, शेतकरी प्रमाण व उत्पन्न, २०१५ | ३५ |
| १.४ | शेतकऱ्यांच्या आत्महत्या | ४९ |
| १.५ | अहमदनगर जिल्हा महसूल उपविभाग | ६५ |
| १.६ | कृषि गणना २०१०– खातेदार व त्यांनी धारण केलेले क्षेत्र | ६७ |
| १.७ | अहमदनगर जिल्ह्याची २००४–०५ व २०१४–१५ यावर्षातील महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्राची तुलनात्मक माहिती | ६९ |
| ४.६.१ | लोकमत या दैनिकाने एकूण जागेच्या तुलनेत कृषिविषयक बातम्यांना विषयानुरूप दिलेली जागा | १४७ |
| ४.६.२ | लोकमत दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय प्राप्त जागा | १४९ |
| ४.७.१ | सकाळ या दैनिकाने कृषिविषयक बातम्यांना घटकनिहाय दिलेली जागा | १५१ |
| ४.७.२ | सकाळ दैनिकाने एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय प्राप्त जागा | १५३ |
| ४.८ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पीक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १५६ |
| ४.९ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी रोगराई, खत, बियाणे वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १५७ |
| ४.१०.१ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी साखर उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६० |
| ४.१०.२ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दूध उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६२ |

| | | |
|---|---|---|
| ४.१०.३ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पशू/कुक्कुट/शेळी/मेंढीपालन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६४ |
| ४.११ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पणन व बाजारभाव वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६६ |
| ४.१२ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि विद्यापीठ वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६८ |
| ४.१३ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी शेतकरी आत्महत्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७० |
| ४.१४ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी लेख, अग्रलेख यांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७२ |
| ४.१५ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी छायाचित्रांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७४ |
| ४.१६ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जाहिरातींचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७६ |
| ४.१७ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि यशकथांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७८ |
| ४.१८ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि तक्रार/आंदोलनांच्या वार्ता चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८० |
| ४.१९ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दुष्काळ विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८२ |
| ४.२० | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी हवामान, पाऊस विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८४ |
| ४.२१ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जलसिंचन, जलसंवर्धन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८६ |
| ४.२८ | शेतकरी उत्तरदात्यांचा वयोगट | १९६ |
| ४.२९ | शेतकरी उत्तरदात्यांचा धर्म | १९७ |
| ४.३० | शेतकरी उत्तरदात्यांची जात | १९८ |
| ४.३१ | शेतकऱ्यांचे शिक्षण | २०० |
| ४.३२ | शेतकऱ्यांचे राहण्याचे ठिकाण | २०१ |
| ४.३३ | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या | २०२ |

| | | |
|---|---|---|
| ४.३४ | शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण | २०४ |
| ४.३५ | वृत्तपत्रे नियमित वाचन | २०५ |
| ४.३६ | शेतकऱ्यांकडून विशिष्ट वृत्तपत्रांचे वाचन | २०६ |
| ४.३७ | शेतकऱ्यांकडून वृत्तपत्र वाचनासाठी दिला जाणारा वेळ | २०८ |
| ४.३८ | कृषि पत्रकारिता आणि स्वतंत्र वृत्तमूल्य | २०९ |
| ४.३९ | कृषि पत्रकारितेमुळे होणाऱ्या कृषिविषयक जागृती बद्दल शेतकऱ्यांचे मत | २१० |
| ४.४० | कृषि पत्रकारिता आणि कृषि जागृती | २११ |
| ४.४१ | कृषि पत्रकारितेत मराठी वृत्तपत्रांचे योगदान याबद्दल शेतकऱ्यांचे मत | २१२ |
| ४.४२ | अहमदनगर जिल्ह्यातील मराठी वृत्तपत्रांची कृषि पत्रकारिते बद्दलची जागरुकता : शेतकऱ्यांचे मत | २१२ |
| ४.४३ | शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देणारे दैनिक : शेतकऱ्याचे मत | २१३ |
| ४.४४ | शेतकऱ्यांचे आवडते लेखन प्रकार | २१४ |
| ४.४५ | मराठी वृत्तपत्रे राजकारण की शेतीला महत्त्व देतात | २१६ |
| ४.४६ | शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून शेतीतला सर्वाधिक महत्त्वाचा विषय | २१७ |
| ४.४७ | वृत्तपत्रात शेतकरी वर्गाला पुरेशी जागा | २१८ |
| ४.४८ | शेतकरी वर्गास दैनिक ‘ॲग्रोवन’ बद्दल असणारी माहिती | २१९ |
| ४.४९ | शेतकरी सर्वेक्षण : दैनिक ॲग्रोवन शी स्पर्धा करणारे आणखी एखादे मराठी कृषि दैनिक असण्याची गरज | २२० |
| ४.५० | कृषि विषयी अधिक नव्या मजकूराची गरज : शेतकऱ्यांचे मत | २२१ |
| ४.५१ | शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न | २२२ |
| ४.५२ | शेतकऱ्यांवरील कर्जाचे स्वरुप | २२३ |

| | | |
|---|---|---|
| ४.५३ | शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था | २२५ |
| ४.५४ | शेतकऱ्याकडून कर्जाची होणारी फेड | २२६ |
| ४.५५ | शेतीसाठी पाण्याची उपलब्धता | २२७ |
| ४.५६ | शेती उत्पादनाला मिळणारे बाजारमूल्य | २२९ |
| ४.५७ | शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या माहितीची वेळेवर उपलब्धता | २३० |
| ४.५८ | शेतकऱ्यांना वेळेवर मिळणारी शासनाची मदत | २३१ |
| ४.५९ | शेतकऱ्याकडून अमलात आणली जाणारी वर्षभरातील पीक पध्दती | २३२ |
| ४.६० | शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा उपयोग | २३३ |
| ४.६१ | कृषि पत्रकारितेसाठी उपाय व सूचना | २३४ |

# आलेखसूची


| आलेख क्र. | आलेखाचे नाव | पान नं. |
|---|---|---|
| ४.६.१ | लोकमत या दैनिकाने एकूण जागेच्या तुलनेत कृषिविषयक बातम्यांना विषयानुरूप दिलेली जागा | १४८ |
| ४.६.२ | लोकमत दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय दिलेली जागा | १५० |
| ४.७.१ | सकाळ या दैनिकाने एकूण जागेच्या तुलनेत कृषिविषयक बातम्यांना विषयानुरूप दिलेली जागा | १५२ |
| ४.७.२ | सकाळ दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय दिलेली जागा | १५४ |
| ४.८ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पीक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १५६ |
| ४.९ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी रोगराई, खत, बियाणे वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १५८ |
| ४.१०.१ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी साखर उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६० |
| ४.१०.२ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दूध उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६२ |
| ४.१०.३ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पशू/कुक्कुट/शेळी/मेंढीपालन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६४ |
| ४.११ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पणन व बाजारभाव वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६६ |
| ४.१२ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि विद्यापीठ वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १६८ |
| ४.१३ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी शेतक आत्महत्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७० |
| ४.१४ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी लेख, अग्रलेख यांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७२ |
| ४.१५ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी छायाचित्रांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७४ |
| ४.१६ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जाहिरातींचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७६ |

| | | |
|---|---|---|
| ४.१७ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि यशकथांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १७८ |
| ४.१८ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि तक्रार/आंदोलनांच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८० |
| ४.१९ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दुष्काळ विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८२ |
| ४.२० | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी हवामान, पाऊस विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८४ |
| ४.२१ | दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जलसिंचन, जलसंवर्धन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण | १८७ |
| ४.२९ | शेतकरी उत्तरदात्यांचा धर्म | १९७ |
| ४.३० | शेतकरी उत्तरदात्यांची जात | १९९ |
| ४.३१ | शेतकऱ्यांचे शिक्षण | २०० |
| ४.३३ | उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या | २०३ |
| ४.३४ | शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण | २०४ |
| ४.३६ | शेतकऱ्यांकडून विशिष्ट वृत्तपत्रांचे वाचन | २०७ |
| ४.३७ | शेतकऱ्यांकडून वृत्तपत्र वाचनासाठी दिला जाणारा वेळ | २०८ |
| ४.४४ | शेतकऱ्यांचे आवडते लेखन प्रकार | २१५ |
| ४.४६ | शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून शेतीतला सर्वाधिक महत्त्वाचा विषय | २१७ |
| ४.५१ | शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न | २२२ |
| ४.५२ | शेतकऱ्यांवरील कर्जाचे स्वरुप | २२४ |
| ४.५३ | शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था | २२५ |
| ४.५५ | शेतीसाठी पाण्याची उपलब्धता | २२८ |
| ४.५६ | शेती उत्पादनाला मिळणारे बाजारमूल्य | २२९ |

| | | |
|---|---|---|
| ४.६१ | कृषि पत्रकारितेसाठी उपाय व सूचना | २३४ |

# संक्षिप्तरूप सूची

| | |
|---|---|
| ABC | Audit Bureau of Circulation |
| AGRIS | Agriculture Information System |
| DTH | Direct To Home |
| ERNET | Education and Research Network |
| F.M. | Frequency Modulation Radio |
| ICAR | The Indian Council of Social Science Research |
| ICSSR | Indian Council of Social Science Research |
| IRS | The Indian Readership Survey |
| ISBN | International Standard Book Number |
| INS | Indian Newspaper Society |
| RNI | Registrar of Newspapers of India |
| TRP | Television Rating Point |
| WAN | World Association of News Paper |
| WWW | World Wide Web |
| % | टक्केवारी (शेकडा प्रमाण) |
| कि.मी. | किलोमीटर |
| चौ.से.मी. | चौरस सेंटीमीटर |
| से.मी. | चौरस सेंटीमीटर |
| मि.मी. | मिली मीटर |
| द.ल. | दश लक्ष |
| °से. | अंश सेल्सिअस |
| चौ.कि.मी. | चौरस किलोमीटर |
| मे. | मेट्रीक |
| हे. | हेक्टर |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## अ) मराठी वृत्तपत्रे व कृषि पत्रकारितेचा इतिहास व प्रगती

### १.१ प्रास्ताविक

भारत हा कृषिप्रधान देश आहे. एकविसाव्या शतकात संपूर्ण जगभरात होत असलेल्या बदलांचा परिणाम भारतीय कृषिवरही होत आहे, होत राहणार. मुद्रीत माध्यमेही त्याला अपवाद नाहीत. त्यातच वृत्तपत्र हे समाज–जीवनाचा आरसा मानले जाते. बदलत्या तंत्रज्ञानाचे व कृषिविषयक संशोधनाचे प्रतिबींब वृत्तपत्रांमधून उमटत आहे. आज भारत देश हा विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती करीत आहे. पूर्वीच्या किंवा पारंपरिक शेतीत बदल घडून येत आहेत. शास्त्रीय व आधुनिक शेतीचे प्रयोग होत आहेत. त्यामुळे कृषि विकासात मराठी वृत्तपत्रांचे महत्त्वाचे स्थान आहे. भारतात वृत्तपत्रांद्वारे विकासाचा वेग वाढविण्यास हातभार लागत आहे. शेतीविषयक मार्गदर्शन, फळझाडे लागवड, नवीन बी–बियाणे, मशागत, संगोपन, खतांचा वापर, नवीन जातींचे (वाण) उत्पादन, किटकनाशके अशा अनेक विषयांवर माहिती पुरवून व त्या विषयी लेख, मजकूर तसेच कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांच्या, तज्ज्ञाच्या मुलाखती, यशस्वी शेतकऱ्यांच्या सचित्र यशकथा यावरही वृत्तपत्रे भर देत आहेत. याविषयी भाष्य करताना डॉ. रणजित सिंह म्हणतात, I am of the firm belief that newspapers specially the vernacular press can play a very significant role in Agriculture and Rural development.[१](सिंग, १९८६, पृ.क्र. १५४)

भारतातील कृषिविषयक स्वतंत्रपणे वृत्तपत्र माध्यमाचा उपयोग इ. स. १८२० मध्ये सुरू झाल्याची नोंद आहे. डॉ. विल्यम कॅरी या मिशनरी विद्वानाने 'रॉयल ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फत काढण्यात आलेल्या पत्रिकेत शेतीची माहिती देण्यात येत होती. या संस्थेच्या संशोधन कार्यामुळे मातीच्या परीक्षणासह शेतीच्या क्षेत्रातील नवनवीन पद्धतीची माहिती शेतकऱ्यांना मिळत होती. शेती हा जीवनाचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे शेतीसंदर्भातील माहिती सर्वांना वाचायला आवडते. शेती संदर्भातील कायदे, शासन परिपत्रके, कृषि विद्यापीठातील विकासासंबंधी होणारे नवनवीन

संशोधन त्याचबरोबर जमिनीचे तंटे, वाद, फसवणूक, आत्महत्या या संबंधी देखील मोठ्या प्रमाणात माहिती प्रसारीत होत असते. त्यामुळे कृषि वार्ता हा केवळ शेतकऱ्यांचाच विषय नाही तर सर्वांचाच विषय होतो. भारतीय समाजातल्या मोठ्या लोकसंख्येच्या जीवनाशी निगडीत कृषि विषय अनेक अर्थांनी प्रभावी आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य पाया म्हणून शेती कडे पाहिले जाते. ब्रिटीश काळात व भारत स्वतंत्र झाल्यानंतर केंद्रीय व राज्य अर्थसंकल्पात शेतीला म्हणावे तसे झुकते माप मिळाले नाही. बऱ्याच शेतकऱ्यांना अद्याप अर्थसंकल्प कसा असतो हे देखील माहित नाही. शेतकरी आत्महत्या व कर्जमाफी या विषयांवर राजकारण होत असल्याचे गेल्या काही वर्षात पत्रकारितेत वाचायला मिळते. त्यामुळे वृत्तपत्र हे समाज जीवनाचा अविभाज्य घटक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचे व कृषिविषयक संशोधनाचे प्रतिबींब वृत्तपत्रांत पडून त्याद्वारे विकासाचा वेग वाढविण्यास हातभार लागत आहे. २१ व्या शतकाकडे वाटचाल सुरू असताना शेतीचा विकासदर वाढविण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. हरितक्रांतीवर कृतिशील ऊहापोह झाला. तरीही शेतीचा विकास दर हवा तेवढा वाढलेला नाही. कृषिप्रधान असलेल्या भारताला ऑस्ट्रेलियातून गव्हाची तर कधी पाकिस्तानातून कांद्यांची आयात करावी लागते. ही लाजिरवाणी बाब नाही का ? ही घटना लक्षात घेता मराठी वृत्तपत्रे व कृषि पत्रकारितेचा इतिहास व प्रगती याबाबी अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतात.

आता भारताला दुतर्फा हरितक्रांतीस सामारे जावयाचे आहे. त्यासाठी मराठी वृत्तपत्रे आणि कृषि पत्रकारिता या अभ्यासाला महत्त्व आहे. लोकशाही असणाऱ्या भारत देशात पत्रकारितेचे महत्त्व स्पष्ट करताना न्या. सरकारीया यांनी म्हटले आहे की, The role of press in a democracy is that of a watchdog of the public intrest.[२](सरकारिया, १९९३, पृ.क्र. २५) लोकशाहीमध्ये वृत्तपत्रे सार्वजनिक हिताचे रक्षक म्हणून कार्य करतात. त्यांच्या टीकात्मक माहिती कार्यावरच विकासाचे प्रवर्तन अवलंबून असते. या सर्व पार्श्वभूमीवर या अभ्यासात मराठी कृषि पत्रकारितेचे स्वरुप व महत्त्व लक्षात घेतले पाहिजे.

## १.२ मराठी वृत्तपत्रांचा इतिहास

इंग्रजी राजवटीमुळे नाविन्याचा शोध घेणे शक्य झाले होते. देशाच्या इतर भागाप्रमाणे महाराष्ट्रातही सांस्कृतिक प्रबोधनाची लाट निर्माण झाली. प्रबोधनाचे साधन म्हणून हळूहळू

वृत्तपत्रे व नियतकालिके पुढे येऊ लागली. मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' शुक्रवार दिनांक ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबईत सुरू केले. त्यापुर्वी 'मुंबापूर वर्तमान' नावाचे वृत्तपत्र (२० जुलै १८२८) निघाल्याची नोंद आढळते. परंतु या पत्राचा चालक व संपादक कोण? हे पत्र किती काळ चालले? याचा संदर्भ मिळत नाही. तसेच हे पत्र साप्ताहिक, पाक्षिक की मासिक होते, हेही स्पष्ट होत नाही.[३](लेले, २००९, पृ.क्र. ४०) 'मुंबापूर वर्तमान' हे मराठीतील पहिले पत्र असले तरी 'दर्पण' या वृत्तपत्रापासून मराठी वृत्तपत्रास एक निश्चित अशी दिशा प्राप्त झाली असे म्हणता येईल. १२ नोव्हेंबर १८३१ रोजी प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात जांभेकरांनी आपल्या वृत्तपत्राची उद्दिष्टे स्पष्ट केली होती. त्यांनी कोणताही विषय वर्ज्य मानला नाही. हिंदू विधवांचा पुनर्विवाह, धंदे शिक्षणाची आवश्यकता, बंगाली रंगभूमी, रहदारी, जकात असे नानाविध विषय दर्पणमध्ये आले आहेत. रघुनाथ हरिश्चंद्रजी आणि जनार्दन वासुदेवजी या दोन श्रीमंत व्यक्तिंनी हे वृत्तपत्र चालवले होते. दर्पण प्रारंभी पाक्षिक होते. ४ मे १८३२ पासून ते साप्ताहिक स्वरुपात प्रकाशित झाले.[४](लेले, २००९, पृ.क्र. २७७) एका बदनामीच्या खटल्यात जांभेकर यांना आठशे रुपये दंड झाला. बेअदबी प्रकरणाची झळ लागून दर्पण बंद पडले.

पूर्णपणे मराठी भाषेतील मजकुराचे वृत्तपत्र म्हणून 'मुंबई अखबार'चा निर्देश करावा लागेल. ४ जुलै १८४० रोजी त्याचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. याच सुमारास १८४२ मध्ये अहमदनगर येथे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी 'ज्ञानोदय' हे मासिक सुरु केले. हे या काळातील एक महत्त्वाचे नियतकालिक. प्रथम सोळा पानी पाक्षिका नंतर बारा पानी साप्ताहिक असे त्याचे अंक प्रकाशित होत. अहमदनगर–मुंबई–अहमदनगर–मुंबई असे स्थलांतर त्याने केले. युरोपची नकाशाचित्रे प्रथम 'ज्ञानोदय'मध्ये प्रसिद्ध केली. मराठी वाङ्मयाचा परामर्श त्यात घेतला जाई. सध्या 'ज्ञानोदय' पुणे येथून मासिक स्वरुपात प्रकाशित होत आहे.

'प्रभाकर' हे वृत्तपत्र २४ ऑक्टोबर १८४१ रोजी सुरु झाले. प्रभाकरची प्रेरणा सामाजिक परिवर्तनाची होती. भाऊ महाजन हे प्रभाकरचे संपादक होते. पुण्यातून विरेश्वर छत्रे यांनी चालविलेले वृत्तपत्र म्हणजे 'मित्रोदय' ते १८४४ साली निघाले. सुमारे साडेचार वर्ष ते चालले. भारत सेवक समाजाच्या 'ज्ञानप्रकाश'मधून पुण्यातील वृत्तपत्र व्यवसायाला व पत्रकारितेला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. १०३ वर्ष चाललेले हे वृत्तपत्र १२ फेब्रुवारी १८४९ रोजी सुरु झाले.

जानेवारी १८६२ पासून 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र मुंबईहून प्रसिद्ध होऊ लागले. ते काढण्यात 'लोकहितवादीं'चाच पुढाकार होता. 'इंदुप्रकाश' इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषेतून प्रकाशित होई. विरेश्वर उर्फ तात्या छत्रे यांचे 'ज्ञानसिंधू' (१८४२), कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे 'विचारलहरी' (१८५२), 'हिंदू पंच' (१८५२), ही वृत्तपत्रे निघाली. मराठी वृत्तपत्रातून व्यंगचित्र छापण्याची प्रथा 'हिंदू पंच'ने सुरू केली. पुण्यातील 'न्यू इंग्लिशस्कूल' शी संबंधित असलेल्या सहा तरुणांनी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेतून स्फूर्ती घेतली. त्यांनी 'मराठा' व 'केसरी' ही इंग्रजी व मराठी वृत्तपत्रे अनुक्रमे २ जानेवारी व ४ जानेवारी १८८१ रोजी पुण्यातून प्रकाशित करण्यास सुरुवात केली. लोकमान्य टिळक हे 'केसरी'चे पहिले संपादक तर गोपाळ गणेश आगरकर हे 'मराठा'चे पहिले संपादक होते.[५](लेले, १९८४, पृ.क्र. १) भारतीय असंतोषाचे जनक आणि एक महान राष्ट्रवादी झुंजार संपादक लोकमान्य टिळकांच्या रूपाने देशाला पहायला मिळाला.

पुण्यातील 'केसरी' नंतर महाराष्ट्रात काही वृत्तपत्रे निघाली. त्यात 'सुधारक', 'काळ' व 'संदेश' या वृत्तपत्रांची कामगिरी मोलाची आहे. १५ ऑक्टोबर, १८८८ रोजी सुधारकचा साप्ताहिक रुपात पहिला अंक निघाला. भास्कर बळवंत भोपटकर यांनी ५ एप्रिल १९०५ रोजी 'भाला' चा पहिला अंक प्रकाशित केला. लोकमान्य टिळक यांच्या राजकारणाचे आणि विचारांचे पुरस्कर्ते असणाऱ्या अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी १४ जानेवारी १९१५ रोजी मुंबईतून 'संदेश' हे वृत्तपत्र दैनिक रुपात सुरु केले. १९१९ ते १९३७ या काळात महाराष्ट्रात १३७ नियतकालिके प्रकाशित होत असत.[६](कानडे, १९३८, पृ.क्र. ५०)

नाट्याचार्य खाडीलकर यांनी स्वतःचे 'नवाकाळ' हे दैनिक मुंबईतून ७ मार्च १९२३ रोजी सुरू केले. १९८० च्या दशकात 'नवाकाळ' हे दैनिक मुंबईतून अफाट लोकप्रिय केले. १९९० च्या दशकात त्याचा खप तीन लाखावर गेला होता. 'नवाकाळ', 'संदेश' या वृत्तपत्रांच्या पाठोपाठ मुंबईतून 'प्रभात' हे वृत्तपत्र पांडूरंग महादेव भागवत यांनी २१ नोव्हेंबर १९२९ रोजी सुरु केले. आपले वृत्तपत्र बहुजन समाजाचे असावे अशी भागवत यांची इच्छा होती. त्यांच्या इच्छेप्रमाणे हे वृत्तपत्र चालविण्याचा आणि लोकप्रिय करण्याचा प्रयत्न श्रीपाद शंकर नवरे यांनी केला. २६ नोव्हेंबर १९५० रोजी अखेरचा अंक प्रसिद्ध होऊन मुंबईतून 'प्रभात' बंद पडले.

१९३७ मध्ये ‘प्रभात‘ची पुणे आवृत्ती प्रसिद्ध होऊ लागली. या आवृत्तीची मालकी वा. रा. कोठारी यांनी १९३८ साली घेतली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी ’मूकनायक’ वृत्तपत्र सुरू केले. १९३७ मध्ये ’बहिष्कृत भारत’ वृत्तपत्र सुरू केले. १९३० मध्ये ’जनता’ आणि १९५६ मध्ये ’प्रबुद्ध भारत’ ही वृत्तपत्रे सुरु केली व ती चालविली. डॉ. आंबेडकर हे समता समाज संघात होते. या समता समाज संघाचे ’प्रबुद्ध भारत’ हे मुखपत्र होते. सुरुवातीला वृत्तपत्र सुरू करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांना अर्थसहाय्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेच्या रुपाने मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे.

समकालीन वृत्तपत्रांचा सखोल अभ्यास करुन डॉ.ना.भि. उर्फ नानासाहेब परुळेकर यांनी १ जानेवारी १९३२ पासून पुण्यात ’सकाळ’ हे वृत्तपत्र सुरु केले. ’ज्ञानप्रकाश’ च्या संचयिकांचा बारकाईने अभ्यास करुन दैनिक वृत्तपत्रात आपले वेगळेपण कसे निर्माण करता येईल याचा विचार परुळेकर यांनी केला. ते ’सकाळ’ चे संस्थापक संपादक होते. मात्र १९३६ ते १९५२ या काळात रा. ब. उर्फ बाबासाहेब घोरपडे या दैनिकाचे संपादक होते. ’सकाळ’ पासून मराठी वृत्तपत्रसृष्टीत एक नवे पर्व सुरु झाले.[७](अकलुजकर, १९८८, पृ.क्र. ८८) सकाळच्या पाठोपाठ पुण्यात ’त्रिकाळ’ हे दैनिक १९३५ साली निघाले. सकाळ मधून बाहेर पडलेले शि.ल. करंदीकर यांनी हे वृत्तपत्र सुरु केले. परंतु ते अल्पावधीतच बंद पडले. ’काळ’ हे वृत्तपत्र कट्टर हिंदुत्ववादी शं.रा. करंदीकर उर्फ मामाराव दाते यांनी १९४० साली काढले. १९३५ साली ‘लोकशक्ती‘ हे द्विसाप्ताहिक पुण्यातून प्रकाशित होऊ लागले. १९१७ ते १९५० या काळात ‘लोकहित‘, ‘लोकमत‘, ‘नवभारत‘, ‘अग्रणी‘ ही वृत्तपत्रे प्रसिद्ध होऊ लागली.[८](कित्ता, पृ.क्र. ८८)

‘इंडियन न्यूजपेपर सोसायटी‘ नवी दिल्ली यांच्या अहवालात महाराष्ट्रात ३५ मराठी दैनिके, १५ हिंदी दैनिके, १५ इंग्रजी दैनिके, ५ गुजराती दैनिके, एक तमीळ व एक कन्नड भाषेत दैनिक असल्याचे नोंदवले आहे. ही दैनिके इंडियन न्यूजपेपर सोसायटीचे सदस्य आहेत.[९](INS Press, २०१०-११, पृ.क्र. ७२-७३१) अभिमानाची बाब म्हणजे आज रोजी मराठी पत्रकारितेचा झेंडा देशाची राजधानी दिल्ली सह गोवा, कर्नाटक राज्यातही दैनिकांच्या रुपाने रोवला गेला आहे. दिल्लीमध्ये दै. लोकमत, दै. लोकसत्ता तर गोव्यात दै. पुढारी, दै.

लोकमत, आणि कर्नाटक राज्यात बेळगावात दै. तरूण भारत व दै. पुढारी दररोज प्रकाशित होत आहे. दैनिक लोकमत, दै. सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. लोकसत्ता, दै. पुढारी, दै. पुण्यनगरी, दै. नवाकाळ, दै. आपला वार्ताहर, दै. प्रभात, दै. सामना, मुंबई चौफेर, दै. संचार, दै. सार्वमत, दै. देशोन्नती, दै. ॲग्रोवन, दै. तरुण भारत, दै. केसरी, दै. देशदूत, दै. गावकरी आदी वृत्तपत्रांनी जनमासावर आपला ठसा उमटविला आहे.

सन २०१४ च्या इंडियन रिडरशिप (IRS) च्या अहवालानुसार प्रादेशिक भाषांच्या क्रमवारीत संपूर्ण देशभरातून दैनिक 'लोकमत' चौथ्या तर दैनिक 'सकाळ' ने आठव्या स्थानावर झेप घेतली आहे. तर 'द प्रेस इन इंडिया' च्या २०१७-१८ च्या अहवालानुसार मराठी भाषेत ५४० दैनिक, १३४७ साप्ताहिक, ६७ पाक्षिक, १७९ मासिक आणि इतर सर्व प्रकारची मिळून एकूण २२४३ प्रकाशनांनी वार्षिक अहवाल सरकारकडे जमा केले आहेत. या अहवालानुसार मराठी भाषेतील सर्वाधिक खपाचे दैनिक 'सकाळ' चा उल्लेख असून त्याचा दररोजचा खप ५,९६,४२१ इतका आहे.[१०](The Press In India, २०१७-१८, पृ.क्र. ३५२)

आजच्या वेगवान युगात विकास होण्यासाठी वृत्तपत्रे आणि माहितीचे महत्त्व असाधारण आहे. याबाबत प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे म्हणतात 'Actually, information is a staple need of development and newspapers are one of the prime vehicles of development. The developed press in any region gives stimulation, motivation, inspiration and impetus to its development.'[११](गव्हाणे, १९९९, पृ.क्र. २७८) जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरणाने जग आणखी जवळ आले. सायबर युगात तर माहिती तंत्रज्ञानामुळे क्षणार्धात प्रत्येक बातमी लोकांपर्यंत पोहोचते आहे. रजिस्ट्रार फॉर न्यूजपेपर्स इन इंडिया (RNI) च्या ३१ मार्च २०१८ च्या अहवालानुसार भारतात सर्व प्रकारची एकूण १,१८,२३९ नोंदणीकृत दैनिके, नियतकालिके आहेत. संपूर्ण देशभरातून हिंदी भाषेतल्या प्रकाशनांची संख्या ४७,९८९ पहिल्या क्रमांकावर तर दुसऱ्या क्रमांकावर १४,६२६ प्रकाशनांसह इंग्रजीचा क्रमांक आहे. देशभरात या आर्थिक वर्षात सर्व प्रकाशनांचा मिळून एकूण खप सुमारे ४३,००,६६,६२९ इतका नोंदविला गेला आहे. यात खपानुसार अनुक्रमे हिंदी १९,५६,२१,९९० सह पहिल्या, इंग्रजी ५,३४,५३,५६४ सह दुसऱ्या तर उर्दू २,५२,८९,७३१ सह तिसऱ्या क्रमांकावर आहे.[१२](The Press In India, २०१७-१८, पृ.क्र. ११)

विविध प्रादेशिक भाषा असणाऱ्या भारतात सर्वाधिक खपाचे दैनिक म्हणून बंगाली भाषेतून प्रकाशित होणारे 'आनंद बाजार पत्रिका' (खप ११,१८,४४०) तर दुसऱ्या क्रमांकावर इंग्रजी भाषेतील 'संडे टाइम्स ऑफ इंडिया'(खप ८,१८,७६८) आहे.[१३](कित्ता, पृ.क्र. १२) देशपातळीवर हिंदी दैनिक 'पंजाब केसरी', मल्याळम भाषेतील 'वनीता', दै. 'जागरण', दै. 'भास्कर', 'द टाईम्स ऑफ इंडिया', 'द हिंदू', ' मल्याळम मनोरमा' आदि प्रकाशनांसह महाराष्ट्रातील दै. 'सकाळ', दै. 'लोकमत' ही आघाडीची दैनिके आहेत.

## १.३ कृषि वृत्तपत्रांचा इतिहास

भारतातील कृषि विषयक वृत्तपत्र माध्यमांचा उपयोग इ. स. १८२० मध्ये सुरु झाल्याची नोंद आहे. डॉ. विल्यम कॅरी या मिशनरी विद्वानाने 'रॉयल ॲग्री हॉर्टिकल्चर सोसायटी' नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेमार्फत काढण्यात आलेल्या पत्रिकेत शेतीची माहिती देण्यात येत होती. या संस्थेच्या संशोधन कार्यामुळे शेतीच्या क्षेत्रातील नव्या बी–बियाणांप्रमाणे नवनवीन प्रयोगांची माहिती मिळत असे.[१४](agrihorticultureindia.com, २०१६) हवामान, युरोपियन शेती आणि कृषि औजारे ही तीन पुस्तके १९ व्या शतकाच्या मध्यास प्रकाशात आली; तीच कृषि पत्रकारितेची सुरुवात असे म्हटले जाते. सर सय्यद अहमद खान यांनीही ३० मार्च १८६६ रोजी 'अलिगड इन्स्टिट्युट गॅझेट' हे शेतीविषयक माहिती प्रसारित करणारे नियतकालिक सुरू केले. या पत्रिकेत कृषि सुधारणांचे उपाय, युरोपीय अवजारांचा वापर, कापसाची शेती आदि विषयांवर लिखाण होते. त्यानंतर सन १८९० मध्ये महाराष्ट्रातील अमरावती येथील श्री गणेश नारायण धोकडे, श्री. सखाराम चिमाजी बोळे यांच्या संपादकत्वाखाली 'शेतकरी ' मासिक प्रसिद्ध झाले. ते मासिक हिंदी आणि मराठी अशा दोन्ही भाषांत होते. सन १९०० मध्ये वाराणसी येथून 'खेत खेती खेतीहार' नावाचे मासिक सुरू होते. प्रदेश सरकार तर्फे नागरपूरहून 'किसान सहकारी समाचार' १९०९ मध्ये तर त्या अगोदर सन १९०० 'किसान माला' देशसेवक प्रेसमधुन प्रकाशित होत होती.[१५](वाटाणे, १९९७, पृ.क्र. २८)

बिहार राज्यातील पाटणा येथून १९११ मध्ये श्री. गणेश दीक्षित यांच्या संपादकत्वात 'किसान मित्र' नावाचे पाक्षिक प्रकाशित झाले. सन १८६१ मध्ये 'प्लेग' च्या साथीत शेकडो जनावरे मृत्युमुखी पडली. त्यामुळे पशुचिकित्सेकडे लक्ष वेधले गेले. त्यामुळे लाहोर येथे १८८२ मध्ये पशुचिकित्सा महाविद्यालय काढण्यात आले. याच वर्षी पुण्याच्या लष्करी पशु चिकित्सा विद्यालयातर्फे 'व्हेटर्नरी सायन्स अॅन्ड अॅनिमल मॅनेजमेंट' नावाची पशु चिकित्सेविषयी पहिली पत्रिका प्रकाशित होऊ लागली. १८६०, १८७८, १८९६, व १९०१ या वर्षात पडलेल्या दुष्काळामुळे लाखो जनावरे दगावली. त्यावेळी ब्रिटिश सरकारने स्थापन केलेल्या एका कृषि आयोगाच्या शिफारशीवरून भारतीय शेतीच्या विकासासाठी ब्रिटिश कृषि तज्ज्ञांना बोलविण्यात आले. सन १८९१ मध्ये त्यांनी दिलेला अहवाल हा भारतीय कृषि विकासासाठी मैलाचा दगड ठरला. १९२९ मध्ये भारतीय कृषि अनुसंधान परिषदेची दिल्लीला स्थापना करण्यात आली. १९२० नंतर महात्मा गांधींच्या प्रयत्नांमुळे व त्यांनी सुरू केलेल्या 'हरिजन सेवक' आणि 'नवजीवन' या नियतकालिकांमधून शेतकऱ्यांविषयी लेख येऊ लागले. त्यामुळे शेतकरी हा घटक प्रकाशझोतात येण्यास मदत झाली. १९०६ मध्ये इंपिरियल अॅग्रीकल्चरल रिसर्च इन्स्टिटयुट, पुसा येथुन 'अॅग्रीकल्चरल जर्नल ऑफ इंडिया' हे नियतकालिक प्रसिद्ध केले जाऊ लागले. त्याच सुमारास पुण्याच्या कृषि महाविद्यालयातून 'शेती आणि शेतकरी' हे नियतकालिक मराठीतून प्रकाशित होऊ लागले. पुसा येथील इन्स्टिटयुटचे इंडियन कौंसिल ऑफ अॅग्रीकल्चरल रिसर्चमध्ये रुपांतर झाल्यानंतर १९३१ पासून 'इंडियन जर्नल ऑफ अॅग्रीकल्चरल सायन्सेस' ही नियतकालिके आणि खेती (१९४८), कृषि चयनिका (१९७३) व फलफूल (१९७६) ही मासिके प्रसिद्ध होऊ लागली.

काही काळानंतर या नियतकालिकांऐवजी 'इंडियन फार्मिंग' हे नियतकालिक प्रसारित करण्यात आले. सन १९५८ पासून केंद्रिय विस्तार संचालनालयाच्या माहिती विभागातर्फे 'इंटेसिव्ह फार्मिंग', 'उन्नत कृषी' आणि 'धरनी' ही मासिके प्रसिद्ध करण्यात येऊ लागली. १९३३ मध्ये बिहार राज्यातून 'कृषि परिषद किसान' हे मासिक प्रकाशित झाले. १९३६ मध्ये 'दलधर' हे साप्ताहिक तर दरभंगा येथून 'गोपालन' नामक मासिक प्रसिद्ध होऊ लागले.[१६](विदुरा, १९४७, पृ.क्र. ४६७)

१९४१ मध्ये इंदौरहून 'किसान' नावाचे पहिले कृषि दैनिक सुरू झाले. ते १८ महिने सुरु होते. १९४४-४५ मध्ये नागपूरहून 'उदयम' नावाचे मासिक प्रकाशित होऊ लागले. या मासिकात शेतकऱ्यांना उपयोगी अशी शेतीच्या विविध कामांची बरिचशी माहिती मिळत असे. अशा प्रकारे कृषिविषयक नियतकालिकांची एक लाट भारतीय भाषांमध्ये उदयास आली. सन १९६० नंतर देशात कृषि विद्यापीठे स्थापन करण्यात आली. या विद्यापीठांमार्फत निरनिराळ्या स्वरुपात कृषि माहिती व संशोधनाबाबत मजकूर प्रसारित होऊ लागला. सन १९५५ मध्ये राज्यांच्या कृषि विभागामध्ये कृषि माहिती केंद्रे स्थापन करण्यात आली आणि त्यांच्यामार्फत पुस्तके, घडीपत्रके, भित्तीपत्रके, नियतकालिके या विविध स्वरुपात माहिती प्रसिद्ध होऊ लागली. याच सुमारास खासगी संस्थामार्फत स्वतंत्रपणे नियमितपणे प्रकाशित होणारी नियतकालिके शेतकऱ्यांच्या माहितीची गरज भागविण्याचा प्रयत्न करू लागली. महाराष्ट्रातील कृषि विभागातून १९६५ पासून प्रसिद्ध होणारे 'शेतकरी' मासिक खूपच लोकप्रिय झाले. अशाचप्रकारे 'बळीराजा' 'उद्यम' यासारखी मासिकेही मोठा वाचकवर्ग टिकवून आहे.

भारतामधील कृषि विद्यापीठांवर नियंत्रण करणारी सर्वोच्च संस्था म्हणजे भारतीय कृषि अनुसंधान परिषद (I.C.A.R.) आहे. या परिषदेने ३,७०० हून अधिक ऑनलाईन नियतकालिके (Online Journals) उपलब्ध करुन दिलेली आहेत. तर महाराष्ट्रातील महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे मुद्रीत माध्यमातील २,०५२ नियतकालिकांची नोंद असल्याचे आढळून येते. याखेरीज शेतीतल्या विविध विषयांवर उपलब्ध असलेली कृषि पंढरी, पूर्वा कृषिदूत, जलसंवाद, कृषि विज्ञान, आधुनिक किसान, किसान शक्ती, कृषि उद्योग संवादिनी, कृषिपणन मित्र, कृषि जागरण, वनराई, शेतीभाती, लोकमंगल, शेती प्रतिक आदि नियतकालिके वाचायला मिळतात.[१७](पाटील, २०१९, मुलाखत) यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध कृषि विषयक नियतकालिके ही मुख्य प्रवाहातली जरी नसली तरी शेती विकासासाठी मोठी उपलब्धी असल्याचे स्पष्ट होते. शिवाय सध्याचा कृषि पत्रकारितेचा विषयकेंद्रीत आवाका लक्षात येऊ शकतो.

शेती विषयक घटना, बातम्या, तंत्रज्ञान, योजना, यशकथा, समस्या आणि त्यावरील उपाय, धोरण, पाऊसपाणी, हवामान, बी बियाणे, बाजारभाव, जाहिराती, आंदोलने, कीड व्यवस्थापन, नविन संशोधन, प्रश्नोत्तरे, भाषणे, मुलाखती, संवाद आदि कृषि विषयक

मजकुराला मोठ्या प्रमाणात स्थान असल्याचे पहायला मिळते. येथील जमिनीचे प्रकार, मातीचे नमुने, पिके, पर्यावरण, तापमान यात विविधता दिसते. त्यामुळे कृषि क्षेत्राशी संबंधित बातम्या, माहिती हा केवळ शेतकऱ्यांचाच विषय नाही तर सर्वांचाच होतो. त्यामुळे व्यावसायिक धोरण म्हणा अथवा गरज असल्याने जवळपास सर्वच दैनिके व नियतकालिके शेतीविषयक मजकूर प्रसिद्ध करतात. स्थानिक व प्रादेशिक वृत्तपत्रे आठवड्यातील एक दिवस आपले संपूर्ण एक अथवा अर्धे पान मजकूर कृषिजागर, कृषिमत, शेतशिवार, कृषकोन्नती, शेतीवाडी अशा प्रकारच्या पुरवण्यांद्वारे माहिती देतात. सरकारी व खासगी क्षेत्रातील अनेक नियतकालिके महाराष्ट्रात वितरीत होतात. त्यात प्रामुख्याने शेतकरी, बळीराजा, श्री सुगी, आपली शेती, हंगाम, कृषिविकास, किसानशेती, शेतकरी शिक्षणमाला, प्रियदर्शनी, योजना, कृषिपणन, अन्नदाता, पशुसेवा, द्राक्षवृत्त, डाळिंबवार्ता, गोडवा, आदर्शगाव,  धान्यलक्ष्मी, शरद कृषि, शेती प्रगती, उद्योजकता, कृषि व्यासपीठ, महाबीज वार्ता, कृषिदर्शनी आदींचा समावेश होतो.

## १.४ मराठी कृषि पत्रकारिता आणि वर्तमान स्थिती

भारतामधील कृषी क्षेत्राबाबत प्रा.वेंकटेस्वरलु व रमण असे म्हणतात की, India is a vast country with wide diversities in land forms, soil types, vegetation and eco-systems, temperature, rainfall over 329 million hectares, about 43 percent is currently under cultivation with a vide variety of crops and which are seasonal, region specific and showing wide variations in their productivity.[१८] (वेंकटेस्वरलु के. व रमन के. व्ही., १९९३, पृ.क्र. १) म्हणजेच भारत हा विविधतेने नटलेला कृषिप्रधान देश आहे. येथील जमिनीचे प्रकार, मातीचे विविध नमुने, येथील पीक, पर्यावरण व्यवस्था, तापमान या सर्वात विविधता दिसते. भारतामधील ३२९ दशलक्ष हेक्टर जमीन लागवडीखाली असून हे प्रमाण उपलब्ध जमिनीच्या ४.३% एवढे आहे.

भारतीय शेती आणि शेतकरी इतिहासात व वर्तमानातही अनेक आव्हानांना सामोरा जात आहे याचे प्रतिबींब रोजच पत्रकारितेत उमटत आहे. लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्यलढ्यासाठी सुरु केलेल्या केसरीसह सकाळ, सामना, महाराष्ट्र टाईम्स, तरुण भारत, लोकमत, पुढारी, देशोन्नती, मराठवाडा, संचार, पुण्यनगरी, रत्नागिरी टाईम्स, सामना आदि

सर्वच दैनिक प्रकाशने कृषि विषयक बातम्या, लेख, संपादकीय, माहिती, जाहिरातीचा मजकूर दररोज प्रकाशित करीत असतात. शेतीसाठी भारतातले पहिले मराठी कृषि दैनिक 'ॲग्रोवन'च्या रुपाने सकाळ माध्यम समुहातर्फे मंगळवार दि. १९ एप्रिल २००६ रोजी प्रकाशित झाले. त्यात शेतीशी निगडीत विषयांवर मार्गदर्शनपर माहिती मोठ्या प्रमाणात मिळते. दिवसेंदिवस ग्रामीण व शेती क्षेत्रातील बातम्यांना प्राधान्य मिळत आहे. ग्रामीण क्षेत्रातील वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यांची रुची असणाऱ्या बातम्या वृत्तपत्रांनी देणे अपरिहार्य आहे. याकरता वृत्तपत्रे अशा बातम्यांचे संकलन व प्रसारण करीत आहेत.

मराठी कृषि पत्रकारिता ही मुद्रीत साहित्याबरोबरच नभोवाणी व दूरचित्रवाणी माध्यमातही केली जाते. यासाठी स्वतंत्र विभाग सुरू आहेत. सरकारने अनेक वर्ष दुरदर्शन वर 'आमची माती, आमची माणसं' या शेतीविषयक कार्यक्रमातून बदल घडवण्याचा प्रयत्न केला. E-TV मराठी वरील 'अन्नदाता', ABP माझा वरील 'सात बाराच्या बातम्या', झी २४ तासचे 'पिकपाणी', TV-९चा 'ॲग्रोहिरो' आदि शेतीविषयक कार्यक्रम चांगला TRP राखून होते. सरकारच्या मदतीने चालणाऱ्या कृषि विज्ञान केंद्र बारामती येथून 'वसुंधरा' तर राहाता तालुक्यातील 'प्रवरा' या कम्युनिटी रेडिओ मार्फतही अनेक प्रकारच्या शेती विषयक कार्यक्रमांचे प्रसारण केले जाते. कृषि पत्रकारितेच्या माध्यमातून शेतीमध्ये नवीन बदल करणे शक्य होऊ शकतात. संशोधन केंद्रातील संशोधन व शेतीचे तंत्र सविस्तरपणे मांडून एका वेगळया पीक पध्दतीचा अवलंब करणे, जोडधंदा म्हणून शेळीपालन, गोपालन, कुक्कुटपालन, मत्स्यपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी व्यवसायांमध्ये उत्पादनात वाढ करणे कृषि पत्रकारितेमुळे शक्य आहे. सुनील माळी यांच्या मते सरकारी कृषि बँकांचे वृत्तांकन करताना व्यापारी बँकाचे काही नियम आणि निकष लावावे लागतात. पण त्याचबरोबर आपल्या वाचकांच्या काही खास गरजाही पुरवाव्या लागतात. सहकारी बँकांचा ग्राहक असलेला आपला वाचक बऱ्याचदा ग्रामीण भागातील असतो आणि त्याला बँकांच्या कारभाराविषयी माहिती हवी असते. आपण गुंतवणूक करीत असलेल्या या बँकांची आर्थिक स्थिती कशी आहे याची माहिती ग्रामीण वाचकाला द्यावी लागते. पीक कर्ज, शेती अवजारे, कर्जाच्या नव्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे.[१९](माळी, २००८, पृ.क्र. २११)

कृषि संशोधकाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांच्या समस्या कृषि संशोधकांपर्यंत पोहोविण्यासाठी कृषि वृत्तपत्रे काम करीत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतीतील समस्या, कीड नियंत्रण, लागवड, फवारणी, कोणत्या पीक पध्दतीचा अवलंब करावा, कमी पाण्यावर, जलसिंचनावर भरघोस उत्पादन देणाऱ्या जाती कोणत्या इत्यादींबद्दल जाणून घेण्यासाठी शेतकऱ्यांना शेतकरी आणि कृषि संशोधक यामधील दुवा म्हणून कृषि वृत्तपत्रे प्राधान्य देत आहेत. देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. शेतीतील उत्पन्न कमी होत आहे. तसेच पुरामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. ओला–कोरडा दुष्काळ पडला, अवकाळी पाऊस आदि समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ हवे आणि त्या समस्या सोडविण्यासाठी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कृषि वृत्तपत्रे लक्ष देत आहेत. भारतातील कृषि घटक देशाचा आर्थिक कणा समजला जातो तेव्हा अन्नधान्याची समस्या सोडविण्यासाठी व उत्पन्नात वाढ करण्यासाठी तसेच उत्पन्न वाढवून निर्यातीचा दर वाढवून देशाच्या आर्थिक उत्पन्नात भर घालण्यासाठी कृषि वृत्तपत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

पारंपरिक व उदरनिर्वाह शेती पध्दत बदलून नगदी पिकांचा स्वीकार, बागायती शेती करुन आर्थिक उन्नती साधणे, तसेच कमी गुंतवणूक व कष्टात भरघोस उत्पादन मिळवून ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय विकास साधून ग्रामीण जीवन उंचावण्यामध्ये कृषि पत्रकारिता महत्त्वपूर्ण ठरत आहे. याबाबत डॉ. सदानंद देशमुख म्हणतात शेतीचं तंत्र झपाट्याने बदलत चाललंय. अमेरिका, चीन, जपान आणि आणखी काही देशात आता जमिनीवरची आणि आभाळाखालची शेती बंद होऊन वातानुकूलित क्षेत्रात उभी शेती केली जात आहे. जमिनीची आडवी वाढ होऊ शकत नाही, म्हणताना जमिनीला उभं करुन एकाच एकराच्या क्षेत्रात दहा एकराची शेती केली जाणार. आणखी पंधरा वीस वर्षांनी तिचा झपाट्याने प्रसार होईल. फवारणी करायचं काम नाही. पाणी द्यायच काम नाही. पाऊस पडो अथवा न पडो, दुष्काळाचं नामोनिशान राहणार नाही.[२०](ॲग्रोवन, २०१७, पृ.क्र. १५)

पत्रकारांनी या प्रकारची ताजी माहिती घेऊन ती प्रत्यक्ष शेतकरी, वाचकांपर्यत पोहोचविली असता ही माहिती त्यांना निश्चितपणे पूरक व पोषक ठरु शकते. भारताने जागतिकीकरण स्वीकारले आणि शेतकऱ्यांना नकळतपणे जागतिक स्पर्धेत ढकलले आहे. तेव्हा गहू महागले म्हणून गहू आयात होतो, तेव्हा देशातील गहू उत्पादकाने काय करावे ? अशा वेळी

जागतिक बाजारपेठेत कशास मागणी आहे.? इत्यादी बाबींचा अभ्यास करुन कमी खर्चात अधिक उत्पादन अशा पध्दतीचा वापर करुन जागतिक बाजारपेठेत स्वतःला सिध्द करणे क्रमप्राप्त आहे. हे सहजतेने व्हावे यासाठी कृषि वृत्तपत्रांचे लेख, बातम्या आदी द्वारे उपाय शेतकऱ्यांसमोर मांडले आहे. वरील बाबीनुसार कृषिचा सर्वांगीण विकास साधून ग्रामीण जीवनस्तर उंचावण्यासाठी तसेच शाश्वत कृषि करण्यासाठी कृषि पत्रकारितेने मराठी कृषि वृत्तपत्रांचे बदलते चित्र पाहिले आहे.

मोठ्या प्रमाणात खेडयांचा देश असलेल्या भारतात सर्वाधिक जनजीवन हे कृषि क्षेत्राशी निगडीत आहे. ग्रामस्तरावर काम करणारे कार्यकर्ते, शेतीकरता झटणाऱ्या सहकारी संस्था व इतर कृषि कार्याशी संबंधित लोकांना कृषिक्षेत्रातील तंत्रज्ञान कळविण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे प्रसिध्दी देण्याची गरज औद्योगिक संस्थांचे व्यवस्थापक, कंत्राटदार, ग्रामपंचायत यांच्यावर येते. अशा तऱ्हेने हजारो कार्य करणाऱ्या लोकांना प्रसिध्दीची गरज आहे. याकरता त्यांना पब्लिक रिलेशन एक्सपर्ट वर अवलंबून राहावे लागते. बऱ्याच अंशी ही प्रसिध्दी त्यांचे प्रसिध्दी माध्यमांशी चांगले संबंध असण्यावर अवलंबून आहे. याकरता वृत्तपत्रात जागा, टीव्ही आणि रेडिओवर त्या बातम्या सांगायला वेळ मिळाला पाहिजे. शेती हे सुधारण्याचे माध्यम आहे. याबाबत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे म्हणतात की भारतीय ग्रामजीवन हे शेतीवर आधारलेले आहे. कृषीवर आधारित रोजगार निर्माण केला तर स्थलांतर कमी होऊ शकेल.[२१](गुप्ता, १९९९, पृ.क्र. ११) त्यामुळे शहरी भागात होणारा वृत्तपत्रांचा खप जरी मोठा असला तरी कृषि क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी प्रसारमाध्यमांची मोठी जबाबदारी नाकारता येणार नाही.

भारतामध्ये राहणारा शेतकरी हा बहुसंख्येने ग्रामीण भागातला असल्यामुळे त्याला DTH आणि केबलच काय तर रेडीओ साठी रेंज मिळणे अवघड आहे. भारनियमन ही देखील मोठी समस्या आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी कितीही प्रगती केली तरी मुद्रित तथा वृत्तपत्र माध्यम हे तुलनेने कमी खर्चिक असल्याचे स्पष्ट होते.

कृषि संवाद तथा कृषि पत्रकारिता ही संकल्पना कृषि शास्त्राच्या प्रसार आणि प्रचारावर आधारलेली आहे. कोणतेही कृषि संशोधन हे प्रयोगशाळेपासून शेतकऱ्यांपर्यंत पोहचले जाते तेव्हा त्यास कृषि विस्तार म्हटले जाते. शेती, शेतकरी आणि कृषि संशोधन संस्था यांच्यामध्ये

दुवा साधण्याचे काम कृषि पत्रकारिता करीत असते. कृषि संवाद ही संकल्पना स्पष्ट करताना ट्रिस म्हणतात, Agricultural communication is a field of study and work that focuses on communication about agricultural related information among agricultural stakeholders and between agricultural and non agricultural stakeholders. It is done formally and infromally by agricultural extention and is considered a subject of science communication. However, it has evolved into its own professional field.[२२](Treies आणि weigold, २००२, पृ.क्र. ३२२) याचा अर्थ असा की, कृषि संवादामध्ये विविध प्रकारचे कृषि क्षेत्रातील भागधारक व त्यांच्यातील संवाद अभिप्रेत असतो. कृषि क्षेत्रातील नवनवे बदल आणि कृषि संशोधन केंद्राने विकसित केलेले नवीन कृषितंत्र व साधने यांची माहिती वेळोवेळी शेतकऱ्यांना देणे, शेतकऱ्यांचे व्यावहारिक अनुभव संशोधन केंद्रास आणि सरकारला सांगणे अशी दुहेरी भूमिका कृषिपत्रांना निभवावी लागते. तसेच कृषि वृत्तपत्रे शेतकऱ्यांची तांत्रिक कौशल्ये वाढवून कृषि उत्पन्नवाढ करण्यास प्रवृत्त करतात. मराठी वृत्तपत्रे या दृष्टीने महाराष्ट्रात कृषि क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत आहेत. डॉ. सुधाकर पवार यांच्या मते कृषि वार्ता हा केवळ शेतकऱ्यांचा विषय नाही तर सर्वांचा विषय होतो. पाणी जमीन, जंगल व हवेचे प्रदुषण सारेच सध्या वाढले आहे.[२३](पवार, २०१७, पृ.क्र. १) तेव्हा शेती, शेतकरी आणि पर्यायाने ग्रामीण जीवन स्तर सुधारण्यासाठी, देशाचा आर्थिक दर वाढवण्यासाठी व भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेत स्वतःचे स्थान टिकविण्यासाठी कृषि पत्रकारितेचे महत्त्व अमुल्य आहे. जोपर्यंत कृषिविषयक संशोधन हे सामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही तोपर्यंत कृषि विस्तार घडू शकत नाही. ज्ञान, माहिती आणि शहाणपण तसेच कौशल्य जर शेतकऱ्यांपर्यत पोहचविले, तरच कृषि पत्रकारिता स्वच्छ अर्थाने सफल होऊ शकते. पत्रकारितेद्वारा कृषि क्षेत्रातील संवाद हा वेगवेगळया विषयांतून होणे आजच्या वर्तमानस्थितीत मराठी कृषी पत्रकारितेची अपरिहार्य गरज आहे.

## १.५ दैनिक ॲग्रोवन

सकाळ माध्यम समुहातर्फे भारतातले पहिले कृषि दैनिक 'ॲग्रोवन' च्या अंकाचे प्रकाशन मंगळवार, दि. १९ एप्रिल २००५ रोजी पुणे येथे भारताचे केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार,

महाराष्ट्राचे कृषिमंत्री बाळासाहेब थोरात आणि प्रसिध्द ग्रामीण कवी ना. धो. महानोर यांच्या उपस्थितीत झाले. तत्पुर्वी १८ मार्च २००५ रोजी अॅग्रोवन या कृषि विषयक संकेतस्थळाचे उद्‌घाटन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते करण्यात आले.[२४](कर्वे, २००५, पृ.क्र. १४८) दैनिक आणि वेबसाईट या दोन्हींची जबाबदारी निशिकांत भालेराव यांनी स्विकारली.

अॅग्रोवन या संपूर्ण कृषि विषयक दैनिकामुळे मराठी भाषेतून शेतीच्या बातम्या, माहिती मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या. यामुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात नव नवीन भर पडू लागली. त्यामुळे अनेक शेतकरी याचा वापर शेती करताना करु लागले. शेती हा मुख्य व्यवसाय असलेल्या भारत देशात कृषि पत्रकारिता ही नवीन ज्ञान सेवा आहे. तिची बैठक स्वतंत्र वृत्तपत्रामधून होत आहे. वृत्तमुल्य म्हणजे नेमक्या कोणत्या घटकांची एखादी घटना म्हणजे बातमी होते. त्याला वृत्तमुल्य म्हणतात.[२५](माळी, २००८, पृ.क्र. १२१) शेतीमुळे मानवाच्या अन्नधान्य, भाजीपाला व दुधाची गरज ही पुर्ण होत असते. कृषि क्षेत्रातील सर्व प्रकारच्या घडामोडी, हवामान, पाणी, दुष्काळ, खते, पुरक उद्योग, शेतमालाच्या समस्या, उत्पादनासाठी लागणाऱ्या विविध निविष्ठा, मोसमी पाऊस, कमी उत्पादकता, शेतीमालाच्या बाजारभावात होणारी लुबाडणूक, कर्जमाफी, नापिकी, कृषिपूरक उद्योग, नद्या–धरणे पीककर्ज, खाजगी सावकारकीचा जाच आदींचा समावेश ही या प्रकारच्या बातमीदारीत करावा लागतो. त्यामुळे अशा प्रकारच्या बातम्यांना प्राधान्य देण्यासाठी स्वतंत्र दैनिक निश्चितच वरदान ठरते.

दैनिक 'अॅग्रोवन' हे देशातील पहिले मराठी कृषि दैनिक आहे. कृषि विकासासाठी धडपडणाऱ्यांमध्ये काही शासकीय संस्थाच दिसतात. खाजगी क्षेत्रातील व्यक्ती, संस्था यांनी याबाबत क्वचितच पावले उचललेली दिसतात. मात्र सकाळ पेपर्स प्रा. लि. ने दैनिक 'अॅग्रोवन' च्या माध्यमातून मराठी पत्रकारितेच्या विश्वात मोठी झेप घेतली आहे. टॅब्लॉईड (अर्धदैनिक) आकाराचे हे सोळा पानी रंगीत वृत्तपत्र केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर देश–विदेशात प्रगत शेती, नवे तंत्रज्ञान, संशोधन, पीक पद्‌धती, जोडधंदे, निर्यातीसाठीचे नियम, शेतमालाच्या बाजारपेठेची खबरबात, शेतीतज्ज्ञांचे मार्गदर्शन, हवामानाचा अंदाज आणि त्यानुसार कृषि सल्ला, राज्यातील बाजार समित्यांमधील दैनंदिन आवक आणि भाव, राज्यभरातील विविध कृषि विद्यापीठांचे प्राध्यापक, शास्त्रज्ञ यांचे अभ्यासपूर्ण लेख, विविध प्रकारचे धान्य, पिके, विदेशी भाजीपाला, फुलोत्पादन, दूध, पोल्ट्री, शेळी–मेंढीपालन, मशागत, कीड रोग नियंत्रण

अन्नद्रव्य व्यवस्थापन, शेतकरी आंदोलने आदि असंख्य विषयावर सर्व प्रकारची माहिती ‘ॲग्रोवन‘ या पत्रातून दिली जाते.

दैनिक ‘ॲग्रोवन‘ ची टॅगलाईन ‘मित्र ग्लोबल शिवाराचा‘ अशी आहे. या वृत्तपत्रासाठी बारकाईने केलेला अभ्यास आणि सकाळ माध्यम समुहाचे परिश्रम यातून हे दैनिक सहा महिन्यातच यशस्वी झाले. नवनवीन तंत्रज्ञान वापर करून जागतिक स्पर्धेच्या आव्हानात शेतकरी आर्थिकदृष्ट्या आणखी सक्षम होण्यासाठी ‘ॲग्रोवन‘ प्रयत्नशील आहे. वाचकांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दैनिक ‘ॲग्रोवन‘ ने कृषिवर आधारित तज्ज्ञांच्या लेखमालेस पुस्तकरुपी मांडले आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरणारी अनेक पुस्तके प्रकाशित केली आहे. उदा.

१) डाळींब शेतीचे यशस्वी मंत्र – (लेखक : सुधीर सोनवणे)

२) पिकांसाठी विक्रम – २ ब्रिकेट्स – (लेखक : कृषिरत्न डॉ. एन. के. सावंत)

३) कृषि ज्ञानमालेतील सकाळ ॲग्रोवन गाईड (संपादक : आदीनाथ चव्हाण)

ताज्या माहितीमुळे या उपक्रमांना मोठा प्रतिसाद मिळाल्याने अनेक पुस्तकांच्या तर अल्पावधीतच आवृत्त्या काढाव्या लागल्या. त्यावरुन ‘ॲग्रोवन‘ची विश्वासार्हता अधिक ठळकपणे पुढे आल्याचे दिसते. शेतीवर उपजीविका असणाऱ्या मोठ्या वर्गात लोकप्रिय होणे सोपी गोष्ट नाही. आजमितीस दैनिक ‘ॲग्रोवन‘च्या महाराष्ट्र राज्यात पुणे, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, जळगाव, नांदेड, अकोला येथून आवृत्त्या प्रसिद्ध होतात.

### **१.५.१ दै.ॲग्रोवनच्या पानांवरील मजकूर**

दैनिक ’ॲग्रोवन’च्या अंकात पहिल्या पानावर ४८ बाय ५० स्क्वेअर सेंटीमीटर चौकोनात टायटल ॲग्रोवन सह उपग्रह छायाचित्राखाली ’गुरुवार (ता. २९) दुपारी ३.३० वाजता उपग्रहाद्वारे टिपलेले छायाचित्र’ अशा फोटो ओळी आहेत. तर मुख्य बातमी ’तेहेतीस लाख शेतकऱ्यांना थेट लाभ’ या मथळ्याखाली मुख्य बातमी देण्यात आली आहे. तर ’गोरक्षा म्हणजे लोकांचे जीव घेणे नव्हे’ ही पंतप्रधान मोदी यांच्या बातमीला दुसऱ्या क्रमांकाचे स्थान आणि जागा देण्यात आली आहे. सर्वाधिक जागा स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज् लिमिटेड या खते

बनविणाऱ्या कंपनीच्या महाधन या उत्पादनाची जाहिरातीसाठी आढळून येते.[२६](ॲग्रोवन, २०१७, पृ.क्र. १) एकंदरीतच पान एकवरील सर्वच मजकूर हा कृषि विषयासाठी दिलेला आहे. बी–बीयाणे, खते, औषधे, दर्जेदार पीक, पिकावर रोग पडला, पिकावर रोगराईची लागण, शेतीविषयक नवे प्रयोग, हवामानविषयक बातम्या, कृषि विद्यापीठातील बातम्या, जाहिराती आदी सर्वच विषयांच्या बातम्या पान एकवर दिलेल्या आढळतात. पान दोनवर देश–विदेश या शीर्षकाखाली भारतातील इतर राज्यातल्या बातम्या आणि माहिती दिली जाते. पान तीनवर महा–ॲग्रो नावाने सहकार, अर्थविषयक, ॲग्रो इफेक्टच्या बातम्यांसह जाहिराती दिलेल्या असतात. पान चार हे राज्य नावाने असून यात महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील बातम्या प्रसिद्ध केलेल्या आढळतात. पान पाचवर प्रादेशिक या नावाने शेतीविषयक आंदोलने, इतर समस्या, जाहिराती आहेत. पान सहा ॲग्रो विशेष प्रासंगिक लेख, छायाचित्रे तसेच हास्यवन नावाने व्यंग्यचित्रे दिसतात.

दैनिक 'ॲग्रोवन' चे संपादकीय पान हे अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाते. यासाठी पान सातवर जागा दिलेली आहे. 'जैवतंत्र विज्ञान व कोरडवाहू शेतीतील आत्महत्या', 'शेतकरी लुटीचे गतीशास्त्र'[२७](ॲग्रोवन, २०१५, पृ.क्र. ७) 'ॲग्रिक्रॉस व्हा', 'बोगस खतांची कीड', 'खतांची भेसळ', 'गोल्डनबीनवर भारी पांढरे सोने', 'ऐतिहासिक कर्जमाफी की फसवणूक?', 'यांत्रिकीकरण नव्हे; शेतीला वरदान', 'मॉन्सून समजून घेऊया... ', 'भारत अमेरिकेच डंपिंग ग्राऊंड आहे का? ' अशा प्रकारचे एकापेक्षा एक सरस, अभ्यासपूर्ण आणि सणसणीत अग्रलेख व विशेष मजकूर संपादकीय पानावर आहे. तर आठ आणि नऊ या दोनही पानांवर ॲग्रो स्पेशल' या सदराखाली शेती आणि शेतकरी यांच्या प्रेरणादायी यशकथा छायाचित्रांसह मांडल्या आहेत. विविध विषय, सखोल माहिती, समर्पक छायाचित्रे, पानांची मांडणी आणि संबंधित यशकथेतील व्यक्तींचे संपर्क क्रमांक दिल्याने वाचकांना थेट संपर्क करुन अधिकची माहिती घेणे शक्य होते.

ॲग्रो गाईड या पान क्रमांक दहावर 'ॲग्रोगाईड' हवामान, कृषि सल्ला, जीआय मानांकन ही माहिती वृत्तमालिकेद्वारे देण्यात आलेली आहे. तर पान क्रमांक अकरा व बारावर 'ॲग्रोप्लस' कृषि विज्ञान केंद्र आणि कृषि विद्यापीठातील संशोधक, शास्त्रज्ञ, प्राध्यापक यांनी लिहिलेले विविध विषयांवरील लेख आहेत. पान क्रमांक तेरावर 'बाजारभाव'असून त्यात राज्यातील सर्व

प्रकारच्या शेतीमालाच्या बाजारभावाची माहिती आहे. पान क्रमांक पंधरावर म्हणजे 'फुलोरा' करिअर कट्टा, पंचांग, पाककृती, भविष्य, सकाळ समुहाचाच भाग असलेल्या साम टीव्हीवरील कार्यक्रमाची माहिती, देवदास पोटे यांचे 'संतसंग' सदर इत्यादी मजकूर आहे. त्या जोडीनेच लहू काळे यांचे 'चकाट्या' नावाचे मार्मिकपणे भाष्य करणारे व्यंगचित्र वाचकांना हसवते तर कधी भावनाप्रधान करते. तर शेवटचे पान क्रमांक सोळा हे महा–राजकारण नावाने शेती व शेतकरी यांच्यासंदर्भातील राजकारणावर भाष्य, निवेदने, आंदोलने, कार्यक्रम, मेळावे आदिंमधील चालू घडामोडींवर आधारीत मजकूर प्रकाशित केला जातो. 'शेतकरी कर्जमाफी संदर्भात दोन जुलैपर्यंत प्रश्न पाठविण्याचे आवाहन– मी मुख्यमंत्री बोलतोय', 'कर्जमाफीमुळे जिल्हा बँकेला मिळणार नवसंजीवनी–कृषीमंत्री पांडूरंग फुंडकर' आणि 'फसव्या कर्जमाफीचा मुख्यमंत्र्यांना जाब विचारणार–खासदार राजू शेट्टी [२८](ॲग्रोवन, २०१७, पृ.क्र. १६) अशा प्रकारच्या सत्ताधारी व विरोधकांच्या बातम्या व जाहिराती प्रसिद्ध केलेल्या आढळतात. याशिवाय मऱ्हाटी मुलखात, शिवार, डायरी, मार्केट, गजरा, घरदार, ॲग्रोगप्पा, खळं, घडामोडी अशा नावांनी पानांची मांडणी देखील आढळते.

गेल्या तेरा वर्षाहून अधिक काळापासून राज्यभर विविध उपक्रम 'ॲग्रोवन' ने सातत्याने राबविले आहेत. 'ॲग्रोवन' सरपंच महापरिषदेमुळे सहा हजार सरपंचांना प्रशिक्षित करण्याची कामगिरी 'ॲग्रोवन' ने पार पाडली. राज्यस्तरीय व राष्ट्रीय पातळीवरील 'ॲग्रोवन' ची कृषि प्रदर्शने, देश–विदेशातील आधुनिक शेतीचा मंत्र देण्यासाठी 'ॲग्रोवन'च्या शेतकरी सहली असोत की शेतीमधील खऱ्या आदर्शांना समाजासमोर आणणारा 'ॲग्रोवन स्मार्ट शेतकरी पुरस्कार' असो, यातून शेतकऱ्यांना सतत उभारी मिळाली आहे. पत्रकरिता व शेती यातील अनोखा मिलाफ ठरलेल्या 'ॲग्रोवन' ने ८० हजाराहून अधिक पानाची निर्मिती केली आहे. अर्थात ही पाने म्हणजे शेती आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीचा इतिहास ठरला आहे. कृषिविषयक सखोल माहिती आणि शेतीमधील व्यथांची बारकाईने मांडणी केल्यामुळे 'ॲग्रोवन' अल्पवधीतच शेतकऱ्यांचा आवाज बनला आहे. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी वारंवार घेतलेल्या संघर्षाच्या भूमिकेमुळे ग्रामसभेपासून ते विधीमंडळापर्यंतच्या चर्चेत 'ॲग्रोवन' ला मानाचे स्थान मिळाले आहे. त्यामुळे अनेकवेळा महाराष्ट्राची विधानसभा, विधानपरिषद दणाणली. त्यातून अनेकदा शेतकरी व शेतकरीभिमुख निर्णय सरकारला घ्यावे लागले आहेत.

'केवळ दैनिक नव्हे तर महाराष्ट्रातील प्रगतीशील शेतकऱ्यांची चळवळ' 'महाराष्ट्रात कृषि विस्ताराचे अजोड कार्य' 'महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात मोलाचे योगदानाबद्दल' असा गौरवपूर्ण उल्लेख करीत नवी दिल्ली येथे एफॅक्स या संस्थेने राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट प्रसारमाध्यम पुरस्कार सोहळयात सर्वोत्कृष्ट वृत्तपत्रासाठी सुवर्णपदक देऊन सन्मान करण्यात आला.[२९] (corporate.agrowon.com, २०१०) यानंतर 'ॲग्रोवन' कडून शेतकऱ्यांसाठी करण्यात येत असलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल थेट 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्स' ने एप्रिल २०१३ ला घेतली आहे. यावर सकाळ माध्यम समुहाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणतात की देशातील, राज्यातील ६० टक्के जनता शेतीवर अवलंबून असली तरी या मोठ्या घटकासाठी कोणतेही स्वतंत्र प्रसिद्धी माध्यम नाही हे लक्षात घेऊन 'ॲग्रोवन' ची सुरुवात करण्यात आली. गेल्या आठ वर्षात 'ॲग्रोवन' ने शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यात मोलाचा वाटा उचलला आहे. केवळ देशातीलच तर हे जगातील एकमेव कृषी दैनिक असावे. म्हणून पुढच्या टप्प्यात 'ॲग्रोवन'ची 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स' मध्ये नोंद करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार आहोत.[३०] (corporate.agrowon.com, २०१३) महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात शेतीवर उपजीविका असलेला वर्ग आहे. गाढवासारखी मेहनत करुन शेतकऱ्यांच्या पदरी निराशा पडण्याचे प्रकार होतात. असे होऊ नये यासाठी सर्व प्रकारच्या विषयांचा समावेश असलेले शेतीशी निगडीत लेख, बातम्या, जाहिराती, शिक्षण आदिंमुळे योग्य मार्गदर्शनाची गरज 'ॲग्रोवन'मुळे भागवली जात आहे.

### १.५.२ इंटरनेटवरील दै.ॲग्रोवन

दैनिक 'ॲग्रोवन' इंटरनेट वरून दररोज www.agrowon.com,www.corporate.agrowon.com आणि www.epaper.agrowon.com या संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आला. यशोगाथा, ॲग्रोमनी, टेक्नोवन, कृषि प्रकिया, संपादकीय, ॲग्रोगाईड, पावसाचा अंदाज, ॲग्रो विशेष, कृषिपूरक, ग्रामविकास, महिला, कृषि शिक्षण, शासन निर्णय, ताज्या घडामोडी, हवामान, फोटो गॅलरी, शेती विषयक कायदे, कृषि सल्ला, जाहिराती बरोबरच व्हिडीओ गॅलरी, प्रश्न तुमचे उत्तर तज्ज्ञांचे, Talk Of the Town,

आपले मत, सतत बदलणाऱ्या बाजारभावाचे रनिंग स्क्रोल आदि वैशिष्ट्यपूर्ण माहिती पहायला मिळते. 'ॲग्रोवन ब्लॉग' ला राज्यात चांगला प्रतिसाद मिळाला आहे. समाज माध्यमातही फेसबूकवर Agrowon-Mitra Global Shivaracha या पेजला १,८४,६२४ लाईक्स मिळालेले दिसतात. [३१](facebook, २०१९) एकविसाव्या शतकातील आधुनिक उच्च तंत्रज्ञान वापरुन अधिक सक्षमरीत्या शेतीविषयक मजकूर सकाळ माध्यम समुहाने जगभरातल्या मराठी वाचकांसाठी उपलब्ध करुन दिला आहे.

## १.६ मराठी कृषि पत्रकारितेचे भवितव्य

शेतीचे पारंपरिक स्वरुप बदलून जसजसे त्यास आधुनिक शास्त्रीय स्वरुप येत जाईल तसेतसे कृषि पत्रकारितेचे महत्त्व वाढत जाणार आहे. साक्षरतेचे प्रमाण मुख्यतः शहरामध्ये जास्त असल्यामुळे पत्रकारिता शहराभिमुख असायची. साक्षरतेचे वाढलेले प्रमाण, वाढलेली दळणवळणाची साधने आणि मुद्रित साहित्याबरोबरच इंटरनेट, समाजामाध्यमे, श्राव्य आणि दृक–श्राव्य साधनांचा संज्ञापनासाठी होणारा वाढता वापर यामुळे पत्रकारिता शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. शेती विकासामध्ये प्रसार माध्यमांची भूमिका स्पष्ट करताना प्रा. रमेश जैन म्हणतात की, कृषि पत्रकारितेचे विकासात महत्त्वाचे स्थान आहे. ही पत्रकारिता देशाच्या सर्वांगीण विकासाला पोषक अशा प्रकारची दिशा देऊ शकते.[३२](जैन, २००७, पृ.क्र. २०) ग्रामीण जीवनाशी संबंधित घडणाऱ्या घटना, उपयुक्त तसेच मनोरंजक माहिती ग्रामीण लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सामान्य पत्रकारितेपेक्षा वेगळ्या पत्रकारितेची गरज भासू लागली. त्यामुळेच प्रादेशिक आणि जिल्हास्तरावरील वृत्तपत्रे नियतकालिके यांची निर्मिती होऊ लागली आहे. नभोवाणी आणि दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांतही ग्रामीण लोकांपर्यत पोहोचवण्यासाठी सामान्य पत्रकारितेपेक्षा वेगळ्या पत्रकारितेची गरज भासू लागली. नभोवाणी आणि दूरचित्रवाणींवरील कार्यक्रमांतही ग्रामीण जीवनाशी संबंधित बातम्यांना आणि माहितीला काही प्रमाणात का असेना स्थान दिले जाऊ लागले आहे. शहरांमध्ये एफ. एम. स्वरुपातील खाजगी नभोवाणी केंद्रे लोकप्रिय झाली आहेत. फेसबुक, व्हॉटस् अप आदि समाजमाध्यमांसह यु टयूब वरील माहिती, बातम्या, मनोरंजन यांचे ग्रुप्स, चॅनल हा प्रकारही मोठ्या प्रमाणात ग्राहक वर्ग

खेचण्यात यशस्वी झाल्याचे पहायला मिळते. यातुनच सर्वसाधारण पत्रकारिता आणि ग्रामीण पत्रकारिता असे पत्रकारितेतील वेगळे प्रवाह निर्माण झाले आहेत.

कृषि जीवनाशी निगडीत घटना, माहिती, तंत्रज्ञान महत्त्वाचे झाले आहे. शेती आणि ग्रामविकासविषयक योजना, प्रकल्प आणि कार्यक्रम, त्यातील उणीवा आणि त्यातून उद्‌भवणारे प्रश्न, त्यावरील उपाययोजना, ग्रामीण भागातील गुन्हेगार, घात, अपघात, नैसर्गिक आपत्ती, सहकार, साखर कारखाने, पाटपाणी, दुष्काळ, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, शेतमालाचे भाव, पशुपालन, दूध व्यवसाय, राजकारण, सांस्कृतिक कार्यक्रमांचे ग्रामीण स्वरुप अशा असंख्या विषयांना पत्रकारितेत असाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कृषि–पदवीधर, विस्तार कार्यकर्ते, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आणि शेतकऱ्यांच्या माहिती विषयक गरजा भागविण्यासाठी कृषि माहितीचे आणि जाहिरातींचे संकलन करुन त्यावर प्रक्रिया करुन मुद्रित साहित्य तसेच दृक, श्राव्य, दृक–श्राव्य, आणि इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून सादर करु शकणाऱ्या कृषि पत्रकारांना मोठ्या प्रमाणात मागणी असणार आहे. त्यासाठी अशा प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण राबविण्याची गरज वाढत आहे.

शेतीविषयक सर्व महत्त्वाच्या घडामोडीची बातमीची दखल पत्रकारांना घ्यावी लागते. खरीप व रब्बी हंगामापूर्वी आढावा बैठक होते. त्यामध्ये कृषिमंत्री, कृषिआयुक्त व कृषिअधिकारी, तज्ज्ञ यांचा समावेश असतो. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील चार कृषि विद्यापिठांनी केलेल्या संशोधनाचे सादरीकरण केले जाते या परिषदेला 'जॉइंट ॲग्रेस्को' म्हणतात. अशा महत्त्वाच्या घडामोडीच्या बातम्या सविस्तर दिल्या जातात. या व्यतिरिक्त कृषिमेळावे, कृषिविषयक वैयक्तिक संशोधन, निरनिराळे प्रयोग यांच्याही बातम्या होतात. त्याचबरोबर जलसाक्षरता, पाणलोटक्षेत्र विकास, अपारंपरिक ऊर्जा, बायोगॅस, कचऱ्यापासून खत, हे सर्व बातम्यांचे विषय होतात. पीककर्ज, वाणांसाठी मिळणारे कर्ज, त्याच्यावरील व्याज, केंद्र आणि राज्य सरकारची शेतीसंदर्भातील धोरणे, विविध योजना हे सर्व बातम्यांचे विषय आहेत. मध्यंतरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय गाजला होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्या विदर्भात मोठ्या प्रमाणात झाल्या. या घटनेनंतर त्या भागातील विविध संस्थांच्या सर्वेक्षणांना माध्यमांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळाले होते. हे क्षेत्र खूप मोठे आहे. यातील बातमीमागची बातमी

शोधण्याकरिता तेवढीच सर्जनशीलता आणि सजगता असावी लागते. या बातम्यांनी राजकीय क्षेत्रातही मोठी उलथापालथ होते.

कृषि हे व्यापक क्षेत्र असल्याने एका राज्याच्या शेतीविषयक घडामोडी माहिती करुन घेणे हे सोपे काम नाही. त्यासाठी या क्षेत्रातील पत्रकाराने अभ्यासाची भूमिका ठेवणे गरजेचे आहे. पुढील १५ वर्ष ही देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने निर्णायक मानली जाणार आहेत. आर्थिक विकासाचा वेग १० टक्क्यापर्यंत नेण्याचे व पुढील काळात तो वाढविण्याचे राष्ट्रीय उद्दिष्ट ठरले आहे, पण त्यासाठी कृषिक्षेत्राचा वेग सध्यापेक्षा दोन तीन पटीने वाढविणे गरजेचे आहे. कारण आपल्या देशात शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण जवळपास ६० टक्क्यांवर आहे. हे लक्षात घेऊनच पुढील १५ वर्षात शेतीक्षेत्रात गुंतवणूक वाढणार आहे. याबाबत ज्येष्ठ संपादक निशिकांत भालेराव म्हणतात 'शेती बाजारपेठचलित (मार्केट ड्रिव्हन) होणार असे आणि होत असल्याने अनेक बदल या क्षेत्रात संभवतात. त्यामुळेच साऱ्या जगभरच्या माध्यमांचे लक्ष कृषिक्षेत्रावर केंद्रित होणार आहे.[३३](भालेराव, २००८, पृ.क्र. ५४) पत्रकारितेच्या दृष्टीने कृषिक्षेत्रात घटना घडत असल्याने तो दैनंदिन बातम्यांचा विषय होतो. उदाहरणार्थ एखाद्या गावात पिकांचे नुकसान झाले तर शेकडो लोकांच्या जगण्यावर या घटनेचा परिणाम होतो. म्हणून माध्यामांच्या दृष्टीने ही बातमी होते. याच्या विपरीत समजा घडले म्हणजे या भागात पाऊसच पडला नाही तरी लोकांच्या जगण्यावर परिणाम घडणार असल्याने तोही बातमीचा विषय बनतो. याचप्रमाणे एखाद्या शेतकऱ्याने जिद्दीने उजाड माळरानावर शेत बहरून दाखविले, एखाद्या गावातील शेतकऱ्यांनी दहा हजार एकरांवर एकाच प्रकारचे वाण घेण्याचा निर्णय घेतला तरी अशा घटना म्हणजे आकर्षक व सकारात्मक बातम्या म्हणून ओळखल्या जातात. या बातम्या समजण्यासाठी शेतीचा थोडाफार अभ्यास असणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्याचा कृषि विभाग, केंद्रिय कृषिखाते, कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन केंद्रे यांच्या संबंधातील दैनंदिन तपशील पत्रकाराला माहिती होणे गरजेचे आहे. त्यासाठी रोजच्या रोज या क्षेत्राशी संबंधित माहिती मिळवित राहणे आवश्यक आहे.[३४](भालेराव, २००८, पृ.क्र. ५५)

कृषिक्षेत्रातील गुंतवणूक वाढत आहे. पीक पद्धती आणि प्रक्रिया उद्योगावर जादा भर दिला जाणार आहे. त्यामुळे बियाण्यांच्या कंपन्यांमधील संशोधनाचा दर्जा उच्च होऊन रोज काही तरी नवे घडणार आहे. या संशोधनाची दिशा भविष्यात पत्रकारितेसाठी पर्यायाने

जनहितार्थ महत्त्वाची बाब ठरणार आहे. संशोधनाची माहिती घेतली तर बातम्या, लेख, वृत्तलेख, टीव्हीसाठी विविध विषय हाताळणे शक्य होईल. एकविसाव्या शतकास माहिती तंत्रज्ञानाचे युग संबोधले जाते. सध्या Informed Society चे जग आहे. तेव्हा भारतीय कृषि संशोधन केंद्र असो की इतर कृषि संशोधन केंद्रातील नवीन संशोधनाची माहिती शेतकऱ्यांना असणे गरजेचे आहे. त्यामुळे पिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व नवनवीन तंत्रामुळे शेतीतील विकास साधणे शक्य होईल.[३५](गुप्ता, २००५, पृ.क्र. २१२) कृषिक्षेत्रातील नवीन संशोधन, जागतिक कृषिव्यापार ध्येयधोरणे इत्यादींबाबत विविध स्तरांवर शेतकऱ्यांना माहिती देऊन अधिक प्रभावी काम होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही आज एक सामाजिक समस्या बनली आहे. या समस्येचे मुळापासून निराकरण करणे आवश्यक आहे. मात्र आहे त्या परिस्थितीत शेतकऱ्यांचे मनोधैर्य उंचावण्याचे आणखी प्रयत्न व्हायला हवेत. काही शासकीय व अशासकीय संस्था प्रबोधनाचे कार्य करतच आहे. प्रसारमाध्यमेही आपला हातभार लावत आहेत. अशा परिस्थितीत कृषिविषयक प्रश्नांची जाण असलेली, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी धडाडी असलेली पत्रकारिता करुन शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदनांना वाचा फोडणे ही देखील आवश्यक बाब आहेच. कृषिव्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशातील मोठ्या लोकसंख्येच्या जीवनाशी प्रत्यक्ष–अप्रत्यक्षरित्या थेट संबंध असणाऱ्या या समुहाला माहितीची गरज ही वाढती राहाणार आहे. कृषिसंशोधन आणि शेतमाल बाजारपेठ हे पुढील काळात पत्रकारितेचे महत्त्वाचे स्त्रोत आणि विषय राहणार आहेत. प्रा. के. ए. खतीब यांच्या मते भारतात एकूण क्षेत्रफळाच्या ४५ टक्के भागावर शेती होते.[३६](खतीब, १९९९, पृ.क्र. ४२) त्यामुळे सर्वाधिक लोकसंख्येच्या अन्नपाणी प्रश्नावर कार्यरत असलेल्या कृषि पत्रकारितेमध्ये भरपूर प्रमाणात संधी असल्याने जास्तीत जास्त प्रशिक्षित मनुष्यबळ असणे काळाची गरज आहे.

## १.७ मराठी वृत्तपत्रांची मराठी कृषि पत्रकारितेबद्दलची जबाबदारी

भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषि विषयाकडे पाहिले जाते. देशाला मिळणाऱ्या एकूण उत्पन्नाच्या जवळपास ५० टक्के भाग शेती व्यवसायातून मिळतो. आजपर्यंत जितका विकास कृषि क्षेत्रामध्ये व्हायला पाहिजे, तेवढा विकास आजपर्यंत झाल्याचे दिसत

नाही. त्यामुळे विकासाच्या दृष्टीने कृषि पत्रकारिता या विषयाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. कृषि क्षेत्रात भारत जगाच्या तुलनेत मागे आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने केलेल्या संशोधनांच्या मदतीने भरघोस उत्पादन घेतले जाऊ शकते, परंतू याची शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नाही. कोणत्या मोसमात कोणकोणती बी–बियाणे लावावीत, खतांचा प्रयोग करावा, शेतीतील माल कोणत्या देशात निर्यात करावा, जेणेकरुन त्या मालाला जास्तीत जास्त भाव मिळेल, या सर्व बाबींबद्दल पुरेसे ज्ञान अनेक शेतकऱ्यांना नाही. अंधविश्वासाने शेतकरी वर्ग आजही पारंपरिक पद्धतीने शेती करीत असताना दिसतो. यातून त्याचे नुकसान होत आहे.

कृषि पत्रकारितेद्वारे शेतकऱ्यांना नवनवीन शोध आणि तंत्रज्ञान स्वीकारण्यास सहज प्रेरीत केले जाऊ शकते. वृत्तपत्रे शेतीला नवी दिशा देऊ शकतात. विकासात्मक चित्र उभे करु शकतात. विकसित देशांमध्ये वैज्ञानिक प्रगती मोठ्या प्रमाणात झालेली आढळते. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे तेथील प्रसारमाध्यमांची भूमिका होय. नवीन वैज्ञानिक प्रगती लवकरात लवकर लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात व त्यांना सुधारलेल्या पध्दतीचा अवलंब करण्यास उद्युक्त करतात. त्यामुळे तेथील लोकांची आर्थिक व इतर क्षेत्रांमध्ये उन्नती होण्यास मदत होते. भारतासारख्या विकसनशील देशात तांत्रिक व वैज्ञानिक ज्ञानाचा म्हणावा तेवढा फायदा लोकांना झाला नाही. परिणामी गरिबी, अज्ञान बेकारी, अनारोग्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांसारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. कृषि विकासाच्या प्रक्रियेस गती देण्याचे महत्त्वाचे कार्य मराठी वृत्तपत्रे करतात अधिकाधिक लोकांचे हित साध्य करणे हे कल्याणकारी राज्याचे उद्दिष्ट असते. बहुजन हिताय, बहुजन सुखाय या दृष्टीने लोक कल्याणकारी राज्यामध्ये उपेक्षित व दुर्बल घटकांना न्याय देण्याचे महत्त्वाचे कार्य राज्यसंस्था करते.

प्रसारमाध्यमे आपल्या विचार सामर्थ्यामुळे कल्याणकारी कार्यास गती देऊन नवे वातावरण तयार करतात. प्रसारमाध्यमे आपल्या नित्य विचार प्रसारणाद्वारे दोन प्रकारचे संदेश देत असतात. एक मनोरंजनाचा तर दुसरा विचार विवेकावर आधारित विकासाचा शहरी दृष्टिकोन आणि शहरी जाहिरातकर्त्यांचा प्रभाव यामुळे प्रसार माध्यमांच्या एकूण कार्यपद्धतीवर शहरी संस्कृतीचा प्रभाव जास्त प्रमाणात जाणवतो. लोकशाहीमध्ये सर्वांगीण विकासाचे चित्र उभे करावयाचे असेल तर शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागाचाही विकास हा महत्त्वाचा ठरतो. तसेच

आकाशवाणी व दूरदर्शन या दृकश्राव्य माध्यमामध्ये कृषि तसेच ग्रामीण विकास वार्तांचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी आहे. दूरचित्रवाणी माध्यमाच्या तुलनेत आकाशवाणीवर प्रसारित होणारे विकासविषयक कार्यक्रम हे ग्रामीण भागातील जनता व शेतकरी वर्गावर अधिक प्रभावीपणे संस्कार करणारे असतात. मराठी आरोग्य, शिक्षणप्रसार, ग्रामीण उद्योगात वाढ व विकास, दळणवळण, पशुसंवर्धन, बालकल्याण योजना, युवक व महिला कल्याण कार्य इत्यादी बाबतीत विकास घडवून आणून संपन्न असा ग्रामीण समाज निर्माण केला जाऊ शकतो.

### १.७.१ तांत्रिक ज्ञानाच्या प्रसाराची जबाबदारी

भारतामध्ये जनशक्ती भरपूर आहे, पण तिचा पुरेपूर उपयोग होत नसल्याने बेकारीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. नवीन ज्ञान व तंत्रांचा वापर केल्यास या समस्या सोडविण्याकरता मदत होऊ शकेल. ग्रामीण क्षेत्रातील दरडोई उत्पन्न वाढविणे जरुरी आहे. शेतीविकासाबरोबरच ग्रामीण लघू व कुटीर उद्योगांचा विकास करणे तसेच देशाच्या सर्वांगीण विकासाकरता सर्वच क्षेत्रांमध्ये उत्पादन क्षमता वाढविणे आवश्यक आहे. शेतीमध्ये नवीन व संकरीत बियाणे, रासायनिक खते, यंत्रे, औजारे, रोगनाशके व किटकनाशके, ओलिताच्या सोयी, इत्यादींद्वारे उत्पादन वाढविले जाऊ शकते. तसेच ग्रामीण उद्योगां मध्ये सुध्दा आधुनिक तंत्र व पध्दतीचा वापर करुन अधिक उत्पादन वाढविले जाऊ शकते. यामुळे लोकांच्या आर्थिक जीवनात सुधारणा होईल.

### १.७.२ लोकशिक्षणाची जबाबदारी

सांस्कृतिक विकासासाठी संस्कृती, रुढी, परंपरा इत्यादी अनावश्यक असल्यास त्या दूर करणे किंवा त्यांच्याशी समायोजन राखून लोकांच्या दृष्टिकोनात व विचारसरणीत बदल घडवून आणणे आवश्यक आहे. उत्तम आरोग्यासाठी संतुलित आहार, स्वच्छता, आरोग्यसंवर्धन कसे राखावे याबद्दलचे शिक्षण लोकांना दिले पाहिजे. अरविंद सिन्हा यांनी भारतातल्या खेड्यांचा अभ्यास करुन मास मीडिया अँड रुरल डेव्हलपमेंट हा ग्रंथ लिहिला आहे. त्यांना आपल्या ग्रंथात केलेली मीमांसा ही अर्थपूर्ण आहे. माध्यमांच्या विचार प्रसारणाचा विकासावर कसा प्रभाव पडतो हे सांगताना ते म्हणतात की, नभोवाणी, चित्रपट व वृत्तपत्रे ही प्रसारमाध्यमे

विकासाबाबत औपचारिक कामे करतात व त्यांचे कार्य असमाधानकारक आहे.[३७] (सिन्हा, १९८५, पृ.क्र. ११९) या संदर्भात यथार्थ मूल्यमापनाची गरज आहे. याप्रमाणे विकास साधण्यास मराठी वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची आहे. शेतीतील नवीन तंत्रज्ञान लोकांच्या नजरेस आणून देण्याचे कार्य प्रसारमाध्यमे करु शकतात. त्याचप्रमाणे लोकांच्या मतपरिवर्तनासाठी आवश्यक ते लिखाण करु शकतात. अशा प्रकारे लोकांना प्रशिक्षित करण्याचे व विकासाला चालना देण्याचे कार्य मराठी वृत्तपत्रे करु शकतात.

### १.७.३ विकास कार्यक्रमांना प्रसिध्दीची जबाबदारी

वृत्तपत्रांनी कृषि क्षेत्रातील विषय आणखी चांगल्या पध्दतीने हाताळणे गरजेचे आहे. शेतीतील तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करुन कृषि उत्पन्नात वाढ, ओलिताच्या सोयी, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, ग्रामीण स्वच्छता व विकासकार्यात लोकांचा सहभाग अपेक्षित आहे. लोकांना तांत्रिक ज्ञान व इतर सेवा उपलब्ध करुन दिल्यानंतर त्यांच्यातील पुढाकार, स्व मदत आणि परस्पर संबंधांना चालना मिळेल. त्यामुळे प्रगतीच्या दिशेने वाटचाल होण्यात मदत होईल, अशा प्रकारचे उपक्रम लोक आणि शासन एकमेकांच्या सहकार्याने योजनांना प्रसिध्दी देऊन करतील अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनबद्ध विकासाला प्राधान्य देण्यात आले. याकरता निरनिराळया योजना आखण्यात व कार्यान्वित करण्यात आल्या. या योजनांबद्दल लाभार्थींना माहिती करुन देणे गरजेचे आहे. ही प्रसिध्दी वृत्तपत्रांतून देता येते. जर या योजनांची माहिती लोकांना नसेल तर ते त्यात साहजिकच सहभागी होणार नाहीत. कार्यान्वित योजनांचे उद्देश, लाभार्थी, प्रशासन पध्दत, फायदे व मदत मिळविण्यासाठी काय करावे याबद्दल प्रसिध्दी देण्याची गरज आहे. पूर्वी शासनाच्या योजनेत लोकांचा सहभाग मिळावा म्हणून प्रसिध्दी खात्याचे धोरण असे. आता मात्र लोकांच्या पुढाकारात शासनाचा सहभाग असे नवे धोरण आहे. अर्थात आता लोकांकडून मागणी येण्यासाठी प्रसिध्दीद्वारे वर्तनात बदल घडवून आणण्याची जबाबदारी जनसंपर्क साधकाची ठरली आहे. माहिती शिक्षण संवादाची प्रभावी माध्यमे आता शेतीक्रांतीचे अग्रदूत ठरतील. मीडिया मिक्स तंत्राने आता एखाद्या घटकाकडे सर्वांचेच लक्ष वेधता येते.

विकासकार्यक्रमांना सुरूवातीला प्रसिध्दी देऊन लोकांची त्या कार्यक्रमाबद्दल मनोभूमिका तयार करता येईल. कृषि प्रदर्शन आयोजित करायचे असेल तर त्याला आधीपासून पूर्वप्रसिध्दी द्यावी लागेल, तरच निरनिराळया संस्था स्टॉल लावतील. तसेच इतर शेतकरी व संस्था हे प्रदर्शन पहायला येण्याचे नियोजन करतील व येतील.

### १.७.४ शेतीपूरक कार्यक्रमांना प्रसिध्दीची सातत्यपूर्ण जबाबदारी

विकासकार्याची एखादीच बातमी देऊन जास्त प्रसिध्दी मिळणार नाही. याकरता वर्षभर बातम्या देत राहावे लागेल. त्यामुळे प्रासारमाध्यमांशी व लोकांशी तुमचे संबंध टिकून राहतील. याकरता दीर्घकाळ प्रसिध्दी देणारी योजना आखण्याची गरज असते. छोट्या का होईना पण बातमीमूल्य असलेल्या बातम्या प्रसिध्द झाल्या पाहिजेत किंवा निरनिराळ्या अनेक कार्यक्रमांच्या बातम्यांच्या आधारे एकच बातमी एकत्रित स्वरुपात प्रसिध्द झाली तरी पोषक ठरेल. निरनिराळ्या योजना, त्यातील सवलती, त्या योजनांमार्फत घेण्यात आलेल्या सभा, प्रात्यक्षिके, महत्त्वाच्या व्यक्तींची भाषणे यांच्या पूर्वसूचना व ते कार्यक्रम झाल्यानंतर त्यांच्या अहवालावर आधारित बातमी प्रसिध्दीसाठी पाठविल्यास त्या कार्यक्रमांना चालना मिळेल. शेतकऱ्यांच्या यशोगाथा प्रसिध्द केल्यास त्या इतरांना मार्गदर्शक ठरतील. कृषिविषयक नवीन सुविधा, संस्था, चळवळी, कार्यालयीन योजना यांना प्रसिध्दी दिल्यास शेतकऱ्यांना फायदा होईल. शेतीक्षेत्रातल्या विकासकार्यक्रमांना प्रसिध्दी देऊन व लोकांचा सहभाग वाढवून विकास साधण्यास मदत होऊ शकेल. या सर्व गोष्टींची परिणिती प्रगतीकडे वाटचाल करण्यात होईल. भारतीय ग्रामीण विकासापुढे भविष्यात अनेक आव्हाने उभी आहेत. विकसनशील राष्ट्रांमध्ये नवीन जीवन मूल्ये रुजविण्याचे काम प्रसारमाध्यमे करतात. एवढेच नव्हे तर जुन्या व नव्या मूल्यात समन्वय साधून एक नवी विकास संस्कृती तयार करतात. त्यामुळे मराठी वृत्तपत्रांची मराठी कृषि पत्रकारितेबाबत सामाजिक, आर्थिक जागृती वाढणे कामी आणखी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

## ब) भारतीय शेती व्यवसायाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व

### १.८ अन्न–धान्य व शेती क्षेत्र

जगातील पहिला व्यवसाय हा शेती हाच आहे. प्रकृती आणि मनुष्य एकत्र आल्यानंतर तो निर्माण झाला. पंचमहाभूतांच्या लक्षावधी वर्षाच्या साठवलेल्या ऊर्जा माणसांच्या श्रमाचा स्पर्श होताच गुणाकार करीत फळाला येतात. एका दाण्यातून शंभर दाणे तयार होण्याचा चमत्कार शेतीतच होतो. ज्या दिवशी हे लक्षात आले त्या दिवसापासून शेतीमध्ये तयार झालेली बचत लूटून न्यायला सुरुवात झाली. आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये होणारा गुणाकार लुटण्याची आहे. रशियन विदूषी रोझा लूक्झबर्ग म्हणतात जगाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास नसून शेतीच्या शोषणाचा आहे.[३८](काळे, २००९, पृ.क्र. २७)

जगातील शेती योग्य क्षेत्राचा विचार केल्यास चीनचे शेती योग्य क्षेत्र ११.९ टक्के, ऑस्ट्रेलियामध्ये ६.३४ टक्के, रशियामध्ये ७.४३ टक्के, अमेरिका व कॅनडा मध्ये फक्त ५.०२ टक्के क्षेत्र शेत जमिनीसाठी वापरात आहे. म्हणजेच इतर देश भारतापेक्षा आकारमानाने मोठे असले तरी भारत देश शेत जमिनीच्या टक्केवारीच्या बाबतीत जगात अग्रेसर आहे. कृषि उत्पन्नाबाबत प्रथम क्रमांकावर चीन असून त्याचे उत्पन्न ६७०.८९ बिलीयन अमेरिकन डॉलर आहे. दुसऱ्या क्रमांकावर भारत असून उत्पन्न ३३३.६५ बिलीयन अमेरिकन डॉलर आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून मनुष्यबळ संख्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तुलनात्मक दृष्टीने भारतातील कृषिक्षेत्र चीनपेक्षा ४.५ पटीने अधिक आहे. उत्पन्न मात्र ५० टक्के कमी आहे. मोठ्या प्रमाणात कृषिक्षेत्र, मनुष्यबळ व अनुकूल परिस्थिती विचारात घेता कृषि उत्पन्नाच्या बाबतीत आपण फारच मागे आहोत.[३९](agri-eculture.blogspot.com, २०१२)

अमेरिकन भूशास्त्रीय सर्वेक्षणानुसार जागतिक शेती क्षेत्र हे १.८७ अब्ज हेक्टर म्हणजेच ४.६२ अब्ज एकर एवढे आहे, जे मागील अंदाजापेक्षा १५ ते २० टक्क्यांनी जास्त आहे. तसेच भारतातील लोकसंख्येला अन्नसुरक्षा पुरवण्याच्या उद्देशाने भारताने अमेरिका आणि चीनलाही मागे टाकत सर्वाधिक शेतजमीन लागवडीखाली आणली आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकाची वेगाने वाढणारी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असलेल्या भारतात सर्वाधिक १७९.८ दशलक्ष हेक्टर शेतीक्षेत्र आहे. अमेरिकेमध्ये १६८.८ दशलक्ष हेक्टर शेतीक्षेत्र, तर चीनमध्ये १६५.२ दशलक्ष हेक्टर शेतीक्षेत्र आहे. तसेच दक्षिण आशिया आणि युरोप जगाचे अग्रगण्य शेतीक्षेत्र म्हणून

ओळखले जात असले तरी या सर्वेक्षणात रशिया चौथ्या क्रमांकावर आहे. मागील सहा दशकांमध्ये भारतातील अन्नधान्याचे उत्पादन पाच पटीने वाढले आहे. १९५०–५१ मध्ये ५०.८२ दशलक्ष टन असलेले भारतातील अन्नधान्य उत्पादन, २०१५–१६ मध्ये २५२.२२ दशलक्ष टनांपर्यंत वाढले आहे.[४०](krushiking.com, २०१८) एकंदरीतच कृषिक्षेत्र हे जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या उपजिविकेचे साधन तसेच उत्पन्नाचा स्त्रोत आहे. जगातील सर्व विकसित राष्ट्रांनी प्रथम कृषिचा विकास करून औद्योगिक विकास केलेला आहे. त्यात इंग्लंड, जर्मनी, रशिया तसेच जपान यांच्या विकासात कृषिचे मोठे योगदान आहे.

कृषि या महत्त्वपूर्ण विषयाची गरज जगभरातल्या मानवी समुहाच्या अन्नाशी म्हणजेच जीवनाशी निगडीत आहे. याची आकडेवारी विचारात पाडणारी आहे. जगातील ७९५ दशलक्ष नागरिकांना सध्या पुरेसे अन्न उपलब्ध नाही. म्हणजेच प्रत्येक ९ व्यक्तीपैकी १ जण दररोज उपाशी असतो. विकसनशील राष्ट्रांमधील अंदाजे १३ टक्के लोकसंख्या पोषणाच्या निम्न पातळीवर जगत आहे. आफ्रिका आणि आशिया खंडातील अन्न सुरक्षेची स्थिती सर्वाधिक गंभीर आहे. विकसनशील राष्ट्रातील प्रत्येक सहा बालकापैकी एक बालक कमी वजनाचे असते. शालेय वयोगटातील मुलांचा उपासमारीचा प्रश्न सोडविण्यासाठी अंदाजे ३.२ अब्ज अमेरिकी डॉलर एवढा निधी आवश्यक आहे. २०५० सालापर्यंत जगाची लोकसंख्या ९ अब्जच्या वर जाण्याची शक्यता असल्याने अन्नाची मागणी दीडपट वाढणार आहे. अशा परिस्थितीत जागतिक कृषि क्षेत्रात हवामान बदल हा घटक महत्त्वाचा ठरणार आहे. हवामानातील बदलामुळे प्रति एकक जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पादनात २५ टक्क्याने घट होण्याची शक्यता असल्याचा अंदाज राष्ट्राच्या अन्न व कृषि संस्थेने व्यक्त केला आहे.[४१] (सकाळ, २०१७, पृ.क्र. २९९)

दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा करण्यात येतो. भारतात हा दिवस अन्न अभियांत्रिकी दिन (Food Engineering Day) म्हणून ओळखण्यात येतो. हवामानातील बदलानुसार अन्न आणि कृषितील बदल आवश्यक Climate is changing, food and agriculture too हा २०१६ या वर्षीच्या अन्नदिनाच्या विषय होता. धान्य कापणीच्या सुधारित पध्दती, साठवणूक वाहतूक आणि पायाभूत सुविधांच्या विकास आणि बाजारपेठेतील सुधारणांद्वारे विक्रीपूर्व नासाडी कमी करणे आणि पिकांच्या लागवडीच्या शाश्वत पध्दतींचा विकास करणे याद्वारे वाढत्या लोकसंख्येस पुरेसे ठरेल एवढे अन्न कमीत कमी जागेत पिकविता

येऊ शकते. याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी या दिनाचे १५० हून अधिक देशात आयोजन करण्यात येते. याचबरोबर आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी कृषि व अन्नविषयाची निगडीत विविध दिवसांचे आयोजन केले जाते. १ जूनला जागतिक दुग्ध दिन, २९ सप्टेंबर जागतिक कौमी दिवस, १ ऑक्टोबर जागतिक शाकाहरी दिन,आक्टोबर महिन्यातील दुसरा शुक्रवार जागतिक अंडे दिन, १५ ऑक्टोबर हा आंतरराष्ट्रीय ग्रामीण दिन, १७ ऑक्टोबर आंतरराष्ट्रीय दारिद्र्य दिन, २५ ऑक्टोबर जागतिक पास्ता दिन साजरा करण्यात येतो.[४२](foo.com, २०१७) कृषि व अन्न या विषयांचे महत्त्व हे दिवस अधोरेखित करतात.

जागतिक बँकेच्या २०१८ च्या अहवालात म्हटले आहे की Agriculture can help reduce poverty, raise income and improve food security for 80% of the world poor,who live in rural areas and work mainly in framing.[४३](Worldbank.org, २०१७) जगभरात ८० टक्के गरीब लोक हे ग्रामीण भागात राहाणारे असून त्यांची उपजीविका शेतीवरच सुरुच आहे. त्यांचे दारिद्र्य कमी करुन अन्न सुरक्षितता मिळवण्यासाठी शेती क्षेत्र मदत करु शकते. कृषि क्षेत्र हीच सर्व उद्योगांची जननी, मानवी जीवनासाठी पोषक, प्रगती तसेच समृद्धिचे प्रतीक समजली जाते. दारिद्र्य, भूकबळी, कुपोषण या कारणांनी मृत्यू पावणाऱ्यांची संख्या जगभरात वाढतच आहे. त्यामुळे कृषि संवाद क्षेत्राचा विकास होणे गरजेचे आहे.

## १.९ हरितक्रांती आणि दारिद्र्य निर्मूलन

पहिल्या योजनेच्या उद्दिष्टानुरूप अपेक्षित यशामुळे दुसरी योजना प्रा.ब्रम्हानंद प्रतिमानावर आधारीत तयार केली. त्यामध्ये अवजड उद्योगावर भार देण्यात आला. दुसऱ्या योजनेच्या शेवटी शेतीतील अन्नधान्याच्या टंचाईचा प्रश्न अस्तित्वात आला या पार्श्वभूमीवर शेतीतील तंत्रज्ञानात्मक बदलाचे दुसरे पाऊल उचलण्यात आले. या पावलालाच पुढे हरितक्रांती हे नाव मिळाले. भारतातील अन्नधान्याचे एकूण उत्पादन १९५०–५१ मध्ये ५० मिलियन टन होते. हरितक्रांतीनंतरच्या काळात भारत हा फक्त कृषिप्रधान देश राहिला नाही तर अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण देश बनला. १९७० साली अन्नधान्याचे एकूण उत्पादन १०० मिलीयन टनावर पोहचले. १९९०–९१ मध्ये १७६.२ मे. टन तर १९९९–२००० मध्ये २०८.६ मे .टन

असे अन्नधान्याचे उत्पादन वाढत गेल्याचे दिसते. उपासमारी, भूकबळी, दारिद्र्याचे प्रमाण २१.२ टक्के होते तर २०१५ साली हे प्रमाण १२.४ टक्क्यांवर आल्याचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालात नमूद केले आहे.[४४](सकाळ इयर बुक, २०१७, पृ.क्र. ३००)

## १.१० सकल राष्ट्रीय उत्पादनात शेतीचे स्थान

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला मध्यवर्ती स्थान आहे. परंतु तरिही कृषि क्षेत्राची स्थिती फारशी समाधानकारक नाही. भारतीय शेतीतून अन्न, चारा व कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो तसेच फार मोठ्या लोकसंख्येस रोजगारही उपलब्ध होतो. यामुळेच भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. बिगर शेती उत्पादनांना व सेवांना शेतीक्षेत्र मोठी बाजारपेठ उपलब्ध करून देते. ग्रामीण व नागरी क्षेत्रे शेतीमुळे एकमेकांशी जोडली जातात. गेल्या सहा दशकात उद्योग व सेवा क्षेत्राने मोठी झेप घेतल्याने सकल राष्ट्रीय उत्पादनातील शेतीचा वाटा कमी झालेला दिसून येतो. परंतु तरिही शेती हे रोजगार निर्माणक्षम क्षेत्र आहे. शेती क्षेत्रात काम करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. भारतातील जनतेस अन्न, पोषण, आरोग्य, अन्नसुरक्षा व रोजगार शेती क्षेत्रातूनच प्राप्त होत असल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेचा लंबक शेतीच्या यश अपयशावर झुलत असतो. स्वातंत्र्योत्तर काळात सकल राष्ट्रीय उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा कमी होत गेला आहे. कृषिक्षेत्र या घटकात कृषि उत्पादनाबरोबर वनोत्पादन व मत्स्यव्यवसाय यांचाही समावेश होतो.

**तालिका क्र. १.१**

**सकल राष्ट्रीय उत्पादनात कृषि क्षेत्राचा शेकडा वाटा (१९५०–५१ ते २०१३–१४)**

| वर्ष | कृषि क्षेत्राचा वाटा (%) |
|---|---|
| १९५०–५१ | ५६.५ |
| १९७०–७१ | ४५.९ |
| १९९०–९१ | ३४.९ |
| २०००–०१ | २४.७ |
| २०१०–११ | १४.५ |
| २०१२–१३ | १३.९ |
| २०१३–१४ | १३.९ |

**(स्त्रोतः ॲग्रिकल्चर ॲट अ ग्लांस, २०१४)**

तालिका क्र.१.१ मध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा दाखविला आहे. त्यावरुन असे निदर्शनास येते की, सन १९५०–५१ या स्वातंत्र्यानंतरच्या लगेचच्या काळात सकल राष्ट्रीय उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा सर्वाधिक म्हणजे ५६.५ टक्के आहे. कारण त्यावेळी उद्योग व सेवा क्षेत्र विस्तारले नव्हते आणि ७० टक्क्यांपेक्षा अधिकची लोकसंख्या शेती व्यवसायात होती. त्यामुळे शेती हाच शाश्वत मुलाधार मानला जात असे. परंतु त्यानंतरच्या प्रत्येक दशकात उद्योग व सेवाक्षेत्राची वाढ होत गेली व पर्यायाने कृषि क्षेत्राचा वाटा कमी होत गेला. अर्थ वृध्दी होऊनही तसेच कृषि उत्पादन वाढत गेले असूनही आता कृषि क्षेत्राचे योगदान १३ ते १४ टक्के एवढेच राहिले आहे. एवढेच नव्हे, तर एकूण लोकसंख्येतील ५५ टक्के लोकच कृषि क्षेत्रात काम करत आहेत. बेभरवशाचा पाऊस, कृषि उत्पादनातील चढ–उतार, औद्योगिकरण, सेवाक्षेत्राची वाढ, नागरीकरण अशा काही कारणांमुळे कृषि क्षेत्राचा वाटा कमी होत गेला. इंग्लंड, अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलिया या सारख्या प्रगत विकसित देशांमध्ये दोन ते चार टक्केच लोकसंख्या शेती व्यवसायात आहे तर या उलट चीन, बांग्लादेश, इजिप्त या भारताप्रमाणे विकसनशील देशांमध्ये जास्त लोकसंख्या कृषि व्यवसायात आहे. जगातील

कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेले देश जगाला रोजगार व अन्नधान्य पुरवितात म्हणून या शाश्वत संसाधनास आगळे वेगळे स्थान आहे.

## १.११ मोसमी पावसावरील अवलंबित्व आणि उत्पादकता

भारत उष्णकटिबंधातील मोसमी हवामानाचा देश असल्याने वर्षभर शेतीस अनुकूल हवामान आढळते. देशात लागवडीखालील फार मोठे क्षेत्र कोरडवाहू शेतीखाली असल्याने पावसाचे प्रमाण, कालावधी, चलनशीलता, आकृतीबंध यावर कृषि उत्पादकता अवलंबून असते. भारतात सरासरी ११० सेमी पाऊस पडतो परंतु तो सर्वत्र सारखा पडत नाही किंवा कालावधीही निश्चित असा नाही. तसेच काही प्रदेश अवर्षणप्रवण आहे. यामुळे पर्जन्याश्रीय कोरडवाहू शेतीच्या उत्पादनावर याचा परिणाम होत असतो. पाऊस वेळवर व चांगला झाल्यास कृषि उत्पन्न चांगले येते. उद्योगांना चालना मिळते व रोजगारही वाढतो. पण अवकाळी पाऊस, गारा, चक्रीवादळे, अपुरा पाऊस झाल्यास कृषि उत्पादनात कमालीची घट येते. त्याचा अर्थव्यवस्थेवार लक्षणीय परिणाम होतो. म्हणूनच भारतीय शेती म्हणजे मान्सूनवर आधारलेला जुगार असतो असे म्हणातात. त्याचा परिणाम उत्पादकतेवर झालेला आढळतो. भारताच्या कृषि मालाच्या उत्पादकतेची तुलना जगातील इतर देशांमधील उत्पादकतेशी केली असता असे आढळते की बहुतांश पिकांची भारतातील उत्पादकता बरीच कमी आहे.

**तालिका क्र.१.२**

**जागतिक उत्पादकता व भारत (क्विंटल/हेक्टर) २०१४**

| पीक | भारतःउत्पादकता | जागतिक उत्पादकता |
|---|---|---|
| भात | ३७.२० | ४५.५० |
| गहू | ३१.७७ | ३०.८९ |
| ऊस | ७०१ | ७०६ |

**(स्त्रोतः ॲग्रिकल्चर ॲट अ ग्लांस, २०१४)**

वास्तविक हरितक्रांतीमुळे गहू व भात यांची देशांतर्गत उत्पादकता वाढलेली असली तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर भात व ऊस यांची उत्पादकता कमीच आहे. ऊस हे नगदी पीक असुनही तशीच परिस्थिती आहे. भारतात प्रादेशिक उत्पादकतेतही बरीच तफावत आढळते. पंजाब, हरियाणा, तमिळनाडू, आंध्रप्रदेश व पश्चिम बंगाल या राज्यांची उत्पादकता चांगली आहे तर ओडिशा, आसाम, झारखंड व छत्तीसगड या राज्यांची बरीच कमी आहे.

## १.१२ धारणक्षेत्र व तुकडीकरण

भारतीय शेतीसमोर असणारे आणखी एक आव्हान म्हणजे लहान धारण क्षेत्र व जमिनीचे तुकडीकरण होय. भारतातील हिंदू व मुस्लीम धर्मियांमध्ये वारसा हक्क कायदा प्रचलित आहे. वारसा हक्काने मिळालेल्या शेत जमिनीचे पुढील पिढीत वाटप होत जाते. वाटप झाल्याने स्वतंत्र मालकी हक्क प्रस्थापित करण्यासाठी बांध घातले जातात. वहिवाटीसाठी पायवाटा ठेवतात. यामुळे जमिनीचे विभाजन होऊन लहान लहान भूखंड होतात. शिवाय एखाद्याच्या मालकीच्या जमिनीचा तुकडा गावालगत जवळ असतो तर दुसरा दूरवर आडबाजूला असू शकतो. अशा स्थितीत दोन्ही वेगळया असू शकतात. शेतकऱ्याला पीक घेण्यासाठी सर्व व्यवस्था स्वतंत्रपणे राबवावी लागते. यामुळे उत्पादन खर्च वाढतो. अशा परिस्थितीत गैरसोयीची जमीन लागवडीविना पडिक ठेवली जाते किंवा दुर्लक्षित राहते. शेत जमिनीच्या वाटपात सर्व वारसदारांचे समाधान न झाल्यास दावे–प्रतिदावे सुरू होतात. काही वेळा जमीन तारण किंवा गहाण ठेवली जाते. कर्जफेड न केल्याने सावकार, बँका, पतपेढ्या जमीन वापरावर निर्बंध घालतात. अशा या सामाजिक कारणांमुळे जमीन तुकडीकरणाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. उत्पादनावर परिणाम होत असल्याने शेतकऱ्याच्या व देशाच्या अर्थकारणावर त्याचा परिणाम होत आहे. नॅशनल स्टॅटिस्टीकल सॅम्पल सर्वे ऑर्गनायझेशन (NSSO) या संस्थेच्या सर्वेक्षणानुसार तुकडीकरणामुळे भारतातील सरासरी भूधारणा क्षेत्र ०.६ क्षेत्र हेक्टर इतके लहान झाले आहे. १०३ दशलक्ष हेक्टर शेत जमीन ४९९ दशलक्ष भूखंडात विभागली गेली आहे. फक्त ६ टक्के शेत जमीन सलग दहा किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्राची आहे. तक्ता क्रं. १.३ मध्ये भूधारण क्षेत्रानुसार शेतकऱ्यांचे प्रमाण, मालकीचे प्रमाण व उत्पन्न दर्शविले आहे. त्यावरुन शेतजमिनीचे आकारमान महत्त्वाचे असते हे अधोरेखित होते.

**तालिका क्र. १.३**

**भूधारण क्षेत्र, शेतकरी प्रमाण व उत्पन्न, २०१५**

| **भूधारणानूसार गट** | **सीमांत शेतकरी (१.० हे.पर्यंत क्षेत्र)** | **अल्पभूधारक (१–२ हे.क्षेत्र)** | **मोठे भूधारक (१०.० हे.पेक्षा अधिक)** |
|---|---|---|---|
| शेतकऱ्यांचे प्रमाण (%) | ७५ | १० | ०.२४ |
| शेतजमिनीच्या मालकीचे प्रमाण (%) | ३० | २४ | ६ |
| मासिक सरासरी उत्पन्न(रु) | ५२५० पर्यंत | ७३५० | ४१३९० |
| मासिक सरासरी खर्च (रु) | ६०२० पर्यंत | ६४६० | १४४५० |
| उत्पादन घेण्यासाठी गुंतवणूकीची सरासरी पुंजी (रु) | ५४० पर्यंत | ४२२ | ६९९० |
| सरासरी बचत/तूट (रु)– | १५०० पर्यंत | ४७० | १९९५५ |

**(स्त्रोतः NSSO संदर्भानुसार टाईम्स ऑफ इंडिया, २०१५)**

तक्ता क्र. १.३ नुसार भारतातील ८५ टक्के शेतकरी अल्पभूधारक व लहान शेतकरी गटातले आहेत. त्यांच्यापैकी बहुतेक सीमांत शेतकरी आहेत. तुकडीकरणाचा हा फार मोठा परिणाम आहे. अमर्त्य सेन यांच्या मतानुसार भूधारणा क्षेत्र लहान तर नफाही लहान म्हणजे कमीच असतो. अशा लहान शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी असल्याने शेती तोट्याची होते. शेती उत्पन्नाला हातभार लागावा म्हणून असे लहान व सीमांत शेतकरी रोजंदारी शेतमजूर, बांधकाम मजूर, पशुपालन, किरकोळ वस्तू विक्रेते अशी कामे करतात. अनेक वेळा आर्थिक ताण–तणावामुळे शेतीतून बाहेर पडतात. भारताच्या अर्थव्यवस्थेवर व सामाजिक परिस्थितीवर याचे दूरगामी परिणाम होत आहेत. एकविसाव्या शतकातील कृषि क्षेत्रात जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, उदारीकरण, अन्नसुरक्षा, गरिबी, भूक, पोषण, न्यूनपोषण, मातीची धूप, जैवतंत्रज्ञ अशा विषयांना अग्रस्थान प्राप्त झाले आहे. बदलत्या काळाबरोबर शेतीतही बऱ्याच वळणवाटा घेऊन गतीशील रहाण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

## १.१३ महाराष्ट्र राज्य – संक्षिप्त आढावा

भारताच्या पश्चिम व मध्य भागात वसलेल्या महाराष्ट्र राज्याला अरबी समुद्राच्या ७२० कि.मी. लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा तर सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांची तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, अग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा आहे. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसूल विभागात (कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती आणि नागपूर) करण्यात आली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार ११.२४ कोटी लोकसंख्या असलेले महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार ३.०८ लाख चौरस कि.मी. भौगोलिक क्षेत्रफळासह तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्याचे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण झाले असून ४२.५ टक्के जनता शहरात राहते. राज्याची राजधानी मुंबई ही फक्त कॉर्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार व सिने जगतातील बॉलिवूडचा अविभाज्य हिस्सा आहे.[४५](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १)

महाराष्ट्र राज्यात शेतीसाठी स्वतंत्र खाते आहे. या खात्यात सचिव व आयुक्त हे दोन मुख्य वरिष्ठ अधिकारी आहेत. प्रत्येक विभागासाठी एक सह संचालक तर प्रत्येक जिल्ह्यासाठी एक उपसंचालक असतो. या यंत्रणेद्वारे राज्यात शेतीसंबंधीच्या विविध योजना राबवण्यात येतात. शेती विकासाकरता कृषि आयुक्तालयातर्फे अनेक योजना राबवण्यात येतात. त्यात तेलबिया, कापूस, ऊस, कडधान्ये यांच्या उत्पादनवाढीच्या त्याचप्रमाणे ठिबक व तुषार सिंचनाच्या योजना आहेत.

महाराष्ट्राचा सुमारे एक–तृतीयांशापेक्षा जास्त भाग पश्चिम घाटाच्या वर्षा छायेत येतो. त्यामुळे राज्यात कोकण आणि उर्वरित प्रदेश यामध्ये पर्जन्यमानात मोठी तफावत आढळते. राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे. मार्चपासून सुरु होणाऱ्या व अंगाची काहिली करणाऱ्या उन्हाळ्या पाठोपाठ जूनच्या सुरुवातीस पाऊस पडतो. महाराष्ट्राला लाभलेला निसर्गाचा वरदहस्त हा त्याच्या घनदाट व संपन्न जंगलामध्ये दिसून येतो. राज्यात ६ मुख्य व्याघ्र प्रकल्प व ६ राष्ट्रीय उद्याने आहेत. राज्यातील बराच भाग डोंगराळ व उंच सखल

स्वरुपाचा असल्यामुळे सिंचनाचे प्रमाणही एका विशिष्ट मर्यादे पलिकडे वाढू शकणार नाही असे आहे. यामुळे महाराष्ट्रातील शेती ही मुख्यतः पावसावर अवलंबून आहे.

शेतीसाठी दर्जेदार बियाणांचा पुरवठा ही महत्वाची बाब आहे. महाराष्ट्रात अनेक खाजगी बीज निर्मिती उद्योग आहेत. यापैकी बहुतेक उद्योग जालना जिल्ह्यात एकवटले आहेत. त्यामुळेच जालना जिल्ह्याला भारताची बीज राजधानी म्हटले जाते. राज्यात बियाणांचा दर्जा तपासण्यासाठी पुणे, नागपूर, औरंगाबाद, परभणी व अकोला येथे प्रयोगशाळा आहेत. महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ हे सरकारी क्षेत्रातील प्रथम क्रमांकाचे बीज महामंडळ आहे. त्यामार्फत बियाण्याची निर्मिती, त्यांची तपासणी आणि विक्री केली जाते. या महामंडळातर्फे राज्याची ५० टक्केपेक्षा जास्त बियाण्याची गरज भागवली जाते. राज्यात खते व औषधे यांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. खतांचा दर्जा तपासण्यासाठी शासनाने पुणे, नाशिक, औरंगाबाद आणि अमरावती येथे प्रयोगशाळा स्थापन केलेल्या आहेत. खतांचे वाटप करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रात कृषि उद्योगांसह ६५, सहकारी क्षेत्रात ३,२८९ आणि खाजगी क्षेत्रात ४२,६४४ अशी राज्यभरातून मिळून एकूण ४६,००० खत वितरण केंद्र आहेत.[४६](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. ९५)

### १.१३.१ प्रमुख खरीप आणि रबी पिकांची माहिती

राज्यात नववी कृषि गणना २०१०–११ नुसार एकूण वहिती खातेदारांची संख्या आणि वहिती क्षेत्र अनुक्रमे १.३७ कोटी व १.९८ कोटी हेक्टर होते, जे पहिली कृषि गणना १९७०–७१ नुसार ०.५० कोटी व २.१२ कोटी हेक्टर असे होते. या कालावधीत वहिती खात्याचे सरासरी क्षेत्र ४.२८ हेक्टर वरुन १.४४ हेक्टर झाले.

महाराष्ट्र शासनाच्या कृषि आयुक्तालयाकडील अधिकृत आकडेवारीनुसार सन २०१६–१७ मध्ये राज्यातील खरीप हंगामात १४,९९९ हेक्टर क्षेत्रावर तांदूळ, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका व इतर तृणधान्ये तर कडधान्यात तूर, मूग, उडिद तर तेलबियात सोयाबीन, भूईमूग, तीळ, कारळे, सूर्यफूल आदि. नगदी पिकांत ऊस व कापूस (रूई) चे उत्पादन घेतले गेले.

रबी हंगामात ६.८२९ हेक्टर क्षेत्रावर तृणधान्यात प्रामुख्याने ज्वारी, गहू, मका कडधान्यात हरभऱ्यासह इतर तेलबियांत तीळ, करडई, सूर्यफूल, जवस, सरसू व मोहरी

इत्यादी पिके घेण्यात आली. यात एक मे.टन तंबाखूचा देखील समावेश आहे.[४७](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. ९२–९३)

### १.१३.२ फलोत्पादन

फलोत्पादनात बाबतीत आपल्या देशाचा जगात पहिला क्रमांक आहे. महाराष्ट्रात पूर्वीपासूनच आंबा, केळी, काजू, द्राक्षे, संत्री, मोसंबी, चिक्कू इत्यादींचे उत्पादन लक्षणीय प्रमाणात होत आले आहे. द्राक्षे, डाळिंब व बोर या फळांबाबत तर महाराष्ट्रात क्रांतिकारक प्रगती झाली आहे. सन १९९०–९१ मधील फळांखालील २.४२ लाख हेक्टर क्षेत्रात वाढ होऊन ते २०१६–१७ अखेर १८.५५ लाख हेक्टर क्षेत्र झाले आहे. द्राक्षे, आंबा, डाळिंब आणि केळी ही राज्यातून निर्यात केली जाणारी प्रमुख फळे आहेत. राज्यात २०१६–१७ मध्ये विविध फळपिकांखालील क्षेत्र ७.४२ लाख हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी आंब्यासाठी १.५७ लाख हेक्टर, संत्र्यासाठी १.०८ लाख हेक्टर, मोसंबीसाठी ०.३३ लाख हेक्टर, डाळिंबासाठी १.४१ लाख हेक्टर, केळीसाठी ०.८२ लाख हेक्टर, चिकूसाठी ०.१६ लाख हेक्टर आणि द्राक्षांसाठी १.०४ लाख हेक्टर क्षेत्र होते.[४८](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १००)

### १.१३.३ फुलशेती

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात शेतीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरुन फुलशेती करण्याकडेही प्रगतीशील शेतकऱ्यांचा ओढा दिसून येत आहे. पुणे, नाशिक, नगर, सांगली, ठाणे आणि नागपूर या जिल्ह्यांनी फूलशेतीमध्ये आघाडी घेतली आहे. नाशिक येथे कार्नेशन या फुलाच्या निर्मितीचे देशातील पहिले आणि सर्वात मोठे केंद्र आहे. या खेरीज राज्यात गुलाब, झेंडू, मोगरा, ऑर्किड्स, ग्लॅडिओलाय, इत्यादींचे प्रामुख्याने उत्पादन होते. राज्यात ६.७८ लाख हेक्टर क्षेत्रात फूलशेती केली जाते.[४९](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. ९४) पुण्यात फुलांच्या लिलावाचे केंद्र असून इतर जिल्ह्यातही अशी केंद्र सुरु करण्यात येत आहेत. महाराष्ट्रात पुणे, नाशिक आणि मुंबई येथे तर अन्य प्रांतात चेन्नई, दिल्ली, कोलकाता, बेंगलूरू, इंदूर, बडोदा, अहमदाबाद आणि चंदिगड येथे फुलांच्या बाजारपेठा आहेत.

फुलांच्या निर्यातीत महाराष्ट्र देशात सर्वात आघाडीवर आहे. अमेरिका,जपान, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड आणि नेदरलँड या देशामध्ये मुख्यतः फुलांची निर्यात होते. गुलाब, मोगरा, जाई, जुई इत्यादींच्या अत्तरांनाही जागतिक बाजारपेठ मोठी मागणी आहे.

### १.१३.४ फळे व भाजीपाला प्रक्रिया उद्योग

महाराष्ट्रात गेल्या काही वर्षात फळांचे उत्पादन भरपूर प्रमाणात वाढलेले असले तरी त्या प्रमाणात फळप्रक्रिया उद्योग आणि फळे साठविण्याच्या सुविधा यांची मात्र वाढ झाली नाही. महाराष्ट्रात सन २०१६–१७ मध्ये १०,६३०.०८ मे.टन फळांचे, तर १०,५२०.४९ मे.टन भाजीपाल्याचे उत्पादन झाले. आंबा, अननस, सफरचंद, टोमॅटो आणि कांद्यावर प्रक्रिया केली जाते व त्यापासून फळांचे डबाबंद रस, जाम, चटण्या, पेय, लोणचे, इत्यादी उत्पादने तयार केली जातात. फळांबरोबरच महाराष्ट्रात वांगी, टोमॅटो, कोबी, कांदा, मुळा, तांबडा भोपळा, इत्यादी भाज्यांचे सॉस, फ्रोझन, लोणचे, पेस्ट, पावडर, डिहायड्रेट्रेड फ्लॉवर क्यूब, हवाबंद कोबी आणि निर्जलीकृत पदार्थ केले जातात. द्राक्षवाईन तसेच औषधी व मसाला वनस्पती प्रक्रिया उद्योग काही प्रमाणात उभारण्यात आले आहेत.

प्रक्रिया केलेल्या फळे व भाजीपाल्याच्या निर्यातीतून सन २०१५–१६ ला १,०४२ कोटी तर २०१६–१७ मध्ये १,०५८ कोटी रुपये महाराष्ट्राला मिळाले आहेत. हवाबंद वेष्टनातील सुकविलेल्या भाजीपाल्यातून २०१५–१६ ला २०६ कोटी तर २०१६–१७ मध्ये २५० कोटी मिळाले आहेत. एकंदरीत या उत्पन्नात दरवर्षी वाढ होत असल्याचे दिसत आहे.[५०] (महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १०१)

### १.१३.५ उसप्रक्रिया व सहकारी साखर उद्योग

भारतात जवळपास ६ लाख हेक्टर क्षेत्रावर उसाचे पीक घेतले जाते. उसापासून विविध प्रकारचे प्रक्रियायुक्त पदार्थ तयार केले जातात. महाराष्ट्रात साखरेबरोबरच कोल्हापूर, सांगली, पुणे, अहमदनगर या जिल्ह्यांमध्ये ऊस हा गुळासाठी वापरला जातो. उत्तम प्रकारचा गुळ हे कोल्हापूरचे वैशिष्ट्य आहे. उसापासून उत्तम प्रकारच्या काकवीचीही निर्मिती करता केली जाते. ऊसाच्या एकूण उत्पादनापैकी काही प्रमाणात तसाच खाण्यासाठी आणि रसवंतीसाठी वापरला

जातो. महाराष्ट्र शासनाच्या साखर आयुक्ताच्या माहितीनुसार भारतातील एकूण साखर कारखान्यांपैकी सर्वाधिक ३१ टक्के कारखाने महाराष्ट्रात असून त्या खालोखाल २४ टक्के कारखाने उत्तर प्रदेशात आहेत. महाराष्ट्रात सन २०१६ ला ५५.८१ लाख मे. टन साखरेचे उत्पादन झाले. ६९ कारखान्यांमध्ये आसवनी प्रकल्प तर ५१ कारखान्यात सहवीज निर्मिती प्रकल्प कार्यान्वित आहेत.[५१](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७-१८, पृ.क्र. १४२)

### १.१३.६ दूध व दुग्धजन्य पदार्थ उद्योग

शेतीपूरक व्यवसायांपैकी दुग्धव्यवसाय फार पूर्वीपासून परंपरागत चालत आलेला आहे. परंतु हा पूर्णवेळ व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांची संख्या मर्यादित आहे. दूध उत्पादनाच्या बाबतीत जागतिक पातळीवर भारताने प्रथम क्रमांक प्राप्त केला असला तरी प्रति जनावर दूध उत्पादनात भारत फार मागे आहे. याचे मुख्य कारण म्हणजे हा व्यवसाय करताना शास्त्रीय पध्दतीचा अवलंब न करणे व आधुनिकिकरणाचा अभाव. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून दुधापासून बनवलेले दही, ताक, लोणी, तूप आहारात वापरले जातात. दूध उत्पादनातील सुमारे ८० टक्के दुधाची द्रव स्वरुपात दैनंदिन उपयोगासाठी विक्री होते. सुमारे १५ ते २० टक्के दुधाचे विविध पदार्थ तयार करुन त्यांची विक्री करण्यात येते. महाराष्ट्राच्या अनेक तालुक्यांत सहकारी व खाजगी दूध संस्था असून त्या खवा, क्रीम, लोणी, पनीर, तूप, चक्का व श्रीखंडाची निर्मिती करतात. महाराष्ट्रात ११,५९७ सहकारी दूध संस्था व ७४ सहकारी दूध संघापैकी सुमारे ४२.९ टक्के दूध सहकारी संस्था व २८.४ टक्के दूध संघ ३१ मार्च २०१७ अखेर तोट्यात आहेत.[५२](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७-१८, पृ.क्र. १४१) तरीही दूध उत्पादनात राज्याचा देशात सातवा क्रमांक आहे.

### १.१३.७ कुक्कुटपालन

कुक्कुटपालन हा शेतीपूरक जोडधंदाही महाराष्ट्रात चांगल्या प्रकारे विकसित झाला आहे. या धंद्याला फारसे भांडवल लागत नसल्यामुळे लहान शेतकऱ्यांनाही तो जोडधंदा म्हणून सहज करता येतो. सुधारित पक्षी, औषधांची सोय, कर्जाची सोय, नवीन तंत्रज्ञान, इत्यादी कारणांमुळे ग्रामीण महिलांपूरताच मर्यादित असलेला हा व्यवसाय जोडधंदा न राहता मुख्य व्यवसाय म्हणून

उभा राहिला आहे. कोंबड्यांची अंडी आणि मांस याची मागणीही सातत्याने वाढणारी आहे. या उद्योगाला सरकारी पातळीवरही सहाय्य मिळाल्याचे आढळून येते. अंडी उत्पादनात महाराष्ट्राचा देशात पाचवा क्रमांक असून प्रतिवर्ष दरडोई अंडी उपलब्धता राज्यात ४७ आहे.[५३](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १०९)

### १.१३.८ शेळी–मेंढीपालन व पशुसंवर्धन

शेळी कुठल्याही हवामानात जगू शकते आणि झाडाझुडपांच्या पाल्यावर वाढत असल्याने हा जोडधंदा महाराष्ट्रात वाढला आहे. शेळी वर्षातून दोनदा विते. तिचा भाकड काळही कमी असतो. एका शेळीपासून रोज सुमारे अर्धा लिटर दूध आणि वर्षाला २०० किलो लेंडी खत मिळते. शेळ्यांच्या संख्येत भारत हा जगात प्रथम क्रमांकावर आहे. देशातील एकूण दूध उत्पादनापैकी ३ टक्के दूध शेळ्यांपासून मिळते. तर देशातील एकूण मांस उत्पादनापैकी ५० टक्के मांस शेळ्यांकडून मिळते. तसेच ४५ टक्के कातडी शेळ्यांपासून मिळते. महाराष्ट्रातील जिरायत व अवर्षणग्रस्त क्षेत्रात शेतीस जोडधंदा म्हणून मेंढीपालन किफायतशीर ठरते. मेंढी पालनातून मांस, लोकर व खताच्या विक्रीतून उत्पादन मिळते. महाराष्ट्रात हा व्यवसाय प्रामुख्याने धनगर समाज करतो. त्यात अगदी अल्प प्रमाणात शेतकरी शेतीबरोबर मेंढ्या पाळतात. महाराष्ट्रात दख्खन्नी जातीच्या मेंढ्या आढळतात. या मेंढ्या मुख्यत्वे मांसासाठी पाळल्या जातात. गाई, म्हशी, बैल, रेडे, याच्यासह राज्यात काही ठिकाणी डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचेही काही प्रमाणात पालन केले जाते. महाराष्ट्रात पशुगणना २०१२ नुसार सुमारे ३.२५ कोटी पशुधनासह महाराष्ट्र राज्य देशात सहाव्या क्रमांकवर आहे. राज्यात दर लाख लोकसंख्येमागे सन २०१२ मध्ये जवळपास २९ हजार पशुधन होते. राज्यात कुक्कुटादि पक्ष्यांची संख्या सुमारे ७.७८ कोटी असून ती भारतातील एकूण कुक्कुटादी पक्ष्यांच्या संख्येच्या १०.७ टक्के आहे व देश पातळीवर राज्याचा तिसरा क्रमांक आहे.[५४](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १०९)

### १.१३.९ प्रमुख पशुधन उत्पादने

मांस उत्पादनात महाराष्ट्र हे ११.४ टक्के उत्पादनाच्या हिश्शासह भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. राष्ट्रीय स्तरावर दरडोई प्रतिदिन ३५२ ग्रॅम उपलब्धतेच्या तुलनेत राज्यात दरडोई प्रतिदिन २४३ ग्रॅम दूध उपलब्धता आहे. अंडी उत्पादनात महाराष्ट्राचा देशात पाचवा क्रमांक असून प्रतिवर्ष दरडोई अंडी उपलब्धता राज्यात ४७ आहे, तर राष्ट्रीय स्तरावर ६९ आहे. राष्ट्रीय पोषण संस्थेच्या अहवालानुसार प्रतिवर्ष दरडोई १८० अंडी सेवन करावे अशी शिफारस केली आहे.[५५](महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७–१८, पृ.क्र. १०९)

## १.१४ जिरायत व बागायत शेती

जलसिंचनाशिवाय केली जाणारी पर्जन्याधारित शेती म्हणजे कोरड्या प्रदेशात केली जाणारी जिरायती शेती (Rainfed Farming) होय. निमओसाड, कोरड्या हवामान प्रदेशात या प्रकारची शेती केली जाते. जगातील व्यापक प्रदेशात याप्रकारची शेती होते. भौतिक आणि सामाजिक परिस्थितीनुसार या शेतीतील मशागतीच्या पध्दती, पिके व पशूपालन यात प्रादेशिक वेगळेपण दिसून येते. कोरड्या प्रदेशातील शेती निर्वाही स्वरुपाची असल्याने धान्य पिकांना प्राधान्य असते. मका, ज्वारी, बाजरी, बार्ली, राय अशी भरडधान्ये मूग, हरभरा, मसूर यांसारखी व इतर कडधान्ये गहू, सोयाबीन, तीळ, सूर्यफूल, जवस ही पिके घेतली जातात. त्याशिवाय कापूस व वाटाणावर्गीय पिकेही घेतली जाता. सन २०१६–१७ मध्ये देशभरात ज्वारीची पेरणी ०.१० लाख हेक्टर क्षेत्रावर करण्यात आली.[५६](Kharif Crops Report, २०१७–१८, पृ.क्र. ३८)

ज्या प्रदेशात वार्षिक सरासरी ३० ते ७५ से. मी. पेक्षा कमी पाऊस पडतो व हवामान उष्ण व कोरडे असते अशा निमशुष्क प्रदेशात किंवा जेथे निमकोरडा प्रदेश आहे अशा भागात ही शेती करतात. या भागातील जमीन सुपीक असते परंतु जलसिंचनाच्या सोयी नसल्याने कोरडवाहू शेती केली जाते. ही शेती ज्या भागात केली जाते तेथे पडणारा पाऊस हा पिकांच्या दृष्टीने अपुरा व अनियमीत स्वरुपाचा असतो. शेतीची मशागत पद्धत विशेष प्रकारची असते. पहिला पाऊस पडण्यापूर्वी शेतीची नांगरणी खोलवर केली जाते. पाऊस पडल्यानंतर पावसाचे पाणी शेत जमिनीत मुरते. त्यानंतर जमीन सपाट केल्यानंतर जमिनीतील पाण्याचा ओलावा

लगेच निघून जात नाही. उपलब्ध ओलाव्यावर वर्षातून एखादे पीक घेतले जाते. या शेतीची वैशिष्टये म्हणजे कमी पावसावर येणारी पिके घेतली जातात. शेत जमिनीस रासायनिक खतांचा पुरवठा केला जातो. जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शेतीतून मिळणारे उत्पन्न कमी असते. निसर्गावर आधारित असल्याने त्याप्रमाणे पिकांचे नियोजन केले जाते.

मोसमी पावसाचे योग्य वेळी आगमन या शेतीसाठी महत्त्वाचे असते. पाऊस उशिरा आल्यास पेरण्या लांबतात व नंतर त्याचा परिणाम पीकवाढीवर व उत्पादनावर होतो. काही वेळा प्रारंभी पाऊस होतो म्हणून पेरण्या केल्या जातात. परंतु नंतर तीन ते पाच आडवड्यांचा काळ पर्जन्यविरहीत गेल्यास पेरण्या वाया जातात व दुबार पेरणी करावी लागते. त्यामुळे उत्पादन खर्च वाढतो. उत्पादनाची हमी राहत नाही. दुबार पेरणी मुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. भारतातील एकूण १४३ दशलक्ष हेक्टर क्षेत्रापैकी ८२ दशलक्ष हेक्टर क्षेत्र कोरडवाहू आहे. तर महाराष्ट्र ८२ टक्के प्रमाण असून ८० टक्के शेतकऱ्यांकडे पाच एकर पेक्षा कमी जमीन आहे.[५७](दैनिक ॲग्रोवन, २०१७-१८, पृ.क्र. ७) हे कोरडवाहू क्षेत्र प्रामुख्याने शुष्क अथवा उष्ण आणि आर्द्रतायुक्त शुष्क किंवा उष्ण हवामान विभागात येते. मोसमी पावसाचा खरीप हंगाम अशा विपरीत परिस्थितीत गेल्यास शेतकऱ्यास रबी हंगामावरच पूर्णपणे विसंबून राहावे लागते.

**मंडई बागायती –** बागायती शेतीच्या प्रकारात जलसिंचनाची व्यवस्था असते. शेतीसाठी पाण्याची व्यवस्था नदी, धरणे, पाट, चारी, विहीर, बोरवेलच्या द्वारे पाणी दिल्याने निश्चित स्वरुपात काही प्रमाणात उत्पादनाची हमी असते. अगदीच पावसाच्या पाण्यावर विसंबून राहण्याची वेळ नसते. मात्र हवामान बदल अथवा नैसर्गिक संकटाने फटका बसण्याचा धोका या ही शेती प्रकारात असतो. तरीही बागायत शेती करणारा शेतकरी हा सधन वर्गात गणला जाातो. मंडई बागायती शेती प्रकारात भाजीपाला, फळभाज्या, फुले, मोसमी फळे अशा दैनंदिन गरजांच्या उत्पादनांचा समावेश असतो. शहरांच्या सीमावर्ती परिसरात केली जाणारी एक प्रकारे परसदारी असणारी ही शेती आहे. शहरांच्या समीपतेमुळे भूखंडाची किंमत खूप जास्त असते. हे भूखंड लहान असल्याने मोठी भांडवल गुंतवणूक, आधूनिक तंत्रज्ञान, कुशल प्रशिक्षित मनुष्यबळाच्या सहाय्याने ही शेती केली जाते. मंडई बागायतीतील उत्पादने ताजी, मोसमी व नाशवंत असतात त्यामुळे त्यांना शहरांतून दैनंदिन मागणी असते. यासाठी उत्तम, सुरक्षित व

कार्यक्षम व्यवस्था असावी लागते. शहरातील ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनाचा प्रकार व क्षेत्र बदलते. काही भागात कुक्कटपालनही केले जाते व अंडी, मांस दररोज शहरात विक्रीसाठी पाठविले जाते.

मळ्याची बागायती शेतीची सुरुवात युरोपीय वसाहती, दक्षिण अमेरिकेत झाल्यानंतर उष्ण व दमट हवामानात झाली. उष्ण कटिबंधात विशिष्ट अनुकूल भौगोलिक परिस्थितीत विशिष्ट पिकांची विस्तृत प्रदेशात लागवड करतात. कुशल कामगारांचा मोठ्या प्रमाणावर वापर करुन आधुनिक तत्त्वावर पिकांचे उत्पादन घेतले जाते. या प्रकारच्या शेतीस मळे पध्दतीची शेती म्हणतात. या प्रकारात शेत जमिनीचा आकार विस्तृत असतो. आधुनिक तंत्राच्या व तंत्रज्ञाच्या सहाय्याने प्रगत शेती करतात. उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञान व संशोधन यांचे प्रयोग सतत सुरु असतात.

महाराष्ट्रात हरितक्रांती यशस्वी करण्यामागे तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. देशात अन्नधान्यापासून फळे–फूले भाजीपाला अशा अनेक उत्पादनासाठी महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. आजही ज्वारीपासून जरबेरापर्यंत आणि बोरापासून स्ट्रॉबेरीपर्यंत असे वैविध्यपूर्ण उत्पादन शेतकरी घेऊन ते देशभर नाही तर जगभर पाठवितो. देशाच्या एकूण फळे, भाजीपाला निर्यातीत महाराष्ट्राचा वाटा सुमारे ३० टक्के आहे. मात्र, मागील काही वर्षांपासून हवामान बदलाच्या काळात वाढलेली नैसर्गिक संकटे, खूल्या अर्थव्यवस्थेच्या काळात बदललेली बाजार आणि शासनाची शेतकरीविरोधी धोरणे यामुळे तो मेटाकुटीस आला आहे. पेरले ते विकत नाही, बाजारात काय विकले जाईल याबाबत कुणाचे मार्गदर्शन होत नाही, परिणामी आतबट्ट्याच्या शेतीने शेतकऱ्यांच्या आत्महत्याही अधिक प्रमाणात होत आहेत, हे राज्यातील शेतीचे वास्तव आहे.[५८](ॲग्रोवन, २०१७, पृ.क्र. ७)

## १.१५ शेतकरी आत्महत्या व इतर समस्या

जगाचा पोशिंदा बळीराजा, कृषिप्रधान देशाचा कणा अशा एक ना अनेक उपाधींनी शेतकऱ्यांचे वर्णन करण्यात येते. शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या आत्महत्यांमुळे वरील सर्व विधाने, मान्यता खोटी असल्याचे वर्तमानपत्रांतील शेतकरी आत्महत्यांवरील बातम्यांमधून दिसते. आत्महत्यांच्या बाबतीत सन २००७ मध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर राहिला

आहे. तर गेल्या १० वर्षात महाराष्ट्रातील तब्बल ३६ हजार ४२८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे.[५९](गायकवाड, २००८, पृ.क्र. ४३) या सरकारी आकड्यांविषयी मतभेद आहेत. शेतकरी आत्महत्यांची खरी संख्या या पेक्षाही जास्त असल्याने अनेकांचे मत आहे.

'मॅगसेस' पुरस्कार विजेते ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ यांनी यावर आणखी प्रकाश टाकताना टिप्पणी केली. 'सेझ' ही संकल्पना 'स्पेशल इलिमिनेशन झोन' ठरते आहे. 'सेझ' च्या अंमलबजावणी नंतर राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण ५.२ टक्क्यांनी वाढले. तुलनेने मागासलेल्या बिहार, आसाम, मेघालय, नागालँड, राजस्थान आदि राज्यांमधले सन २००६-०७ मधले आत्महत्यांचे प्रमाण महाराष्ट्रापेक्षाही कमी आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो ने प्रसिध्द केलेला एक अहवाल तर नुसता धक्का देणाराच नव्हे तर चिंता वाढवणारा आहे. एकूण आत्महत्यांपैकी ४३.९ टक्के आत्महत्या या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक व मध्यप्रदेशात होतात. शिवाय एकूण शेतकरी आत्महत्येच्या तुलनेत हा आकडा ६४ टक्के आहे. १९९९७ ते २००५ या काळात देशात एकंदर ९,७७,१०७ लोकांनी जीवन यात्रा संपवली. त्यात १,४९,२४४ शेतकऱ्यांचा समावेश आहे. आत्महत्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. याबाबत प्रा.मुकुंदराव गायकवाड म्हणतात की, महाराष्ट्र हे शेतकऱ्यांचे स्मशान (ग्रेव्ह यार्ड) ठरू लागले आहे.[६०](गायकवाड, २००८, पृ.क्र. ५८)

## आत्महत्येसाठी तज्ज्ञांनी दिलेली कारणे

१) शेतीसाठी होणारा खर्च आणि उत्पन्नाचे व्यस्त प्रमाण, बदललेली नैसर्गिक शेती, बोगस बियाणे यावर सरकारचे नियंत्रण नाही.

२) प्रयोगशीलतेचा अभाव, सरकारची इच्छाशक्ती, सावकारीला लगाम घालण्यात येत असलेले अपयश

३) सर्वोच्च न्यायालयाने चक्रवाढ व्याजाने शेतकऱ्याकडून कर्ज वसूल करू नये असा आदेश दिला असतानाही बँकांनी तो मानला नाही.

४) सन १९६९ मध्ये जी हरितक्रांती झाली, त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करुन बँकांवर धाक निर्माण केला होता. त्यामुळे बँका शेतकऱ्यांना सहानुभुतीने कर्ज पुरवठार करीत असत. आज बँका उद्दाम बनलेल्या आहेत. सरकारचे,

रिझर्व बँकेचे आणि सर्वोच्च न्यायालयाचे आदेश धुडकावून लावण्याइतपत स्वतंत्रता उपभोगत आहेत.

५) देशी वाण बुडत चाललेले आहे. परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांचे महागडे बियाणे शेतकऱ्यांना खरेदी करावे लागत आहे.

६) खुद्द महाबीजच्या बियाणाबाबतही बोगस बियाणे म्हणून तक्रारी पुढे येत आहेत. सरकारने काय केले? याचे उत्तर नाइलाजाने नकारार्थी निघत आहे.

७) शेतकरी आळशी आहेत असे जाहीर करुन टाकले की पुढची जबाबदारी झटकून टाकणे सोप जाते, असे एक समीकरण दृढ होऊ पाहते आहे.

८) प्रयोगशीलता कमी पडते याला कारण आळस नसतो तर द्रष्ट्या नेतृत्वाचा आणि अभ्यासाचाही अभाव असतो.

९) शेतकरी वर्षानुवर्ष एकाच पध्दतीची शेती करीत आहेत असाही निष्कर्ष अनेकांनी काढला आहे.

१०) विदर्भात सहकाराचा अभाव आहे.

११) शेतीपूरक उद्योग पश्चिम महाराष्ट्रात आहे. विदर्भात असे शेती पूरक उद्योग सुरूकेले नाहीत.

१२) तिथे द्रष्ट्या नेतृत्वाचा अभाव कारणीभूत आहे.

१३) बँका शेतीला कर्जपुरवठा करायला तयार नाहीत कारण शेतीतून येणारे उत्पन्न अनिश्चित आहे.

१४) शेतीवर खर्च वाढतो, त्या तुलनेत उत्पन्न मिळालं तर कर्ज फेड सोपी होते हे साधे गणित आहे पण हे घडत नाही. परिणामी पूर्वीची कर्ज फेडता येत नाही. पत कमी होत जाते. नव्याने कर्ज मिळत नाही.

१५) शेतकऱ्याला दिलेले कर्ज हे बुडीतच असते असा जो बँकांचा ग्रह झाला आहे तो वेळीच दूर केला नाही.

१६) अनेक धनदांडग्या शेतकऱ्यांनी, व्यापाऱ्यांनी, कारखानदारांनी कट कारस्थान करुन

लॉबी निर्माण करुन बँकांची, आर्थिक संस्थांची जाणीवपूर्वक फसवणूक करुन, त्याला हातभार लावला. हे लोक नामानिराळे राहिले. चोर सोडून संन्याशाला सुळी देण्याचा प्रकार शेतकऱ्याच्या बाबतीत घडला.

१७) शेतकरी दारू पितो, लग्नावर जास्त खर्च करतो, अंथरुण पाहून पाय पसरत नाही, ज्या कारणासाठी कर्ज घेतले त्यासाठी खर्च करीत नाही.

१८) शेतीला प्रतिष्ठाच राहिली नाही.

१९) शेतकऱ्यांची संघटना नाही.

२०) शेतकऱ्यांना योग्य नेते मिळाले नाहीत, असलेले नेतृत्व घरच्या म्हातारीचे काळ ठरत आहेत. नेते वरवर शेतकऱ्यांचा कैवार दाखवीत असले तरी कारखानदार आणि औद्योगिक लॉबीला विकले गेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांबद्दल त्यांना प्रेम व सहानुभूती उरली नाही.

२१) खाजगी सावकारांचा वार्षिक वसुली दर ६० ते १५० टक्के असा असतो. आगीतून फुफाट्यात पडण्यासारखे हे स्पष्ट दिसत असुनही शेतकऱ्यांपुढे पर्याय उरत नाही.

२२) कापसाच्या किंमतीत वाढ होत नाही. ९० च्या दशकात एक क्विंटल कापसाला २००० रुपए भाव होता तितकाच किंवा त्यापेक्षा कमी भाव २००८ साली सुध्दा आहे. दरम्यानच्या काळात उत्पादन खर्च मात्र अफाट वाढला.

२३) नियोजन मंडळाच्या एका समितीच्या पाहणीनुसार विदर्भातील ३२ लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांपैकी २००८ मध्ये २८ लाख शेतकरी दिवाळखोरीत आहेत.

२४) उत्पादन खर्च आणि किमान वैधानिक किंमत यामधील फरक भातामध्ये ३८ टक्के, बाजरी ४८ टक्के, भूईमूग ३२ टक्के, तूर ४० टक्के, कापूस ३८ टक्के, सूर्यफूल ५० टक्के, उडीद ४७ टक्के, सोयाबीन ३७ टक्के इतका आहे. सगळयात कमी फरक केवळ उसामध्ये १२ टक्के आहे. केंद्र सरकारच्या कृषि मंत्रालयाची ही आकडेवारी आहे. तरीही कोणतीही उपयोजना करण्यात आलेली नाही.

२५) कांद्यासारख्या निर्यातीबाबत धरसोड धोरण कधी अत्यावश्यक वस्तुच्या यादीत टाकून निर्यात बंद करणे, तर भाव उतरले असता शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देणे.

२६) शेतीला दुय्यम ठरविले गेले आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या राज्यात विदर्भ

आत्महत्याने ग्रासलेला, तर मुंबईत रोज नव्या अर्थपूर्ण घडामोडी होतात. सेन्सेक्स वर खाली होत राहतो. सायबर सिटीतील झगमगाट डोळे दिपवीत असतो.

२७) अन्य कोणत्याही गोष्टीसाठी थोडे थांबून लक्ष दिले तरी चालेल पण शेतीकडे विलंबाने लक्ष देवून चालणार नाही.

२८) शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय काही अचानक उद्‌भवलेला नाही. पाऊस कमी झाला नाही. पिक वाया जाणे, फेरपेरणी करावी लागणे, अडत्याकडून होणारी फसवणूक हे देखील नवीन नाही हे वर्षानुवर्ष आपण पाहतो आहोत.

२९) शेतकऱ्यांच्या डोक्यावर कर्ज नाही अशी उदाहरणे इतिहासात जवळपास नसतीलच. असंख्य प्रकारचे विचार करता शेतकरी पूर्वी कधीच निराश होत नव्हता, असेही नाही. पण आत्महत्या करण्याइतका तो टोकाचा विचार करू लागला आहे.

''दारिद्र्य मरण यांतुनी मरण बरे, बा दारिद्रता खोटी

मरणात दुःख थोडे, दारिद्र्यांत व्यथा असे मोठी''[६१](गायकवाड, २००८, पृ.क्र. १९८)

एकदा जमिनीवर कर्ज वाढले की ते वारणं होत नाही. व्याज, चक्रवाढ व्याज चढत राहतं आणि सावकार जमीन गिळून बसतो. आहे ती जमीन गेल्यावर आपल्याजवळ काय राहील? ज्येष्ठ साहित्यिक व्यंकटेश माडगुळकर यांनी करुणाष्टक या आत्मचरित्रात्मक कादंबरीमध्ये केलेले हे वर्णन. पावसाचा लहरीपणा आणि बाजारपेठेतील अनिश्चितता या दोन कारणांमुळे महाराष्ट्रातील कृषि क्षेत्राला एक प्रकारे ग्रहण लागलेले आहे. महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांनी दुधाचा महापूर आणला परंतु त्याचा काही आर्थिक फायदा झालेला दिसून येत नाही. भाव नसल्यामुळे कांदा, टोमॅटो, दूध, भाजीपाला रस्त्यावर फेकून द्यावे लागतात. अधिक पिकविलेला ऊस जाळावा लागतो. शेतकऱ्यांचे या पध्दतीने होणारे नुकसान थांबविण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जात नाहीत. दुधाला मिनरल वॉटरपेक्षा कमी भाव मिळत असल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमात अनेकदा आढळतात. महाराष्ट्र राज्यात १ जानेवारी २००१ ते ३१ मार्च २०१९ पर्यंत एकूण ३०,३३४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची सरकार दरबारी नोंद आहे.

**तालिका क्र.१.४**
**शेतकऱ्यांच्या आत्महत्या**

| वर्ष | आत्महत्या | मदतीसाठी पात्र | अपात्र |
|---|---|---|---|
| २०१४ | २०३९ | १३५८ | ६७४ |
| २०१५ | ३२६३ | २१५२ | १०८१ |
| २०१६ | ३०८० | १७६८ | १२९२ |
| २०१७ | २९१७ | १६३८ | ९८७ |
| २०१८ | २७६१ | १३३० | १०५० |
| मार्च–२०१९ | ६१० | १९२ | ९६ |
| एकूण | १४६७० | ८४३८ | ५१८० |

**(स्त्रोतः महाराष्ट्र शासन संदर्भानुसार दैनिक लोकमत, २०१९)**

विशेष म्हणजे गेल्या पाच वर्षात जवळपास निम्म्या म्हणजेच १४,६७० जणांनी आत्महत्या केली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक जणांच्या वारसांना सरकारने आर्थिक मदत केली असून उर्वरितांना मदतीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे. भारतीय जनता पक्ष व शिवसेना युती सरकार सत्तेवर आल्यापासून म्हणजेच २०१४ पासून ३१ मार्च २०१९ या कालावधीत १४,६७० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. हे प्रमाण जवळपास त्यापूर्वीच्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारच्या १३ वर्षांच्या कालावधीइतकेच आहे. त्यामुळे युती सरकारच्या कालावधीत आत्महत्यांचे प्रमाण वाढल्याचे स्पष्ट होत आहे. विशेष म्हणजे ही आकडेवारी केवळ सरकार दरबारी नोंद असून त्याशिवाय नोंद न झालेली प्रकरणे अनेक असल्याची शक्यता आहे.[६२](लोकमत, २०१९, पृ.क्र. ७) कर्जमाफी, विविध सवलती, शेतकरी स्वावलंबी मिशन, सन्मान योजना आदि प्रकारच्या उपाययोजना करताना सरकार दिसते. तरिही शेतकऱ्यांच्या आत्महत्या काही थांबत नसल्याचे चित्र दिसत आहे. सन २०११ पासूनचा विचार केल्यास हे चित्र अधिकच गडद होताना विविध अहवाल आणि वृत्तपत्रांतील बातम्यांतून प्रकर्षाने दिसत आहे.

## १.१६ शेती क्षेत्र व आधुनिक तंत्रज्ञान

शेती क्षेत्रातील अनेक प्रकारच्या समस्यांचा उहापोह वृत्तपत्रांमध्ये वाचायला मिळतो. भारताने स्वतंत्र झाल्यापासून पंचवार्षिक योजनांचा अवलंब करुन इतर पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर दिला परिणामी कृषि क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली नाही. भारताला जागतिक बँकेने व आंतरराष्ट्रीय नाणे निधीने अन्नधान्याची स्वतःची गरज भागविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा अशी शिफारस केली. त्याच बरोबर संकरित बी-बियाणे, त्याला आवश्यक अशी खते आणि जंतुनाशके यांचा अवलंब करावा असे सुचविले. त्याकरता भारत सरकारने न्यू ॲग्रीकल्चरल स्ट्रॅटेजी – नवीन कृषिविषयक व्यूहरचना उभारली. तिलाच नंतर हरितक्रांती असे नाव देण्यात आले. या हरितक्रांतीमुळे भारत अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला. याचा परिणाम म्हणून भारतातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करु लागला.

संकरित बी-बियाणे तंत्रज्ञान, ऊती संवर्धन, नॅनो तंत्रज्ञान, खत तंत्रज्ञान, किटकनाशक तंत्रज्ञान, ग्रीन हाउस तंत्रज्ञान, सेंद्रीय शेती तंत्रज्ञान शेतीला वरदान ठरत आहेत. शेतीक्षेत्रातील अनेक आव्हाणे पेलण्याची ताकद आधुनिक तंत्रज्ञानामध्ये असल्याने महाराष्ट्रातील शेतीक्षेत्रही मोठ्या प्रमाणात आधुनिक झाल्याचे दिसते. याबाबत कृषितज्ज्ञ डॉ. किरण कोकाटे प्रस्तावनेत म्हणतात की, शेती प्रामुख्याने हवामानावर अवलंबुन असल्याने शेतकऱ्यांना नेहमीच हवामान बदलाच्या समस्येचा सामना करावा लागतो. या अनुषंगाने शेतीच्या शाश्वत विकासासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे.[६३](कृषिदर्शनी, २०१९, प्रस्तावना)

## १.१७ कृषि शिक्षण, संशोधन व नवे प्रयोग

जागतिक शैक्षणिक स्पर्धेत भावी युवा पिढीसाठी कृषि शिक्षण हे एक महत्त्वाचे व्यासपीठ खुले झाले आहे. कृषि क्षेत्रातील आमुलाग्र बदल, नवनविन तंत्रज्ञान या बाबींचा विचार करता शेतीच्या शाश्वत भवितव्याकरिता कृषि व कृषीसंलग्न अभ्यासक्रम जसे की उद्यानविद्या, कृषि जैव तंत्रज्ञान, कृषि अभियांत्रिकी, अन्नतंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, मत्स्यव्यवसाय, वनशास्त्र, पशुसंवर्धन या विषयातील प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे काळाची गरज झाली आहे. सध्या भारतामध्ये एकूण ६२ कृषि विद्यापीठे, ५ अभिमत विद्यापीठे, २ केंद्रीय कृषि व ४

केंद्रीय विद्यापीठे कार्यरत आहेत. या सर्व विद्यापिठांमधून कृषि क्षेत्रासाठी लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार केले जाते.[६४](mpkv.mah.nic.in, २०१८)

कृषि क्षेत्रात प्रगती केल्याशिवाय राज्याचा विकास होऊच शकणार नाही. हे ओळखून महाराष्ट्रात १९६७ साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र कृषि विद्यापीठाची प्रथम स्थापना झाली. त्यानंतर राज्याची भौगोलिक परिस्थिती, हवामान आणि शेती व्यवसायातील विविधता विचारात घेऊन राज्याच्या चार विभागांसाठी चार स्वतंत्र कृषि विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. सन १९६९ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी आणि डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ही दोन कृषि विद्यापीठे स्थापन झाली. त्यानंतर सन १९७२ मध्ये डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली व वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी याची स्थापना झाली. या चारही कृषि विद्यापीठात कृषि व संबंधित विषयांवर अभ्यासक्रम घेतले जातात. याशिवाय संशोधन कार्यही सुरू असते. या चारही कृषि विद्यापीठांच्या शिक्षण व संशोधन कार्यात योग्य समन्वय राखण्यासाठी शासनाने महाराष्ट्र कृषि संशोधन परिषद ही संस्था स्थापन केली आहे. तिचे मुख्यालय पुण्यात आहे. राज्यातील चारही कृषि विद्यापिठांशी राज्याचे काही कृषि संशोधन संभाग संलग्न केले आहेत. जागतीकिकरणामुळे कृषि, उद्यानविद्या, कृषि व्यवसाय व्यवस्थापन, जैवतंत्रज्ञान, अन्नतंत्रज्ञान, शेतमाल प्रक्रिया, पीक संरक्षण या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची मागणी वाढत आहे.

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापिठातील ३४ घटक कृषि व संलग्न महाविद्यालये व १५६ कृषि आणि कृषि संलग्न विना अनुदानित महाविद्यालयातून एकूण १४,८४७ विद्यार्थ्यांना कृषि व कृषि संलग्न अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर कृषि क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ निर्मिती होत आहे. वाढीव प्रवेश क्षमतेनुसार कृषि शिक्षणाची गुणवत्ता टिकून राहण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. विस्तार शिक्षण हे या विद्यापीठांच्या उद्दिष्टांमध्येच समाविष्ट आहे. विस्तार शिक्षण ही एक समस्या सोडविणारी शिक्षण पध्दती म्हणून प्रसिध्द आहे. व्यवहारी जगात ग्रामीण लोकांच्या जीवनात सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी नवीन आणि उपयुक्त तंत्रज्ञान त्यांच्या पर्यंत पोहोचवून त्यांना ते आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे महत्त्वाचे आहे. यासाठी विस्तार शिक्षण पध्दतीचा वापर एक प्रभावी साधन आहे. कृषि संशोधन केंद्रे आणि शेतकरी यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी,

त्यामध्ये या दोन घटकांना जोडणारे दुवे निर्माण केले असून त्याद्वारे संशोधनाचे निष्कर्ष पुढील अवलंबनासाठी शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले जातात. शिवाय शेतीविषयक प्रश्नही याच दुव्यामार्फत संशोधन केंद्रावर अभ्यासण्यासाठी व त्यावरील उपाय शोधण्यासाठी आणले जातात. या दोन घटकातील दुवा म्हणजे विस्तार कार्यकर्ता. विस्तार कार्यकर्त्यांना नवीन संशोधनाबद्दल प्रशिक्षण देवून त्यांच्याकडून शेतकऱ्यांत कृषि ज्ञानाचा प्रसार करुन शेती उत्पादन वाढविण्याकरिता प्रशिक्षण व भेट योजना अंमलात आणली जाते. या योजनेचे खास वैशिष्ट्य म्हणजे कृषि विस्तार कार्यकर्ता व कृषि विद्यापीठांचे निकट संबंध स्थापन करणे हे होते.[६५](mpkv.mah.nic.in, २०१८)

कृषि विद्यापीठांनी केलेले संशोधन अल्पकाळात सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत विस्तार कार्यकर्त्यामार्फत पोहोचविणे. कृषि विद्यापीठांनी निरनिराळ्या विषयातील तज्ज्ञ विस्तार कार्यकर्त्यांमार्फत प्रत्यक्ष शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींची माहिती घेऊन व त्यावर संशोधन करुन परिणामकारक मार्गदर्शन करण्यसाठी कृषि विद्यापीठांकडून विविध माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी संशोधक व विस्तार कार्यकर्त्यांचे जिल्हा, मासिक चर्चासत्र, हंगामनिहाय विस्तार कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण तर शेतकऱ्यांसाठी गाव पातळी प्रशिक्षण अशी कार्यप्रणाली वापरण्यात आली.

महाराष्ट्र राज्यात १९८९ साली नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. या विद्यापीठातील कृषि विज्ञान शाखेने शेती, फलोद्यान, फूलशेती, प्रांगण उद्यान आणि कृषिकेंद्री व्यवस्थापन विषयातील प्रमाणपत्र पातळीपासून पदव्युत्तर पातळीपर्यंतचे शिक्षणक्रम दूरशिक्षण पध्दतीने उपलब्ध करुन दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतावर काम करता करता आधुनिक कृषि शिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आणि ज्ञानाचा थेट प्रयोग आपल्या शेतात करुन उत्पादन वाढविण्याचे प्रयोग करण्याची संधीही प्राप्त झाली. उद्यानविद्या आणि नर्सरी व्यवस्थापनाच्या शिक्षणक्रमामुळे फुलशेती आणि शोभेच्या फुलांच्या रोपवाटिका करुन अनेक तरुणांनी स्वयंरोजगाराच्या दिशेने यशस्वी वाटचाल केली, रासायनिक खताएवेजी सेंद्रीय खतांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने या विद्यापीठाने अभ्यासक्रमात व प्रशिक्षणात खास तरतुदी केल्या आहेत. विद्यापीठाच्या वतीने आदिवासी भागात मधमाशापालन, आळंबी लागवड, आंबा, काजूलागवड, शेवगा, फलोद्यान नर्सरी,

इत्यादींसाठी जैविक ग्रामविकास प्रकल्प राबविण्यात येतो. ग्रामीण भागात निवडक ठिकाणी भूईमुगाच्या शेंगा, सोयाबीन, कार्ला उत्पादन वाढीचे प्रयोग परिवार स्थापन केले आहेत. भाजीपाला उत्पादनासाठीही विद्यापीठाने पदविका शिक्षणक्रम सुरू केला आहे. [६६](ycmou.ac.in, २०१८)

भारत सरकारचे कृषि विज्ञान केंद्र आणि मुक्त शिक्षणप्रणाली यांची सांगड घालून मुक्त विद्यापीठाने शेतकऱ्यांच्या अल्प मुदतीच्या प्रशिक्षणाने कार्यक्रम आखून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतावर थेट आधुनिक ज्ञान पोहचविण्याची उपक्रमशीलता दाखविली असून नजिकच्या काळात त्याचा परिणाम महाराष्ट्रातील कृषि उत्पादनावर निश्चित होणार आहे. महाराष्ट्रात एकमेव याच विद्यापीठात कृषि पत्रकारितेचा पदविका अभ्यासक्रम राबविण्यात येतो. महाराष्ट्रात ३२ कृषि तंत्र विद्यालय, ४५ विनाअनुदानीत कृषि तंत्र विद्यालय व १७७ विनाअनुदानीत कृषि तंत्र निकेतनचे तसेच १० माळी प्रशिक्षण व १ शासकीय मत्स्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत आहेत. याद्वारे १५,६७० प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती केली जाते. याच बरोबर नागपूर येथे राज्यातील एकमेव असे महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ आहे.[६७](mafsu.in, २०१८)

कृषि उत्पादन प्रक्रियेत कृषि निविष्ठांना फार महत्त्व आहे. शेतकऱ्यांनी दर्जेदार उत्पादनासाठी सुरुवातीपासूनच खबरदारी घेऊन दर्जेदार निविष्ठाच वापरल्या पाहिजेत. यात मुख्यत्वे रासायनिक खते, रासायनिक किटकनाशके आणि सुधारित औजारे यांचा विचार आवश्यक आहे. या निविष्ठा अधिकृत ठिकाणाहून योग्य दर्जा, योग्य किंमतीच्या असल्याची खात्री करुन वापरणे आवश्यक ठरते. यासाठी कृषि संशोधन व विकास समिती अनेक प्रकारच्या सुधारीत, संकरीत वाण, कृषि यंत्रे व औजारे प्रसारीत करीत असतात. याच बरोबर अनेक प्रकारच्या पीक उत्पादन वाढ तंत्रज्ञानाच्या शिफारसींना दर वर्षी मान्यता देण्यात येत असतात. सन २०१७ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे बाजरी, राजमा, बरटी, ऊस, भूईमूग, ओटचारा, मारवेल, गवत, मद्रास अंदन गवत, टॉमॅटो, घोसाळी, सिताफळ या सुधारीत तथा संकरीत वाणांसह ६१ पीक उत्पादन वाढ व तंत्रज्ञानच्या शिफारसींना मान्यता देण्यात आली आहे. यात शक्तीचलीत फुले ऊस बेणे कापणी यंत्र आणि ट्रॅक्टरचलीत फुले

ऊस रोपे लागवड यंत्र या दोन उपयुक्त यंत्रांची शिफारस देखील करण्यात आली आहे.[६८](श्री सुगी, २०१७, पृ.क्र. १)

संशोधनात सन २०१६ मध्ये ओडिशातील कटक येथील राष्ट्रीय भात संशोधन संस्थाच्या वैज्ञानिकांनी सीआर तांदूळ ३१० ही भाताची नवीन प्रजाती विकसित केल्याची माहिती केंद्रीय कृषि मंत्री राधामोहन सिंह यांनी दिली. सर्व साधारणपणे तांदळामध्ये ६–७ टक्के प्रथिने आढळून येतात, मात्र या नव्या प्रजातीमध्ये ११ टक्के प्रथिने आहेत. आजपर्यंत विविध हवामानात टिकण्यासाठी ११४ भाताच्या प्रजाती विकसित केल्या आहेत.[६९](crro/nic.in, २०१८) विविध शेतमालात सर्वाधिक १८ भौगोलिक निर्देशांक (Geographical Indication) मानांकने मिळवत महाराष्ट्र राज्याने दि. ६ जून २०१६ रोजी देशात पहिला क्रमांक मिळविला. सन २००७ ते २०१२ या दरम्यान १४ अशा एकूण १८ शेतमालांना जीआय मानांकने मिळाली आहेत.[७०](ipindia.nic.in, २०१८)

इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ऑरगॅनिक ॲग्रिकल्चर मूव्हमेंट या सेंद्रिय शेती क्षेत्रातील जगप्रसिध्द आंतरराष्ट्रीय संस्थेने दि. ९ जून २०१६ रोजी प्रकाशित केलेल्या अहवालानुसार सेंद्रीय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या यादीत भारताने पहिला क्रमांक पटकाविला. या अहवालातून मिळालेल्या माहितीनुसार भारतात सेंद्रीय शेती उत्पादक शेतकऱ्यांची संख्या जवळपास साडे सहा लाख इतकी आहे. भारता पाठोपाठ १ लाख ९ हजार ५९० उत्पादक शेतकऱ्यांसह युगांडा दुसऱ्या क्रमांकावर तर १ लाख ६९ हजार ७०३ शेतकऱ्यांसह मेक्सिको या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे.[७१](ifoam.bio, २०१८) भारतीय कृषि संशोधन परिषद ही देशातील सर्वोच्च कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्यातील संस्था आहे. भारत सरकारच्या कृषि विभाग आणि कृषि संशोधन आणि शिक्षण विभागांतर्गत या संस्थेचा कारभार चालतो. देशातील कृषि, फलोद्यान, मत्स्यशेती, पशुपालनातील शिक्षण तसेच संशोधनाचे नियोजन करण्याचे काम परिषदेमार्फत केले जाते. परिषदेच्या संशोधन केंद्र आणि कृषि विद्यापीठांनी केलेले संशोधन, तंत्रज्ञान विस्तारामुळे भारतीय शेतीला नवी दिशा मिळाली असून संशोधन संस्थांनी विकसित केलेले विविध वाण, पीक व्यवस्थापनाचे तंत्र, पशुपालन, मत्स्यशेती, कुक्कुटपालन प्रक्रिया उद्योगातील तंत्र शेतकऱ्यापर्यंत पोहचत आहे. या परिषदेचे

मुख्यालय नवी दिल्ली येथे असून या परिषदेच्या अंतर्गत ९९ संशोधन संस्था आणि ५३ कृषि विद्यापीठे कार्यरत आहे.[७२](kvk.icar, २०१८)

कृषि पत्रकारितेसाठी शेतीतले नाविन्यपूर्ण, अभिनव नवनवीन प्रयोग हे बातम्या व लेखांचे विषय होत असतात. सामूहिक शेती ही एक वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना आहे. शाश्वत विकास व पर्यायाने शाश्वत शेतीचा एक भाग म्हणून सामूहिक शेती विकसीत होत आहे. सुमारे तीन दशकांपूर्वी पर्यावरणाचे जतन व संरक्षण करण्याच्या उद्देशाने परिसराला सुयोग्य ठरतील अशा काही शेती निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यातून सेंद्रीय शेती, गटशेती, सामूहिक शेती, सहकारी शेती, कौटुंबिक शेती, शेती पूरक व्यवसायाची जोड देणे आदि प्रयत्न या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत आहेत.

वर्तमान शेतीमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जंगलतोड, मातीची धूप, पाण्याची कमतरता व प्रदूषण, अनारोग्य व अशांतता असे अनेक परिणाम मानवाच्या क्रिया–प्रक्रियांमुळे निर्माण झाले आहेत. जरी आधुनिक शेतीने उत्पादन वाढ साध्य करुन सकारात्मक परिणाम दर्शविला असला तरी त्यामुळे झालेली व होणारी पर्यावरण हानी आणि त्याचा पुढील पिढ्यांवर होणारा परिणाम लक्षात येऊ लागल्यावर शेती पध्दतीत बदल सुचविण्यात आले. त्यातून सामूहिक शेती उदयास आल्याचे मानले जाते. कृषिप्रधान देशांमध्ये शेतकऱ्यांची कमी होणारी संख्या, वाढते भूमीहीन शेतमजूर, स्त्री–पुरुषांचे प्रमाण हेच दर्शवित आहे. म्हणून जमीन मालकीचे व शेती कसण्याचे एक भिन्न रुप घेऊन सामूहिक शेती विकसित होत गेली आहे. भारतातील सामूहिक शेतीत सीमांत व लहान भूधारक यांची संख्या जास्त आहे. असे असले तरी काही कृषि पत्रकारांनी नवे प्रयोग राबविणाऱ्या संस्था प्रकाश झोतात आणल्याचे दिसते. काही ठळक उदाहरणे खालीलप्रमाणे सांगता येतील

आंध्रप्रदेश मेडक जिल्ह्यातील 'दि डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी' या संस्थेने भूमिहीन महिलांसाठी सामूहिक शेतीचा प्रकल्प यशस्वी पध्दतीने राबविला आहे. या संस्थेने शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून सामूहिक शेती करण्यासाठी महिलांना जमीन खरेदी करण्यासाठी सहाय्य केले. तर काहींना भाडेपट्टीचा करार करुन जमीन कसण्यासाठी मिळवून दिली. या व्यवहारासाठी अनुसूचित जाती जमाती विकास महामंडळाचे सहाय्य घेतले. हा महिलांचा गट या योजनेतून मिळालेल्या भूखंडावर एकत्र शेती करतो. पण त्यातील प्रत्येकाला सुमारे एक

एकर जमिनीची मालकी दिलेली आहे. असे वेगवेगळे २४ महिला गट १४ गावांमधून जवळपास ४७४ एकर जमिनीवर सामूहिक शेती करत आहेत. अशा गटामधील महिला हळूहळू बरेच व्यवहार शिकल्या आहेत. ट्रॅक्टर भाड्याने घेणे, अधिकारी, तज्ज्ञ यांना भेटून सल्ला घेणे, खते खरेदी व्यवहारात भाग घेणे, उत्पादीत मालाचे विपणन करणे अशी कामे त्या स्वबळावर करू शकतात. 'दि डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटी'अशा प्रकारे २००० पेक्षा अधिक महिलांना एकत्र करुन सामूहिक शेतीस उत्तेजन देत आहे.[७३](ddsindia.com, २०१८) यातून महिलांचे सक्षमीकरण होत असल्याने याची दखल घेतली जात आहे.

गुजरातमध्ये 'सेवा' या संस्थेने ओसाड जमीन लागवडीखाली आणण्यासाठी भूमिहीन शेतमजूरांची सहकारी संस्था सुरू केली. गुजरात शासनाचा महसूल विभाग व गुजरात कृषि विद्यापीठाचे स्थानिक केंद्र यांच्याकडून ओसाड जमिन मिळविली. नंतर जमीन लागवडीखाली आणण्यासाठी तांत्रिक निविष्टा प्राप्त करुन घेतल्या. त्यानंतर पर्यावरणपूरक पध्दतीने कृषी उत्पादने घेण्यासाठी सामूहिक शेती करण्यास मदत केली. सन २००५ मध्ये या उपक्रमातून प्रत्येक सभासदास रुपये २००० उत्पन्न मिळाले शिवाय 'सेवा' ने याच गटातील महिलांसाठी रोपवाटीका उभ्या करुन उत्पन्नाचे साधन मिळवून दिले.[७४](sewa.org, २०१८)

'नॅशनल कमिशन ऑन फार्मर्स' या संस्थेतर्फे तंत्रज्ञान व जलसिंचन विषयक एक अहवाल प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यात केरळ मधील त्रिसूर जिल्ह्यातील 'अडत' या शेतकरी सहकारी बँकेने राबविलेल्या उपक्रमाचा उल्लेख केला आहे. त्रिसूर जिल्ह्यातील २४०० सभासद शेतकरी एकत्र आले आणि त्यांनी गावागावातील जमिनी संलग्न करुन घेऊन गट तयार केले. सर्व निविष्टा एकत्रित खरेदी केल्या व पिके घेतली ज्यात भात हेच प्रमुख पीक होते. शेतकऱ्यांनी जमीनीबरोबर त्यांचे मनुष्यबळही उपलब्ध करुन दिले. त्यातून झालेल्या भात उत्पादनाच्या विक्रितून बँकेस ५.१० कोटी रुपए नफा मिळाला.[७५](adatfarmersbank.com, २०१८) ते त्यांनी जमिनीच्या वाट्याप्रमाणे सभासद शेतकऱ्यांना दिले. यावरुन सीमांत व लहान शेतकऱ्यांना महत्त्वाची बाब लक्षात आली की, लहान लहान भूखंडावर स्वतंत्रपणे दुबळी शेती करण्यापेक्षा सामूहिक तत्व आणि प्रामाणिक नेतृत्व हे यशास कारणीभूत ठरतात.

## १.१८ भविष्य व दिशा

शेती व्यवसाय अनेक समस्यांनी ग्रस्त असलेला दिसून येतो. जागतीकीकरण, हवामान बदल, देशांतर्गत अस्थिरता अशा काही कारणांमुळे प्रत्येक देशातील शेतीचे भवितव्य काय असेल याचा विचार होणे महत्त्वाचे ठरते. भारतातील शेती व्यवसाय अनेक समस्यांनी ग्रस्त झालेला आहे. शेतकरी शेती सोडून देऊन इतर क्षेत्राकडे वळू लागले आहेत. याबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरु के.पी. विश्वनाथा म्हणतात की, शहरात मिळणारे शिक्षण, आरोग्य यासह अन्य सुविधा खेड्यातच मिळाल्या तर तरुणांचा शहराकडे जाण्याचा ओढा नक्कीच कमी होईल. कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून पीक पध्दतीमध्ये बदल करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. एकाच प्रकारचे पीक न घेता शेतीला फळभाज्या, दूध व्यवसाय, शेळपालन आदिंची जोड दिली तर शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पादनाचा नवीन स्त्रोत तयार होतो.[७६](लोकमत, २०१६, पृ.क्र. २) एकूण भारतीय शेतीचे भवितव्य धूसर असल्याच्या सूचना मिळू लागल्या आहेत. खुली अर्थव्यवस्था, जागतीकीकरण, हवामान बदल याचा शेतीवरील प्रभाव वाढत आहे. जागतिक व्यापार संघटना 'सार्क' आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अशा संस्थांच्या धोरणांचा प्रभाव आपल्या शेतीवर असल्याने शेतीच्या भवितव्याचा विचार पुढील मुद्यांच्या आधारे करावा लागेल.

### १.१८.१ शेतमालाची बाजारपेठ

भारतीय शेती आता मागणी प्रधान झाली आहे. बाजारात ज्या उत्पादनांना मागणी आहे. तोच कृषिमाल उत्पादित केला जातो. पूर्वी शेतकरी कोणते पीक घ्यावयाचे याचा निर्णय स्वतःच घेवून पिकविलेला माल बाजारात विक्रीसाठी घेऊन येई यास पुरवठा प्रधान शेती म्हणतात. अशी पुरवठा प्रधान शेती असताना बाजार समिती कायदा करण्यात आला. पण आता तो कायदा कालबाह्य झाला असल्याचे मत व्यक्त होत आहे. शेतमालाच्या खरेदीची स्पर्धा वाढणे आवश्यक आहे. म्हणजेच शेतमालाची बाजारपेठ खुली करायला हवी. शेतीच्या भवितव्यासाठी शेतमालाच्या खासगी बाजारपेठांची निर्मिती करणे, शेतकरी–ग्राहक बाजारपेठ उभारणी, अन्न प्रक्रिया उद्योग उभारणी, संघटीत किरकोळ विक्री केंद्राची साखळी निर्मिती

करणे, करारी शेती, कॉर्पोरेट शेती मान्यता देणे आणि शेतकऱ्याकडून माल विकत घेण्याची मुभा मिळणे या बाबी महत्त्वाच्या आहेत.

### १.१८.२ माहिती तंत्रज्ञानाचा वापर

भारतातील बहुतांश कुटुंबामध्ये मोबाईल फोन पोहोचलेला आहे. तसेच संगणकाचे जाळेही विस्तारलेले आहे. तलाठ्याचे कार्यालय इ–चावडी म्हणजे मोबाइल, संगणक, इंटरनेटच्या माध्यमातून तलाठी कार्यालयापासून तालुका, जिल्हा व राज्य अशा प्रशासकीय यंत्रणेला अद्ययावत करुन जोडण्याचे काम सुरू आहे. जमिनीच्या नोंदी, हवामान विषयक सूचना, बाजारभाव, सार्वजनिक वितरण व्यवस्थेत आधुनिक संदेशवहन, संगणक प्रणाली वापरुन पारदर्शकता वाढली आहे. त्यामुळे माहिती न मिळणे, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार आदि त्रुटी दूर झाल्या आहेत. यास आय टी एनेबल्ड प्रतिमान म्हणतात. भारत सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने 'विकीपीडिया'च्या धर्तीवर 'विकासपीडिया' हे बहुभाषिक वेबपोर्टल सुरू केले आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असे हे मुक्त व्यासपीठ आहे. शेतीशी निगडीत अनेक विषयांची माहिती एकत्रितरित्या 'विकासपीडिया' वर उपलब्ध आहे. पीक उत्पादन वाढ, शेतीतील गुंतवणुक, कृषि हवामान, जल–मृदा संधारणाचे उपाय, पशुपालन, शेतीपूरक उद्योग, मत्स्य व्यवसाय, शासकीय योजना, शाश्वत शेती, कृषि क्षेत्राच्या यशोगाथा, पतपुरवठा अशा अनेक विषयांची माहिती विविध भाषांमधून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. यामुळे शेतकरी व शेती तज्ज्ञ–तंत्रज्ञ यांच्यातील संवाद शक्य होत आहे. 'विकासपीडिया' च्या या चळवळीत ग्रामीण भागातील स्वयंसेवी संस्था व शासनाचे विविध विभाग सहभागी होत असल्याचे दिसते.

अनेक शेतकरी व्हॉट्सॲप, फेसबुक, इंटरनेट, या नव माध्यमांचा वापर संवादासाठी करीत आहेत. ही बाब ओळखून पुणे जिल्ह्यातील बारामती येथील 'ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट' च्या कृषि विज्ञान केंद्राने ८ नोव्हेंबर २०१६ रोजी 'कृषिक' ॲप्लिकेशन सादर केले. हवामानाचा अंदाज, कृषि सल्ला, शेतीविषयक ताज्या बातम्या, प्रमुख बाजारपेठांतील शेतमालाचे बाजारभाव, कृषि तज्ज्ञांचे मार्गदर्शन, पिकांची सुधारित लागवडी पध्दती, ड्रीप डिझाईनसाठी अंदाजे येणारा खर्च, जनावरांसाठी लागणारा आदर्श चारा, एकरी रोपांची संख्या, त्यासाठी होणारा खर्च व इतर शेतीविषयक उपयुक्त माहिती असल्याने 'कृषिक ॲप' पहिल्याच

वर्षी संपूर्ण महाराष्ट्रातील तब्बल ४० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यात यशस्वी झाले.[७७](शेतकरी, २०१८, पृ.क्र. ४९) अशा प्रयोगांमुळे शेती आणि शेतकऱ्यांना निश्चितच बळ मिळत असते.

### १.१८.३ पुढची पिढी व शेती

ग्रामीण भागात झालेला शिक्षणाचा प्रसार व त्याचबरोबर ग्रामीण भागातील कमी झालेला रोजगार आणि त्यामुळे शहरांकडे होत असलेले स्थलांतर या भारतीय शेतीच्या भवितव्याच्या दृष्टीने सूचक ठरणाऱ्या बाबी आहेत. बेभरवशाची शेती, काबाडकष्ट, शेती तोट्याची होणे हे कोणालाच नकोसे वाटायला लावणारे आहे. म्हणूनच शेतकऱ्यांची मुले शहराकडे स्थलांतर करत आहेत. अनेक श्रीमंत शेतकऱ्यांची मुलेही घरची शेती करायला तयार होत नाही. या पिढीस एकदम रोख पैसा हातात येण्याचे मार्ग खुणावत आहेत. सेझ, रस्ते, लोहमार्ग, विमानतळ, यासाठी लागणारी जमीन, औद्योगिक प्रकल्प, घर बांधणी प्रकल्प, शहरांच्या सीमांचा विस्तार अशा कारणास्तव शेतजमीन विकण्याचे प्रमाणही वाढले आहे. यात कोरडवाहू शेतीची विपन्नावस्था शेतीचे भवितव्य धूसर होण्याचा धोका दर्शवत आहे.

शेतीच्या दृष्टीने दुःखदायक बाब म्हणजे शेतकऱ्यांचे मानसिक आरोग्य ठीक नसणे, शेतकऱ्यांना आलेले नैराश्य व त्यामुळे केल्या जाणाऱ्या आत्महत्या या शेतीसाठी व समाजासाठी गंभीर बाबी आहेत. देशाची सर्व आर्थिक धोरणे अल्पभूधारक, छोटया व मध्यम शेतकरी वर्गाच्या विरोधात गेली आहेत. यात बदल करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची आज खरी गरज आहे. पश्चिम बंगालने वृध्द शेतमजुरांना निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. कर्जमाफी, मदतीच्या नावाने पॅकेजची मलमपट्टी करण्यापेक्षा हमी भाव, भरवशाची वीज, मोफत आरोग्य सेवा, शिक्षणाची हमी आणि कोरडवाहू शेतकऱ्यास दरमहा उदरनिर्वाहापुरती रोख रक्कम मानधन म्हणून दिल्यास काही प्रमाणात शेतीचे भवितव्य चांगले असेल असा विश्वास वाटतो.

अशा या नकारात्मक पार्श्वभूमीवर काही मोठ्या संस्था, उद्योगसमूह शेतीसाठी काही भांडवल व शेती निविष्टा पुरवून विपुल उत्पादन घेण्यासाठी लहान भूधारकांना एकत्र करुन कराराची शेती, कंपनी प्रशासित शेती करण्यास प्रवृत्त करत आहेत. यातील शेतकरी हिताच्या बाबी लक्षात घेऊन स्वीकार करावा किंवा नाही ते ठरविता येऊ शकते. त्याशिवाय गटशेती,

सामूहिक शेती व सहकारी शेती असे एकजुटीने शेती करण्याचे प्रयोग कौतुकास्पद आहेत. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात बुचकेवाडी वैष्णवधाम हे माळीण दुर्घटना परिसरातील एक लहान गाव व त्याचे शिवार ल्युपिन फाऊंडेशन या संस्थेने दत्तक घेतले आहे. सन २००९ पासून त्यांनी पाणलोट क्षेत्र विकास, पीक पध्दती ठरविणे, निविष्टा उपलब्ध करुन देणे आणि कृषि विपणनास साहाय्य करुन तेथील सर्व शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी उमेद व प्रेरणा दिली आहे. देशात आदर्श असलेली गाव ही तेथील एखाद्या स्थानिक वजनदार नेतृत्वात विकासाच्या वाटेने पुढे गेलेली दिसतात. परंतु बुचकेवाडी हे गाव जात, धर्म, वय, लिंग विरहित सामुहीक नेतृत्वात पुढे येऊन आदर्श ग्राम झाले आहे.[७८] (buchkewadi-vaishnavdham.com, २०१८) शेतीच्या दृष्टीने ही सकारात्मक बाब आहे.


### १.१८.४ आधुनिकतेचा स्विकार

भारतीय शेतीच्या अधिक चांगल्या भवितव्यासाठी आधुनिकतेचा स्विकार होणे गरजेचे आहे. कालची शेती पारंपरिक, आजची शेती आधुनिक आणि उद्याची शेती शाश्वत असे म्हटले जाते. यासाठी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारले जाऊ लागले आहे. सुक्ष्म जलसिंचन, जैव खते, कीटकनाशके, उती संवर्धन, पॉली हाऊस, सेंद्रीय खते, मधुमक्षिका पालन असे अनेक पर्याय उभे आहेत. त्याशिवाय हवामान बदल, पर्यावरण ऱ्हास, प्रदूषण रोखण्याच्या पर्यायांमध्ये सेंद्रिय शेती व शाश्वत शेतीचा समावेश होतो. तंत्रज्ञान प्रसारासाठी प्रक्षेत्र भेटी, प्रत्यक्ष मार्गदर्शन, प्रदर्शनांचे आयोजन, माध्यमांचा वापर, माहिती विषयक साहित्य निर्मिती आदींचा वापर करुन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करण्यासाठी शेतकरी प्रथम हा राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत प्रकल्प सन २०१५–१६ पासून राबवण्यात येत आहे.[७९] (श्री सुगी रब्बी, २०१७, पृ.क्र. ५६) शेती आणि शेतकरी यांच्या विकासासाठी आणखी नवनवीन प्रकल्प, योजना सरकारी व बिगर सरकारी पातळीवरुन राबविणे गरजेचे आहे. भारत तरुणांचा देश असल्याने भारतीय शेतीचे भवितव्य त्यांच्या हातात असणार आहे एवढे मात्र खरे!

## क) अहमदनगर जिल्हा–एक आकलन

### १.१९ पार्श्वभूमी

सहकारातून समृध्दीकडे वाटचाल करणारा अहमदनगर जिल्हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या या जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १७,०४८ चौ. कि. मी. असून ते राज्याच्या क्षेत्रफळाच्या ५.६ टक्के आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ४५,४३,१५९ आहे. पश्चिमेकडील डोंगराळ भाग व पूर्वेकडील सखल भाग हे जिल्ह्याचे स्वाभाविक विभाग आहेत. पश्चिम भागातील हवामान थंड व कोरडे तर पूर्व भागातील हवामान उष्ण व कोरडे आहे. जिल्ह्यातील सरासरी पर्जन्यमान ३८२ मिली मीटर इतके असून पर्जन्यमानाची वाटणी असमान आहे.[८०](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. १)




(स्त्रोत : [www.mapsofindia.com](http://www.mapsofindia.com)) not to the as per Scale for information only.

गोदावरी व भीमा या जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तर सीमेवरुन गोदावरी नदी वाहते. प्रवरा व मुळा या तिच्या उपनद्या आहेत. भीमा नदी जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरुन वाहते. दक्षिण भागातून सीना, हंगा, घोड या नद्या दक्षिणेकडे वाहतात. काळी लालसर, काळी बरड, व पंढरी या प्रकारात जिल्ह्याची जमीन विभागलेली आहे. रब्बी ज्वारी हे

जिल्ह्याचे मुख्य पीक आहे. खरीप हंगामात बाजरी, भूईमूग, मठ, सोयाबीन व मूग ही पिके तर रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा ही पिके घेतली जातात. ऊस हे जिल्ह्याचे प्रमुख नगदी पीक असून त्यामुळे जिल्ह्याची आर्थिक प्रगती झाली आहे. द्राक्षे, संत्री, डाळींबे, पेरु इत्यादी फळांचे उत्पादनही जिल्ह्यात घेतले जाते. जिल्ह्यातील बागायत शेती प्रामुख्याने विहिरींच्या पाण्यावर केली जाते. गंगापूर, भंडारदरा, मुळा, घोड, कुकडी या धरणाच्या पाटपाण्यामुळे शेतजमिन ओलिताखाली येण्यास मदत झाली आहे. सर्व प्रकारच्या एकूण ५,३८६ सहकारी संस्थांसह सहकार क्षेत्रातील अग्रणी जिल्हा ही आपली ओळख या जिल्ह्याने टिकवली आहे. महाराष्ट्र राज्याच्या निम्म्याहून अधिक साखरेचे उत्पादन एकट्या नगर जिल्ह्यात केले जाते. २०१७ अखेर जिल्ह्यात १९ साखर कारखाने कार्यरत आहेत. आशिया खंडात सहकार क्षेत्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या व इतर सहकारी बँकेच्या एकूण २९६ शाखा जिल्ह्यात मार्च २०१७ अखेर कार्यान्वीत होत्या. जिल्ह्यात मार्च २०१७ अखेर १०० टक्के विद्युतीकरण झालेले असून त्या खेडे व शहरांची संख्या १,६०३ आहे.[८१](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. २)

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे पारनेर तालुक्यातील आदर्श गाव राळेगणसिध्दी आणि सरपंच पोपटराव पवार यांचे लोकसहभागातून जलसंधारणात आदर्श निर्माण करणारे नगर तालुक्यातील हिवरे बाजार राज्यात प्रसिध्द आहे. श्री साईबाबांची शिर्डी व अवतार मेहेरबाबांचे मेहराबाद ही अहमदनगर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे भारतातीलच नव्हे तर जगातील अनेक भक्तांचे श्रध्दा स्थाने आहेत. याशिवाय श्री ज्ञानेश्वर मंदिर (नेवासा), श्री शनी शिगणापूर, श्री दत्त मंदिर (देवगड) व चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे जन्मस्थान, पाथर्डीचे भगवानगड, सिध्दटेकचे श्री सिध्दी विनायक या तीर्थक्षेत्रांनी भाविकांच्या मनात अहमदनगर जिल्ह्याचे आगळेवेगळे स्थान निर्माण केले आहे.

## १.२० स्थान, चतुःसीमा, अक्षांश व रेखांश

महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी ऊर्ध्व गोदावरी व भीमा या नद्यांच्या खोऱ्यात वसलेला अहमदनगर जिल्हा उत्तर अक्षांस १८°.२ अंश ते १९°.९ अंश आणि पूर्व रेखांश ७३°.९ ते ७५°.५ अंश या दरम्यान पसरलेला आहे. जिल्ह्याच्या सीमेवर उत्तरेस नाशिक, इशान्येस

औरंगाबाद, पूर्वेस बीड व उस्मानाबाद, दक्षिणेस सोलापूर तर पश्चिमेस ठाणे व पुणे हे जिल्हे आहेत.[८२](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७ पृ.क्र. ३)

## १.२१ क्षेत्रफळ व प्रशासकीय सेवा

क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर असलेल्या जिल्ह्याचे क्षेत्रफळ १७,०४८ चौ.कि.मी. आहे. त्यातील १३ लाख ५९ हजार ९०० हेक्टर क्षेत्र पेरणी लायक आहे. त्यात खरीपात ४,१२,००० हेक्टर तर रब्बीत ७,८७,९४० हेक्टर क्षेत्रावर पेरणी होते. खरीपाची ५८२, तर रब्बीची १०१८ गावे आहेत. दि. १५ ऑगस्ट २०१३ पासून प्रशासकीय सोयीसाठी महसूल खात्याने जिल्ह्यातील १४ तालुक्यांची विभागणी सात उपविभागात केली आहे.[८३](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ३)

## १.२२ विस्तार

पेशवाईच्या अस्तानंतर इ.स. १८२२ मध्ये अहमदनगर जिल्ह्याची निर्मिती झाली त्यावेळी अहमदनगर जिल्ह्याची हद्द आताच्या नाशिक जिल्ह्यातील वणी तर दुसरे टोक सोलापूर जिल्ह्यातील करमाळयापर्यंत होते. १८६९ मध्ये नाशिक व सोलापूर जिल्ह्यांची निर्मिती झाल्याने वणी व करमाळा हे अहमदनगर जिल्ह्यातून वगळण्यात आले. पुणे महसूल विभागात असलेला अहमदनगर जिल्हा फेब्रुवारी १९८१ पासून नाशिक या नवीन महसूल विभागात समाविष्ट करण्यात आला. नाशिक महसूल विभागात येणाऱ्या अहमदनगर जिल्ह्याचा विस्तार १४ तालुक्यांमध्ये झाला आहे. जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय अहमदनगर आहे. जिल्ह्यातील एकूण १८ शहरे, एक महानगरपालिका, १ कटक मंडळ, १४ पंचायत समित्यांसह जिल्ह्यात १,५७८ गावे व १,३११ ग्रामपंचायती आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अहमदनगर जिल्ह्यात एकूण ३ खेडी निर्जन आहेत. त्यापैकी नगर तालुक्यात घानेगाव व सुजलपूर तर श्रीरामपूर तालुक्यामध्ये गोंधवणी गाव हे निर्जन आहे. वरील १४ तालुक्यांमध्ये एकूण १,५८४ खेडी आहे. जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात एक या प्रमाणे एकूण १४ पंचायत समित्या तर १,३११ ग्रामपंचायती आहेत.

**२०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्यात १७ नागरी भाग आहेत.**

१. कॅन्टोन्मेंट प्रशासनाखाली अहमदनगर कटक मंडळ

२. महानगरपालिका,अहमदनगर

३. राहूरी नगरपालिका

४. देवळाली प्रवरा नगरपालिका

५. श्रीरामपूर नगरपालिका

६. पाथर्डी नगरपालिका

७. श्रीगोंदा नगरपालिका

८. संगमनेर नगरपालिका

९. कोपरगाव नगरपालिका

१०. राहाता नगरपालिका

११. शिर्डी नगरपंचायत

१२. नेवासा नगरपंचायत

१३. पारनेर नगरपंचायत

१४. अकोले नगरपंचायत

१५. शेवगाव नगरपंचायत

१६. कर्जत नगरपंचायत

१७. जामखेड नगरपंचायत

या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. राजूर, घुलेवाडी, नागापूर, बुऱ्हाणनगर, नागरदेवळे, दरेवाडी अशा ६ नगरपालिका नसलेले नागरी भाग (गणना शहरे) आहेत.[८४](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ३ व ४)

**तालिका क्र. १.५**

**अहमदनगर जिल्हा महसूल उपविभाग**

| अ.क्र. | उपविभाग | समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | नगर,नेवासा |
| २ | कर्जत | कर्जत,जामखेड |
| ३ | पाथर्डी | पाथर्डी,शेवगाव |
| ४ | श्रीगोंदा | श्रीगोंदा,पारनेर |
| ५ | संगमनेर | संगमनेर,अकोले |
| ६ | शिर्डी | कोपरगाव,राहाता |
| ७ | श्रीरामपूर | श्रीरामपूर, राहूरी |

**(स्त्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७)**

## १.२३ हवामान, पाऊस व भूजल

जिल्ह्याचे हवामान साधारणपणे उष्ण व कोरडे आहे. पर्जन्यमान अनिश्चित स्वरुपाचे असून पर्जन्याची वाटणी असमान आहे. सह्याद्रीच्या पूर्व उतारावरील महाराष्ट्राचा प्रदेश पर्जन्य छायेचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात साधारणपणे जुन, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर या कालावधीत पाऊस पडतो. अकोले व संगमनेर तालुक्यांच्या पश्चिम भागातील सरासरी पर्जन्यमान इतर तालुक्यांपेक्षा जास्त आहे. पण तेही नियमित नाही. जिल्ह्यातील पावसाची सरासरी ५५ सें.मी. इतकी आहे. हवामान विषम असून पावसाळा मर्यादीत तर हिवाळा व उन्हाळा कडक असतो. तपमान कमाल ४२° से.तर किमान १२° से. इतके असते. सन २०१६–१७ मध्ये जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ६७९ मि.मि. होते. काही ठराविक भाग वगळता जिल्ह्यातील भूजल, घरगुती वापरासाठी व शेतीसाठी सामान्यपणे चांगल्या प्रतीचे आहे. काही भागातील भूजल क्षारयुक्त असून ते घरगुती वापरासाठी अयोग्य आहे. २० फुटापासून २५० फुट खोलीपर्यंत भूजल उपलब्ध आहे.[८५](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ४)

## १.२४ जलसिंचन

फार पुर्वी स्थापनेच्या काळात नगरला खापरी नळांद्वारे पाणीपुरवठा होत असे. त्याचा स्त्रोत फार दूरवर होता. कारंजी व हौद ही पाण्याची साधने होती. त्यानंतर ब्रिटिशांच्या राजवटीत पिंपळगाव, कापूरवाडी तलावाद्वारे पाणीपुरवठा होत असे. वारंवार पडणारा दुष्काळ पाहून १८६६ मध्ये बिल व हिल या अधिकाऱ्यांनी सर्वेक्षण केले. सर्वेक्षणानंतर त्यांच्या चर्चेतूनच मुळा धरणाची कल्पना निघाली. सन १९०१ पर्यंत डिग्रस, चास आणि बारागांव नांदूर येथे वंजारवाडीच्या माध्यमातून १७ हजार ८५९ दशलक्ष घनफुट पाण्याची उपलब्धता वर्तविण्यात आली. त्या पाण्याद्वारे २ लाख २८ हजार ७५० एकर क्षेत्र ओलिताखाली येण्याची शक्यता वर्तवून, योजनेला १ कोटी ४५ लाख रूपये खर्च येऊन तीन टक्के महसूल मिळेल असे अपेक्षित होते. या पार्श्वभूमीवर सर्वेक्षण करुन १९५४ मध्ये मुळा प्रकल्प सादर करण्यात आला. त्याच्या संभाव्य क्षमतेत चार वेळा फेरबदल करुन, शेवटी २६ हजार दशलक्ष घनफूट क्षमता निश्चित झाली. या धरणातील पाण्यामुळे नेवासे, राहुरी, शेवगाव, पाथर्डी तालुक्यातील ८० हजार ८१० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. ब्रिटिश अधिकारी अभियंता विल्सन यांनी १९२७ ते १९२९ या दोन वर्षात दुष्काळी कामाच्या माध्यमातून फक्त ८६ लाख रुपयांमधून धरणाची निर्मिती केली. तेच भंडारदरा धरण त्याची क्षमता ११ हजार ३९ दशलक्ष घनफूट आहे. या दोन धरणांमुळे सहकारी साखर कारखान्याची मुहुर्तमेढ रोवली गेली.[८६](करवंदे, २०१७, पृ.क्र. ८)

पहिला सहकारी साखर कारखाना व इतर साखर कारखान्यांची निर्मिती होऊन कामगारांना रोजगार उपलब्ध झाला. त्याचबरोबर चलन–वलन वाढून शेतीस शाश्वत पाणीपुरवठा व उसाद्वारे नगदी पिकांच्या उत्पादनास वाव मिळाला. संगमनेर, अकोले, श्रीरामपूर, राहूरी, नेवासे, राहाता तालुक्यांमधील २३ हजार ७७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले. या पाच तालुक्यांचे संपूर्ण भविष्य बदलून गेले. त्यानंतर मुळा व घोड प्रकल्पांमुळे राहूरी, नेवासे, शेवगाव, पाथर्डी, कर्जत, शिरुर (पुणे जिल्हा) तालुक्यांचे भविष्य उज्जवल झाले. परिणामी उसाखालील क्षेत्र आणि साखर करखान्यांची संख्या विक्रमी झाली. साखर उत्पादन व रोजगार वाढले. यामुळे नगर शहराबरोबरच अनेक ठिकाणांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागून औद्योगिक वसाहती पाण्यामुळे उर्जितावस्थेत आल्या. याचा स्वाभाविक परिणाम अर्थव्यवस्थेवर झाला. इतर मध्यम प्रकल्पांमुळे जिल्ह्याची सिंचन क्षमता वृध्दिंगत झाली

शेतकरी शाश्वत पिकांबरोबर नवनवीन आधुनिक अवजारे वाढवून शेतीतंत्र विकसित करीत गेला. हा फायदा केवळ सिंचनाबरोबर धरणामुळे झाला.

भंडारदरा धरणात पाणी साठवण क्षमता ११,२०० द. ल. घन फुट असून भंडारदरा धरणामुळे १,५७,४४८ एकर क्षेत्राला पाणी मिळते. तर मुळा धरणाची पाणी साठवण क्षमता २६,००० द. ल. घन फुट इतकी आहे. या धरणांमुळे संपूर्ण अहमदनगर शहर आणि औद्योगिक वसाहतीला पाणी पुरवठा होतो. तसेच या धरणामुळे ८५,७१० हेक्टर ओलिताखाली आले आहे.[८७](गंधे, १९८७, पृ.क्र. १०७)

## १.२५ जमिनीचे वापरानुसार वर्गीकरण, पीक पध्दती आणि व्याप्ती

अहमदनगर जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १६.६८ लक्ष हेक्टर असून २०१२–१३ वर्षात जमिनीचे वापरानुसार एकूण पिकाखालील क्षेत्र १२,७०,५८५ हेक्टर होते. एकूण लागवडीखालील क्षेत्राशी दुबार पिकाच्या क्षेत्राचे प्रमाण ८.१८ टक्के इतके होते. कृषी गणना २०१० नुसार जिल्ह्यातील एकूण खोतदारांची संख्या ९,५६,०९४ असून त्यांनी धारण केलेले क्षेत्र १२५८३४३.५७ हेक्टर इतके असून त्यांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

आकारमानानुसार खातेदार व त्यांच्याकडील क्षेत्र खालीलप्रमाणे

**तालिका क्र. १.६**

**कृषि गणना २०१०– खातेदार व त्यांनी धारण केलेले क्षेत्र**

| अ.क्र. | आकारमान | खातेदारांची संख्या | (क्षेत्र हेक्टर) |
|---|---|---|---|
| १ | ०.० ते ०.९९ हेक्टरपर्यंत | ७९७६५६ | २४९९०३.९६ |
| २ | १ ते १.९९ हेक्टरपर्यंत | २८२७३३ | २४९९०३.९६ |
| ३ | २ ते ४.९९ हेक्टरपर्यंत | १५३७८३ | ४३७५२०.२७ |
| ४ | ५ ते ९.९९ हेक्टरपर्यंत | १९०२७ | १२३८२०.९३ |
| ५ | १० ते १९ हेक्टरपर्यंत | २४७१ | ३१५०८.०९ |
| ६ | २० हेक्टर व त्याहून अधिक | ४२४ | १५७०९.३७ |
| | एकूण | ९५६०९४ | १२५८३४३.५७ |

**(स्त्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,२०१७)**

अहमदनगर जिल्ह्यात खरीप, रब्बी आणि उन्हाळी असे तीन कृषि उत्पादनांचे हंगाम प्रचलित आहेत. येथील बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. खरीप हंगामात बाजरी, खरिप ज्वारी, मठ, मुग, मका, हरभरा, सोयाबीन, उडीद, तांदूळ, नाचणी, वरई कापूस तर रब्बीत ज्वारी, गहू, हरभरा, करडई आदी पिके घेतली जातात. तर नदी क्षेत्रात ऊस, द्राक्षे, संत्री, चिक्कू, पेरु, कापूस, डाळींब हे नगदी पिके घेतली जातात. तांदूळ व नाचणी ही पिके बहुतांशी अकोले तालुक्यामध्ये घेतली जातात. दूध व्यवसायाला प्राधान्य देणाऱ्या या जिल्ह्यामध्ये मिरची, वांगी, वाटाणा, टमाटे, कांद्यासह भाजीपाल्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. त्याचप्रमाणे उन्हाळी हंगामात सामान्यपणे ज्या ठिकाणी ओलिताची व्यवस्था आहे अशा क्षेत्रात उन्हाळी भूईमूग, मका, सुर्यफूल, भाजीपाला, व चाऱ्याची पिके घेतली जातात. याशिवाय लाखभर हेक्टरवर डाळिंब, लिंबू, संत्री, मोसंबी, बोर, आवळा, द्राक्ष, केळी, सिताफळ, नारळ यांच्या बागा आहेत.

२०१४–१५ या वर्षात जिल्ह्याचे एकूण लागवडीखालील क्षेत्र १२,७०,५८५ हेक्टर इतके होते. त्यापैकी ६,८५,६४० हेक्टर क्षेत्र तृणधान्याखाली १,१६,६३९ क्षेत्र कडधान्याखाली होते. ऊस पिकाखालील क्षेत्र १,२९,०६९ हेक्टर, फळे व भाजीपाला केवळ ६१,०९३ हेक्टर क्षेत्र होते तर उर्वरित व अखाद्य पिकाखाली २७२७९३ हेक्टर क्षेत्र होते. जिल्ह्याची २००४–०५ व २०१४–१५ या वर्षाची महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्राची तुलनात्मक माहिती पुढीलप्रमाणे आहे.

**तालिका क्र. १.७**

**अहमदनगर जिल्ह्याची २००४–०५ व २०१४–१५ यावर्षाची महत्त्वाच्या पिकाखालील क्षेत्राची तुलनात्मक माहिती**

| अ.क्र. | पीक प्रकार | पिकाखालील क्षेत्र हेक्टर | | २००४–०५ च्या तुलनेत २०१४–१५ क्षेत्रात वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | | २००४–०५ | २०१४–१५ | |
| १ | तृणधान्ये | १०००८४६ | ६८५६४० | –४५.९७ |
| २ | कडधान्ये | ८३८०१ | ११६६३९ | २८.१५ |
| ३ | ऊस | ८११५५ | १२९०६९ | ५९.०४ |
| ४ | मसाल्याचे पिके | ४६८० | --- | --- |
| ५ | फळे व भाजीपाला | ३७५६२ | ६१०९३ | ३८.५२ |
| ६ | कपाशी व तंतुमय पिके | ५९७६ | ८९५४७ | ९३.३३ |
| ७ | गळीताची पिके | ४२३८८ | ५५६८३ | २३.८८ |
| ८ | इतर अखाद्य पिके | ६९७४८ | २२२४६२ | ४७.५२ |
| एकूण सर्व पिके | | १३२६१५६ | १३६०१३३ | २.५६ |

**(स्त्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७)**

सन २००४–०५ चा तुलनेत २०१४–१५ मध्ये तृणधान्ये, मसाल्याच्या पिकामध्ये घट झाल्याचे दिसते. तसेच कपाशी व तंतुमय पिके, ऊस, फळे, भाजीपाला तसेच इतर अखाद्य पिकांमध्ये वाढ झाली आहे. महाराष्ट्र शासनाने १९८२ पासून फलोत्पादन विकास कार्यालयाची स्थापना केलेली असून त्याद्वारे शेतकऱ्यांना फळबागा व भाजीपाला विकासाची माहिती व मार्गदर्शन आणि विविध प्रकारच्या रोपांचा पुरवठा केला जातो. अहमदनगर जिल्ह्यातील काष्टी (श्रीगोंदा), कुकाणा (नेवासा), श्रीरामपूर व पाथर्डी येथील फळरोपवाटीका मार्फत शेतकऱ्यांना

मोसंबी, संत्री, डाळींब, कागदी लिंबू, पेरु, नारळ, सिताफळ, चिक्कू, आंबा इत्यादी फळझाडांच्या रोपांचे वाटप केले जाते.

जिल्हा खरेदी विक्री संघ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या, कृषि उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य, कृषि औद्योगिक विकास महामंडळ या मार्फत जिल्ह्यात रासायनिक खतांची विक्री केली जाते. २०१६–१७ या वर्षात विविध पिकाखालील सर्व प्रकारची एकूण ३,३१,२३४ मेट्रीक टन खते वापरली गेली. पिकांचे विविध रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रामुख्याने कीटकनाशके व बुरशी नाशक औषधे, भुकटी, निमोळी अर्क, गोमुत्र अर्क इत्यादींचा वापर केला जातो.[८८](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ६)

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाची जिल्ह्यात विविध ठिकाणी असलेली गोदामे आणि सहकारी संस्थांची गोदामे यातून कृषि उत्पन्नांची साठवण जिल्ह्यात केली जाते. सन २०१६–१७ या वर्षात जिल्ह्यात एकूण ४१ शासकीय गोदाम असून त्याची क्षमता ३१.८५ हजार मे. टन इतकी आहे. जिल्ह्यात एकूण १४ कृषी उत्पन्न बाजार समित्या व २९ उपसमित्यांमार्फत कृषि उत्पन्नांची विक्री केली जाते. अहमदनगर येथील बाजार समिती जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असून त्या ठिकाणी परजिल्ह्यातूही कृषि मालाची आवक मोठ्या प्रमाणावर होते. उर्वरित १४ कृषि उत्पन्न बाजार समित्या या प्राथमिक बाजारपेठा असून त्या ठिकाणी प्रामुख्याने तालुक्यातील कृषि उत्पन्ने विक्रीसाठी आणली जातात. कृषि उत्पन्न बाजार समित्यांना नियंत्रित केलेली विविध प्रकारची कृषि उत्पादने विकली जातात. संदर्भ वर्षात जिल्ह्यातील सर्व कृषि उत्पन्न समित्यांमार्फत कांदा १५,१३,६३२ टन, गव्हाची १३,२७९ टन, ज्वारी ३१,१५०.०३ टन, इतकी आवक झाली. बाजरी १०,९८७ टन व तांदळाची ४६०.८५ टन इतकी आवक झाली. कडधान्यापैकी मुगाची आवक ७६४.६१ टन झाली. सर्वाधिक आवक उडीद ८७०.१६ टन झाली तर सर्वात कमी आवक कुळीथ केवळ ५६ टन झाली.[८९](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ७)

## १.२६ साखर उद्योग

सहकार चळवळीच्या क्षेत्रात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्र राज्यात प्रथमपासून अग्रेसर आहे. राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर

कारखाना हा भारतातील सहकार क्षेत्रातील पहिला साखर कारखाना आहे. साखर उत्पादनात जिल्हा महराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. हंगाम २०१६–१७ मध्ये १९ साखर कारखाने कार्यान्वित असून ३५,०५,५७२ मे.टन उसाचे गाळप करून ३४,१९,६२५ मे. टन साखरेचे उत्पादन केले. संदर्भ वर्षात जिल्ह्यात २२ साखर कारखाने कार्यान्वित आहेत. काही कारखान्यातून साखर उत्पादना व्यतिरिक्त देशी दारू कागद, औद्योगिक मद्यार्क वगैरे उत्पादने केली जातात.[१०](जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ७) जिल्ह्यातील साखर कारखान्यांमुळे अनेक छोट्या मोठ्या उद्योगांची वाढ होवून ग्रामीण भागात अनेक व्यक्तिंना रोजगार उपलब्ध झालेला आहे.

## १.२७ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी

पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाची स्थापना गुरूवार दिनांक २० ऑक्टोबर १९६८ साली अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यात झाली. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासह सुधारित जातीच्या बियाणांची निर्मिती करुन त्याचा पुरवठा विदयापीठाकडून केला जातो. २४६ सुधारीत आणि संकरित वाण, १३७१ तंत्रज्ञान शिफारसी, ३२ सुधारित यंत्रे व औजारे, दर्जेदार शेळी, मेंढी, गाय व खिलार तसेच चार टक्के स्निग्धांश असणाऱ्या व एका वितात तीन हजार लिटरपेक्षा जास्त दूध देणाऱ्या फुले त्रिवेणी या संकरित गायींची निर्मिती या विद्यापीठाने केली आहे. शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण या कार्याची विशेष नोंद घेत भारत सरकारने अकराव्या पंचवार्षिक योजनेत १०० कोटी रुपयांचे विशेष अनुदान देऊन महात्मा फुले कृषि विद्यापीठाला २००८ सालातील देशातील सर्वोत्कृष्ठ विद्यापीठ असा गौरव केला आहे.[११](कृषीदर्शनी, २०१७, पृ.क्र. १)

## १.२८ समारोप

भारतीय प्रसारमाध्यमे सध्या एका वळणावर उभी आहेत. समग्र परिवर्तन आणि विकास क्षेत्रांचा शोध ही एक निरंतर प्रक्रिया असते. कृषि हा भारतीय अर्थकारणाचा एक पायाभूत घटक होय. तरीही शेतीवर आधारलेल्या बातम्यांचे प्रमाण तुलनेने उपेक्षित आहे. या प्रकारणात मराठी वृत्तपत्रे व कृषी पत्रकारितेचा इतिहास व प्रगती, मराठी कृषि पत्रकारिता आणि वर्तमान

स्थिती, मराठी वृत्तपत्रांची मराठी कृषि पत्रकारितेबद्दलची जबाबदारी, भारतीय शेती व्यवसायाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व, अन्न–धान्य व शेती क्षेत्र, हरितक्रांती आणि दारिद्र्य निर्मूलन, पावसावरील अवलंबित्व आणि उत्पादकता, सकल राष्ट्रीय उत्पादनात शेतीचे स्थान याचा थोडक्यात परामर्श घेतला आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या प्रस्तुत संशोधनात मराठी वृत्तपत्रांतील शेती विषयक लिखाणाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. हा संशोधनाचा विषय प्राचीन, ऐतिहासिक आणि संतांचा जिल्हा, उसाचा जिल्हा, साखरेचे कोठार, महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा, स्वातंत्र्यसैनिकांचा जिल्हा, सिंचनाचा जिल्हा अशी विविध बिरुदे मिरविणाऱ्या अहमदनगर जिल्ह्याच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्याची पार्श्वभूमी देखील थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न या प्रकरणाच्या शेवटच्या भागात मी केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात वितरीत होणाऱ्या मराठी वृत्तपत्रातील आशय सामग्री त्यातील कृषिविषयक लेखन व संबंधित घडामोडींच्या घटकनिहाय योगदानाची चर्चा करावयाची आहे.

## संदर्भसूची


०१) डॉ. सिंग, रणजित. (१९८६) स्थीच सेमिनार पेपर्स, नॅशनल कौन्सिल ऑफ डेव्हलपमेंट, वाराणसी, संपादन, व्ही. के. दुबे, डॉ. के. एन. पाम्टे, सुनील कुमार, पृष्ठ क्र. १५४

०२) सरकारिया, आर. एम. (१९९३). पी. आर. अँड प्रेस रिलेशन द प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया, रिव्ह्यू व जर्नल, खंड १४ क्र. पृ.क्र. २५

०३) लेले, रा. के. (२००९) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती, पृष्ठ क्र. ४०

०४) कित्ता, पृ.क्र. २७७–२७८

०५) लेले, रा. के. (१९८४). मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १

०६) कानडे, रा. गो. (१९३८) मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस पुणे. पृष्ठ क्र. ५०

०७) अकलुजकर, प्रसन्नकुमार, (१९८८) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, मराठी विश्वकोष खंड १७, संपा. वाड, विजया मुंबईः मराठी विश्वकोष खंड १७, संपा. वाड, विजया मुंबईः मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, पृ.क्र. ८८

०८) कित्ता, उपरोक्त, पृष्ठ. ८८

०९) INS Press Hand Book (२०१०–११). मराठी वृत्तपत्रे, पृ.क्र. ७२, ७३१

१०) The Press in India (२०१७–१८). रिपार्ट पृ.क्र. ३५२

११) गव्हाणे, डॉ. सुधीर (१९९९) इम्पॅक्ट ऑफ मोनोपोलायझेशन ऑफ चैन न्यूजपेपर्स ऑन इकॉनॉमिक व्हायेबलिटी ऑफ स्मॉल न्यूजपेपर्स इन महाराष्ट्र. पीएच. डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. पृ.क्र. २७८

१२) प्रेस इन इंडिया ६२ वा अहवाल (२०१७–१८). रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेसर्स फॉर इंडिया. पृ.क्र. ११

१३) कित्ता, पृ.क्र. १२

१४) www.agrihorticultureindia.com (AHSI)(2016) founded in 1820 by Rev. Dr. William Carry, an English Baptist Missionary (Surfing Dt-२६/११/२०१६)

१५) वाटाणे, दिलीप (१९९७) कृषिवृत्त–एक अभ्यास, पीएच. डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. पृ.क्र. २८

१६) विदुरा अंक (१९४७) पृ.क्र. ४६७

१७) पाटील, डॉ.किशोर (२०१९) ग्रंथपाल, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांची मुलाखत, २५–०२–२०१९

१८) Venkateswarlu, K. & Raman, K. V. (1993). Project Management Techniques for R & D in Agriculture, Sterling Publishers, New Delhi, पृ.क्र. ०१

१९) माळी, सुनील (२००८) बातमीदारी, राजहंस, प्रकाशन, पृ.क्र. २११

२०) दै. ॲग्रोवन (३० जून २०१७) पुणे आवृत्ती, ३० जून २०१७, पृ.क्र. १५

२१) हजारे, अण्णा (१९९९) यांची विशेष मुलाखत. चित्रन गुप्ता १९९९, पृ.क्र. ११

२२) Treies D & Weigold M. F. (2002). Advancing Science Communication A Survey of Science Communications. Science Communication 23 (3) पृ.क्र. ३२२

२३) पवार, डॉ. सुधाकर (२०१७) कृषि पत्रकार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे–३०, पृ.क्र. १

२४) कर्वे, स्वाती (२००५) अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण क्र. ७. राज्य मराठी विकास संस्था, पुणे पृ.क्र. १४८

२५) माळी, सुनिल (२००८) बातमीदार, राजहंस प्रकाशन, पुणे. पृ.क्र. १२१

२६) दैनिक ॲग्रोवन (३० जून २०१७) पुणे आवृत्ती, पृ.क्र. १

२७) दैनिक ॲग्रोवन (२९ जून २०१५) पुणे आवृत्ती, पृ.क्र. ७

२८) दैनिक ॲग्रोवन (२९ जून २०१७) पुणे आवृत्ती, पृ.क्र. १६

२९) दैनिक ॲग्रोवन (२९ ऑगस्ट २०१०) www.corporate.agrowon.com वेबसाईटवर प्रकाशित बातमी

३०) दैनिक ॲग्रोवन (४ एप्रिल २०१३) www.corporate.agrowon.com वेबसाईटवर प्रकाशित बातमी

३१) www.facebook.com (२३ फेब्रुवारी २०१९) Agrowon-Mitra Global Shivaracha पेज

३२) जैन, रमेश (२००७) जनसंचार विश्वकोश, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर, पृ.क्र. २०

३३) भालेराव, निशिकांत (२००८) आधुनिक पत्रकारिता, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक, पृ.क्र. ५४

३४) कित्ता, पृ.क्र. ५५

३५) गुप्ता, आर. (२००५) भुगोल नेट/सेट, रमेश पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली ११०००२, पृ.क्र. २१२

३६) खतीब, के. ए. (१९९९), भारताचा भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे–३०, पृ.क्र. ४२

३७) सिन्हा, अरविंद (१९८५) मास मिडिया अँड रुरल डेव्हलपमेंट कन्सेप्ट, नवी दिल्ली, पृ.क्र. ११९

३८) काळे, भानू ऑक्टो. (२००९) अंतर्नाद, शरद जोशी विशेषांक, औंध, पुणे–४११००७ पृ.क्र २७

३९) http://agri-eculture.blogspot.com/2012/06/agriculture.html प्रकाशित माहिती

४०) http://krushiking.com (२०१८) वेबसाईटवर प्रकाशित बातमी

४१) सकाळ इयर बुक–(२०१७), प्रकाशक सकाळ पेपर्स प्रा. लि. पुणे, पृ.क्र. २९९

४२) http://www.foo.com (2017) वेबसाईटवर प्रकाशित बातमी

४३) The World Bank http://www.worldbank.org/en/topic/agriulture (२०१७)

४४) http://www.un.org & सकाळ इयर बुक (२०१७) प्रकाशक सकाळ पेपर्स प्रा. लि. पुणे, पृ.क्र. ३००

४५) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१७–१८) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ.क्र. १

४६) कित्ता, पृ.क्र. ९५

४७) कित्ता, पृ.क्र. ९२–९३

४८) कित्ता, पृ.क्र. १००

४९) कित्ता, पृ.क्र. ९४

५०) कित्ता, पृ.क्र. १०१

५१) कित्ता, पृ.क्र. १४२

५२) कित्ता, पृ.क्र. १४१

५३) कित्ता, पृ.क्र. १०९

५४) कित्ता, पृ.क्र. १०९

५५) कित्ता, पृ.क्र. १०९

५६) Report on area coverage under Kharif crops (19/05/2017), Crops Division, Department of Agriculture, Government of India, पृ.क्र. ३८

५७) दैनिक ॲग्रोवन (१ जूलै २०१७). पुणे आवृत्ती, पृ.क्र. ७

५८) कित्ता, पृ.क्र. ७

५९) गायकवाड, प्रा. डॉ. मुकुंदराव (२००८) भारताचे कृषि–अर्थशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृ.क्र.४३

६०) कित्ता, पृ.क्र. ५८

६१) कित्ता, पृ.क्र. १९८

६२) दैनिक लोकमत (२९ मे २०१९) अहमदनगर आवृत्ती, पृ.क्र. ७

६३) कृषिदर्शनी (२०१९) संपादक डॉ.किरण कोकाटे,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, पृ.क्र. प्रस्तावना

६४) www.mpkv.mah.nic.in (२३ जून २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

६५) कित्ता

६६) www.ycmou.ac.in (२३ जून २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

६७) www.mafsu.in (२३ जून २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

६८) श्री सुगी खरीप (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी, पृष्ठ क्र. १

६९) www.crro/nic.in (५ जुलै २०१९) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७०) www.ipinida.nic.in (७ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७१) www.ifoam.bio (८ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७२) www.kvk.icar.gov.in (२० जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७३) www.ddsindia.com (२१ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७४) www.sewa.org (२१ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७५) www.adatfarmersbank.com (२२ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहिती

७६) दैनिक लोकमत (१४ ऑगस्ट २०१६) अहमदनगर आवृत्ती, व्हिजन अहमदनगर वर्धापनदिन विशेष, पृ.क्र. २

७७) मासिक शेतकरी. जानेवारी – (२०१८) संपादक व्ही. एन. देशमुख, पृ.क्र. ४९

७८) www.buchkewadi-vaishnavdham.com (२२ जुलै २०१८) वेबसाईटवर प्रकाशित माहित

७९) श्री सुगी रब्बी (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी, पृष्ठ क्र. ५६

८०) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७ अहमदनगर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.क्र. १

८१) कित्ता, पृ.क्र. २

८२) कित्ता, पृ.क्र. ३

८३) कित्ता, पृ.क्र. ३

८४) कित्ता, पृ.क्र. ३ व ४

८५) कित्ता, पृ.क्र. ४

८६) करवंदे, चंद्रशेखर (१७ सप्टेंबर २०१७) अहमदनगरचे सिंचन वैभव, दै. लोकमत, अहमदनगर आवृत्ती, पृ.क्र. ८

८७) गंधे नारायण, प्रवरा काठची संस्कृती, प्रकाशक चंद्रकिमार गंधे, ज्ञानेश प्रिंटर्स, संगमनेर, १९८७, पृ.क्र. १०७

८८) कित्ता, उपरोक्त, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७, पृ.क्र. ६

८९) कित्ता, पृ.क्र. ७

९०) कित्ता, पृ.क्र. ७

९१) कृषिदर्शनी (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, २०१७, पृ.क्र. १

# प्रकरण दुसरे

# संशोधन पूर्वाभ्यास व संदर्भ साहित्याचा आढावा

## २.१ प्रस्तावना

सामजिक शास्त्राच्या संशोधनातील प्रत्येक टप्पावर उपलब्ध साधनसामग्रीचा परामर्श घेणे अत्यंत आवश्यक असते. त्यामध्ये विषयाशी साधर्म्य असलेले संशोधन व अभ्यास उपयुक्त ठरतो. पूर्वी झालेल्या अभ्यासावरुन विषयाची माहिती मिळते. त्या संशोधनात कोणत्या मुद्यांना स्पर्श केला आहे ? संशोधनाच्या काय मर्यादा आहेत ? आधीच्या संशोधकाचे काय वेगळेपण आहे, विश्लेषण आहे आणि आपण त्या विषयावर नव्याने काय मांडणी करणार आहोत? याविषयीचा वस्तुपाठ घेणे, आकलन करण्याला संशोधन पूर्वाभ्यास असे म्हणतात.

प्रा. रा.ना. घाटोळे यांच्या मते संबंधित साहित्याचे अध्ययन किंवा साहित्य सर्वेक्षण ही पहिली आवश्यक अट आहे. कारण त्याशिवाय या विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैध्दांतिक आधाराशिवाय शोध कार्य करणे अंधारात चाचपडणे होय.[१](घाटोळे, २००५, पृ. क्र. १७)

अंधारातून प्रकाशाकडे जाणारे साहित्य समालोचन करावे लागते. पूर्वाभ्यास हा संशोधन कार्यातील महत्त्वाचा भाग आहे. आपण ज्या विषयावरती संशोधन करीत आहोत त्याविषयी यापूर्वी कोणते आणि कितपत संशोधन झाले आहे हे पाहिल्यामुळे आपल्या संशोधनालाही पूर्वाभ्यासामुळे दिशा मिळते.

अन्वेषणात्मक अध्ययने ही खरोखर अज्ञान व अंधकारातून बाहेर पडण्यासाठी उपयुक्त ठरतात. समस्यांची गुंतागुंत लक्षात घेताना प्रकाशित साहित्याच्या समालोचनामुळे गतकाळातील संशोधनाच्या अडचणी, उणीवा लक्षात घेऊन पुढील अध्ययनास नवी दिशा येते तसेच उपेक्षित पैलूंवर नवा प्रकाश टाकणे शक्य होते. अन्वेषणात्मक अध्ययनात अभ्यास विषयाला पूरक अशा ज्ञान शास्त्रातील उपयुक्त ज्ञानाचे समालोचन करुन अभ्यास विषय अधिक भक्कम व मजबूत करता येतो.[२](जहोड, २००४, पृ. क्र. ५३) प्रस्तुत संशोधनासाठी संबंधित साहित्याचे समालोचन करणे आवश्यक असते. सदर प्रकल्पाचा अभ्यास करताना संशोधकाने या

संशोधनाचा पूर्वाभ्यास शोधण्याचा प्रयत्न केला आहे. खालील संस्थांना प्रत्यक्ष भेटी देवून सदर संशोधकाने संशोधन पूर्वाभ्यास व वाचन साहित्याचा शोध घेतला आहे.

०१) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

०२) मुंबई विद्यापीठ, मुंबई

०३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

०४) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर

०५) अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर

०६) दै. सकाळ, दै. ॲग्रोवन, दै. लोकमत

०७) जिल्हा परिषद, अहमदनगर

०८) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

०९) जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालय, अहमदनगर

१०) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

११) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१२) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

१३) इंटरनेटवरील अभ्यासाविषयीच्या अनुषंगाने जे साहित्य उपलब्ध झाले ते अभ्यासण्यात आले आहे.

## २.२ संशोधन साहित्याच्या समालोचनाची उद्दिष्टये

१) संशोधनाचा विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळणे व निवडलेल्या विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाची माहिती मिळवणे व पुनरावृत्ती टाळणे.

२) संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वतःच्या ज्ञानाची कक्षा वाढविणे.

३) संशोधन विषयासंबंधी गृहितकृत्याच्या मांडणीबद्दल निश्चित माहिती मिळविणे.

४) निवडलेल्या विषयासंबंधी आवश्यक योग्य पद्धती, तंत्र यांच्याबद्दल माहिती मिळविणे.

५) आधार सामग्री व निष्कर्ष याविषयी तुलनात्मक माहिती मिळविणे, समर्पक आशय विश्लेषण, गुणात्मक व सांख्यिकीय तंत्र व त्याचा उपयोग आणि निर्वचन करण्यासाठी मार्गदर्शन मिळविणे.

### २.२.१ संबंधित साहित्याचे समीक्षण

संशोधकाने आपला संशोधन विषय निवडल्यानंतर तो व्यवस्थितपणे मांडण्यासाठी व संशोधन करण्यासाठी आपल्या विषयासंदर्भात जे संबंधित साहित्य आहे त्याचा सुरुवातीस सखोल असा अभ्यास केला पाहिजे. या अभ्यासाचा उपयोग संशोधकास एक मार्गदर्शक म्हणून होऊ शकतो. तसेच संबंधित साहित्यामध्ये संशोधन पद्धती समस्येसंदर्भात शैक्षणिक मानसशास्त्र, तत्वज्ञान, अध्यापन पद्धती, शैक्षणिक समाजशास्त्र अशा इतर विषयांचा अभ्यास होतो.

साहित्याचा अभ्यास संशोधनासाठी उपयोग होण्याकरिता वाचन करीत असताना त्याचे टिपण व्यवस्थित ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये संदर्भाची नोंद, आवश्यक माहिती, सारांश, महत्त्वाचे उतारे व इतर संबंधित गोष्टीचे वाचन यांचा समावेश होतो. या अगोदर झालेल्या संशोधनाची पुनरावृत्ती असू नये. यामुळे त्यास संशोधन म्हणता येणार नाही. कारण संशोधनाची कक्षा विस्तृत झाली पाहिजे. कृषि हा विषय व्यापक असून मानवी जीवनाशी निगडीत असून समाजाला याची जाणीव झाली पाहिजे.

### २.२.२ संबंधित संशोधनाचे समीक्षण

संशोधकाने समस्या सर्वसाधारण ठरविल्यानंतर ती स्पष्टपणे योग्य शब्दात मांडण्यासाठी समस्येची उद्दिष्ट्ये ठरविण्यासाठी तसेच संशोधनासंबंधी साधने निवडण्यासाठी मार्गदर्शक माहिती आवश्यक असते. म्हणून संबंधित साहित्याच्या अभ्यासाबरोबरच संबंधित संशोधनाचा अभ्यासही महत्त्वपूर्ण आहे. आपल्या संशोधनाच्या संदर्भात कोणकोणती संशोधने झालेली आहेत हे संशोधकाने अभ्यासणे अतिशय महत्त्वाचे ठरते. त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा अचूक ठरविता येते.

विविध संशोधनात वापरलेल्या कसोट्या व पद्धती लक्षात घेतल्याने संशोधकाला आपल्या संशोधनात कोणत्या कसोट्या वापराव्या लागतील व आपली संशोधन पद्धती कोणती ठेवावी याचे मार्गदर्शन मिळते. या विशिष्ट क्षेत्रात कोणते संशोधन झालेले आहे हे समजते. जे निष्कर्ष, सिध्दांत सिध्द झालेले आहेत त्यांचा संशोधन प्रक्रियेत आधार घेता येतो. कोणत्या संख्याशास्त्रीय तंत्राचा आधार घ्यावा व वापर करावा लागतो ते समजते. लेखनाची पद्धती कशी ठेवावी, अहवाल कसा लिहावा हे समजते. संदर्भ साहित्यसूची व संकीर्ण विभागात कोणत्या घटकांचा समावेश करावा हे समजते. थोडक्यात अनेक पुस्तके वाचून ज्यासंबंधी आपणास निश्चित माहिती मिळणार नाही ती या संशोधन प्रबंध व लेख, अहवाल वाचनाने मिळते. अशाप्रकारे संबंधित संशोधनाला अभ्यास अनिवार्य असल्यामुळे संशोधकाने केला आहे.

## २.३ शेतीवरील काही ग्रंथ व लेख

**शिंदे, डॉ. अण्णासाहेब (१९८९)**[३]

महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन या ग्रंथात २६–२७ मार्च १९८८ रोजी संयोजिलेल्या दुष्काळ आणि पाणी ह्या परिसंवादातील चर्चा, व्याख्याने, प्रश्नोत्तरे; अवर्षण, पाणी वाटप व धरणे विषयक शासकीय अहवालातील महत्त्वाच्या शिफारसी आणि पाणी व्यवस्थापन (वाल्मी) ह्या परिसंवादातील काही महत्त्वाच्या निबंधासह महाराष्ट्रातील शेती आणि ग्रामीण कृषि औद्योगिक विकासाच्या समस्यांचे वास्तव रुप यावर प्रकाश टाकण्याचे कार्य याद्वारे करण्यात आले आहे.

शेती, लोकसंख्या, पाणी व्यवस्थापन, सिंचन, कृषि, राष्ट्रीय पाणी धोरण, भूजल आयोगाची आवश्यकता, दुष्काळ आयोगांच्या शिफारशींचा गोषवारा आदि महत्त्वपूर्ण प्रकरणांचा समावेश असलेल्या या ग्रंथाचे संपादन भारत सरकारचे तत्कालिन नामवंत कृषिमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी केले आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या प्रदेशातील शेती व पाणी समस्यांवर प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून चर्चा यात देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील मृदा, अवर्षण प्रवण विभाग, नद्या व नद्यांचे खोरे, सरासरी वार्षिक पर्जन्यमान, प्राकृतिक, राजकीय,

भूगर्भातील जलक्षमता व जलविकास, महत्त्वाच्या नद्या या विषयांवरील खास तयार करुन घेतलेल्या नकाशांचा समावेश असल्याने सदर ग्रंथ संशोधनासाठी उपयुक्त ठरला आहे.

### मुलानी, उमराव (२००९)[४]

यांच्या कृषि अर्थशास्त्र या संदर्भ ग्रंथात शेतीच्या जलसिंचन पद्धतीवर विश्लेषण केले आहे. जमिनीच्या पृष्ठावरुन पिकांना पाणी देण्यासाठी जंगल बांधणी करणे आवश्यक असते. जमिनीची पीक निहाय बांध बंदिस्ती केल्यास पिकांना समप्रमाणात पाणी मिळून पिकांची वाढ चांगली होते. पाण्याचा अपव्यय कमी होऊन जमिनीची धूप कमी होते. पिकांना जलसिंचनाचे नियोजन पिकनिहाय जमिनीचा प्रकार व उतारानुसार केले जाते. भारतात पिकांना पाणी देण्यासाठी पारंपरिक सिंचन पद्धतीमध्ये मोकाट पद्धत, सारे पद्धत, वाफे पद्धत, आळे पद्धत, सरी वरंबा पद्धत यांचा समावेश आहे. पारंपरिक पद्धतीने वाया जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण अधिक असते. पाटातून ३० ते ४०% शेतात देतांना १० ते १५% वितरण करताना, १० ते १५% खोल मुरल्यामुळे १० ते २०% पाणी वाया जाते. असे स्पष्ट मत त्यांनी मांडले आहे. पाण्याचा हा अपव्यय टाळण्यासाठी म्हणून ठिबक सिंचन पद्धती, तुषार व फवारा सिंचन पद्धत या आधुनिक पद्धतीचा अवलंब करावा असे प्रतिपादन केले आहे.

### दत्त, गौरव आणि महाजन, अश्विनी (२०१४)[५]

यांच्याा भारतीय अर्थव्यवस्था (हिंदी अनुवाद) या संदर्भ ग्रंथात शेतीच्या विकासासाठी सरकारने पंचवार्षिक योजना काळात केलेल्या तरतुदींचा आढावा घेतला आहे. पहिल्या योजनेत शेती व संबंधित क्षेत्रासाठी ६०० कोटी रु. (३१%), दुसऱ्या योजनेत ९५० कोटी रु (२०%), तिसऱ्या योजनेत १७५० कोटी रु. (२१%), चौथी योजना ३६७० कोटी रु. (२४%), पाचवी योजना ८७४० कोटी रु. (२२%), सहावी योजना २६,१०० कोटी रु (२४%), सातवी योजना ४७,१०० कोटी रु. (२३%), आठवी योजना १,०१,५९९ कोटी रु. (२१%), नववी योजना १,६१,८८० कोटी रु. (२०%), दहावी योजना ३,०५,०५५ कोटी रु. (२०%), अकरावी योजना ७,१२,४६५ कोटी रु. (१९.७%), बारावी योजना १३,२३,११९ कोटी रु. (१७.३%) खर्च शेतीसाठी करण्यात आल्याचे मांडण्यात आले आहे.

**देशमुख, प्रकाश पुंडलिक (१९८६)**[६]

'भारतातील फळझाडांची लागवड' या संदर्भ ग्रंथात तीन खंडामध्ये वर्गीकरण करुन शास्त्रीय माहिती दिली आहे. खंड १ः मध्ये फळबागायतीची तत्त्वे, फळांचे महत्त्व, लागवडीस आवश्यक परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती यांचे फळझाडांवर होणारे परिणाम तसेच फलधारणा व फलोत्पादन पद्धती, संरक्षण इ. मुलभूत गोष्टीवर सखोल विचार केला आहे. खंड २ : मध्ये आंबा, केळी, द्राक्ष, पपई, पेरु, चिकू, डाळिंब, अंजीर, सीताफळ, नारळ, सुपारी, बोर, जांभूळ, आवळा, करवंद इ. फळझाडांची प्रत्यक्ष लागवडी संदर्भात शास्त्रीय पद्धतीने सविस्तर माहिती दिलेली आहे. खंड ३ : मध्ये फळातील पोषक मुल्ये, दर हेक्टरी लागवड खते, संशोधन केंद्र सुची, इ. संदर्भात उपयुक्त माहिती दिलेली आहे.

**गायकवाड, प्रा.डॉ. मुकुंदराव (२००८)**[७]

भारताचे कृषि–अर्थशास्त्र या संदर्भ ग्रंथात शेती अर्थव्यवस्थेवर नवा प्रकाश टाकण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, समर्थ देश निर्माणासाठी सहकार, शेती कर्जमाफी आणि वित्तीय पुरवठा, शेतीच्या विकासाचा मानवी चेहरा, विकासाचे नवे ग्रोथ इंजिन– एस.ई.झेड. गुड ॲग्रीकल्चरल प्रॅक्टीसेस आदि प्रकरणांतून आकडेवारीसह ऊहापोह केला आहे. शेती व शेतकरी डोळ्यासमोर ठेवून कृषि अर्थशास्त्र या विषयासंबंधी सर्व अभ्यासक्रमांवर भाष्य केले आहे. भारताच्या कृषि विषयक सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक प्रश्न मांडताना विकासाभिमुख विश्लेषणाला या ग्रंथामध्ये स्थान देण्यात आले आहे.

**Barooch, S. (१९९५)**[८]

हे पुस्तक कल्याणी प्रकाशन, नवी दिल्ली यांनी प्रकाशित केले आहे. या ग्रंथामध्ये फळपिकांच्या वाढींची पार्श्वभूमी विचारात घेऊन काही पायाभूत मुलभूत तत्त्वे फळपिकांच्या संवर्धनासाठी मांडलेली आहे. जागतिक फलोत्पादन विकासाचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. फळपिकांचे वाढते अर्थकारण, त्यातील समस्या, उपलब्ध संशोधन आणि बाजारपेठ, शेतकऱ्यांना त्यामुळे होणारे फायदे यासह नवीन फळ पिकांच्या तंत्रज्ञानाच्या प्रगती संदर्भात आधुनिक तंत्रे मांडलेली आहेत.

**साबळे, डॉ. रामचंद्र (२०१४)**[९]

जागतिक तापमान वाढ, अवर्षण, अतिवृष्टी, हवामान बदल, अवकाळी पाऊस, ढगफुटी गारपीट याचे परिणाम अलीकडे सातत्याने दिसत आहेत. ॲग्रोवन या दैनिकातून लिहिलेल्या लेखांच्या या पुस्तकातून हवामानशास्त्राचा इतिहास, बदलते ऋतुचक्र, हरितगृह वायू, शेती, तापमानवाढ, हवामानबदल,अन्नसुरक्षा, उपाययोजना यांचा ऊहापोह या पुस्तकात करण्यात आला आहे. गारपीट, वादळी वारे रबी पिकांना फटका देतात. एक तर उभी पिके कोलमडतात आणि गारांच्या पावसाने झोडपली जातात. त्यामुळे अशा प्रकारच्या हवामान बदलाने शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. याचा पिकांवर होणारा परिणाम अभ्यासणे गरजेचे असल्याचे मत डॉ. रामचंद्र साबळे यांनी मांडले आहे.

**मीना, आर.के. व यादव, जे.एस. (२००१)**[१०]

या संदर्भ पुस्तकामध्ये भारतातील फलोत्पादन शेती आणि स्वरुप, फळे, भाजीपाला, बाजारपेठ आणि आयातीचे धोरण, विपणन व्यवस्थापन व त्याचे कायदे या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. नवनवीन तंत्रज्ञानामुळे भारतीय शेतीतले फलोत्पादनांचे महत्त्व आणि योग्य नियोजनामुळे शेतकऱ्यांना होत असलेला फायदा याची माहिती दिली आहे. भारतातून होणारी निर्यात आणि दक्षिण आणि पूर्व आशियाई राष्ट्रासंबंधी फलोत्पादन संदर्भात अभ्यास केला आहे. शेतकऱ्यांना याबाबत योग्य माहिती दिल्यास याचे सकारात्मक परिणाम दिसू शकतील असा विश्वास लेखकाला वाटतो.

**Handbook of Agriculture (२००८)**[११]

यामध्ये भारतीय कृषि क्षेत्रात विज्ञानाचा वापर, राष्ट्रीय पातळीवरील संशोधन, कृषि क्षेत्रातील नवनवीन कल्पना या संदर्भात शास्त्रोक्त माहिती आहे. काही प्रकरणांमध्ये शेतजमिनीचा वापर, माती आणि जल व्यवस्थापन संदर्भात माहिती दिलेली आहे. बि–बियाणे, कृषि उत्पादकता आणि तंत्रज्ञान, कृषितंत्रज्ञानाचा वापर, जैवतंत्रज्ञान, संपत्तीचा मालकी हक्क, उर्जेचा वापर, माहिती तंत्रज्ञान, कृषि बाजारपेठ या संदर्भात सर्वांना उपयोगी पडेल अशा

प्रकारची माहिती दिलेली आहे. अनेक तज्ज्ञांनी सुचविलेल्या उपयुक्त सुचनांचा विचार करुन नवीन व अधिकची माहिती असलेली आवृत्ती प्रकाशित केली आहे.

**देऊळगावकर, अतुल (२०१४)**[१२]

नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरण विनाश याबाबत प्रसारमाध्यमे काही प्रमाणात जागरुक झाली आहेत, परंतु फारशी नाहीत असे सांगताना देऊळगावकर यांनी २००६ पर्यंत जगातील माध्यमधुरीणांसाठी पर्यावरणाला बातमीमूल्य नसल्याचा आरोप केला आहे. प्रसारमाध्यमांच्या दृष्टीने शेतीसंबंधी बातम्यांना मूल्य नाही. मग ही वार्ता लोकांपर्यंत पोहोचणार तरी कशी ? भारताच्या कोठारांमध्ये ६ कोटी टन तांदूळ व गहू पडून आहे. साहजिकच तांदूळ पेरले न पेरले तरी कुणालाच फरक पडत नाही. भरलेली कोठारे आणि भुकेलेली माणसे दोन्हीमध्ये बातमी नाही असे परखड मत अतुल देऊळगावकर मांडतात.

**भोसले, शिवाजी (२०१२)**[१३]

यांच्या अर्थव्यवस्थेतील शेती जलसिंचनाची भूमिका या लेखात ठिबक व तुषार सिंचनामुळे सिंचनाखालील क्षेत्रात वाढ होते. ठिबक सिंचनामुळे पाण्याची २५ ते ६०% बचत होते. उत्पादनात ६०% वाढ होते. तुषार सिंचनामुळे २५ ते ३३% पाण्याची बचत होते. भारतातील ६९ द.ल.हेक्टर या निव्वळ ओलिताखालील क्षेत्रापैकी ०.५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र ठिबक सिंचनाखाली व ०.७ दशलक्ष हेक्टर क्षेत्र तुषार सिंचनाखाली आहे. भारतातील ठिबक सिंचनाखालील एकूण क्षेत्रापैकी महाराष्ट्रात ४६%, कर्नाटक २१%, तामिळनाडू १४%, आंध्रप्रदेश १२%, आहे. ठिबक व तुषार सिंचनाचे अनेक फायदे होत असले तरी याबाबत फारशी प्रगती झालेली दिसून येत नाही. भारतातील इतर राज्यांत ही सिंचन पद्धतीच्या पिकांसाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले आहे.

**वेदपाठक, मधुकर (२०१४)**[१४]

यांनी कोरडवाहू शेती अभियानाद्वारे शाश्वतीकरण या लेखात महाराष्ट्र राज्यातील हमखास सिंचन क्षेत्राखाली न येणारे क्षेत्र हे या अभियानाचे कार्यक्षेत्र आहे. जे शेतकरी मुलस्थानी जलसंधारण पद्धतीचा अवलंब करतील, जे शेतकरी सूक्ष्म सिंचन पद्धती

अवलंबण्यास तयार असतील अशा शेतकऱ्यांना कोरडवाहू शेती अभियानाचा लाभ मिळणार आहे. ठिबक सिंचनासाठी अल्प भूधारकास ६०%, बहु भूधारकास ५०% किंवा २०,००० रु. पर्यंत अनुदान देण्यात येईल. तुषार सिंचनासाठी ५०%, किंवा ७,००० रु. अनुदान असेल. कोरडवाहू पिकांच्या सुधारित बियाणांचा पुरवठा केला जाईल व मृदा परीक्षणाच्या प्रति नमुन्याला ३०० रु. अनुदान देय आहे. या अभियानाला शेतकऱ्यांनी प्रतिसाद दिल्यास अशाश्वत कोरडवाहू शेती ही शाश्वत ठरेल असे संशोधकाने स्पष्ट केले आहे.

**अनंदकवळस, एम.बी. (२०१३)[१५]**

यांनी आधुनिक शेतीत जैविक तंत्रज्ञान एक वरदान या लेखात सेंद्रिय शेतीची संकल्पना प्रत्यक्षात प्रभावी राबविण्यासाठी पुढील बाबींबर भर देणे महत्त्वाचे मानले. सेंद्रिय पदार्थाला जोरखतांद्वारे वापर, जिवाणू संवर्धकाचा पर्याप्त वापर, हिरवळीच्या खतांचा उपयोग, गांडूळ खताचा वापर, एकात्मिक किड व्यवस्थापन, अच्छादनांचा योग्य वापर, पिकांच्या अवशेषांचा व अन्न प्रक्रियेतील टाकाऊ घटकांचा तसेच ओल्या कचऱ्याचा कंपोस्ट खत म्हणून वापर, पीक फेरपालट व आंतरपीक पद्धतीचा उपयोग इत्यादी घटकांवर लक्ष दिल्यास सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून उत्पादनात वाढ घडवून आणता येईल असा विश्वास संशोधकाला वाटतो.

**शंभरकर, अर्चना (२०१४)[१६]**

यांच्या हरितक्रांतीच्या नवा अध्याय या लेखामध्ये महाराष्ट्रातील शेती ही कोरडवाहू प्रकारची असून शेती विकासासाठी कोरडवाहू शेती अभियान राबविण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. ८३ टक्के कोरडवाहू क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी पाच वर्षासाठी १०,००० कोटी रु. गुंतवणूक केली जाईल. या हरितक्रांतीच्या यशस्वीतेसाठी स्वयंचलित हवामान केंद्र स्थापन करण्यात आले. त्यामुळे हवामान बदलास अनुसरुन पीक उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. २०११–१२ पासून प्रायोगिक तत्त्वावर १ लाख हेक्टर क्षेत्रावर हवामान आधारित पीक विमा योजना, द्राक्ष, केळी, संत्री, मोसंबी, डाळींब, आंबा, काजू या पीकांसाठी कार्यान्वीत केली. २०११–१२ मध्ये ४५,०५५ शेतकऱ्यांनी सहभाग घेतला असून या योजनेत १०,१३३ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली. खरीप २०१२ मध्ये या योजनेत पेरु पिकाचाही समावेश करण्यात आला. राष्ट्रीय कृषि विमा योजनेअंतर्गत रबी हंगाम

२०१२–१३ मध्ये गहू, ज्वारी, हरभरा, सुर्यफूल व करडई या पिकांसाठी जोखीम स्तरांत ६०% वरुन ८०% वाढ करण्यात आली. पिकांच्या विमा संरक्षित रकमेत ३३ ते ३५% वाढ करण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याची जास्त संधी निर्माण झाल्याचे स्पष्ट केले आहे.

**राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) सामन्तरा, समीर (२०१०)[१७]**

सदर संशोधनात किसान क्रेडीट कार्ड योजनेचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यात शेतकऱ्यांना गटानुसार मूल्यमापन केलेले असून लाभार्थी शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करुन परिणामकारकता तपासली आहे. या योजनेमधील अल्प मुदत कृषि कर्जातील योगदान महत्त्वाचे आहे. या योजनेच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कर्जाच्या रकमेत दिवसेंदिवस वाढ झाल्यामुळे ग्रामीण कर्ज पुरवठा करणारे घटक म्हणजे सावकार व इतर बिगर संख्यात्मक स्त्रोतांचे महत्त्व कमी होत आहे. असे जरी असले तरी या योजनेची अंमलबजावणी करत असताना येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रभावी धोरणे व उपाययोजनांची गरज आहे. एकात्मिक कीड व्यवस्थापन, अच्छादनांचा योग्य वापर, पिकांच्या अवशेषांचा व अन्न प्रक्रियेतील टाकाऊ घटकांचा तसेच ओल्या कचऱ्याचा कंपोस्ट खत म्हणून वापर, पीक फेरपालट व आंतरपीक पद्धतीचा उपयोग इत्यादी घटकांवर लक्ष दिल्यास सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून उत्पादनात वाढ घडवून आणता येईल असा विश्वास संशोधकाला वाटतो.

## २.४ कृषि औद्योगिक ग्रंथ

**गुंजाळ, सुर्या (२००७)[१८]**

फळांची काढणी, हाताळणी आणि विक्री व्यवस्था या ग्रंथात फळ प्रक्रिया आणि फळांची निर्यात या विषयावर महिती आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या फळांवर प्रक्रिया करुन विविध पदार्थ बनविता येतात. यातून वाया जाणाऱ्या भागावर प्रक्रिया करुन उपपदार्थ तयार करता येतील. ताजी फळे आणि त्याच्यापासून प्रक्रिया केलेल्या पदार्थांच्या निर्यातीला कर प्राधान्य देवून केंद्र सरकारने त्यासाठी अनेक सवलती दिल्या आहेत. या संधीचा फायदा घेवून फळ

उत्पादकांनी फळांच्या निर्यातीकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र सरकारच्या रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबागा विकास योजनेमुळे आपल्या राज्यातील फळांचे उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढत आहे. म्हणूनच प्रथम आपल्या देशातील सर्व प्रमुख बाजारपेठांमध्ये फळे पाठवून देशांतर्गत विक्री व्यवस्थेकडे लक्ष देवून नंतर परदेशी बाजारपेठाचा विचार करावा. भारतात शीतपेयांना जवळ–जवळ वर्षभर मागणी असते. म्हणून निरनिराळ्या फळांपासून रस काढून त्याच्यापासून शीतपेये, सरबते, सिरप तयार करण्याच्या उद्योगाला संधी आहे. अशा प्रकारे संशोधन क्षेत्रातील लाभार्थी शेतकऱ्यांच्या आर्थिक विकास यातून रोजगार निर्मितीला फार मोठी संधी आहे. या संदर्भात उहापोह केला आहे.

### शर्मा, आवंतिका (२००६)[१९]

Textbook of Food Science and Technology हा संदर्भ ग्रंथ Internationl Book Distribution Co. यांनी प्रकाशित केला आहे. यामध्ये अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे. फळे, भाजीपाला, अंडी, मांस, मासे तसेच अन्नशास्त्रामध्ये कडधान्य, तेलबिया, दूध, फळे, भाजीपाला यांचे उत्पादन आणि प्रक्रिया तंत्रज्ञान या विषयी शास्त्रोक्त विश्लेषण केले आहे. शुगर उत्पादन Fats & Oils, Nuts & Oilseeds, Bevereges and Appetizers, Spices, Salt या संदर्भात शास्त्रोक्त आढावा घेण्यात आला आहे. त्यामुळे हा ग्रंथ शेतीसह गृहशास्त्र, फलोत्पादन, अन्नशास्त्र आणि तंत्रज्ञान, कृषि, नेट आणि स्पर्धा परिक्षा यासाठी उपयुक्त आहे.

## २.५ कृषि पत्रकारितेवरील संशोधनपर लेख

सदर संशोधकाने संशोधन कार्य करीत असताना एका आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात संशोधन पेपरचे प्रत्यक्ष उपस्थित राहून सादरीकरण केले. याबाबत तज्ज्ञांमध्ये व उपस्थित अभ्यासकांमध्ये चर्चा झाली. संशोधनाच्या अनुषंगाने त्यांनी विविध पैलूंवरची मते अवगत केली. सारांश पुढीलप्रमाणे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दि. २८ व २९ एप्रिल २०१७ रोजी Multidisciplinary International Seminar on UNs Sustainable Development Goals (SDGs), Social Justice and Media या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्रात पत्रकारिता आणि जनसंज्ञापन क्षेत्रातील देश विदेशातील प्राध्यापक, अभ्यासक, संपादक, पत्रकार, संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गायकवाड, जयंत (२०१७)**[२०]

यांनी या चर्चासत्रात Sustainable agriculture, farmers suicides and media या विषयावर संशोधन पेपर सादर केला. पृष्ठ क्रमांक १८१ वर असलेल्या या संशोधन पेपरमध्ये शेती व हरितक्रांतीचे बदल व परिणाम काय झाले ? भारतीय शेतीतला रासायनिक खतांचा वाढता वापर व आधुनिक तंत्रज्ञानाने कोणते सकारात्मक व नकारात्मक परिणाम झाले व त्यामुळे कशा प्रकारच्या संकटात वाढ झाली याची माहिती दिली आहे. तसेच भारतातील शेतकरी आत्महत्या व त्याची कारणे दिली आहेत. शाश्वत शेतीची गरज व महत्त्व यासह महाराष्ट्रातील विदर्भ व मराठवाडा भागातल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाढती आकडेवारी आणि प्रसारमाध्यमांनी वेधलेले लक्ष यावर प्रकाश टाकला आहे. मनोरंजन तथा चित्रपट विषयक घडामोडींची माहिती, संगीत क्षेत्र, फॅशन शो, क्रिकेट, भविष्य आदि प्रकारांना दिलेले महत्त्व आणि त्या तुलनेत शेतीकडे होत असलेले दुर्लक्ष अधोरेखित करण्यात आले आहे. प्रसार माध्यमांची जबाबदारी यामुळे वाढली असल्याची गरज संशोधकाने व्यक्त केली आहे.

**धादवड, एम.बी. व इतर (२०१७)**[२१]

या संशोधन पेपरच्या प्रोसिडींगमध्ये धादवड एम.बी., रुपाली गोरे, राठोड के.एस. आणि नरखेडे एम.बी. यांनी लिहिलेल्या Roll of media in climate change adaptation and mitigation in indian agriculture sector या संशोधन पेपरमधील सारांश पुढीलप्रमाणे. Climate change has serious implications for Indian agriculture as vulnerability of Indian agriculture is likely to increase further unless timely adaption and mitigation measures are adopted. It is necessary to enhance public knowledge of the nature causes and consequences of climate change in order to enable them to take informed decisions. Media can empower the key stakeholders in agriculture sector to effectively

deal with the adverse impacts of climate change. Media can play significant role in bringing climate literacy among farming community and extention personnel besides removing their misperceptions regarding different dimensions of climate change and agriculture and there by helping mitigation and adaption to climate change in agriculture sector in India.

### बोराडे, मिलिंद (२०१७)[२२]

याच प्रोसिडिंगमध्ये पृष्ठ क्रमांक २७४ वर बोराडे मिलिंद रामदास यांनी लिहिलेल्या शाश्वत कृषि विकास और कृषि पत्रकारिता या संशोधन पेपरमधील समारोप पुढीलप्रमाणे.

विभिन्न क्षेत्रोमे आज पत्रकारिता की मांग बढती जा रही है। ऐसी स्थिती मे सबसे जादा वार्तांकन कृषि क्षेत्र से होना जरुरी हुआ है। वास्तव मे कृषि पत्रकारिता यह समाचार पत्र के शुरुवाती दिनो से हे । लेकिन अभी तक देश के किसानों की जरुरत पुरी हो ऐसी वार्ता समाचारपत्र प्रकाशित नही करते है । वार्ता प्रकाशित होना जरुरी है । आज देश की सभी किसानो की अलग अलग समस्या उत्पन्न हुई है । स्थानिय समाचार पत्रो मे किसानों के हित की वार्ता प्रकाशित होना जरूरी हुआ है । तभी किसान की मांग पर समाचारपत्र न्याय दिला सकेगे । समाचार पत्रो मे विकासात्मक वार्ता प्रकाशित हुई तो उसका असर किसानो की सोच पर होकर शाश्वत और फायदेमंद वाली खेती करने पर होगा । इस लिये कृषि पत्रकारिता का महत्त्व दिनोदिन बढता जा रहा है । समाचारपत्र किसान के हित की वार्ता प्रकाशित कर सके तो काफी हद तक किसानो की समस्याये सुलझ सकती है । इस लिये कृषि पत्रकारिता का महत्त्व अधिक है । अशा प्रकारे कृषि पत्रकारितेचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

### Sodhi (१९८२)[२३]

Print Media and Agricultural Development, Dr. Ranjit Singh, National Council of Development Communication, July, 1986 - P – 158 च्या प्रोसिडींगमध्ये मुद्रित मजकूराचे गणित करुन बातम्यांना किती जागा दिली ? बातम्यांचे स्वरुप आणि प्रकार अशा प्रकारचा अभ्यास यापूर्वी इंग्रजीत झाला आहे. तो पुढीलप्रमाणे While studying the space devoted by two leading English dailies of Northern India namely Indian Express and The Tribune found that the Indian Express devoted 2.60% of the total space to the

farm information in terms of area in square centimeters. The same information when calculated in terms of number of column lines was found to be 2.3 per cent. The total space occupied by farm information in The Tribune, in terms of area in square centimeters was 2.08 percent. As much as 1.90 percent of the coverage was covered in terms of number of column lines. In both the newspapers, the content area of agricultural marketing occupied the maximum coverage. याच संशोधन पेपरच्या प्रोसिडींगमध्ये कृषि विषयक आशय विश्लेषणाच्या दुसऱ्या एका अभ्यासाचा निष्कर्ष खालील प्रमाणे.

**Dhillon (१९८२)**[२४]

While analyzing the agricultural contents of three major Punjabi dailies, It found that every little space was occupied by the various content areas relating to farm information in all the newspapers. Viz Ajit, Jajbani and Punjabi Tribune. The study disclosed that Ajit, Jajbani, and Punjabi Tribune devoted only 1.05 percent, 1.20 percent and 2.74 percent of the space to farm information respectively.

**Prof. Ramswami (१९७५)**[२५]

यांनी केलेल्या आशय विश्लेषणाच्या अभ्यासाची माहिती श्री. एम.व्ही. कामथ यांनी प्रोफेशनल जर्नलिझम पृष्ठ क्र. २६४ या ग्रंथात दिली आहे. त्यावरुन राष्ट्रीय इंग्रजी वृत्तपत्रात अन्न, शेती व ग्रामीण विकास या विषयांच्या बातम्यांचे प्रमाण फक्त १.२२ टक्के असल्याचे त्यांच्या अभ्यासावरुन स्पष्ट दिसते.

## २.६ कृषि पत्रकारितेवरील संशोधन

**Pawar, B.P. (२००३)**[२६]

Miss B.P. Pawar यांनी Prof. A.M. Shaikh यांच्या मार्गदर्शनाखाली Content Analysis of Post Harvest Technology Information in Leading Farm Magazine Shetkari from Maharashtra या विषयावर पीएच.डी केली आहे. या संशोधनात त्यांनी शेतकरी या मासिकात प्रकाशित होणाऱ्या मजकूराचा अभ्यास केला आहे. शेतकरी या मासिकात कशा

प्रकारे विषय मांडले जातात व त्यांना स्थान देण्याबाबतचे संशोधन यात मांडले आहे. अभ्यासकाने २००३ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला आहे.

### वाटाणे, दिलीप (१९९७)[२७]

दिलीप उत्तमराव वाटाणे यांनी एप्रिल १९९७ मध्ये डॉ. सुधाकर पवार यांचे मार्गदर्शनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठास कृषि वृत्त : एक अभ्यास या विषयावर पीएच.डी. साठी शोध प्रबंध सादर केला आहे. या शोध प्रबंधात दैनिक लोकमतमध्ये कृषिविषयक वार्तांना किती स्थान व महत्त्व दिले जाते याचा अभ्यास करीत मीमांसा करण्याचा प्रयत्न केला आहे. यात कृषि विद्यापीठे, कृषि संशोधन केंद्रे, कृषि पदवीधर, ग्रामीण भागातील वार्ताहर, प्रगतीशील शेतकऱ्यांकडून वृत्तपत्राकडे देण्यात येणाऱ्या बातम्या, लेख कशा व किती येतात याचेही अवलोकन केले आहे. १ जानेवारी १९९४ ते ३१ डिसेंबर १९९४ या कालावधीतील दैनिक लोकमत या वृत्तपत्राच्या प्रसिध्द झालेल्या एकूण सर्व प्रकारच्या मजकूरात सर्वसाधारण वार्तांना ९६.८५% तर कृषि वार्तांना ३.१५% जागा देण्यात आली आहे. तर कृषि पुरवणी असलेल्या अंकातील एकूण मुद्रित मजकूरात कृषि वार्ता ५.६६% व सर्वसाधारण वार्ता ९४.३४% असल्याचा निष्कर्ष संशोधकाने नोंदविला आहे. औरंगाबाद शहर परिसरातील दैनिक लोकमत वृत्तपत्र वाचणाऱ्या २०० शेतकऱ्यांच्या उत्तरावर आधारित सर्वेक्षणात दैनिक लोकमतमध्ये शेतीविषयक बातम्या येतात काय ? या प्रश्नावर ९४.५% वाचकांनी होकार दिला तर ५.५% वाचकांनी लोकमतमध्ये शेतीविषयक बातम्या येत नाहीत असे सांगितले. लोकमत दैनिकातील कृषिवार्ता हा विषय निवडून त्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

### शिंदे, बालाजी (२००९)[२८]

बालाजी लक्ष्मणराव शिंदे यांनी डॉ. वि. ल. धारुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हरितक्रांतीमधील कृषि संवाद : मराठी वृत्तपत्रांचा तौलनिक अभ्यास या विषयावर पीएच.डी केली आहे. २००९ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला आहे. या प्रबंधात हरितक्रांतीमध्ये कृषि संवादात प्रसार

माध्यमांची भूमिका अभ्यासली आहे. त्यातही प्रामुख्याने भाषिक वृत्तपत्रे हरितक्रांतीस कशा प्रकारे सामोरे जात आहेत त्याचा या प्रबंधात अभ्यास करण्यात आला आहे. दुसऱ्या हरितक्रांतीची वैशिष्ट्ये व स्वरुप यावर प्रकाश टाकला आहे. तसेच हरितक्रांतीची उद्दिष्टे साररुपाने स्पष्ट केली आहेत. हरितक्रांतीची प्रक्रिया शेतकऱ्यांपर्यंत पोहचविताना घडणारा कृषि संवाद कशा प्रकारे घडत आहे ? याचा अभ्यास केला आहे. तसेच दुसऱ्या हरितक्रांतीचे स्वरूप सांगून त्या आधारे वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकला आहे. भारतामध्ये पहिल्याप्रमाणे दुसऱ्या हरितक्रांतीमध्ये वृत्तपत्रे महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. त्यामुळे कृषि संशोधन प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहचत असल्याचा ठळक निष्कर्ष काढण्यात आला आहे. तर ग्रामीण भागात हंगामास पोषक अशा पूरक माहिती सेवा भाषिक वृत्तपत्रांनी द्यायला हव्यात अशी शिफारस करण्यात आली आहे. पहिल्या व दुसऱ्या हरितक्रांतीची तुलना करुन या दोन्हीमधील फरक, आयाम तसेच प्रवाहांची नोंद घेतली आहे.

### कुऱ्हाडकर, गजानन (२०१४)[२९]

गजानन भाऊराव कुऱ्हाडकर यांनी डॉ. वि.ल. धारुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि जनसंवाद आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांची भूमिका : एक अभ्यास या विषयावर २०१४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाकडे शोध प्रबंध सादर केला आहे. या अभ्यासात नभोवाणी क्षमता, चित्रवाणी माध्यमांच्या मर्यादा आणि शेतकऱ्यांच्या लोकशिक्षणात इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. भारतीय कृषि प्रसारणाच्या मर्यादा सांगताना संशोधकाने ग्रामीण भागामध्ये वीजेचा पुरवठा अनियमित असल्याने नभोवाणी व चित्रवाणीचे कार्यक्रम नियमितपणे ऐकता येत नाही ही प्रमुख मर्यादा व्यक्त केली आहे. तर भारतीय कृषि प्रसारण हे नभोवाणी व चित्रवाणी या दोन माध्यमांशी निगडीत आहे. त्याचे जाळे वाढत आहे. तसे या प्रसाराचे सामर्थ्यही वाढत आहे त्याचबरोबर भारतीय कृषी प्रसारणामध्ये प्रश्नोत्तरे आणि तज्ज्ञांच्या मुलाखती यांच्या आधारे ही माहिती चर्चात्मक व आदानप्रदानावर आधारित केली जाते त्यामुळे या मुख्य क्षमता असल्याचा उल्लेख संशोधनात केला आहे. या संशोधनात शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची गरज, पाश्चात्य देशातील प्रयोगांचे अध्ययन, शेतीविषयक कार्यक्रमांना पारितोषिके व पुरस्कार देणे, कृषि

निर्मिती कार्यक्रमासाठी प्रसार भारतीने भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाकडून आर्थिक सहाय्य घेणे, प्रत्येक भारतीय भाषेत 'आमची माती, आमची माणसं' यासारखे कार्यक्रम इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांनी तयार करावेत अशा प्रकारच्या शिफारसी करण्यात आल्या आहेत.

## २.७ शेतीवरील अहवाल

**World Development Report (2008)**[३०]

जागतिक बँकेने शेतीच्या विकासावर २००८ मध्ये महत्त्वपूर्ण World Development Report अहवाल प्रकाशित केला आहे. Agricultural for Development अशा शिर्षकाखाली ३५५ पृष्ठे असलेल्या या ग्रंथात अकरा प्रकरणांचा समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावनेत Robert B. Zoellick म्हणतात In all regions, with rising land and water scarcity and the added pressures of a globalizing world, the future of agriculture is intrinsically tied to better stewardship of natural resources. With the right incentives and investments, agriculture environmental footprint can be lightened, and environmental services harnessed to protect watersheds and biodiversity.

**Sustainable Development, Linking economy, Society, environment Report (2008)**[31]

जगभरातल्या ३० देशांचा फोरम असलेल्या Organistion for Economic Co-operation And Development (OCED) ने शास्वत विकास–अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरणाची जागतिक आव्हाणे यावर आधारित Sustainable Development, Linking economy, Society, environment हा महत्त्वपूर्ण अहवाल प्रकाशित केला आहे. २००८ मध्ये लिहिलेल्या १३४ पानांच्या अहवालात Tracey Strange, Anne Bayley यांनी पृष्ठ क्रमांक १२ वर म्हणतात की World population is projected to increase (by around 2 billion) by 2050. Practically all that growth will be in the developing countires of Asia and Africa. This will put increased strain on resources and systems that are already insufficient in many cases.

**Rural Development Report (2016)**[३२]

International Fund for Agricultural Development यांनी Rural Development Report 2016 प्रकाशित केला आहे. यात जागतिक पातळीवर अभ्यास मांडताना दहा प्रकरणांचा समावेश असलेला ३७० पानांचा अहवाल प्रकाशित केला आहे. ग्रामीण विकासाचा मुख्य विचार समोर असणाऱ्या या संस्थेचे ब्रिदवाक्य Investing in rural people यामध्ये Structural and rural transformation in Asia and the Pacific, Agrifood markets and value chains, Food and nutrition security, Agricultural technology innovation, Land and natural resources मुद्यांवर तपशिलवार प्रकरणांद्वारे शेती आणि ग्रामीण भागातल्या विविध विषयांवर प्रकाशझोत टाकला आहे.

**Report of the Expert Advisory Group on Improvement and Strengthening of Internal Audit Systems and Processes (2018)**[३३]

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने मार्च २०१८ मध्ये Report of the Expert Advisory Group on Improvement and Strengthening of Interanl Audit Systems and Processes हा ग्रामीण विकासावर आधारीत अहवाल प्रसिध्द केला आहे. यामध्ये अंतर्गत आर्थिक व्यवस्थापन प्रणालीवर सखोल विश्लेषण करण्यात आले आहे. देशातल्या विविध पातळ्यांवर अंमलबजावणी करणाऱ्या केंद्र सरकारपासूनच्या सर्व प्रकारच्या यंत्रणा म्हणजेच राज्य सरकारे तर थेट ग्रामपंचायतीपर्यंत याचा विचार करण्यात आला आहे. कृषि विभागाच्या योजना, अंमलबजावणी तथा आर्थिक व्यवस्थापन यावर मुद्देसुद विवेचन केले आहे.

**Feroze Varun Gandhi (2018)**[३४]

सन २००९ पासून लोकसभेचे सदस्य असलेले **Feroze Varun Gandhi** यांनी A Rural Manifesto – Realizing Indias Future Through Her Villages या तब्बल ७९७ पानी ग्रंथात भारतातील ग्रामीण भागाचा सर्वकष अभ्यास आकडेवारीसह मांडला आहे. नवी दिल्लीतल्या रूपा पब्लिकेशन्स इंडिया प्रा. लिमिटेड यांनी हा ग्रंथ प्रकाशित केला आहे. शेती, पाणी, पिके, बी–बियाणे, रासायनिक खते, शेतमालाच्या किंमतींची परिस्थिती, नद्या, नद्यांचे प्रदुषण, धरणे, मासेमारी, जमिनीतले पाणी व त्याचा उपसा, जलसिंचनाचे प्रकार, सिंचनाचे

व्यवस्थापन, उर्जा क्षेत्राची परिस्थिती, विजेची उपलब्धता, कोळसा, स्वयंपाकासाठीचे इंधन, गोबर गॅस, स्टोव्ह, L.P.G. Gas अनुदान, कृषि उत्पादनाचे बाजार व मुल्य निर्धारण, कांदा, कापूस, फळे, धान्य, फुलांचे उत्पादन व बाजार, साठवणूक, पणन व्यवस्था, हमी भाव, करार शेती, पडित जमिन, शेतकऱ्यांचे उत्पन्न, पशूधन, ग्रामीण रोजगार, हातमाग उद्योग, साड्या, सतरंज्या लाकूडकाम, विणकाम, मनरेगा सह इतर सरकारी योजना ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था व आव्हाने, सर्व शिक्षा अभियान, स्थलांतराच्या समस्या, हंगामी रोजगार, ग्रामीण आरोग्य, औषधांची उपलब्धता, आयुर्विमा, कुपोषण, झिरो हंगर, जेनेरीक औषधे, शेती कर्ज व परत फेड, पिक विमा असे अनेक मुद्दे सविस्तर मांडले आहेत.

सहा पानी प्रस्तावना असलेल्या या ग्रंथात पान क्रमांक १८ वर खासदार गांधी म्हणतात, Ideally, India ought to have no rural distress – we have the second largest quantity of arable land in the world. And yet, less than 35 per cent of this land is irrigated, with the remnant land subject to fluctuations in rainfall. Growth in agriculture and allied sectors has almost been offset buy rural inflation. With small farm sizes and rising agricultural input costs, farmers have increasingly grown indebted. Rural India remains where it was, mired in its own abyss. २०१८ मध्ये हा ग्रामीण विकासावर आधारीत ग्रंथ प्रसिध्द झाला आहे.

## २.८ प्रस्तुत संशोधन व गत संशोधनातील फरक

गत संशोधनाचा अभ्यास करत असताना अनेक बाबी संशोधकाच्या लक्षात आल्या. गत संशोधनातली उद्दिष्ट्ये, पध्दती, संख्याशास्त्रीय तंत्रे याचाही संशोधकास उपयोग झाला. सदर संशोधनाचा विषय मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास असा आहे. म्हणून शेती क्षेत्रात अहमदनगर जिल्ह्यातील मराठी कृषि पत्रकारितेचे योगदान काय आहे ? हे पाहणे संशोधकला महत्त्वाचे वाटले म्हणून संशोधकाने गत संशोधनाचा अभ्यास केला.

सहकाराचा बालेकिल्ला असलेल्या अहमदनगर जिल्ह्यात कृषि पत्रकारितेवर संशोधन अभ्यास अद्याप झालेला नाही. आढावा घेतलेल्या सर्व संशोधनाचा विचार करता अशा पध्दतीने संशोधन अनेक विद्यापीठामध्ये प्रस्तुत संशोधनाशी संबंधित एकही संशोधन झालेले आढळून

आले नाही. अशा प्रकारचा फरक प्रस्तुत संशोधन व संशोधनामध्ये दिसुन आला. या विषयावर हा पहिलाच संशोधन प्रकल्प आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकरितेचा तुलनात्मक अभ्यास अशा व्यापक शीर्षकाने यापूर्वी अभ्यास झालेला नाही. कृषि बातम्यांचा अभ्यास देश–विदेशातील काही नियतकालिकांतून झालेला आहे. अशा अनेक नियतकालिके, संशोधन पत्रिका, पुस्तके यांचा शक्य तेवढा उपयोग सदर प्रबंधासाठी केला आहे. इंग्रजी व हिंदी भाषेत याविषयी अभ्यास झालेला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासकाने महाराष्ट्रातील विविध संस्था व ग्रंथालयांना भेटी देऊन या अगोदरच्या संशोधनाचा आणि संशोधन साहित्याचा आढावा घेतला आहे व तो पूर्वाभ्यासामध्ये दिला आहे. शेती, ग्रंथालय, वृत्तपत्र विद्या, पत्रकारिता, संवादशास्त्रातील तज्ज्ञ मंडळी यांचेशी अनेकदा चर्चा केलेली आहे. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्यस्तरावर झालेल्या कार्यशाळांमध्ये संशोधकाने सहभाग घेतला आहे. त्यामध्ये सदर संशोधन विषयाच्या अनुषंगाने संशोधन पेपर सादर केला आहे. त्यातील माहितीही दिली आहे. इतर मान्यवरांच्या संशोधन पेपरमधील सारांशही दिला आहे.

## २.९ संदर्भ साहित्याचे निष्कर्ष

उपरोक्त कृषितज्ज्ञ, लेखक, कृषि पत्रकार तथा संशोधक यांच्या संदर्भ साहित्याचा आढावा घेतल्यानंतर असे लक्षात येते की, सदर विषयाशी निगडीत अनेक अभ्यासकांनी शेती विषयावर विविध प्रकारचे ग्रंथ, पुस्तक, संशोधन प्रबंध, शासकीय अहवाल, संशोधन निबंध इत्यादींच्या माध्यमातून आपले विचार मांडले आहेत. सदर काही अभ्यास हा स्थूलदर्शी स्वरूपाचा आहे. त्यामुळे त्यांचे निष्कर्ष स्थानिक विभाग व प्रादेशिक विभागांना जसेच्या तसे लागू होत नाही. तसेच सर्व अभ्यासकांचा कालावधी वेगवेगळा असल्याने त्यांच्या निष्कर्षामध्ये तफावत आढळते. त्याचबरोबर कृषि पत्रकारितेच्या अभ्यासाचे प्रमाण अतिशय कमी आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेतीसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या पाणी, पीक, हवामान, सिंचन, पणन, दुष्काळ, नापिकी, खते, बि–बियाणे, पाऊस, शाश्वत शेती, सरकार राबवित असलेल्या विविध योजना, विश्लेषण आदि संशोधन विषयक मजकुराची उणीव मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. ही उणीव भरून काढण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची जाणीवपूर्वक निवड केली आहे.

## २.१० समारोप

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने समस्येविषयीची सखोल माहिती मिळविण्यासाठी व त्या क्षेत्राशी संबंधित साहित्यातून माहिती मिळविली. त्यामुळे संशोधकाला संशोधन समस्येची व्याप्ती व मर्यादा लक्षात आली. त्यामुळे संशोधकाला संशोधन समस्येविषयी एक निश्चित दिशा मिळविण्यासाठी संदर्भ साहित्याचा अभ्यास उपयोगी ठरला. संशोधनातील विविध संकल्पना, संशोधन पद्धतीचा वापर कसा करावा, माहिती विश्लेषणासाठी कोणते तंत्र वापरावे या विषयीची माहिती पूर्व संशोधनाच्या आढाव्यातून मिळाली. पूर्व संशोधनात निवडलेला नमूना, नमूना निवडीच्या पद्धती याविषयीची माहिती मिळण्यास मदत झाली. अशाप्रकारे संदर्भ साहित्य व पूर्व संशोधनाच्या आढाव्यातून संशोधकाला संशोधनाची कार्यवाही करण्यासाठी निश्चित दिशा मिळण्यास मदत झाली. पुढील प्रकरण तीनमध्ये संशोधनासाठी निवडलेल्या पद्धतीविषयी विस्तृत माहिती दिली आहे.

## संदर्भसूची


०१) घाटोळे, रा.ना. (२००५) समाजशास्त्रीय संशोधन : तत्त्वे व पद्धती. श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५, पृ.क्र. १७

०२) जहोड, सॅल्टीश व कुक (२००४) रिसर्च मेथड्स इन सोशल रिलेशन्स रिसर्च. लंडन, पृ.क्र. ५३

०३) शिंदे, डॉ. अण्णासाहेब (१९८९) महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन. प्रकाशक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

०४) मुलानी, उमराव (२००९) कृषि अर्थशास्त्र. सक्सेस पब्लिकेशन, राधाकृष्ण अपार्टमेंट, ५३५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे

०५) दत्त, गौरव आणि महाजन, अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था. ५२ वी सुधारीत आवृत्ती, एस. चांद अँड कंपनी, नवी दिल्ली

०६) देशमुख, प्रकाश पुंडलिक (१९८६) भारतातील फळझाडांची लागवड

०७) गायकवाड, प्रा.डॉ. मुकुंदराव (२००८) भारताचे कृषि – अर्थशास्त्र. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

०८) Barroch S. (1995) Modern Fruit Cultivation. कल्याणी प्रकाशन, नवी दिल्ली

०९) साबळे, डॉ.रामचंद्र (२०१४) शेती आणि हवामान बदल. प्रथम आवृत्ती, सकाळ प्रकाशन, पुणे

१०) मीना, आर.के. व यादव, जे.एस. (२००१) Horticulture Marketing and Post Harvest Management Pointing Publisher. Jaipur

११) Handbook of Agriculture (2008) Directorate of Inforamtion and publication of Agriculture Indian Council of Agricultural Research. New Delhi

१२) देऊळगावकर, अतुल (२०१४) विश्वाचे आर्त. द्वितीय आवृत्ती, मनोविकास प्रकाशन, पुणे

१३) भोसले, शिवाजी (२०१२) अर्थसंवाद. खंड ३६, अंक १, पृष्ठ क्र. १० ते १४

१४) वेदपाठक, मधुकर (२०१४) अर्थसंवाद. खंड ३६, अंक१, पृष्ठ क्र. २६ ते ३१

१५) अनंदकवळस, एम.बी. (२०१३) अर्थसंवाद. खंड ३६, अंक ४, पृष्ठ क्र. ३६८ ते ३७३

१६) शंभरकर, अर्चना (२०१४) हरित क्रांतिचा नवा अध्याय. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई. पृ.क्र. २० ते २२

१७) Samantara, Samir (2010) Kisan Credit Card – A Study. Department of Economics & Analysis & Research. NABARD Mumbai, पृ.क्र. १५ ते ३५

१८) गुंजाळ, सुर्या. (संपादक)(एप्रिल २००७) फळांची काढणी, हाताळणी आणि विक्री व्यवस्था. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक प्रकाशन

१९) Sharma, Awantika. (2006) Textbook of Food Science and Technology. Publication International Book Distribution Co.

२०) गायकवाड, जयंत डी. (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे संशोधन नियतकालिक खंड ९, अंक १, पृ.क्र. १८१ ते १८६

२१) धादवड एम.बी., रूपाली गोरे, राठोड के.एस. व नरखेडे एम.बी. (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका. उपरोक्त पृ.क्र. १०७ ते १११

२२) बोराडे, मिलिंद (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका. उपरोक्त पृ.क्र. २७४ ते २७८

२३) Sodhi (1982) Sampreshan Seminar papers. Print Media and Agricutlral Development, Dr. Ranjit Singh, National Council of Development Communication, July, 1986 - P- 158

२४) Dhillon (1982) Sampreshan Seminar papers. Print Media and Agricutlral Development, Dr. Ranjit Singh, National Council of Development Communication, July, 1986 - P- 168

२५) Prof. Ramswami (१९७५) प्रोफेशनल जर्नलिझम. संपादक एम.व्ही. कामथ, पृ.क्र. २६४

२६) Pawar, B.P. (2003) Content Analysis of Post Harvest Technology Information in Leading Farm Magazine Shetkari form Maharshtra. Ph.D. Thesis submitted to Mahatma Phule Agricultural University, Rahuri

२७) वाटाणे, दिलीप (९९९७). कृषिवृत्त – एक अभ्यास. पीएच.डी. प्रबंध, वृत्तपत्र तौलनिक अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२८) शिंदे, बालाजी (२००९) हरितक्रांतीमधील कृषि संवाद : मराठी वृत्तपत्रांचा तौलनिक अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२९) कुऱ्हाडकर, गजानन (२०१४) कृषि जनसंवाद आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांची भूमिका : एक अभ्यास. पीएच.डी प्रबंध, वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

३०) World Development Report (2008) Agriculture for Development Published by World Bank, Washington DC, USA

३१) Sustainable Development, Linking Economy, Society, Environment Report (2008) Published by Organistion for Economic Co-operation And Development (OCED) Paris, France

३२) Rural Development Report (2016) Published by International Fund for Agricultural Development, Rome, Italy

३३) Report of the Expert Advisory Group on Improvement and Strenthening of Interanl Audit Systems and Processes (2018) by Government of India, Ministry of Rural Development, New Delhi

३४) Feroze Varun Gandhi (2018) A Rural Manifesto – Realizing Indias Future Through Her Villages. Rupa Publications, New Delhi

# प्रकरण तिसरे

# संशोधन पद्धती

## ३.१ प्रस्तावना

संशोधन या शब्दाचा अर्थ पुन्हा पुन्हा शोध घेणे. तथ्ये शोधून काढण्यासाठी करण्यात येणारी चिकित्सा किंवा विश्लेषण म्हणजे संशोधन होय. एल.व्ही. लेहमन आणि ए.व्ही. एच. मोरी यांच्या अनुसार संशोधन म्हणजे नवे ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न.[१](सिंग, १९८६, पृ.क्र. १५४) कोणतेही संशोधन होण्यासाठी योग्य संशोधन पद्धतीची आवश्यकता असते. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या प्रस्तुत संशोधनात मराठी वृत्तपत्रांतील शेती विषयक लिखाणाचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. हा संशोधनाचा विषय समाजातील मोठ्या घटकाशी निगडीत असल्यामुळे सामाजिक संशोधन पद्धतीची निवड करण्यात आलेली आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यासातूनही अनेक बाबी समोर येऊ शकतात. यातून राज्याची व देशाची प्रगती होईल. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा अभ्यास या उद्देशाने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

कृषि पत्रकारिता हा संवादाचा प्रकार सामाजिक विकासाशी निगडीत आहे. मराठी वृत्तपत्रे ही जनसेवेचे व लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम म्हणून काम करू शकतात. सामाजिक जडणघडणीत राष्ट्रवादाची उभारणी, अंधश्रध्दा निर्मूलन, कृषि विकासाच्या उभारणीत मराठी वृत्तपत्रांनी मोलाची भर टाकली आहे. लोकशाही व्यवस्थेत जीवनदायी विचार मूल्यांची जोपासना करताना व्यापक, सर्वसमावेशक लोकमत घडविण्यात मराठी वृत्तपत्रे नेहमीच प्रयत्न करीत असतात. सामाजिक प्रश्न कृषिविषयक माहिती प्रकाशित करणे आदि कार्य झाले पाहिजेत.

संज्ञापन संशोधन हे संवादातील जाणीवा, मूल्ये व तत्त्व यांचा शोध घेणारे असते. मार्टीन व कॉलबर्न यांच्या मते We may also need faith in the motives of people who do not agree with us. In many cases, what can be interpreted as lying or deception is really misunderstanding in communication.[२](मार्टीन व विल्लियम, १९७२, पृ.क्र. १८) जे

लोक आपणाशी सहमत नाहीत, त्यांच्याविषयी श्रध्दा ठेवली पाहिजे. बऱ्याच वेळा आपणाशी होणारी सहमती ही गैरसमजांमुळे निर्माण होते. त्यासाठी संवाद संशोधन आवश्यक असते. वृत्तपत्रे समाज परिवर्तनाचे काम करीत असतात. शेतीचा विकास होण्यासाठी मराठी वृत्तपत्रांचा किती वाटा आहे हे पडताळून पाहिलेले आहे. अनेक थोर विचारवंतांच्या मते मानव हा विकासाचा केंद्रबिंदू मानला पाहिजे असे सांगितले आहे. प्रस्तुत संशोधनात कृषि विषयक संवादाद्वारे सामाजिक परिवर्तन अभ्यासण्यासाठी मराठी वृत्तपत्रांनी विकासाला चालना दिलेली आहे. त्यांचे परिणाम अभ्यासले आहेत. कृषि पत्रकारितेचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासण्यासाठी मराठी वृत्तपत्रांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे काय? त्याचा येथे अभ्यास करण्यात आला आहे. मराठी वृत्तपत्रे शेतकऱ्यांच्या विकासासाठी झटत असलेली अभ्यासावरून दिसून आलेले आहे. याबाबत पु.ल. भांडारकर म्हणतात, सामाजिक संशोधन ही एक शास्त्रीय आकलनाची क्रिया असते. सामाजिक प्रश्न सोडविणे किंवा त्यांचे आकलन करून अभ्यास करणे हे सामाजिक शास्त्राचे ध्येय असते. शास्त्रीय व तर्कसंगत पद्धतीने हे प्रश्न सोडविण्यासाठी मार्ग काढला जातो. नवीन तथ्ये प्रकाशात आणणे किंवा जुन्या तथ्यांची पडताळणी करणे व त्यांचा अनुक्रम शोधणे हा या प्रक्रियेचा एक उद्देश असतो.[३](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ४)

मराठी वृत्तपत्रे शेतकऱ्यांच्या विकासासाठी झटत असलेली अभ्यासावरून दिसून आलेले आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकाकारितेचा तुलनात्मक अभ्यास या प्रबंधातून मराठी वृत्तपत्रांचा तसेच कृषिवृत्तपत्रांच्या विविध घटकांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. विविध पैलूंबाबत विवेचन करण्यात आले आहे. संज्ञापन हे विचार कल्पना व माहितीच्या प्रसारावर भर देणारे शास्त्र आहे. माहितीचे उगमस्थान ते ग्रहण कर्ता या दरम्यान खालील घटक महत्त्वाचे आहेत.

१) उगम (Source)

२) संदेश (Message)

३) माध्यम (Channel)

४) गोंगाट (Noise)

हे सर्व महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व घटकांच्या अभ्यासाशिवाय हे संशोधन पूर्ण होत नाही. श्रॅम यांच्या मते, “The mass media serve three traditional social function of communication, as watchman as anmid to social decision making and as a teacher.”[४] (श्रॅम, १९६४, पृ.क्र. १३८)

जगाविषयी अधिक माहिती लोकांना देण्याची महत्त्वाची कामगिरी वृत्तपत्रे करीत असतात. यावरून असे लक्षात येते की, समाजाचा, प्रदेशाचा, देशाचा व शेतीचा विकास करण्यासाठी मराठी वृत्तपत्रांचा मोठा वाटा आहे. स्वातंत्र्यानंतर कृषि क्षेत्रात भारतासारख्या विकसनशील देशाने कृषि उत्पादनात स्वयंपूर्णता मिळविण्याच्या दृष्टीने जगात जोरदार प्रयत्न केले आहेत. यामध्ये वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा मोठा वाटा आहे. विकासाच्या मार्गात कृषि विकासाचा समावेश आहे. यासाठी वृत्तपत्रांचे योगदान तपासताना, त्यातील वृत्तमूल्ये व त्यांचे स्वरूप सामाजिक संशोधनाचे आगळे–वेगळे महत्त्व आहे. सामाजिक नियोजन व समाजकल्याण दृष्ट्या विकसनशील समाजातील संशोधनाची व्यावहारिक उपयुक्तता मोठी असते.

पारंपरिक शेतीला आधुनिक करण्यासाठी माध्यमांचा सिंहाचा वाटा आहे. संशोधनाच्या बाबत टी.के. उन्नीथन यांच्या मते, The primary goal of social research is to understand social life and there by gain greater measure of control over it.[५] (उन्नीथन व इतर, १९६६, पृ.क्र. २३०) सामाजिक संशोधनाचा उद्देश सामाजिक जीवनाचे आकलन करणे व अशा प्रकारच्या प्रश्नांवर नियंत्रण प्रस्थापित करणे हे सुध्दा अपेक्षित आहे. कृषिविषयक संवादामध्ये वृत्तपत्रे शेतकऱ्यांचे प्रबोधन करण्यासाठी साधन म्हणून कशा प्रकारे वापरले जाते याचा अभ्यास या संशोधनात केलेला आहे.

वैज्ञानिक, तांत्रिक प्रगतीबरोबर शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी सामाजिक संशोधनाची गरज असते. आयुष्यातील अनेक समस्यांचे निराकरण करताना सामाजिक संशोधनाचा मार्ग हा विविध स्वरूपात उपयोगी ठरत असतो. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेच्या तुलनात्मक अभ्यासातील अनेक पैलू पाहताना सदरचे सामाजिक संशोधन अत्यंत उपयोगी ठरणार आहे. कृषिविषयक अभ्यास समाजाशी संबंधित असल्याने ती संकल्पना स्पष्ट करून माहिती

संकलनाच्या आधारे संवादशास्त्राचे परिणाम वापरून या प्रबंधात चिकित्सक प्रकाश टाकण्यात आला आहे.

## ३.२ संशोधन समस्या व विषयाचे महत्त्व

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीव्यवसायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. भारतातील शेती व्यवसाय म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. गेल्या ७१ वर्षांच्या काळात औद्योगिकरण करण्याचे प्रयत्न केले गेले असले तरी भारतातील शेतीव्यवसायाचे स्थान अद्याप महत्त्वाचे राहिले आहे. भारतातील शेतीव्यवसाय हा बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे एक प्रमुख साधन आहे. भारतातील दर दहा लोकांपैकी सात लोक आपल्या चरितार्थासाठी शेतीव्यवसायावर अवलंबून राहतात. २०११ च्या जनगणनेनुसार शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ५९ टक्के होते. याचाच अर्थ बहुसंख्य लोक आपल्या उपजीविकेसाठी शेती व्यवसायावर अवलंबून असल्याने शेती व्यवसायाचा विकास घडवून आणणे बहुसंख्य लोकांच्या दृष्टीने आणि सरकारच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.[६](दत्त आणि सुंदरम, २०१२, पृ.क्र. ५०६)

भारतातील प्रमुख उद्योगांपैकी अनेक उद्योगांना लागणारा कच्चा माल पुरविण्याचे कार्य शेतीव्यवसायाकडूनच केले जाते. सूती कापड, ताग, साखर असे अनेक उद्योग शेतीव्यवसायावर अवलंबून आहेत. भारताच्या परराष्ट्रीय व्यापारात देखील शेतीव्यवसायाचा कार्यभाग फार महत्त्वाचा आहे. तेलबिया, तंबाखू, चहा, कॉफी, काजूगर, मसाल्याचे पदार्थ यांसारख्या वस्तू म्हणजे भारताच्या निर्यातीच्या महत्त्वाच्या बाबी आहेत. २००९–१० साली एकूण निर्यातीपैकी कृषिक्षेत्रातून होणारी निर्यात रू ८७,५२३ कोटी एवढी होती.[७](भालेराव व देसाई, २०१३, पृ.क्र. ११)

शेतीव्यवसाय वाढीमुळे व त्यावर आधारित उद्योगाच्या वाढीमुळे कोट्यवधी लोकांना रोजगार प्राप्त होतो. भारतातील उद्योगांचा विकास घडून येण्यास भारतीय शेतीव्यवसायाचा विकास घडून येणे आवश्यक ठरते. शेतीव्यवसायाचा विकास घडून आल्यास अन्नधान्याचा

वाढावा निर्माण होईल. लोक औद्योगिक व सेवा क्षेत्रात काम करीत असतात आणि अन्नधान्याचे काहीही उत्पादन करीत नाहीत, अशा लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणे शक्य होते.

शेतीव्यवसायाच्या विकासामुळे शेतमालाची परकीय देशांकडे केली जाणारी निर्यात वाढेल. निर्यातीतील वाढीमुळे भारताला चलन मिळू शकेल व या परकीय चलनांच्या सहाय्याने आधुनिक यंत्रांची आयात करणे भारताला शक्य होईल. त्यामुळे भारतीय शेती व्यवसायाचा विकास म्हणजेच भारतीय उद्योगांचा विकास असे समीकरण निर्माण झाल्याचे दिसून येते.

शेती आणि उद्योगांचे विकासात्मक संबंध ऑर्थर लेविस यांनी देखील मांडले आहे. त्यांच्या मते शेतीमध्ये श्रमिकांचा अतिरिक्त पुरवठा असतो. जसे शेतमजूरांचे स्थलांतर रोजगारानिमित्त उद्योगांकडे होत असते, तसे उद्योगांचा विकास होत असतो. शेती क्षेत्रातील श्रमिकांच्या स्थलांतरामुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळते व नवीन उद्योगांची स्थापना होत असते. उद्योगांच्या विकासामुळे नंतर शेती क्षेत्राचाही विकास होतो. [८](ऑर्थर, १९५४, पृ.क्र. १२७) त्यामुळे शेती क्षेत्र व उद्योग क्षेत्र हे एकमेकांना पूरक आहेत हे ऑर्थर लेविस यांनी दाखवून दिलेले आहे. नेमकी याचीच प्रचिती भारतीय अर्थव्यवस्थेत येत असते.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे, हे निश्चित आहे. परंतु भारतीय शेतीव्यवसायाची तुलना विकसित देशांतील शेतीव्यवसायांशी केल्यास, भारतीय शेतीची अवस्था अत्यंत वाईट असल्याचे दिसून येते. कृषि उत्पादकता, सिंचन व्यवस्था, बी–बियाणे, अवजारे, यांत्रिकीकरण, बाजार रचना, किंमत धोरण, शेतकऱ्यांचा दृष्टीकोन इत्यादी बाबत भारतीय शेती मागासलेली असल्याचे दिसून येते. २००६–०७ साली अन्नधान्याची सरासरी उत्पादकता २००० किलोग्रॅम प्रति हेक्टर एवढी होती. अर्थात स्वातंत्र्यानंतरच्या काळात म्हणजे १९५०–५१ सालातील शेतीची स्थिती फारच मागासलेली होती परंतु आजची भारतीय शेतीची स्थिती त्या तुलनेत फारच चांगली आहे. भारतीय शेती व्यवसायामध्ये विकासाचे पोषक गुण आहेत. भारतीय शेतकरी कष्टकरी आहेत. शेतजमीन चांगली आहे. फक्त त्यांना पूरक सेवा योग्य वेळी देणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या शेतीपूरक सेवामुळे काही पीकांच्या उत्पादनांबाबत भारतीय शेती फारच प्रगत आहे. २०११–१२ साली तांदळाचे

उत्पादन १०१ दशलक्ष टन तर उसाचे उत्पादन ३४७ दशलक्ष टन एवढे होते.[९](इकॉनॉमिक सर्वे, २०१२–१३, पृ.क्र. १८०)

कृषि पत्रकारिता हा विषय अन्न निर्मिती करणाऱ्या मोठ्या घटकाशी निगडीत आहे. सन २००७–२००८ ते २०१७–२०१८ या १० वर्षाच्या काळात भारतात अन्न–धान्यावर ९,८४,७९० कोटी खर्च केलेला आहे.[१०](Expenditure Budget, 2018) अन्नावाचून मृत्यू होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जागतिक पातळीवर भूकबळी व बालमृत्यूचे प्रमाण भारतात चीन, म्यानमार, पाकिस्तान, नेपाळ व बांग्लादेशपेक्षा अधिक आहे. सन २०१७ मध्ये तर भारताची ही घसरण ११९ स्थानावर झाली आहे.[११](ifpri.org, 2017) आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाच्या काळात भारतातील हे भीषण वास्तव आहे. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा पूर्ण होत नसल्याने शिक्षणाची तर गोष्ट अवघडच आहे. भारतात आर्थिक परिस्थिती नसल्यामुळे दोन लाख मुलांना दरवर्षी प्राथमिक शिक्षण सोडावे लागत आहे. त्यामुळे अन्नसुरक्षा विधेयकात अन्नावरील झालेल्या बचतीचा वापर शिक्षणासाठी करावा असे म्हटले आहे.

२१ व्या शतकात भारत देश अण्वस्त्र संपन्न आहे पण अन्नसंपन्न नाही असे विविध अहवालावरुन सिध्द होत आहे. नृपाय बुभुक्षिताया : प्रजाया : मृत्यु महत्पापं वर्तते[१२](Sanskrit.org, 2017) या संस्कृत श्लोकाच्या मतितार्थानुसार राजाचा सगळ्यात मोठा अपराध कुठला असेल, तर त्याच्या प्रजेचा भूकबळी किंवा अन्नावाचून मृत्यू होय. सर्वसामान्य व्यक्तीच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न प्राधान्याने सोडविणे गरजेचे आहे असा संदेश चाणक्याने दिला आहे. यामधील आशय आजच्या काळातही लागू पडतो. त्यामुळे पत्रकारितेत कृषि पत्रकारितेचा विषय हा व्यापक लोककल्याणाच्या व सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून अनन्यसाधारण महत्त्वाचा आहे. जर भारतीय शेतीव्यवसायाला व शेतकऱ्यांना पूरक सेवा व माहिती योग्य वेळी पुरविण्यात आली तर भारतीय शेतीव्यवसायाचा आर्थिक विकास जलद गतीने होणे शक्य आहे. अशा माहिती व सेवा देण्यामध्ये वृत्तपत्रांचा परिणामकारक वापर करणे शक्य आहे.

भारत सरकारद्वारे वेगवेगळ्या प्रकारे माहितीचे प्रकाशन व प्रसारण केले जात आहे. परंतु माध्यमांनी अशा गरजेकडे गांभिर्याने पाहिले तर मात्र भारतीय शेतीव्यवसायामध्ये परिवर्तन

होणे शक्य आहे. अशा या भूमिकेतून वृत्तपत्रांची जबाबदारी फार महत्त्वाची असते. वृत्तपत्रांद्वारे शेतीव्यवसायाबाबतची माहिती देणे शक्य आहे व ती माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणे शक्य आहे. त्यातून शेतीव्यवसायांबाबत नवीन दृष्टिकोन व जागृती निर्माण होईल. परंतु वृत्तपत्रांद्वारे ही भूमिका पार पाडली जाते का? हा खरा प्रश्न आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे कृषि पत्रकारितेविषयक वृत्तपत्रांची भूमिका अभ्यासली गेली आहे. वृत्तपत्रे हे प्रभावी माध्यम आहेत, परंतु कृषि पत्रकारितेविषयक त्यांची भूमिका काय आहे ? त्याची व्याप्ती किती आहे ? अशा दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधन केले आहे.

## ३.३ सामाजिक संशोधन

सामाजिक संशोधनात वेगवेगळया साधनांचा उपयोग केला जातो. यातून प्रथम तथ्ये शोधावी लागतात. त्यानंतर त्या तथ्यांचा संगतवार क्रम लावून त्या आधारे निष्कर्ष काढावे लागतात. पियर्सन यांच्या मते, तथ्ये कोणत्या प्रकारची असावीत, यावर शास्त्राचे कोणत्याही प्रकारचे बंधन नसते हे स्पष्ट करून ते म्हणतात, तथ्ये म्हणजे शास्त्र नव्हे, तर तथ्यांना हाताळण्याची पद्धतच शास्त्र आहे.[१३](Pearson, 1911 पृ.क्र. १५) यावरून मराठी वृत्तपत्रांचा अभ्यास करीत असताना येथे आठ कृषि पत्रकारांच्या व कृषि तज्ज्ञांच्या मुलाखती घेऊन सत्यता पडताळून पाहिली आहे. या अभ्यासामध्ये आत्मनिष्ठा बाजूला ठेवून वस्तुनिष्ठ दृष्टीने संशोधन केलेले आहे.

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास हे संशोधन समाजाला व वृत्तपत्राला नवी दिशा देणारे आहे. नव्या तथ्यांच्या शोधासाठी सत्याचे सामान्यीकरण करणे आवश्यक असते. याबाबत ग्रीनवूड म्हणतात, तथ्यांच्या मुळाशी असणारी संबध्दता स्पष्ट झाली की, अशा तथ्यांचा एक तार्किक वर्ग बनविता येतो. अशा वर्गास आणि त्यात आढळणाऱ्या प्रतिमेला सामान्य विधान बनविता येते.[१४](Greenwood, १९४५, पृ.क्र. १३०) कोणत्याही सामाजिक अध्ययनात शास्त्रीय पद्धतीने तत्त्वांचा शोध करतात. त्यानंतर सिध्दांतांची उभारणी करतात. या संशोधनामध्ये कृषि संवाद अभ्यासताना आजच्या परिस्थितीमध्ये कृषि पत्रकारितेत कोणती उद्दिष्टे डोळयासमोर ठेवली पाहिजेत, त्यात कोणकोणत्या बाबींचा समावेश केला

पाहिजे. याचा अभ्यास करून तथ्ये उलगडली आहेत. या अभ्यासामध्ये सामाजिक अध्ययनातील वेगवेगळ्या घटकांचे विविध प्रवाहांचे अवलोकन केले आहे. यासाठी सामाजिक संशोधनाचे निकष वापरले आहेत. कारण समाजाच्या विविध घटकातील परस्पर संबंधातून अभ्यास करता येईल. बी.एन. घोष म्हणतात, Social research studies human behaviours and social problems. The main idea behind research is to discover new inter relation, new knowledge, new facts and also to verify old ones.[१५](Ghosh, १९८५, पृ.क्र. ९४)

सामाजिक संशोधनात सामाजिक प्रश्नांचा अभ्यास केला जातो. या संशोधनाचा मुख्य उद्देश नवीन संबंधाचा शोध, नवीन ज्ञानाचा शोध, नवीन तथ्यांचे संकलन आणि त्याचबरोबर जुन्या तथ्यांची पडताळणी करणे हा असतो.

प्रस्तुत संशोधन प्रकल्पात अभ्यास करताना मराठी वृत्तपत्रांचा समाजावरील परिणाम हा केंद्रबिंदू मानला आहे. त्याचा अभ्यास करताना मराठी वृत्तपत्रे ही सामाजिक घटना–घडामोडी, शेतीचा विकास याकडे कसे बघतात याचा अभ्यास करण्यात आला आहे. या प्रबंधात मराठी वृत्तपत्रातील शेतीविषयक लेखनात वृत्तपत्रांनी केलेले कार्य व त्यांचे परिणाम अभ्यासले आहेत. मराठी वृत्तपत्रांचा शेतकऱ्यांवर काही फरक पडला आहे का ? त्यात वृत्तपत्रांचे योगदान कसे व किती आहे ? शेतकऱ्यांचा विकास कसा झाला ? आवश्यक घटनांबाबत वेळीच माहिती मिळते का ? वृत्तपत्रे ही समाजाशी निगडीत आहेत. शेतकरी हा त्या समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे. देशातील बहुसंख्य लोकसंख्या कृषि क्षेत्राशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या निगडित आहे.

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या संशोधनात कृषिविषयक पैलूंचा सखोल व सुव्यवस्थित अभ्यास केलेला आहे. डॉ. पु.ल. भांडारकर म्हणतात, नव्याने उजेडात आणलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिध्दांतांचे पुनर्परीक्षण करताना चिकित्सा व सखोल चौकशी करणे म्हणजे संशोधन म्हणता येईल.[१६](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ६)

संशोधनामुळे जुन्या ज्ञानात भर पडते. त्याचबरोबर ज्ञानाची कक्षाही वाढते. प्राप्त ज्ञानातील कालबाह्य गोष्टी, विषय यांच्यातील दोष दूर करता येतात. वृत्तपत्रांशी सांगड घालून ज्ञानाशी व्यावहारिक उपयोगिता वाढविता येते. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा

तुलनात्मक अभ्यास या विषयावर त्यांची कृषि व सामाजिक क्षेत्रातील उपयोगिता पडताळण्याचा प्रयत्न केला आहे. विधानांचे प्रामाण्यसिध्द होण्याएवढेच त्यांची अप्रमाणता सिध्द होणे हेही संशोधनाच्या प्रगतीसाठी उपकारक आहे.[१७](Conften १९९४, पृ.क्र. २४४)

कोणतेही निष्कर्ष अंतिम किंवा सत्य मानीत नाहीत. सत्य उजेडात आणले जाणारे निष्कर्ष त्याज्य ठरवू शकतात. त्यासाठी पुनःपुनः प्रयोग करुन त्याची सत्यता पडताळून पाहणे आवश्यक आहे. याचाच अर्थ ज्ञानाची पद्धतशीर मांडणी म्हणजे संशोधन होय. याबाबत पु.ल. भांडारकर म्हणतात, निष्कर्षांचे प्रामाण्य पुनःपुनः तपासून पाहणे ही शास्त्राची एक मूलभूत गरज आहे.[१८](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ३०)

वृत्तपत्रे हे लोकजीवनाचे दर्शन घडवीत असल्यामुळे कृषि पत्रकारितेचा अभ्यास हा समाजीवनाशी संबंधित आहे. या कृषि संवादाच्या अभ्यासातून सामाजिक गटांवर होणारे परिणाम यांचे अध्ययन हा सामाजिक संशोधनाचा उद्देश आहे. ग्रामीण भागात वृत्तपत्रांचे कार्य एक विकास प्रेरक शक्ती म्हणून होत असते. यातून विकास होतो. विकास विषयक दृष्टीकोन बदलत असतो. समाज आधुनिकिकरणाच्या दिशेने वाटचाल करीत असतो. कृषि विकासातील मराठी वृत्तपत्रांचा अभ्यास करताना लोकांचा सहभाग आणि विकासाचे शहाणपण याबाबत वृत्तपत्रांनी बजावलेली कामगिरी अभ्यासली असता ही प्रक्रिया आपण अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो. कृषि संवादाचे कृषि पत्रकारितेतील वृत्तमूल्ये यांचे अध्ययन करण्यासाठी संवादशास्त्राचा अभ्यास यात सुक्ष्म पद्धतीने केला आहे. तसेच वृत्तपत्रातील आशयाचा आशय उलगडणे व त्यातील अर्थ स्पष्ट करणे यालाही महत्त्व दिले आहे. मराठी वृत्तपत्रांचा अभ्यास करताना कृषि वृत्तपत्रांचे प्रारूप लक्षात घेऊन येथील वृत्तपत्रांचे नवनवीन परिणामाच्या संदर्भात विवेचन केलेले आहे. थॉमसन यांच्या मते प्रत्येक ज्ञान शाखेच्या विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेग वेगळा असतो.[१९](थॉमसन, १९५२, पृ.क्र. २५)

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करीत असताना त्यांचे अंतरंग पडताळून पाहावे लागते. मराठी वृत्तपत्रांचा कृषि विषयक बातम्यांविषयी शास्त्रीय अभ्यास झालेला नाही. कारण या अभ्यासाच्या मार्गात अनेक अडचणी आहेत. या अडचणींची नोंद घेऊन व त्यावर मात करून या अभ्यासामध्ये नव्याने भर टाकायचा प्रयत्न केलेला आहे.

हा अभ्यास प्रथमच होत असल्याने अडचणींवर मात करून येथे व्यवहार्य उपाययोजनाही सूचित केल्या आहेत.

## ३.४ संशोधन पद्धती

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना येथे सामाजिक सर्वेक्षण व आशय विश्लेषण या दोन प्रमुख पद्धतींचा अवलंब करण्यात आला आहे. या पद्धतीच्या वापरातील तत्त्व, तंत्र, नमूना निवडण्याची पद्धत, कालमर्यादा या बाबी निश्चित केल्या आहेत. या दोन्हीही पद्धतीची ओळख करून देणे उचित ठरेल. वृत्तपत्रासारख्या सामाजिक संस्थेचा प्रभाव मोजताना सामाजिक सर्वेक्षण ही पद्धत पोषक ठरते. सामाजिक प्रगतीसाठी विधायक कार्यक्रम मांडण्याचे उद्दिष्ट्ये समोर ठेवले की, त्यात झालेले शास्त्रीय अध्ययन म्हणजे सामाजिक सर्वेक्षण होय.

या अभ्यासामध्ये कृषि संवाद व मराठी वृत्तपत्रांचा अभ्यास करताना अहमदनगर जिल्ह्यातील ३०० शेतकऱ्यांचे सामाजिक सर्वेक्षण केलेले आहे. समाज जीवन, वृत्तपत्रांची क्षमता, शेतकऱ्यांवरील प्रभाव, पत्रकारांची भूमिका, आधुनिक साधनांचा वृत्तपत्रांत वापर व परिणाम, माहितीची गरज याबाबत हे संशोधन पोषक ठरणारे आहे. कृषि विषयक माहितीने शेतकऱ्यांचा विकास झाला का ? त्यात मराठी वृत्तपत्रांची भूमिका काय ? त्यातून साधलेला संवाद या अभ्यासाचा मुख्य आधार आहे. त्यांच्या बारीक अभ्यासामध्ये कृषि दैनिकांशी व शेतीशी संबंधित आठ कृषितज्ज्ञांच्या व कृषि पत्रकारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. या मुलाखतींमुळे अन्वेषणात्मक स्वरूपाच्या अभ्यासातून असंरचित मुलाखतीचीच पद्धती प्रामुख्याने वापरली जाते. याबाबत संदिग्धता हा असंरचित मुलाखतीचा खरा फायदा आहे. कारण या प्रकारच्या मुलाखतीत व्यक्तींची उत्तरे बरेचदा अनपेक्षित असतात. मराठी वृत्तपत्रेही याला अपवाद नाहीत. कृषि संवाद नवनव्या प्रसार माध्यमांबरोबर झपाट्याने बदलत आहे.

आधुनिक तंत्रज्ञान व निसर्गामुळे देखिल शेती व्यवसाय झपाट्याने बदलत आहे. अनेक परिणाम आपणाला कृषि व्यवसायावर होताना दिसतात. या प्रबंधामधील सर्वेक्षण तंत्र नव्या

दिशेने अभ्यासास पोषक ठरले आहे. मराठी वृत्तपत्रे ही शेतकऱ्यांच्या किंवा समाजाच्या समस्येला वाचा फोडण्यासाठी व जागृत करण्यासाठी उपयोगात आणलेले संवाद माध्यम आहे.

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना प्रश्नावलीद्वारे सर्वेक्षण व प्रत्यक्ष निरिक्षणांद्वारे आशय विश्लेषण केलेले आहे. सामाजिक सर्वेक्षणाबाबत डॉ.पु.ल. भांडारकर म्हणतात, एखाद्या विशिष्ट समूहाच्या व गटाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आदि पैलूंचे अध्ययन व विश्लेषण करून त्यांच्यात समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच सामाजिक सर्वेक्षण होय.[२०] (भांडारकर, १९८७, पृ.क्र. ४०)

शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करताना त्यांचे शिक्षण, गाव, जात, वर्ग, मासिक उत्पन्न, धर्म सध्याची परिस्थिती, सरकारी धोरण, पाणी समस्या, गरजा, नव्या अपेक्षा, सूचना व उपाययोजना आदि पैलूंचे अध्ययन व विश्लेषण केलेले आहे. बी.एन. घोष यांच्या मते A social survey method is the way of the way of approaching the problem in order to find out the truth involved in the problem certain steps must be taken in certain order and the ordered steps called a method.[२१] (Ghosh,१९८५, पृ.क्र.९१) सामाजिक सर्वेक्षण पद्धतीत समस्येला हात घालून सत्याचा शोध घेण्यासाठी विशिष्ट घटकांचा शोध घेणे होय. त्यासाठी विशिष्ट पायऱ्यांचा वापर करावा लागतो. अशा वेळी सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला जातो त्याला सामाजिक सर्वेक्षण पद्धती म्हणतात. सामाजिक संशोधनात प्रश्नावली हे एक विचार संकलनाचे महत्त्वाचे साधन होय. प्रश्नावली ही पुर्वनियोजित क्रमाने मांडण्यात आलेली मालिका असते.

आशय विश्लेषण विषयी बर्जर सांगतात,मुद्रित किंवा प्रसारित तथ्यांचे शास्त्रीय विश्लेषन करण्याची ही एक प्रमाण पद्धती होय.[२२] (Berger, २०१३, पृ.क्र. ४८) या अभ्यासामध्ये आशय विश्लेषणाच्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्राचा वापर केलेला आहे. या अभ्यासात मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक रीतीने विषय मांडून त्यांचे सामाजिक कार्य कसे प्रभावी होईल या बाबत व्यवहार्य विवेचन केले आहे.

वस्तुनिष्ठता हा सामाजिक संशोधनाचा आत्मा होय. कृषि संदर्भात मराठी वृत्तपत्रांमध्ये कुठल्या प्रकारच्या आशयाला किती स्थान मिळाले यावरून या वृत्तपत्रांची भूमिका व दर्जा

यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे सामाजिक संशोधन करताना आशय विश्लेषण पद्धती अत्यंत उपयुक्त ठरते.

शास्त्रीय शोध लावण्याच्या दृष्टीने मिळविलेल्या संदर्भावरुन तसेच तथ्यांच्या आधारे केलेले विश्लेषण म्हणजेच आशय विश्लेषण होय. तर याबाबत डॉ.वा.भा. पाटील यांच्या विवेचनावरुन मुलाखती, प्रश्नावली, अनुसूची इत्यादिंच्या लिखित किंवा मौखिक साधनांच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांचा पद्धतशीर वस्तुनिष्ठ व प्रमाणबद्ध अर्थ विषद करण्याच्या संशोधनात्मक तंत्राला आशय विश्लेषण असे म्हणतात.[२३](पाटील, २००६, पृ.क्र. १३०) तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन हे सर्व प्रकारच्या संशोधनाचे एक अविभाज्य अंग असते. या संदर्भात पु.ल. भांडारकर यांच्या मते संकलित तथ्यांचे विशिष्ट प्रकारे संघटन करून सिध्दांताची व गृहितकृत्यांची पडताळणी घेता यावी किंवा नवीन सिध्दांत बांधता यावा हाच विश्लेषणामागील उद्देश असतो.[२४](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ९५)

आशय विश्लेषण ही एक व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत अनेक कार्याचा समावेश होतो.

१) मिळविलेल्या माहितीचे वर्ग पाडणे

२) सांकेतिकीकरणाद्वारे पाडलेल्या वर्गांचा उपयोग करून घेणे

३) कोष्टके बनविणे

४) संख्याशास्त्रीय निष्कर्ष काढणे

वरील सर्व आशय विश्लेषणाच्या समग्र क्रियेची उपांगे आहेत. आशय विश्लेषणाचे तंत्र विशद करताना बी. बर्लसन म्हणतात, सत्यापनातील व प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ, संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र असून अभ्यासाला पूरक होईल. अशा तऱ्हेने विषयांचे तथ्य संकलन करणे व या तथ्यांसाठी विविध मार्गाने माहिती उपलब्ध करणे या तंत्राला आशय विश्लेषण म्हणता येईल.[२५](Berlson, 1952, पृ.क्र. ८५)

या अभ्यासात आशय विश्लेषणाच्या वैशिष्ट्यपूर्ण तंत्राचा वापर करून वृत्तपत्रांमधील कृषि विषयांचा मजकूर तपासून पाहिलेला आहे. या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे

की, संज्ञापनातील व्यक्त व प्रगट आशयाच्या वस्तुनिष्ठ, व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण एक तंत्र आहे.[२६] (कित्ता, पृ.क्र. ८५)

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास हा सामाजिक संशोधनाचा विषय असल्याने या संशोधनात तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन यांना स्वतःचे महत्त्व आहे. कृषि पत्रकार व कृषि तज्ज्ञांच्या घेतलेल्या मुलाखतीनंतर त्यांचे विश्लेषण व निर्वचन करणे ही त्यांची रचनात्मक बाजू आहे. येथे कृषिविषयक १४ घटकांचा अभ्यास करून त्या बाबतच्या तथ्यांचे संकलन प्रश्नावली व मुलाखतीत निरीक्षणाद्वारे केलेले आहे. त्यामागचा उद्देश मराठी वृत्तपत्रांचे वास्तविक ज्ञान प्राप्त करणे आहे. त्यामुळे संकलित तथ्यांचे उचित विश्लेषन व निर्वचन येथे करण्यात आलेले आहे. मराठी वृत्तपत्रे हे माध्यम सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावी कृषि संवादाचे माध्यम म्हणून उपयोगात आणले जाते. तेव्हा परिवर्तन प्रक्रियेशी त्याचा कार्यकारण भाव जाणून घेण्याचा येथे प्रयत्न केलेला आहे. अहमदनगर जिल्ह्यात वितरीत होणारी दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या दोन प्रमुख वृत्तपत्रांची या अभ्यासासाठी निवड केली आहे. तसेच असा नमूना निवडताना त्रिस्तरीय अभ्यास पद्धती वापरली आहे.

त्यासाठी संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन वैज्ञानिक पद्धतीने केले आहे. त्यावरून सिध्दांत व नियमांचे प्रतिपादन केले आहे.  संकलित प्रश्नावली व मुलाखती याची मांडणी करण्यात आलेली आहे. मराठी वृत्तपत्रांची कृषिविषयक भूमिका पडताळण्यासाठी संकलित तथ्यांचे एकत्रीकरण करून त्यांचे विश्लेषण केलेले आहे. त्या आधारे निष्कर्ष काढलेले आहेत.

## ३.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये

भारतीय शेतीव्यवसायाला व शेतकऱ्यांना पूरक सेवा व माहिती योग्य वेळी पुरविण्यात आली तर भारतीय शेतीव्यवसायाचा आर्थिक विकास जलद गतीने होणे शक्य आहे. अशा माहिती व सेवा देण्यामध्ये माध्यमांचा परिणामकारक वापर करणे शक्य आहे. भारत सरकारद्वारे वेगवेगळया प्रकारे माहितींचे प्रकाशन व प्रसारण केले जात आहे. माध्यमांनी जर अशा गरजेकडे

गांभिर्याने पाहिले तर मात्र भारतीय शेतीव्यवसायामध्ये परिवर्तन होणे शक्य आहे. अशा भूमिकेतून वृत्तपत्रांची जबाबदारी फार महत्त्वाची असते. वृत्तपत्राद्वारे शेतीव्यवसायाबाबतची माहिती देणे शक्य आहे. त्यातून शेतीव्यवसायांबाबत नवीन दृष्टीकोन व जागृती निर्माण होईल. परंतु वृत्तपत्रांद्वारे ही भूमिका पार पाडली जाते का ? हा खरा प्रश्न आहे. प्रस्तुत संशोधनाद्वारे कृषि पत्रकारितेविषयक वृत्तपत्रांची भूमिका अभ्यासली जाणार आहे. वृत्तपत्रे हे प्रभावी माध्यम आहेत, परंतु कृषि पत्रकारितेविषयक त्यांची भूमिका काय आहे ? त्याची व्याप्ती किती आहे ? अशा दृष्टिकोनातून संशोधन केले आहे.

१) कृषि पत्रकारितेचा अभ्यास करणे.

२) कृषि पत्रकारितेमध्ये मराठी वृत्तपत्रांच्या योगदानाचा अभ्यास करणे.

३) मराठी वृत्तपत्रांचा कृषि पत्रकारितेबाबत तुलनात्मक अभ्यास करणे.

## ३.६ संशोधन प्रश्न

भारतीय शेतीव्यवसायाचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी मराठी वृत्तपत्रे पूरक भूमिका पार पाडू शकतात. माहिती सेवा देण्यासाठी माध्यमांचा परिणामकारक वापर करणे शक्य आहे. अशा भूमिकेतून वृत्तपत्रांची जबाबदारी फार महत्त्वाची असते. मराठी वृत्तपत्रे हे प्रभावी माध्यम आहेत. वृत्तपत्राद्वारे शेतीव्यवसायाबाबतची माहिती देणे शक्य आहे. त्यातून शेतीव्यवसायांबाबत नवीन दृष्टीकोन व जागृती निर्माण होईल. कृषि पत्रकारितेविषयक वृत्तपत्रांची भूमिका काय आहे. वृत्तपत्रांद्वारे ही भूमिका पार पाडली जाते का ? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन विषयातून केला आहे. या पार्श्वभूमीवर कृषि पत्रकारितेतील अभ्यासाच्या अर्थपूर्ण मांडणीसाठी पुढील संशोधन प्रश्न निश्चित केले आहेत.

१) कृषि पत्रकारितेविषयक मराठी वृत्तपत्रांची भूमिका काय आहे ?

२) कृषि पत्रकारितेमध्ये मराठी वृत्तपत्रांचे योगदान कशा प्रकारचे आहे ?

३) मराठी वृत्तपत्रांत सर्वसाधारण वार्ता व कृषि वार्ता यांचे तुलनात्मक प्रमाण कसे आहे

४) शेतकऱ्यांना कृषि पत्रकारितेचा फायदा होतो का ?

अशाप्रकारे अनेक प्रश्नांच्या जाळ्यात अडकलेल्या कृषि पत्रकारितेला लोकाभिमुख करण्यासाठी वरील संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे जी प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातुन शोधली आहेत.

## ३.७ गृहितकृत्ये

कोणतेही संशोधन करताना संशोधनाची गृहितकृत्ये डोळयांपुढे ठेवावे लागते. डॉ. पु.ल. भांडारकर यांच्या मते, संशोधन फलपद ठरण्यासाठी तथ्ये संकलित करण्यात आली पाहिजे की त्याआधारे एखाद्या विधानाचे व दृष्टिकोनातून मंडन किंवा खंडन होऊ शकेल. असा दृष्टिकोन किंवा विधान म्हणजे गृहितकृत्य होय.[२७](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ९३)

गृहितकृत्यांची उपलब्ध तथ्यांच्या आधारे चाचणी होणे हेच संशोधनाचे कार्य असते. ज्ञात असलेल्या माहितीच्या आधारे किंवा संशोधनातून संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांच्या आधारे याच गृहितकृत्यांची चाचणी घेण्याचा संशोधनकर्ता प्रयत्न करीत असतो. संज्ञापन माध्यमांच्या पातळीची तुलना करण्यासाठी ही पद्धती उपयुक्त ठरते. भविष्याच्या संदर्भात आशयाच्या तपासणीसाठी तिचा अवलंब करता येते. सुरुवातीलाच ज्याच्या आधारे आशयाचे वर्गीकरण करावयाचे असते. त्यांचे विश्लेषण वर्गाच्या घटकांच्या किंवा एककाच्या आकलनाची आवश्यकता असते. सामाजिक आशयाचे परिणाम कोणते हे पाहण्यासाठी सुध्दा ही पद्धती पोषक आहे. या अभ्यासातही गृहितकृत्यांची चाचणी पद्धती वापरत आहोत.

वैज्ञानिक पद्धतीने कोणत्याही विषयाचा अभ्यास करावयाचा असल्यास अभ्यासकाला प्रथम त्या विषयाची पूर्ण माहिती असावी लागते. संशोधन करताना असंख्य तथ्ये अभ्यासकाच्या अवतीभोवती फिरत असतात. त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. अशावेळी या अगणित तथ्यांमधून संशोधनासाठी नेमकी व संशोधनाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी तथ्येच निवडण्याचे कार्य गृहितकृत्यांच्या आधारे होऊ शकते. सामाजिक संशोधनात गृहितकृत्याला महत्त्व असते. गृहितकृत्य लक्षात घेऊनच संशोधनाची दिशा ठरवली जाते.

गृहितकृत्य हे सिध्दांताकडे जाण्यासाठी दिशा देण्यास उपयुक्त ठरणारे असतात. गृहितकृत्ये म्हणजे तथ्ये निरीक्षणांवर आधारलेली असून त्यामुळे भावी संशोधन कार्याला चालना मिळते. वेबस्टरच्या शब्दकोशातील व्याख्यांप्रमाणे गृहितकृत्ये म्हणजे एखादे गृहीत धरलेले विधान, तत्त्व किंवा एखादी गृहीत धरलेली अट होय. संशोधनकर्त्यापुढील प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी तथ्ये संकलित करणे आवश्यक आहे. त्या संकलनाचे परिणामकारक विश्लेषणासाठी तथ्यांचे संघटन कशा प्रकारे करणे ते दर्शविण्यासाठी गृहितकृत्ये मार्गदर्शकाचे काम करतात. संशोधकाच्या कार्यात संशोधकांना गृहितकृत्ये किंवा उपकल्पना गृहीत धरावी लागते. अभ्यासासाठी निवडलेल्या विषयांची संशोधकाला सखोल माहिती असावी लागते. म्हणजे योग्य असे गृहितकृत्ये निवडता येते. गृहितकृत्यावरून काढलेल्या परिणामांबाबतच्या अपेक्षा प्रत्यक्षात साकार झाल्या आहेत की नाहीत याची चाचणी घेणे म्हणजे गृहितकृत्यांची शहानिशा करणे होय. गृहितकृत्यांची सत्यता सिध्द झाली म्हणजे संशोधनाची समस्या सुटते. गृहितकृत्याशिवाय संशोधनात आपण एकही पाऊल ठेवू शकत नाही, असे कोहेन व नॅगेल यांनी म्हटले आहे.[२८](भांडारकर, १९८७, पृ.क्र. १४०)

मराठी वृत्तपत्रांद्वारे संदेशवहन शेतकऱ्यांपर्यत जाऊन भिडते. वृत्तपत्रे संदेशवहनाचे कार्य अखंडपणे करीत असतात. त्याचे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांवर दूरगामी परिणाम होतात. तत्कालीन समाज जीवनाचे प्रतिबींब मराठी वृत्तपत्रांतून व्यक्त होते. मराठी वृत्तपत्रे ही समाजपरिवर्तनाची जनित्रे आहेत. कृषि संवाद व मराठी वृत्तपत्रांमधील विचार, माहिती व ज्ञानामुळे नवीन समाजाची निर्मिती होते. समाजातील अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यांना हादरे देवून नवा समाज, मानव व नवी संस्कृती घडविण्याचे काम कृषि पत्रकारितेतून शक्य आहे. शेतकऱ्यांमध्ये निर्माण होणारे नवनवीन प्रश्न सोडविण्यासाठी मराठी वृत्तपत्रे हे एक उपयुक्त संवाद माध्यम आहे.

प्रस्तुत संशोधनात मराठी वृत्तपत्रांचा कृषि विषयक लेखनांचा कृषि विकासासाठी कसा संबंध आहे ? जनसंवाद म्हणून वृत्तपत्रे कसे प्रभावीपणे कृषि संशोधन विस्ताराला प्रेरक ठरत आहे हे प्रामुख्याने तपासले आहे. धान्य उत्पादनासह फळे व फुले यांच्या उत्पादनावर अधिक भर देऊन शेतीत व्यापक परिवर्तन करणे आणि यातून कृषि क्षेत्र अधिक शक्तीशाली

बनविण्याचा हेतू आहे. यासाठी हे माध्यम कितपत उपयुक्त आहे हे समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यासले आहे. वृत्तपत्रांचे कार्य लक्षात घेता मराठी वृत्तपत्रांचे कार्य कृषि विषयक संवादाबाबतीत तपासून पाहणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना खालील गृहितकृत्ये प्रमाण मानली आहेत.

१) कृषि पत्रकारितेमुळे शेतीव्यवसायात वाढ होते.

२) कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होते.

३) मराठी वृत्तपत्रांचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान आहे.

४) मराठी वृत्तपत्रांच्या कृषि पत्रकारितेच्या योगदानामध्ये असमतोलपणा दिसून येतो.

## ३.८ प्रश्नावली

सामाजिक संशोधनात प्रश्नावली हे माहिती संकलनाचे महत्त्वाचे साधन आहे. सामाजिक सर्वेक्षण करून एखाद्या विषयाबद्दल आवश्यक ती माहिती आपणास संकलित करता येते. या माहितीच्या संकलनासाठी प्रश्नावली हे साधन वापरले जाते. प्रश्नावली तंत्राचा वापर करून तथ्य संकलन केले जाते. तथ्ये संकलनासाठी प्रश्नावली हे महत्त्वपूर्ण साधन म्हणून ओळखले जाते. विशिष्ट समस्येचा अभ्यास करण्यासाठी संबंधितांकडून त्यासंबंधी माहिती मिळावी म्हणून समस्येच्या संदर्भात एक प्रश्नांची यादी तयार केली जाते. त्याला प्रश्नावली म्हणतात. समाजशास्त्रीय संशोधनात तथ्ये शोधण्यासाठी प्रश्नावली आणि अनुसूची या दोन्हींचा वापर करण्यात येतो. या प्रकारात प्रश्नमालिकेतील प्रश्न संशोधक निवेदकांना प्रत्यक्षपणे विचारून त्यांची उत्तरे भरत असतो. अशा प्रश्नमालिकेला अनुसूची असे म्हटले जाते. याबाबत गुड आणि हॅट म्हणतात की सर्वसामान्यपणे अनुसूची प्रश्नावली हे प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचे असे एक तंत्र आहे की, ज्या छापील कागदावरील प्रश्नांची उत्तरे निवेदक स्वतःच भरत असतो.[२९](कऱ्हाडे, २०११, पृ.क्र. ३००)

प्रश्नावली मुळे दूरवर असलेल्या व्यक्तीकडून माहिती गोळा करता येऊ शकते. ही प्रश्नावली तंत्राच वैशिष्ट्यपूर्ण लक्षण होय. प्रश्नावलीमध्ये चांगले प्रश्न असतील तर त्यास

सत्वर व तत्पर उत्तरे मिळतात. दुबळ्या प्रश्नांमधून अयोग्य प्रतिसाद मिळतो. प्रश्न रचताना पुनरावृत्ती टाळावी लागते. प्रश्नांची भाषा ही साधी व सोपी असावी लागते.

प्रश्नावलीमध्ये बंदिस्त व संरचित प्रश्नावली असे दोन प्रकार पडतात. नमुनेदार प्रश्नावली तयार करताना या दोन्ही पद्धतीचे दोष टाकून प्रश्नावलीला आदर्श रूप देता येते. प्रश्नावली फार मोठी असेल तर ती उत्तरदात्यास कंटाळवाणी होते आणि लहान असेल तर त्यातून माहितीच्या संकोचाचा धोका निर्माण होऊ शकतो. उत्तम प्रश्नावली ही समतोल असावी लागते हे लक्षात घेऊन या अभ्यासात दोन्ही प्रकारातील दोष टाळून गुणांचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रगत संगणकीय तंत्रज्ञान, समाजमाध्यमांचा प्रभाव व मोबाईल क्रांतिच्या युगात कृषि संवादाच्या शास्त्रशुध्द अभ्यासामुळे शेतकऱ्यांच्या कौशल्यात भर पडली आहे. त्या दृष्टिने त्यांच्या वाढत्या गुणवैशिष्ट्यांचे व कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी या सर्वेक्षणातून प्रश्नावली अत्यंत उपयुक्त ठरली आहे. प्रश्नावली संदर्भात विल्सन गी म्हणतात, नागरिकांमधून मर्यादित प्रमाणात तथ्ये संकलन करण्याची सरळ पद्धती म्हणजे प्रश्नावली होय.[३०](विल्सन, १९६८, पृ.क्र. ४८)

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करीत असताना कृषि क्षेत्रात काम करणाऱ्या तीनशे शेतकऱ्यांचे सामाजिक सर्वेक्षण करण्यासाठी प्रश्नावली हे माध्यम वापरून त्याद्वारे तथ्यसंकलन केले आहे. भारतीय एकूण लोकसंख्येतील सर्वात मोठा घटक असणाऱ्या बहुजन वर्गातील शेती, कृषि घटकांचे पडसाद वृत्तपत्रात कशा प्रकारे उमटते ? त्यामागे सकारात्मक, नकारात्मक फरक कोणते आहेत याचा शोध घेण्यासाठी या अभ्यासात शेतकरी व कृषितज्ज्ञ तसेच कृषि पत्रकार यांच्यासाठी वेगवेगळया प्रश्नावीलीद्वारे माहितीचे संकलन करून सामाजिक पाहणीचा निष्कर्ष पडताळून पाहिलेला आहे. कोणतीही सामाजिक पाहणी ही सुक्ष्म माहिती संकलनावर अवलंबून असते. त्यामुळे शेतकरी, कृषितज्ज्ञ, कृषि पत्रकार यांना प्रश्न विचारून त्या आधारे माहितीचे पृथ्थकरण करून यथार्थ अनुमाने काढण्याची शास्त्रीय पद्धती अवलंबिली आहे. अशी प्रश्नावली, अनुसूची तयार करताना शेतकरी, कृषितज्ज्ञ, कृषि पत्रकार या घटकांचा स्वतंत्रपणे विचार केला आहे. या संशोधनात

बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या तांत्रिक, शैक्षणिक पात्रता, उत्पन्न, अवलंबून असणाऱ्या मुलांची संख्या व त्यांचे शिक्षणाची इयत्ता, कर्ज, पाणी परिस्थिती, कर्ज प्रकरणे, सरकारी मदत, राहणीमान, वैचारिक पातळीत कसे बदल झाले आहेत आदि प्रकारे अवलोकन, विश्लेषण केलेले आहे.

## ३.९ मुलाखत

पॉलिन यंग यांच्या मते मुलाखत ही सुव्यवस्थित पद्धतीची आहे की ज्यायोगे तुलनेने त्रयस्थ असलेल्या व्यक्तीच्या जीवनात अभ्यासक कल्पनाशक्तीच्या बळावर शिरत असतो.[३१](नाडगोंडे, १९८६, पृ.क्र. ११४) मुलाखत तंत्र ही सामाजिक आंतरक्रियेची प्रक्रिया आहे. प्रा. वा.बा. पाटील म्हणतात, तथ्य संकलनाच्या कार्यासाठी मुलाखतीचा उपयोग करण्यात येतो.[३२](पाटिल, २००६, पृ.क्र. २२९) सर्वेक्षणातील माहिती ही प्रश्नावली व वैयक्तिक मुलाखतीच्या आधारे संकलित केली जाते. अपेक्षित सत्य व प्रत्यक्ष माहिती यातील अंतर कापण्यावर मुलाखतीचा भर असतो. प्रत्यक्षात मुलाखत ही बाब अत्यंत गुंतागुतीची असते. जनसमुदायाकडून तथ्ये संकलन करण्यासाठी मुलाखतीसारखे दुसरे उचित साधन नाही.

प्रस्तुत प्रबंधात प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा वापर करून तथ्यांचे संकलन करण्याचा प्रयत्न केला. कृषितज्ज्ञ व कृषि पत्रकारांच्या मुलाखतीमुळे कृषिविषयक विकासाच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे शक्य झालेले आहे. सामाजिक चळवळीत पत्रकारांच्या मुलाखतीमुळे मराठी वृत्तपत्रांच्या वाटचालीचे खरे स्वरूप समोर आले आहे. त्यांच्या वर्तनाबाबत मुलाखतीच्या माध्यामातून प्रश्न विचारून आपणाला माहिती मिळू शकते. सदर व्यक्तींशी संभाषणाद्वारे किंवा मुलाखतींद्वारे आपल्या संशोधनासाठी उपयुक्त माहिती मिळविता येते. मुलाखतीच्या पद्धतीत मुख्य भर मौलिक शब्दांवर असतो. या बाबत पु.ल. भांडारकर म्हणतात, मुलाखत तंत्राद्वारे व्यक्तिंच्या अवबोधनाचे, विश्वासाचे, प्रेरणांचे, आशा–आकांक्षांचे, खासगी स्वरूपाच्या वर्तनाचे ज्ञान आपणाला मिळू शकते.[३३](भांडारकर, १९८७, पृ.क्र. ३००)

मुलाखत तंत्र हे तोंडी माहिती गोळा करण्याचे तंत्र असून ते सर्वसामान्य वर्तनाबद्दलची माहिती मिळविण्यासाठी वापरले जाते. ही एक मुलाखत तंत्राची पद्धती आहे.[३४](Ghosh,१९८५, पृ.क्र. ९८) तज्ज्ञांनी दिलेल्या या प्रकारच्या विवेचनावरून मराठी वृत्तपत्रांची कृषि विचारांसंबंधी माहिती मिळविण्यासाठी मुलाखत हे अत्यंत उचित असे तंत्र मानले आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना आशय विश्लेषण, सर्वेक्षण, मुलाखत व प्रश्नावली या तंत्रांचा अवलंब केला आहे. मराठी वृत्तपत्रांनी कृषि विकासाला कशी चालना दिली हे पाहिले आहे. बदलत जाणाऱ्या विविध घटकांमुळे कृषि व्यवसायात कसा बदल झाला आदि पैलूंचे अवलोकन केले आहे. शेतीसंदर्भात विकास दर वाढविण्याठी हे संशोधन निश्चितच उपयोगी ठरेल.

प्रस्तुत संशोधनासाठी आठ कृषि पत्रकार व कृषितज्ज्ञांच्या मुलाखती घेतल्या गेल्या आहेत. सर्वच कृषि तज्ज्ञ व  पत्रकारांना सारखे प्रश्न विचारणे शक्य नसल्याने येथे संरचित मुलाखत तंत्र वापरले आहे. डॉ. पु.ल. भांडारकर म्हणतात, असंरचित स्वरूपाच्या मुलाखतीद्वारे व्यक्तीच्या संवेगाचे, भावनांचे, विषया संबंधीच्या अभिवृत्तीचे महत्त्वाचे दर्शन आपणाला घडू शकते.[३५](भांडारकर, १९८७, पृ.क्र. २९८) उत्तरदात्या व्यक्तीला मनमोकळया पद्धतीने बोलू दिल्यास त्यांच्या मनातील अनेक गोष्टी बाहेर येतात. याशिवाय अनौपचारिकता या प्रकारच्या मुलाखतीचा सर्वात मोठा फायदा आहे. त्यामुळे उत्तरदात्यांकडून अधिक सखोल माहिती संशोधनकर्त्यांना मिळते. कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकारांची मानसिकता बदलण्याच्या प्रक्रियेत कशी आकार घेते याचे आकलन करण्यासाठी मुलाखत तंत्र उपयुक्त ठरते.

मुलाखत तंत्रामुळे निरक्षर लोक तसेच मुलाकडून माहिती घेण्यास उपयुक्त ठरते. टपालाने पाठविलेल्या प्रश्नावलीपेक्षा या पद्धतीतून अधिक चांगला प्रतिसाद लाभतो. मुलाखत तंत्रात अधिक लवचिकता असते. माहिती उपलब्ध करताना प्रश्न समर्थकपणे वापरता येतात. मुलाखतीतून सुस्पष्ट चर्चा घडते. मुक्त प्रश्नांतून अधिक विचारमंथन घडते. उत्तरदात्यांचे प्रत्यक्ष वर्तन नोंदता येते. प्रत्यक्ष संपर्क साधून आपल्याला हवी ती माहिती मिळविणे, गृहितकांचा शोध घेणे आणि तपासणी करण्यासाठी मुलाखती वापरल्या जातात.

## ३.१० अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

संशोधनासाठी आराखडा तयार करणे आवश्यक असते. या अभ्यासासाठी अन्वेषणात्मक आराखडा वापरला आहे. आराखडा ही संकल्पना स्पष्ट करताना डॉ. वा.बा. पाटील म्हणतात, अन्वेषणात्मक संशोधनाचा उद्देश एखाद्या सामाजिक घटनेच्या मुळाशी असलेल्या कारणांचा शोध घेणे हा असतो.[३६](पाटील, २००६, पृ.क्र. १०३)

आराखडा केल्याशिवाय संशोधन होत नाही. त्यामुळे संशोधन करण्यासाठी आराखड्याची गरज असते. यात विशिष्ट क्रमाने मांडल्या जाणाऱ्या निर्णयामधून संशोधन आराखडा साकार होत जातो. यात तथ्य संकलन, नमुना निवड, तथ्यांचे संकलन, विश्लेषण आदि विषयाचे निर्णय योग्य आधारावर घेणे आवश्यक असते. सर्व गोष्टी विचारात घेऊन संशोधन करण्यापूर्वी आराखडा तयार केल्यास संशोधन कार्यात शक्ती, पैसा, श्रम यांचा अपव्यय होत नाही. संशोधन आराखड्याच्या आधारे पुढे येणाऱ्या अडचणी कोणत्या असतील याबद्दल सर्व सूचना संशोधकाला प्राप्त होतात. तो योग्य वेळी सावध होतो, हा विषय तुलनेने नवा असल्यामुळे अन्वेषणात्मक आराखडा निवडलेला आहे. यामध्ये तीन टप्पे महत्त्वाचे असतात ते पुढीलप्रमाणे दिलेले आहे.

१) विषयांशी संबंधित साहित्याचे परिक्षण करणे व अन्य विषयांचे ज्ञान करून घेणे.

२) अध्ययन विषयाबाबत अनुभवी व ज्ञान असणाऱ्या व्यक्तींचे सर्वेक्षण करणे.

३) ज्या उदाहरणामुळे चालना मिळेल अशांचे विश्लेषण करणे.

मराठी वृत्तपत्रांत कृषि पत्रकारितेचे मूल्यमापन करण्यासाठी अन्वेषणात्मक आराखडा अधिक समर्पक ठरतो. या अभ्यासामध्ये हा आराखडा पुढीलप्रमाणे वापरला आहे. या प्रबंधासाठी कृषि पत्रकारिता व वृत्तपत्रांची भूमिका मांडण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून किंवा ग्रंथांचा आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व स्थानिक अशा प्रकारे वर्गीकरण करून संशोधनाचे अध्ययन करण्यात आले आहे. त्याचबरोबर इंटरनेट, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, वार्षिक अंकातील लेखांचाही आढावा घेण्यात आला आहे. सामाजिक अनुभव सर्वेक्षण म्हणून तीनशे शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत तसेच आठ कृषि पत्रकार व कृषि तज्ज्ञांच्या मुलाखतींचाही समावेश करण्यात आलेला आहे.

## ३.११ सैध्दांतिक चौकट

प्रसार माध्यमांचे संशोधन हे समाजशास्त्रीय दृष्टीने केले जाते. प्रा.रा.ना. घाटोळे यांच्या मते समाजामध्ये नित्य घडणाऱ्या घटना, क्रिया–प्रतिक्रिया यांचे सूक्ष्म आकलन करून वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढावे लागतात.[३७](घाटोळे, २००५, पृ.क्र. ११) समाजशास्त्रीय संशोधनामध्ये सामाजिक दृष्टीने माध्यमातील आशयाचे आकलन करावे लागते. येथे मराठी वर्तमानपत्रातील कृषि पत्रकारितेच्या सामग्रीचे विवेचन करताना सामाजिक मीमांसा करावयाची आहे.

शेतीशी निगडीत लोकसंख्या आणि कृषि विषयाचे महत्त्व लक्षात घेता कृषि पत्रकारिता ही शेतकरी आणि भारतीय समाज जीवनावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. कृषि विकासात शेतकऱ्यांना सहभागी करणे हे मराठी वृत्तपत्रांचे उद्दिष्ट होय. लोकप्रबोधन आणि विकास प्रवर्तक हा कृषि संवादामधला वृत्तपत्रांचा मुख्य आत्मा आहे. मराठी वृत्तपत्रे ही एक सामाजिक संस्था असून त्यांचे कार्य कृषि विकासाला पोषक ठरते. भाषिक वृत्तपत्रे शेतकऱ्यांच्या विकासाचे सर्वांगीण साधन होय. यातील आशय हा गुणात्मक बदल करण्यासाठी पोषक ठरतो.

कृषि विषयक नविन विज्ञान आणि तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य मुद्रित माध्यमे कशा रितीने करत आहेत ते अभ्यासावयाचे आहे. त्यामुळे वृत्तपत्रांची भूमिका मित्र, मार्गदर्शक व तत्त्वचिंतनाची असून कृषि पत्रकारिता शेतकऱ्यांना किती प्रमाणात व कोणत्या प्रकारची पोषक माहिती उपलब्ध करुन देते या बद्दल मराठी वृत्तपत्रातील छापील मजकूराचा तुलनात्मक अभ्यास करणे हीच या संशोधनाची मुख्य सैध्दांतिक चौकट असणार आहे.

## ३.१२ संशोधन अध्ययनाची व्याप्ती, कालावधी व सामग्री निवड

### ३.१२.१ भौगालिक व्याप्ती

प्रस्तुत संशोधन कार्य अहमदनगर जिल्ह्यातील मर्यादीत आहे.

### ३.१२.२ जनसंख्या व्याप्ती

संशोधन विषयात अहमदनगर जिल्ह्यातील ३०० शेतकरी, ८ कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकार यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क करुन कृषि पत्रकारितेचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे.

### ३.१२.३ कालमर्यादा

हा अभ्यास ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ या सहा महिन्याचा असून तो त्रिस्तरिय पद्धतीने केला आहे. वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचे स्वरूप उलगडताना १४ घटकांचे संख्यात्मक, गुणात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

### ३.१२.४ त्रिस्तरीय पद्धत

त्रिस्तरिय पद्धतीने या काळातील वृत्तपत्रीय सामग्री सुक्ष्मपणे अभ्यासली आहे. यात महिनाभराच्या अभ्यासात ऑक्टोबर महिना निवडला आहे कारण कृषि क्षेत्राशी निगडीत घडामोडी या महिन्यात सर्वाधिक असतात. परतीचा पाऊस, कृषि आधारीत व्यवसाय, उद्योग विशेषतः साखर कारखान्यांचे गाळप हंगाम देखील सर्वसाधारणपणे २० ऑक्टोबर पासून सुरू होतो. त्यामुळे ऑक्टोबर, २०१६ हा महिना विशेष अभ्यासासाठी निवडला आहे. सप्ताहाच्या अभ्यासासाठी मार्च महिन्यातील एक आठवडा निवडला आहे. हा कालावधी सुक्ष्म अभ्यासासाठी निवडला आहे. ऑक्टोबर, २०१६ हा आधारभूत महिना धरल्यानंतर एक दिवसाच्या अभ्यासात उपलब्ध प्रत्येक महिन्यातील पहिल्या आडवड्याचा एक दिवस निवडला आहे.

### ३.१२.५ सामग्री निवड

अहमदनगर जिल्ह्यात वितरीत होणाऱ्या सकाळ पेपर्स प्रा. लि. चे दैनिक सकाळ व लोकमत मीडिया प्रा. लि. चे दैनिक लोकमत या दोन प्रमुख वृत्तपत्रांची निवड अभ्यासासाठी केली आहे. याचे कारण म्हणजे जास्तीत जास्त शेतीविषयक माहिती व बातम्या देण्याचे या वर्तमानपत्रांचे धोरण दिसते. १ जानेवारी १९३२ रोजी सुरू झालेल्या दैनिक सकाळ माध्यमसमूहाने कृषि विषयक माहितीत परिपूर्णता यावी म्हणून १९ एप्रिल २००५ ला ॲग्रोवन हे

कृषि विषयक दैनिक सुरू केले. तर लोकमत मिडिया प्रा. लि. च्या लोकमतने महाराष्ट्रासह गोवा व दिल्ली राज्यातही मराठी पत्रकरितेचा झेंडा रोवला आहे. नंबर एकच्या स्पर्धेत लोकमत व सकाळ मध्ये मोठी चुरस असल्याचे A.B.C. व I.R.S. च्या विविध आकडेवारीवरून स्पष्ट होते. सकाळ आणि लोकमत या वृत्तपत्रांमध्ये वाचकांसाठी नेहमीच नव नवीन प्रयोग केले जातात. या दोनही वृत्तपत्रांनी शेतीतले प्रश्न व शेतकऱ्यांच्या विविध समस्या स्थानिक तसेच राज्यस्तरावर वेळोवेळी मांडल्या आहेत. याची दखल सरकार पातळीवर नेहमीच घेतली गेली आहे. तसेच ही वृत्तपत्रे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचत असून नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून विशेषांकांसह अधिकाधिक मजकूर देणारी वृत्तपत्रे ठरली आहेत. कृषिविषयक वार्तासंबंधीचे धोरण त्यामधून लक्षात येऊ शकते.

## ३.१३ संशोधन मर्यादा

प्रस्तुत संशोधनात मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करणार असल्याने अभ्यासामध्ये काही मर्यादा साहजिकच येतात. या मर्यादांचे भान ठेवूनच संशोधनाची दिशा ठरविली जाते. रॅली रॉबर्ट म्हणतात, Defining the problem seems like the simplest part of the survey. It is not some executive well tell you what they think the problem is.[३८](रॅली, १९८७, पृ.क्र. ६७) संशोधनातील मुख्य विषयाचे सूत्र लक्षात घेणे व ते नेमके व्याख्येत मांडणे ही सर्वेक्षणातील साधी बाब होय. पण प्रश्न कोणता आहे ते कोणीही कार्यकारी अधिकारी आपणास सरळपणे सांगत नाही त्यासाठी प्रश्नावली व सर्वेक्षण या तंत्राचाच वापर करावा लागतो. नाहितर संशोधन अतिव्याप्त किंवा दिशाहीन होण्याचा धोका असतो. त्यामुळे संशोधनातील मर्यादाही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. संशोधनाच्या गृहितकृत्यांचा मागोवा घेताना प्रस्तुत प्रबंधात मर्यादा पुढीलप्रमाणे नोंदविण्यात आल्या आहेत.

१) निवडलेला अभ्यास दैनिक सकाळ, दैनिक लोकमत या दोन प्रमुख वृत्तपत्रांविषयी मर्यादित आहे. मराठी भाषेतील इतर भागांतील वृत्तपत्रांशी याची तुलना केलेली नाही.

२) प्रत्येक वृत्तपत्रांची येथे नोंद घेतलेली नाही, त्यापैकी काही निवडक वृत्तपत्रे प्रातिनिधिक स्वरूपात कृषि घटकांच्या अभ्यासासाठी निवडलेली आहेत.

३) पूर्ण वर्षभरातील अंकाचा सूक्ष्म अभ्यास करणे अतिव्याप्त होते व व्यवहार्यही नाही. त्यामुळे हा अभ्यास ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०१७ या काळापुरता मर्यादीत आहे.

४) निवडलेल्या उत्तरदात्यांनी दिलेली माहिती सत्य आहे, असे गृहीत धरून विश्लेषण केले आहे.

५) विश्लेषणांमध्ये कृषि पत्रकारितेच्या निर्देशांकांद्वारे विश्लेषण केले आहे.

६) मुलाखत घेताना काही शेतकऱ्यांकडून योग्य अपेक्षित माहिती मिळवण्यासाठी काही वेळा त्रास झाला. काही मुद्यांची माहिती अपूर्ण मिळाल्यामुळे माहिती संकलनात अडचणी निर्माण झाल्या. काही ठिकाणी शेतकऱ्यांच्या पत्नी किंवा महाविद्यालयात जाणाऱ्या मुलांनी माहिती सांगितली. तर मुलाखत घेताना काही शेतकरी, कृषि तज्ज्ञ व पत्रकार टाळाटाळ करीत असल्याचे अनुभव आले.

७) माहितीच्या नव्या युगात वृत्तपत्राप्रमाणे दृकश्राव्य साधनांचाही उपयोग होत आहे परंतु ग्रामीण भागात ही साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नसल्याने अद्यापही लोकांचा वृत्तपत्रावर अधिक भरवसा आहे. त्यासाठी येथे वृत्तपत्र माध्यमाचा विशेष अभ्यास केला आहे. प्रस्तुत अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष मर्यादीत स्वरूपात उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे काढलेले असल्यामुळे त्याची सत्यता स्थळ, काळ परिस्थितीनुसार बदलणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष इतर ठिकाणी लागू पडतीलच असे नाही.

८) सरकारी कार्यालयातील माहिती जमवताना काही वेळा माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करावा लागला. तसेच वृत्तपत्रांच्या जुन्या अंकाचे पुराभिलेख जतन करण्याची सवय नसल्याने पूर्वीची साम्रगी अध्ययनास संपूर्णपणे उपलब्ध होऊ शकत नाही. यावरुन स्पष्ट होते की, उपरोक्त मर्यादांसह हा विषय प्रथमच अभ्यासला गेला असल्याने या विषयाचे अध्ययनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. या सर्व मर्यादांचे भान ठेवून हे संशोधन अधिक काटेकोरपणे व बारकाईने करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ३.१४ अनुमान आणि विश्लेषण

प्रस्तुत अभ्यासात माहितीचे संकलन करताना तालिका, आलेख आणि स्थळाचे चौरस सेंटी मिटर मध्ये मापन करून त्या आधारे फरक निहाय संख्यात्मक व गुणात्मक विवेचन केले आहे. सॅम ब्लॅक यांनी अनुमान आणि विश्लेषणाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे, When all the results of the enquiry have been received, it is necessary to tabulate them and to draw up the conclusions in such a form that they will yield useful guidance to them upto have sponsored the and who paying for it.[३९] (ब्लॅक, १९७२, पृ.क्र. १२४) अन्वेषणातील सर्व माहिती संकलित केल्यानंतर तिचे तालिकाकरण करावे लागते त्यातुन असे निष्कर्ष काढावे लागतात की संबंधित संस्था व प्रायोजकात मार्गदर्शक ठरू शकतात. पण अशा सुचनांचे फलीत हे एकसंघ अन्वेषण प्रयत्नाच्या पराकाष्ठेवरच अवलंबून असते.

केवळ संख्यात्मक विश्लेषणावर भर न देता संख्यात्मक तक्त्याचे गुणात्मक विश्लेषण केले आहे. म्हणजे या अभ्यासात गुणात्मक आशय विश्लेषणावर भर दिला आहे. एकेका घटकाला कमी व अधिक प्रमाणात जागा का दिली आहे. याचा अभ्यास करून यथायोग्य अनुमाने काढली आहेत. कार्यकारण भाव तपासून शास्त्रीयपणे विश्लेषण केले आहे. अनुमानाच्या पद्धतीबाबत नाडगोंडे यांनी म्हटले आहे की, निष्कर्षातून विचारांत पुरावा व त्याच्या आधारे काही विचार सिध्द केले जातात. साहजिकच अनुमान योग्य आहे की नाही हे शेवटी तथ्यामधील सुसंगती, उचितता व खरेपणा यावर अवलंबून असते. तेव्हा या संशोधनात तथ्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष कसे काढले यासंबंधीचे पूर्ण विवेचन अहवालात केले गेले पाहिजे. तथ्यांचे शास्त्रीय वर्गीकरण करून त्यातील कार्यकारण भाव ठेवून या अभ्यासात शास्त्रीयपणे अनुमाने काढली आहेत. या संदर्भात प्रा. सॅम ब्लॅक म्हणतात When the results of the research are available it is then necessary to consider what action if any should be taken.[४०] (ब्लॅक, १९७२, पृ.क्र. १२९) संशोधनाचे निष्कर्ष उपलब्ध झाल्यानंतर पुढे चालून कोणता कृती कार्यक्रम हाती घ्यावयाचा ते ठरवावे लागते त्यावरून या संशोधनास असा एक व्यापक कृती कार्यक्रम सूचित करून मराठी वृत्तपत्रात शेतीच्या व कृषि पत्रकारितेच्या दृष्टीने काय असावे ते सूचित केले आहे. याचा अर्थ असा की या प्रबंधामधील अनुमान केवळ

तात्विक नसून व्यावहारिक असे आहे. यातील निष्कर्ष हे प्रत्यक्ष सरकार, कृषि विभाग आणि एखाद्या वृत्तसंस्थेस कृतीमध्ये उतरविता येतील असेच आहेत.

## ३.१५ वर्गीकरण व संकल्पनीकरण

प्रस्तुत प्रबंधासाठी योजलेल्या संशोधन पद्धतीपैकी आशय विश्लेषण आणि सामाजिक सर्वेक्षण तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. प्राथमिक सामग्री म्हणून प्रत्यक्ष निरिक्षण, मुलाखती, प्रश्नावली, अनुसूचीचा वापर तर दुय्यम सामग्रीसाठी वैयक्तिक कागदपत्रे, सार्वजनिक दप्तरे, अहवाल व अन्य प्रकाशित साहित्य, शासकीय प्रकाशने, खासगी संस्थांची प्रकाशने, वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे. डॉ.पु.ल. भांडारकर म्हणतात, संशोधनातून नवीन संकल्पना किंवा निष्कर्ष ज्ञान कक्षा विस्तृत करतेच. पण प्रस्थापित ज्ञानावरील चुकांचा निर्देश करून सुधारणा घडवून आणण्याचे कामही करते. [४१](भांडारकर, १९८७, पृ.क्र. २९७) मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना अन्वेषणात्मक आराखडा वापरलेला असून कृषि पत्रकारितेत मराठी वृत्तपत्रांची भूमिका काय ? या संकल्पना जाणून दै. सकाळ, दै. लोकमत या वृत्तपत्रातील अंकातील मजकूरातील कृषिविषयक चौदा घटक पाडून कोणत्या विषयाला जास्त जागा देण्यात आली याचे महत्त्व अभ्यासिले आहे.

संशोधनामध्ये विषयाची आवश्यक ती माहिती जमा केल्यानंतर त्या माहितीचे वर्गीकरण करणे आवश्यक असते. वर्गीकरण करतांना आपल्या डोळ्यासमोर काही एक उद्देश असतो. हा उद्देश साध्य करण्यासाठी वर्गीकरणाच्या आधारानुसार संशोधन कार्य केले जाते. प्रस्तुत प्रबंधामध्ये कृषि पत्रकारिता अशी संज्ञा वापरली आहे. कृषिविषयक वृत्तांचे वर्गीकरण करताना त्या वृत्ताचा विषय हा मुख्य मानून प्रस्तुत अभ्यास केला आहे. शेतीची बातमी असली तरी शेतीच्या कोणत्या अंगाविषयी ती बातमी आहे म्हणजे तिचा उपविषय काय आहे हे लक्षात घेऊन हे वर्गीकरण केलेले आहे. त्यामागे या संज्ञेत समाविष्ट केलेले पुढील विषय अंतर्भूत आहेत. उपविषय व संकल्पनीकरण खालील प्रमाणे आहे. यावरून याची कल्पना येईल.

०१) **पीक** – मानवी अन्नाची व वस्त्रांची गरज भागवण्याच्या हेतूने शेतात शेतकरी वनस्पतींची जोपासना करून घेणारे उत्पादन म्हणजे पीक. या संबंधीच्या बातम्या, माहिती, छायाचित्रे यांचा समावेश पीक वार्ता या उपविषयात केला आहे.

०२) **रोगराई, खत व बियाणे** – हवामान व ऋतुबदलांमुळे बुरशी, जीवाणू व सूक्ष्म जिवांचा हल्ला होवून पीक कमजोर बनते त्यास रोगराई म्हणतात. तर वनस्पतींची चांगली वाढ होऊन अधिक पीक उत्पादनासाठी विविध खनिजे अथवा अन्य पोषक द्रव्यांची गरज असते. ही द्रव्ये सर्व प्रकारच्या जमिनीत सर्व प्रकारच्या पिकांसाठी पुरेशी ठरणारी नसतात. अशा वेळी बाह्य नैसर्गिक अथवा कृत्रीम रसायनांद्वारे, फवारणीद्वारे अथवा जमिनीतून दिली जाणारी वस्तू म्हणजे खते. पीकांचे उत्पादन घेण्यासाठी जमिनीमध्ये योग्य मशागत करून बियांचे रोपण करण्यात येते. रोगराई, खत व बियाण या संबंधीच्या बातम्या, माहिती, छायाचित्रे यांचा समावेश या उपविषयात केला आहे.

०३) **कृषिपूरक व्यवसाय/प्रक्रिया उद्योग –** (A - साखर, B - दूध, C - कुक्कुट/शेळी/मेंढीपालन व इतर) – थेट शेतीत तयार होणाऱ्या पिकांचे, त्यातून निघणाऱ्या उत्पादनाचे स्वतःच्या उदरनिर्वाहाचे साधन मानून केली जाणारी शेती म्हणजे कृषि व्यवसाय. तर शेतीत तयार होणाऱ्या मालाची प्रक्रिया करून अधिक उत्पन्न मिळवणे अथवा शेतीवर अवलंबून असलेल्या विविध पक्षी प्राणी यांचे पालन करून यातून अधिक कमाई करणे म्हणजे कृषीपुरक व्यवसाय. साखर, दूध व कुक्कुट/शेळी/मेंढीपालन व इतर या संबंधीच्या बातम्या, माहिती, छायाचित्रे यांचा समावेश कृषिपूरक व्यवसाय/प्रक्रिया उद्योग या उपविषयात केला आहे.

०४) **पणन व बाजारभाव –** उत्पादीत मालाची विक्री करण्याचे व्यवस्थापन म्हणजे पणन तर बाजारात विक्रीसाठी नेलेल्या कृषीमालाची त्याच्या गुणवत्ता व उपलब्धतेनुसार बाजारात मिळणारे मूल्य म्हणजे बाजारभाव. पणन व बाजारभाव या संबंधीच्या बातम्या, माहिती, छायाचित्रे यांचा समावेश या उपविषयात केला आहे.

०५) **कृषि विद्यापीठ –** शेती व्यवसायाचा अभ्यास, संशोधन करून शेती करण्याच्या तसेच उत्पादन वाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अंतर्भाव करून उत्पादन वाढीसाठी

विद्यार्जनाची केलेली व्यवस्था म्हणजे विद्यापीठ. कृषि विद्यापीठातील देण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या बातम्या, माहिती, छायाचित्रे यांचा समावेश या उपविषयात केला आहे.

०६) **शेतकरी आत्महत्या –** अवकाळी पाऊस, सततची नापिकी, बोगस बियाणे, सावकार तथा आर्थिक संस्थांचा जाच, शेतीवर होणारा वाढता खर्च, शेतीमालाला न मिळणारा बाजारभाव तथा डोक्यावर निर्माण होणारा कर्जाचा बोजा आदि समस्यांना वैतागून शेतकऱ्यांनी संपविलेल्या स्वतःच्या जीवन यात्रेला शेतकरी आत्महत्या म्हणता येईल. शेतकरी आत्महत्या  या उपविषयात यासंबंधीच्या सर्व प्रकारच्या बातम्या, माहिती, लेख, छायाचित्रे यांचा समावेश या उपविषयात केला आहे.

०७) **लेख, अग्रलेख –** एखाद्या विषयाचे ज्ञान, लोकप्रबोधन करणारी लिखित माहिती म्हणजे लेख. तर एखाद्या विषयावर साधक बाधक विचार करून तो विषय आपल्या मतानुसार वाचकांपुढे संक्षीप्तपणे मांडण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे अग्रलेख. लेख, अग्रलेख या उपविषयात शेती, शेतकरी, कृषिसंशोधन, विस्तार आदि सर्व प्रकारच्या विषय उपविषयांचा समावेश यात केला आहे.

०८) **छायाचित्र –** जे हजार शब्दांनी व्यक्त करूनही त्यावर विश्वास बसत नाही मात्र चित्राद्वारे माहिती नाविन्य लगेच व्यक्त होऊन स्वतःच्या मनात ठसते ते म्हणजे छायाचित्र. या उपविषयात शेती, शेतकरी, कृषिसंशोधन, विस्तार आदि सर्व प्रकारच्या विषय उपविषयांचा समावेश यात केला आहे.

०९) **जाहिरात –** आपली वस्तू त्याच्या गुणवैशिष्ट्यांसह समोरच्या व्यक्तीच्या मनावर ठसवण्यासाठी कौशल्य वापरून केलेला प्रयत्न म्हणजे जाहिरात. या उपविषयात शेती, शेतकरी, कृषिसंशोधन, विस्तार आदि सर्व प्रकारच्या विषय उपविषयांचा समावेश यात केला आहे.

१०) **कृषि यशकथा –** चाकोरीबाहेर जावून अडचणींवर मात करून जेव्हा यश मिळते तेव्हा ते कसे मिळाले याचे केलेले कथन म्हणजे यशकथा. या उपविषयात शेती, शेतकरी, कृषिसंशोधन, विस्तार आदि सर्व प्रकारच्या विषय उपविषयांच्या यशकथांचा समावेश यात केला आहे.

११) **आंदोलन, तक्रार –** जेव्हा केवळ सांगून उपयोग होत नाही तेव्हा आपले प्रश्न म्हणण्याकडे लक्ष वेधून घेवून समोरच्याला त्याबद्‌दल विचार करण्यास प्रवृत्त करण्यास भाग पाडण्यासाठी योजलेली कृती म्हणजे आंदोलन, तक्रार. या उपविषयात शेतकरी व संबंधीत घटकांनी केलेल्या सर्व प्रकारच्या आंदोलन, तक्रार यांचा समावेश केला आहे.

१२) **दुष्काळ –** सजीवसृष्टीच्या चक्रासाठी आवश्यक असलेला पाऊस जेव्हा कमी अथवा अधिक पडतो तेव्हा पीके उद्‌ध्वस्त होण्याची, पाण्याचे दुर्भिक्ष होण्याची निर्माण झालेली स्थिती म्हणजे दुष्काळ. या उपविषयात ओला व सुका या दोन्ही प्रकारच्या दुष्काळाच्या बातम्या, माहिती यांचा समावेश केला आहे.

१३) **हवामान, पाऊस –** ऋतूमानानुसार प्रदेशनिहाय तापमान, आर्द्रता, वादळ, पाऊस हवेचा दाब यांची स्थिती म्हणजे हवामान. या उपविषयात हवामान व पाऊस विषयक बातम्या, माहिती यांचा समावेश केला आहे.

१४) **जलसिंचन, जलसंवर्धन व इतर –** पिकांच्या वाढीसाठी गरज असलेले पाणी पिकांना देणे म्हणजे जलसिंचन. तर वाया जाणारे पाणी जेव्हा गरज असेल तेव्हा वापरण्यासाठी साठवून ठेवण्याची केलेली व्यवस्था म्हणजे जलसंवर्धन. या उपविषयात जलसिंचन व जलसंवर्धन विषयक बातम्या, माहिती यांचा समावेश केला आहे.

प्रस्तुत अभ्यासात कृषि बातम्यांचे प्रमाण ठरविताना एकूण अंकातील छापलेल्या मजकुराशी ते प्रमाण ठरविलेले आहे. हे मोजमाप करताना दैनिकाच्या पानातील मजकूराचा सरासरी आकार स्केअर सेंटीमीटर मध्ये घेण्यात आला आहे. या वृत्तपत्रांच्या एकूण जागेतील कृषि विषयक बातम्यांसाठी वापरलेल्या जागेचे प्रमाण काढलेले आहे. दैनिकातील वापरलेल्या एकूण जागेचे प्रमाण काढलेले आहे. दैनिकांतील कृषि वार्तांचे स्थान निश्चित करायचे म्हणजे वर्तमानपत्रातील छापील मजकूराशी कृषि वार्तांचे प्रमाण किती पडते ते पाहणे होय. या अभ्यासामुळे कोणत्या प्रकारच्या कृषिविषयक बातम्या किती प्रमाणात आल्या हे स्पष्ट झाले आहे. इतर बातम्यांसाठी वापरलेली जागा व कृषि वार्तांसाठी वापरलेली जागा यांच्या तुलनेमुळे कृषि वार्तांचे स्थान स्पष्ट झाले आहे. असाच अभ्यास वृत्तपत्रातील एकूण छापलेल्या जागेपैकी किती जागा कृषि वार्ता व्यापतात एवढाच मर्यादित उद्देश ठेवून केलेला आहे.

या अभ्यासात एकूण मुद्रीत जागा विचारात घेतलेली आहे. त्यात जाहिरात, छायाचित्रे व मजकूर असा भेद केलेला नाही. वृत्तपत्रांच्या एकूण पानात छापलेली जागा व कृषि वार्ता यांच्या प्रमाणाचा हा तुलनात्मक अभ्यास होय. हा अभ्यास करताना कृषि वार्तांची जागा स्केअर सेंटीमीटरमध्ये मोजली आणि त्यांचे प्रमाण ठरविले. कृषि वार्तांचे विषयानुसार चौदा भागात वर्गीकरण करून त्यांचेही प्रमाण काढले अशा प्रकारची पद्धत अभ्यासासाठी स्वीकारली. कोष्टके, तक्ते आणि आलेख त्यावर आधारलेली आहेत. कृषि विषयक वार्तांच्या संदर्भात येणारी छायाचित्रे ही सुध्दा कृषि वार्तांचाच भाग होय. त्यामुळे या अभ्यासात त्यांचा विचार अंतर्भूत आहे. परंतु या छायाचित्रांचे स्वरूप त्यांचे महत्त्व, संपादन, जागेची निश्चिती इत्यादी बाबींचा विचार केलेला नाही. कारण दैनिकात प्रसिध्द होणाऱ्या छायाचित्रांचे संपादन हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय होईल. ही छायाचित्रे कृषि वार्तांचा विषय एवढ्या पुरतीच विचारात घेतली आहेत.

प्रस्तुत अभ्यासात सांख्यिकी पद्धतीने प्रसिध्द मजकुराचे गुणोत्तर प्रमाण, सरासरी टक्केवारी यांचा वापर करून शेती विषयक वार्तांनी व्यापलेली जागा किती चौरस सेंटीमीटर, टक्के आहे यावरून कृषि पत्रकारितेच्या विश्लेषणाचे निष्कर्ष काढले आहेत. सरासरीची आकडेवारी प्रातिनिधिक असल्याने एकूण कृषि पत्रकारितेला स्थान देण्याची प्रवृत्ती कितपत आहे हे लक्षात येते. प्रातिनिधिक अंक मिळाल्यामुळे सर्व साधारण कृषिवार्तांच्या प्रसिध्दीविषयी आपण निश्चित विधान करू शकतो. तुलना केल्यामुळे कृषि आणि कृषितर (बिगर शेती) मजकुराचे प्रमाण लक्षात घेऊन कृषि विषयक मजकूर किती प्रमाणात प्रसिध्द केला याचे निश्चित प्रमाण कळते आणि नियोजनात याचा उपयोग होतो. कृषि विषयक मजकूर अधिक द्यावयाचा किंवा कमी द्यावयाचा हे ठरवता येते. कृषि पत्रकारितेचे प्रमाण वाढत जाण्याचे किंवा कमी होण्याची कारणे दोन प्रकारची असू शकतात एक म्हणजे लौकिक प्रवृत्ती (सेक्युलर) आणि दूसरे म्हणजे हा चढउतार हंगामी असतो. त्यास सिझनल व्हॅरीएशन असे म्हणता येईल तसेच चक्रीय बदल (सायक्लीक) व अनियमित बदल (इरेग्युलर व्हॅरीएशन) असे चार प्रकार सांगता येतील. या प्रकारचे विश्लेषण हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळे कृषि पत्रकारितेसंबंधी पुष्कळ प्रकाश पडू शकेल.

तसेच पूरक म्हणून शेती विषयक आलेल्या बातम्यांचे शेतकरी वाचक व त्यांची वाचनाची प्रवृत्ती कशी आहे ? हे प्रश्नावली तयार करून त्या आधारे शोधले आहे. त्याचबरोबर ८ कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकार यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. शेतकरी वाचकांचा व या क्षेत्रातील तज्ज्ञ, पत्रकार यांचा हा अभ्यास शेती विषयक बातम्यांच्या अभ्यासाला जोड देणारा पूरक अभ्यास म्हणून करण्यात आला आहे. या समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीने केलेल्या अभ्यासामुळे कृषि क्षेत्राचे वृत्तपत्रांत पडणारे प्रतिबींब स्पष्ट होऊ शकले आहे. उदाहरणादाखल घेतलेल्या दैनिक सकाळ व दैनिक लोकमत मध्ये कृषि पत्रकारितेला किती स्थान दिले जाते ते मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेच्या तुलनात्मक अभ्यासावरून स्पष्ट होते.

## ३.१६ प्रकरणांची योजना

प्रस्तूत संशोधन विषयाची विभागणी एकूण पाच प्रकरणात करण्यात आली आहे.

### प्रकरण १. प्रस्तावना

या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना केली आहे. ‘अ’, ‘ब’ आणि ‘क’ अशा तीन भागात विभागणी केलेल्या या प्रकरणात मराठी वृत्तपत्रे व कृषि पत्रकारितेचा इतिहास व प्रगती द्वारे मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कृषि वृत्तपत्रांचा इतिहास थोडक्यात मांडला आहे. स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर पत्रकारिता, आधुनिक काळातील पत्रकारिता, पत्रकारितेचे उद्योगात रूपांतर, आव्हाने, मुख्य प्रवाह व वर्तमान स्थिती, एकमेव मराठी कृषि दैनिक ॲग्रोवन बद्दल माहिती देत आढावा घेतला आहे. प्रगत भारत देशातील सर्व साधारण पत्रकारिता आणि कृषि पत्रकारिता याचा प्रामुख्याने लेखाजोखा थोडक्यात मांडला आहे. मराठी कृषि पत्रकारितेचे भवितव्य, मराठी वृत्तपत्रांची मराठी कृषि पत्रकारितेबद्दलची जबाबदारी या मुद्यांचा अभ्यास थोडक्यात मांडला आहे. तर ‘ब’ या भागात भारतीय शेती व्यवसायाचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व स्पष्ट केले आहे. ‘क’ भागात अहमदनगर जिल्ह्यावर थोडक्यात दृष्टीक्षेप टाकण्यात आला आहे.

## प्रकरण २. संशोधन पूर्वाभ्यास व संदर्भ साहित्याचा आढावा

प्रस्तावना, संशोधन निबंध, संशोधन प्रबंध, पुस्तके, लघु प्रबंध, विविध अहवाल संबंधित संदर्भ साहित्याच्या आढाव्याची गरज, संबंधित साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व, संबंधित साहित्याचा आढावा व फायदे, गत संशोधनाचा आढावा या सर्व घटकांचा समावेश प्रकरण दोन मध्ये करण्यात आला आहे.

## प्रकरण ३. संशोधन कार्यपद्धती

या प्रकरणातून संशोधन अभिकल्पना स्पष्ट केली आहे. तसेच संवाद संशोधन आणि त्यातील कृषि पत्रकारितेचे स्थान स्पष्ट करून संशोधन आराखडा कशा प्रकारे वापरला याबाबत विवेचन करण्यात आले आहे. प्रस्तावना, संशोधन समस्या आणि विषयाचे महत्त्व, सामाजिक संशोधन, संशोधन पद्धती, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, प्रश्नावली, मुलाखत, अन्वेषणात्मक संशोधन आराखडा, संशोधन अध्ययनाची व्याप्ती, संशोधन मर्यादा, प्रकरणांची योजना, समारोप या सर्व मुद्यांचे विश्लेषण क्रमवार प्रकरण तीन मध्ये देण्यात आले आहे.

## प्रकरण ४. तथ्य विश्लेषण व चिकित्सा

### अ) कृषि पत्रकारिता : आशय विश्लेषण

या प्रकरणात वृत्तपत्रातील कृषिविषयक बातम्यांचे १४ प्रकार केले आहेत. या द्वारे तुलनात्मक अभ्यास केला आहे. वृत्तपत्रे कृषि विषयाच्या बातम्या व मजकूराला कशा प्रकारे किती जागा देतात याचा दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या आघाडीच्या मराठी वृत्तपत्रांच्या प्रकाशित कृषि सामग्रीचे अध्ययन करून त्या आधारे प्रबंधात प्रकाश टाकला आहे. विविध प्रकारच्या बातम्या, जाहिराती, अग्रलेख, लेखांना किती जागा उपलब्ध केली आहे त्याद्वारे आशय विश्लेषण, संख्यात्मक व गुणात्मक वर्गीकरण, घटकनिहाय विश्लेषण, निष्कर्ष काढले आहेत. यामुळे कृषि पत्रकारितेचे वेगळेपण स्पष्ट करणे शक्य झाले आहे.

## ब) शेतकरी वर्गाचे सर्वेक्षण

प्रकरणाच्या या भागात शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांची यावर भूमिका, शेतकऱ्यांना योग्य माहिती वृत्तपत्रातून पुरवली जाते का ? सिंचन व पाणी पुरवठ्याबाबत काय मत आहे ? यात प्रश्नवलीच्या आधारे शेतकऱ्यांकडून माहिती संकलित केली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील तीनशे शेतकऱ्यांच्या मुलाखतीमधील संकलीत माहितीचे विश्लेषण व सारणीकरण करण्यात आले आहे. ही सामाजिक पाहणी शास्त्रीय पद्धतीवर आधारलेली आहे.

## प्रकरण ५. निष्कर्ष व उपाययोजना

या प्रकरणात मागील प्रत्येक प्रकरणाचा आढाव घेऊन पुढील काळात करावयाच्या आदर्श कृषि पत्रकारितेसाठी ठळक निष्कर्ष मांडण्यात आले आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात कृषि पत्रकारितेचे स्वरूप कसे असावे याचा अभ्यास मांडला आहे. संशोधन विषयाचा सारांश, माहितीचे शास्त्रीय पद्धतीने संकलन व विश्लेषण करून प्रमुख निष्कर्ष या प्रकरणात नोंदवले आहेत. संशोधन विषयातील गृहितकांची पडताळणी केली आहे. यावरून या अभ्यासाची भावी दिशा स्पष्ट होण्यास मदत होते. अभ्यासाची दिशा ही समाजशास्त्रीय प्रगतीवर आधारलेली आहे. सामाजिक सर्वेक्षण आणि आशय विश्लेषण ही आयुधे समाजशास्त्रीय अभ्यासात वापरली जातात. त्यामुळे या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे. प्रकरणाची योजना करताना त्यांचे परस्पर पूरक व समांतर महत्त्व लक्षात घेतले आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेच्या तुलनात्मक अभ्यासातुन समोर आलेल्या शिफारसी याप्रकरणात सुचवण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर कृषि पत्रकारितेसाठीचे नवे समीकरण व नवे आदर्श प्रतिमान मांडले आहे.

## संदर्भसूची


०१) नाडगोंडे, डॉ.गुरूनाथ (१९८६) सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र. १३

०२) Howard H. Martin and C. William colburn (1972) Communication and Consensus: An introducation to Theorotical Discourse, Har Court Brace Jovanovich, Page – 18

०३) भांडारकर, पु.ल. (१९८७) सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, महात्मा गांधी मार्ग नागपूर, पृ.क्र. ३–४

०४) Schramm, Wilbuir (1964) Mass Communication and National Development, Stanford University Press, Stanford, P – 138 – 141

०५) Unnithan T.K.N., Indra Deva and Yogendra Singh (1966) Towards a sociology of culture in India, Prentice Hall, New Delhi, P – 230 – 231

०६) दत्त आणि सुंदरम (२०१२) इंडियन इकॉनॉमी. एस.चांद प्रकाशन, नवी दिल्ली, पृ.क्र. ५०६

०७) भालेराव व देसाई (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ११

०८) लेविस ऑर्थर (१९५४) इकॉनॉमिक डेव्हेलपमेंट वुइथ अनलिमिटेड सप्लाई ऑफ लेबर, पृ.क्र. ११

०९) इकॉनॉमिक सर्वे (२०१२–१३) भारत सरकार प्रकाशन, नवी दिल्ली, पृ.क्र. १८०

१०) Expenditure Budget (2017-18) Union Budget 2006-07 to 2017-18

११) http://www.ifpri.org/publication/2017-global-hunger-index-severtiy

१२) http://www.sanskrit.org/specials/chanakya-neeti-darpan.html 2018

१३) Karl Pearson (1911) The Grammar of Science, Third Edition, A and C. Blak, London, P.15

१४) Greenwood Arnest (1945) Experimental Sociology, New York, P – 130

१५) Ghosh B.N. (1985) Scientific Method and Social Research, Sterling Publishers, P -94

१६) भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. ६

१७) Conften Felix (1994) The Methodology of Social Sciences, Oxford University Press, Oxford, P – 244

१८) डॉ.भांडारकर, पु.ल., उपरोक्त पृ.क्र. ३०

१९) Thomson, T. Aurther (1952) Introduction to Science, Jeffery Comberlage, Oxford University Press, Oxford, P – 125

२०) डॉ.भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. ४०

२१) घोष, बी.एन., उपरोक्त, पृ.क्र. ९१

२२) Berger, A.A. (2013) Mass Analysis Techniques, SAGE Publications, Fourth Edition, P – 48

२३) पाटील, वा.भा. (२००६) संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती, पृ.क्र. १३०

२४) डॉ. भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. ९५

२५) Berlon, B. (1952) Content Analysis in Communication Research, Preen Press New York, P – 85

२६) कित्ता, पृ.क्र. ९७–१००

२७) भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. ९३

२८) डॉ.भांडारकर, पु.ल., उपरोक्त पृ.क्र. १४०

२९) कऱ्हाडे, डॉ. बी.एम.(२०११) शास्त्रीय संशोधन पद्धती. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, तृतिय आवृत्ती, पृ.क्र. ३००

३०) Wilson, Gee (1968) Elements of Social Research. Pre Press, New York, P – 48

३१) नाडगोंडे, डॉ. गुरूनाथ (१९८६) सामाजिक संशोधन पद्धती. फडके प्रकाशन, प्रथम आवृत्ती, पृ.क्र. ११४

३२) पाटील, वा.भा., उपरोक्त, पृ.क्र. २२९

३३) भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. ३००

३४) घोष, बी.एन., उपरोक्त, पृ.क्र. ९८

३५) भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. २९८

३६) पाटील, वा.भा., उपरोक्त, पृ.क्र. १०३

३७) घाटोळे, रा.ना. (२००५) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती. मंगेश प्रकाशन, नागपूर पृ.क्र. ११

३८) रॅली, रॉबर्ट (१९८७) पब्लिक रिलेशन इन ॲक्शन. पिंटवेल हॉल, न्यू जर्सी, उपरोक्त, पृ.क्र. ६७

३९) सॅम, ब्लॅक (१९७२) प्रॅक्टीकल पब्लिक रिलेशन इन ॲक्शन. द इंग्लिश लँग्वेज बुक सोसायटी, लंडन, पृ.क्र. १२४

४०) सॅम, ब्लॅक उपरोक्त, पृ.क्र. १२९

४१) भांडारकर, पु.ल., उपरोक्त, पृ.क्र. २९७

# प्रकरण चौथे

# तथ्य विश्लेषण व चिकित्सा

## अ) कृषि पत्रकारिता : आशय विश्लेषण

### ४.१ प्रस्तावना

पन्नास वर्षापूर्वी शेतीच्या ज्या बातम्या प्रकाशित होत असत त्यापेक्षा आता किती तरी पटीने अनेक प्रकारे कृषि संदर्भातील बातम्या प्रकाशित होताना दिसतात. त्यामुळे कृषि पत्रकारितेचे स्वरुप झपाट्याने बदलत चालले आहे. पूर्वीच्या काळात पाऊस, पेरण्या, दुष्काळ यावर अधिक प्रमाणात बातम्या असायच्या. परंतु आता प्रगत तंत्रज्ञानाच्या विस्ताराबरोबर कृषि वार्तांचे स्वरुपही झपाट्याने बदलत चालले आहे. कृषि पत्रकारितेमध्ये मृदा संधारण, कृषि अर्थशास्त्र तसेच कीटकनाशकशास्त्र, पशुपालन, कुक्कुटपालन, शेळी–मेंढी पालन, मत्स्यपालन, खते बी–बियाणे, जलसंधारण, कृषि प्रक्रिया उद्योग, कृषि रचनाशास्त्र आदि अनेक प्रकारच्या ज्ञानशाखा आहेत. विकासाच्या दृष्टीने अशी सर्व प्रकारची अद्ययावत माहिती शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक आहे. प्रा. रमेश जैन यांच्या मते शेतीच्या वाचकाला नवे ज्ञान प्राप्त करुन देण्याच्या तंत्रज्ञानाला कृषि पत्रकारिता असे म्हणतात. या कृषि पत्रकारितेचा मुख्य उद्देश शेतीचे संवर्धन करणे होय.[१] (जैन, २००७, पृ.क्र. २०)

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन विषयासाठी प्रस्तुत संशोधकाने महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, राहुरी येथील विद्यापीठांना भेटी दिल्या आहेत. तसेच दैनिक वर्तमानपत्र 'लोकमत' व 'सकाळ'च्या कार्यालयांना भेटी दिल्या आहेत. शेतकरी, कृषितज्ज्ञ, कृषि पत्रकार यांचेकडून प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षणाद्वारे माहिती घेऊन संकलित केली असून त्याचे विश्लेषण व अर्थनिर्वचनही केले आहे. अनेकांनी या कामी पुरेसा वेळ देऊन चर्चा केली व आपली मते मांडली. त्यामुळे सदर संशोधन कामास आणखीन बळकटी आली. संकलित झालेली माहिती पुढे विभागवार दिली आहे.

## ४.२ माहिती संकलन, विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

सामाजिक संशोधनामध्ये माहिती संकलनानंतर तथ्य विश्लेषण ही महत्तवाची प्रक्रिया आहे. Analysis या शब्दाचा मराठी अर्थ विश्लेषण हा आहे. या प्रक्रियेमध्ये संकलित तथ्यांचे वर्गीकरण माहितीच्या गुणवैशिष्ट्यानुसार केले जाते. संशोधनामध्ये तथ्यांचे परिक्षण करून त्याची क्रमबध्द, शास्त्रोक्त मांडणी केली जाते. त्यामुळे विश्लेषणानंतर निष्कर्ष काढणे सोपे जाते.

संशोधनामध्ये प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या माहिती संकलन साधनांद्वारे व तंत्राद्वारे माहिती संकलित केल्यानंतर त्या माहितीचे प्रक्रियन (Processing of Information) केले जाते. संशोधनासाठी संकलित केलेली माहिती अपरिपक्व स्वरुपात किंवा कच्च्या स्वरुपात असते. तिला विश्लेषणक्षम बनविण्याची प्रक्रिया म्हणजेच तथ्यांचे प्रक्रियन होय. या ठिकाणी माहितीचे योग्य विश्लेषण आणि निर्वचन करावे लागते. या विश्लेषण व निर्वचन प्रक्रियेच्या आधारावर नियमांचे प्रतिपादन/स्पष्टिकरण करावे लागते. संशोधनाच्या एकूण प्रक्रियेमध्ये तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन या दोन कार्याला अतिशय महत्तवाचे स्थान आहे. जोपर्यंत तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन संशोधनात केले जात नाही, तोपर्यंत संशोधनासाठी संकलित केलेली तथ्ये ही कच्च्या स्वरुपात आणि अर्थहीन असतात. परंतु विश्लेषण व अर्थनिर्वचनानंतर त्या माहितीला एक वेगळा अर्थ प्राप्त होतो.

माहिती संकलन करण्याच्या विविध साधनाद्वारे विविध प्रकारची माहिती संकलित होते. फक्त माहिती/तथ्य संकलनाने संशोधन विषयाचे स्वरुप स्पष्ट होत नाही तर त्यासाठी संकलित माहितीवर लक्ष केंद्रीत करुन माहितीची फेररचना करून, त्या माहितीमध्ये एक प्रकारची सुव्यवस्था निर्माण करावी लागते. त्यातील परस्पर संबंध, संघटन व व्यवस्थिकरण केल्याशिवाय माहितीचा अर्थबोध होत नाही. माहितीच्या ढिगाऱ्यातून काहीही निष्पन्न होत नाही. म्हणून केवळ तथ्यांची/माहितीची उपलब्धता म्हणजे शास्त्रीय संशोधनाचा शेवट नसतो. म्हणून संकलित माहितीचे शिस्तबध्द व्यवस्थापन केले पाहिजे. या प्रक्रियेलाच तथ्यांचे विश्लेषण असे म्हणतात. संशोधनात आशय विश्लेषण व निर्वचन या प्रक्रिया आवश्यक आणि अटळ आहेत. विविध तंत्रांचा वापर करून मिळविलेल्या माहितीला, शास्त्रीय रुप देण्यासाठी विश्लेषण हाती घ्यावे लागते. पण तथ्यांचे विश्लेषण करताना ते काल्पनिक, व्यक्ती सापेक्ष किंवा मर्यादित

स्वरुपाचे असू नये. तर ते व्यक्ती निरपेक्ष, तार्किक व काही मुलभूत तत्वावर, गुणावर अवलंबून असावयास पाहिजे.

वुल्फ यांच्या मते, निसर्गातील घटनांमध्ये जरी गुंतागुंत असली व सकृतदर्शनी त्यांची स्थिती गोंधळून टाकणारी असली तरी, त्यामध्ये व्यवस्थितपणा अगर अनुक्रम आणणे हे केवळ विश्लेषणाच्या व संयोगाच्या प्रक्रियेने शक्य होते. सर्व वैज्ञानिक पध्दतीचा हाच पाया आहे. The discovery of order in the phenomena of nature, not withstanding their complexity and apparent confusion is rendered possible by the processes of analysis and synthesis, which are the foundation stone of all scientific methods.[२](अरविंद कुमार, २००२, पृ.क्र. १६९) थोडक्यात एखाद्या संमिश्र, गुंतागुंतीच्या घटनेचे स्पष्टीकरण करताना अत्यंत तार्किक पध्दतीने त्यामध्ये समाविष्ट असलेले निरनिराळे घटक वेगळे करुन सांगणे म्हणजे तथ्यांचे विश्लेषण करणे होय.

## ४.३ आशय विश्लेषणाचे उद्देश

आशय विश्लेषण ही सामाजिक शास्त्रातील एक सर्वमान्य पद्धती आहे. या पद्धतीचे महत्त्व सांगताना बॅरलमन म्हणतात, संज्ञापणातील व्यक्त व प्रकट आशयाच्या वस्तुनिष्ठ व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे तंत्र आहे. संख्यात्मक तथ्यांचे गुणात्मक विश्लेषण करण्याची ही पध्दती उपयुक्त ठरते.[३](भांडारकर, १९८७, पृ.क्र. २३३) वृत्तपत्रे समाजातील सर्वस्तरातील वाचकांच्या हिताची जोपासना करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यासाठी विविध प्रकारची माहिती व मजकूर प्रकाशित केला जातो. आशय विश्लेषण केल्याने यापैकी कोणती माहिती महत्त्वाची आहे ते समजू शकते. तसेच कोणत्या घटकाला कोणते वृत्तपत्र किती जागा देते हे समजते. आशय विश्लेषणाचे एकूण तीन उद्देश मानले जातात.

१. लोकांच्या अभिवृत्ती, हितसंबंध व मुल्ये प्रतिबिंबित करण्यासाठी
२. संज्ञापनामुळे लक्ष्य केंद्र कसे प्रभावित होते ते दाखवण्यासाठी
३. संज्ञापनाप्रती होणाऱ्या वर्तन प्रतिक्रियांच्या किंवा अभिवृत्ती प्रतिक्रियांच्या वर्तनासाठी [४](कित्ता, पृ.क्र. २३७)

या प्रबंधात कृषि पत्रकारितेतील विविध घटकांचा अभ्यास करताना विश्लेषण तंत्राचा वापर करुन जिल्हा वृत्तपत्रातील विकास सामग्रीचे अध्ययन करावयाचे आहे. एखाद्या माध्यमाचे उद्दिष्टानुरुप अध्ययन व संशोधन करताना नवनवीन तंत्रांचा वापर करावा लागतो. डॉ. पी. व्ही. यंग म्हणतात, Content analysis is a research technique for the systematic objective and quantative description of content of research data procured through interviews, questions, schedules and other linguistic the expressions, written or oral.[५](नाडगोंडे, १९९९, पृ.क्र. २२७)

मुलाखत, प्रश्नावली, अनुसूची व इतर लिखित किंवा मौखिक माध्यमातून संकलित केलेल्या तथ्यांच्या आशयाचे व्यवस्थित, वस्तूनिष्ठ व परिणामात्मक वर्णन करण्याचे संशोधन तंत्र म्हणजे आशय विश्लेषण होय. याच दृष्टीने कृषि पत्रकारितेच्या विकासात वृत्तपत्रे कोणती भूमिका पार पाडतात ते तपासून घ्यावयाचे आहे. आशय विश्लेषणाचे संख्यात्मक व गुणात्मक असे दोन प्रकारे वर्गीकरण केले जाते. येथे कृषि वार्तांचे तथ्य संकलन केवळ संख्यात्मक दृष्टीने नव्हे तर गुणात्मक दृष्टीने केले आहे. गुणात्मक वर्गीकरणाबाबत डॉ. नाडगोंडे म्हणतात, गुणात्मक वर्गीकरणात मोजता न येणाऱ्या गुणधर्मानुसार तथ्याचे वर्गीकरण करता येते. विवाहित, अविवाहित, साक्षर, निरक्षर, शहरी, ग्रामीण इ.[६](कित्ता, १९९९, पृ.क्र. २२९) या प्रबंधासाठी संख्यात्मक तसेच गुणात्मक अशा दोन्ही परिणामांचा योजकतेने उपयोग केला आहे. त्याद्वारे तथ्यांवर नवा प्रकाश टाकला आहे. या सर्व अभ्यासाचे आकलन करताना संशोधकाने तटस्थ व समतोल भूमिका घेतली आहे.

## ४.४ कृषि आशयाचे स्वरुप

भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये शेती हा व्यवसाय राष्ट्रीय जीवनाचा मुख्य आधार होय. त्यामुळे कृषि जनसंवादाचा अभ्यास करताना विविध प्रसारमाध्यमांची त्या क्षेत्रातील कामगिरी विचारात घ्यावी लागते. कृषि विकासात प्रगत तंत्रज्ञानाप्रमाणे विस्तार व प्रसार कार्यात माध्यमांचा यथोचित वापर ही बाब सुध्दा तेवढीच महत्त्वाची ठरते. त्यासाठी

विविध माध्यमांचा उपयोग केला जातो. या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रांतील कृषि माहितीचे स्वरुप विचारात घेणे आवश्यक आहे. तसेच कृषि सामग्री, शेती प्रश्नांचे स्वरुपही लक्षात घेतले पाहिजे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात वृत्तपत्रांना ही जबाबदारी निश्चितच अधिक प्रकर्षाने पार पाडावी लागते. भारतीय वृत्तपत्रे गेल्या अनेक वर्षांपासून लोकहितास पोषक असे कार्य करीत आहेत. त्यामुळे कृषि वृत्तपत्रांच्या कार्याची चिकित्सा निश्चितच उद्बोधक ठरेल. शेती प्रश्नांचे प्रत्यक्षात शेती सर्वेक्षण व अध्ययन केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या समस्यांना उत्तरे मिळू शकणार नाहीत.

अलीकडे आधुनिक वृत्तपत्रात शेती क्षेत्रातील गुंतवणूक, संशोधन, अर्थकारण, विस्तार, उत्पादकता, आधुनिकीकरणाचे प्रश्न आदि घडामोडी सविस्तर प्रकाशित होत आहेत. राज्यातील बरीच वृत्तपत्रे शेतीविषयक पुरवण्या प्रकाशित करतात. एवढ्यावरच न थांबता पावसाळ्याच्या सुरुवातीला अनेक दैनिके शेतीविषयक माहितीसह पुरवण्या प्रकाशित करीत असतात. या पुरवण्यांमध्ये कृषि तज्ज्ञांचे लेख, बी–बीयाणांची माहिती, खतांबाबत माहिती, नव्या प्रयोगाबाबत, तंत्रज्ञानाबद्दल माहिती आदि शेतीसंदर्भातील माहिती पुरवण्यांच्या माध्यमांतून शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. बरीच वृत्तपत्रे हंगामनिहाय बातम्या प्रकाशित करतात. १२ ते १६ पानांच्या दैनिकांमध्ये शेतीसंदर्भातील काही बातम्या पान एकवर बॅनर तर कलर अँकरही घेतले जातात. शेतकऱ्यांचे कल्याण, शेतीपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योग, शेती विस्तार, कोणत्या महिन्यात कोणते पीक घ्यावे व कोणते खत, बी–बियाणे विकसित झाले आहे, कोणत्या पिकावर कोणता रोग पडला आहे, त्या समस्यांवर उपाययोजना कशी करावी या बाबत माहिती मिळते. काही वृत्तपत्रे दररोज शेतीस्तंभ चालवतात. दैनिक लोकमत शेतीवाडी हे सदर दर आठवड्याला चालवायचे ते आता दररोज संपादकीय पानावर चालवले जाते तर दैनिक सकाळ रविवारच्या सप्तरंग पुरवणीत महत्त्वाच्या कृषीविषयक लेखांना स्थान देत असल्याचे दिसते. यातील अनेक बातम्या, लेख, संपादकीय सचित्र व टीकात्मक स्वरुपाचे असतात. शेतीवर आधारित ही माहिती जागृत शेतकरी वर्गात अत्यंत उपयुक्त सिध्द होत आहे. शेतीवर आधारित विशेष अंक ही प्रकाशित केला जातो. यातूनच आणखी कृषि विषयक नियतकालिकांचा जन्म होत आहे. तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रे माध्यमाची गरज आहे.

## ४.५ घटकनिहाय तुलनात्मक विश्लेषण

कृषिविषयाशी आधारित बातम्यात कोणते विषय आहेत आणि त्या विषयांच्या बातम्या किती प्रमाणात आल्या या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात आला. एक प्रकारे कृषिवार्तांचे हे वर्गीकरणच आहे. शेतीची बातमी असली तरी प्रामुख्याने आशयाचा उपविषय काय आहे, शेतीच्या कोणत्या अंगाविषयी सदरची बातमी आहे हे लक्षात घेऊन वर्गीकरण केलेले आहे. Like all classification this system is arbitrary; artificial & often difficult to apply. [७](Neal & Brown, १९७६, पृ.क्र. २६) कृषि विषयक वृत्तांचे वर्गीकरण करताना हाच दृष्टिकोन स्वीकारावा लागतो.

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन प्रबंधात कृषिविषयक बातम्यांचे १४ घटक पाडून तुलनात्मक अभ्यास केला आहे. १ ऑक्टोबर २०१६ ते ३० मार्च २०१७ मधील दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या आघाडीच्या मराठी वृत्तपत्रांच्या प्रकाशित कृषि सामग्रीचे अध्ययन करुन त्याचा आधार प्रबंधासाठी घेतला आहे. एक दिवसाचा अभ्यास त्यासाठी उपलब्ध प्रत्येक महिन्यातील पहिल्या आठवड्याचा एक दिवस म्हणजे सहा अंकातील (२ ऑक्टोबर २०१६ ते २ मार्च २०१७) ही तारीख निवडली आहे. सप्ताहाचा अभ्यास या गटात ६ ते १२ मार्च २०१७ हा आठवडा निवडला आहे. मासिक अभ्यासामध्ये ऑक्टोबर २०१६ हा महिना निवडला आहे. अशा प्रकारे त्रिस्तरीय अभ्यास पध्दतीने विविध प्रकारच्या बातम्या, जाहिराती, अग्रलेख, लेखांना किती चौ.से.मी. जागा उपलब्ध केली आहे त्याची टक्केवारी तसेच त्याद्वारे घटकनिहाय आशय विश्लेषण, संख्यात्मक व गुणात्मक वर्गीकरण करणे शक्य झाले आहे. त्याचा अहवाल पुढे देण्यात आलेला आहे.

## ४.६ लोकमत दैनिकातील कृषिविषयक बातम्या

काही स्वातंत्र्यसैनिकांनी एकत्र येत महाराष्ट्र राज्यातल्या यवतमाळ जिल्ह्यात १९१८ साली लोकमतची स्थापना केली. १९५२ मध्ये ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक जवाहरलाल दर्डा यांचे मार्गदर्शनात लोकमतची वाटचाल सुरु झाली. १५ डिसेंबर १९७१ साली नागपूर येथून लोकमतचे दैनिकात रुपांतर झाले. आज रोजी दैनिक लोकमतच्या महाराष्ट्रातील सर्वच

जिल्ह्यात आवृत्त्या प्रकाशित होतात. दिल्ली आणि गोवा राज्यातही लोकमतने मराठीचा झेंडा रोवला आहे. IRS Report इंडियन रिडरशिप सर्वे २०१७ नुसार लोकमत हे महाराष्ट्र आणि गोवा राज्यात प्रादेशिक भाषेतील सर्वाधिक वाचले जाणारे दैनिक आहे.[८](outlookindia.com, २०१८) दि. १५ ऑगस्ट १९८७ रोजी सुरू झालेल्या अहमदनगर जिल्ह्याच्या स्वतंत्र आवृत्तीचा खप महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या आकडेवारी नूसार ५९,७५८ एवढा आहे.[९](dgipr.maharashtra.gov.in, २०१९) या अभ्यासात कृषि विषयक १४ घटकांचा अभ्यास करण्यात आला. संशोधन कालावधीतील सर्व प्रकारचा एकूण छापील मजकूर १३,३४,६०० चौ.से.मी. असून यापैकी सर्व प्रकारच्या कृषि मजकुराला दिलेली एकूण जागा ४४,२६८.५८ चौ.से.मी. आहे. हे प्रमाण ३.३१ टक्के एवढे आहे.

## तालिका : ४.६.१

**लोकमत या दैनिकाने एकूण जागेच्या तुलनेत कृषिविषयक बातम्यांना विषयानुरूप दिलेली जागा**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)


| अ.न. | कृषि घटक | जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पीक | २,२३४.३ | ०.१६७ |
| २ | रोगराई व खते | १,७१७.२५ | ०.१२८ |
| ३ | कृषि व्यवसाय/उद्योग | | |
| | अ) साखर | ४,३५०.८५ | ०.३२६ |
| | ब) दूध | ९६८ | ०.०७२ |
| | क) पशू/शेळी/मेंढीपालन | १,८५९ | ०.१३९ |
| ४ | पणन व बाजारभाव | ४,९६६.६ | ०.३७२ |
| ५ | कृषि विद्यापीठ | १,३७८ | ०.१०३ |
| ६ | शेतकरी आत्महत्या | ७,१०.५ | ०.०५३ |
| ७ | लेख, अग्रलेख | ४,९३० | ०.३६९ |
| ८ | छायाचित्र | १,५०३.५८ | ०.११२ |
| ९ | जाहिरात | ३,०२२.७५ | ०.२२६ |
| १० | यशकथा | ५,०८५.७५ | ०.३८१ |
| ११ | आंदोलन | ३,७४५ | ०.२८० |
| १२ | दुष्काळ | ७,६६ | ०.०५७ |
| १३ | हवामान, पाऊस | ४,१७८ | ०.३१३ |
| १४ | जलसिंचन, जलसंवर्धन | २,८५३ | ०.२१३ |

एकूण ४४,२६८.५८ चौ.से.मी.

## आकृती क्र. : ४.६.१

## लोकमत या दैनिकाने एकूण जागेच्या तुलनेत कृषिविषयक बातम्यांना विषयानुरूप दिलेली जागा

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)




लोकमत दैनिकाने पीक वार्तांसाठी २,२३४.३ चौ.से.मी. (०.१६ टक्के), रोगराई व खतांच्या वार्तांसाठी १,७१७.२५ चौ.से.मी. (०.१२ टक्के), साखर उद्योगासाठी ४,३५०.८५ चौ.से.मी. (०.३२ टक्के), दूध उद्योगासाठी ९६८ चौ.से.मी. (०.०७ टक्के), शेळी-मेंढी-कोंबडी व पशूपालन वार्तांसाठी १,८५९ चौ.से.मी. (०.१३ टक्के), पणन व बाजारभाव वार्तांसाठी ४,९६६.६ चौ.से.मी. (०.३७ टक्के), कृषि विद्यापीठ वार्तांसाठी १,३७८ चौ.से.मी. (०.१० टक्के), शेतकरी आत्महत्या ७१०.५ चौ.से.मी. (०.०५ टक्के), लेख-अग्रलेखांसाठी ४,९३० चौ.से.मी. (०.३६ टक्के), छायाचित्रांसाठी १,५०३.५८ चौ.से.मी. (०.११ टक्के), जाहिरांतीसाठी ३,०२२.७५ चौ.से.मी. (०.२२ टक्के), कृषि यशकथांसाठी ५,०८५.७५ चौ.से.मी. (०.३८ टक्के), आंदोलनांसाठी ३,७४५ चौ.से.मी. (०.२८ टक्के), दुष्काळ या घटकासाठी ७६६ चौ.से.मी. (०.०५ टक्के), हवामान-पाऊस वार्तांसाठी ४,१७८ चौ.से.मी. (०.३१ टक्के), आणि जलसिंचन-जलसंवर्धन विषयक वार्तांसाठी २,८५३ चौ.से.मी. (०.२१ टक्के), जागा दिली आहे.

**तालिका क्र.: ४.६.२**

**लोकमत दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय प्राप्त जागा**

**(चौ.से.मी. मध्ये)**


(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).

| अ.न. | कृषि घटक | जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पीक | २,२३४.३ | ५.०४७ |
| २ | रोगराई व खते | १,७१७.२५ | ३.८७९ |
| ३ | कृषि व्यवसाय/उद्योग | | |
| | अ) साखर | ४,३५०.८५ | ९.८२८ |
| | ब) दूध | ९६८ | २.१८६ |
| | क) पशू/शेळी/मेंढीपालन | १,८५९ | ४.१९९ |
| ४ | पणन व बाजारभाव | ४,९६६.६ | ११.२१९ |
| ५ | कृषि विद्यापीठ | १,३७८ | ३.११२ |
| ६ | शेतकरी आत्महत्या | ७१०.५ | १.६०४ |
| ७ | लेख, अग्रलेख | ४,९३० | ११.१३६ |
| ८ | छायाचित्र | १,५०३.५८ | ३.३९६ |
| ९ | जाहिरात | ३,०२२.७५ | ६.८२८ |
| १० | यशकथा | ५,०८५.७५ | ११.४८८ |
| ११ | आंदोलन | ३,७४५ | ८.४५९ |
| १२ | दुष्काळ | ७६६ | १.७३० |
| १३ | हवामान, पाऊस | ४,१७८ | ९.४३७ |
| १४ | जलसिंचन, जलसंवर्धन | २,८५३ | ६.४४४ |

**आकृती क्र.: ४.६.२**

**लोकमत दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय प्राप्त जागा (चौ.से.मी. मध्ये)**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).




## ४.७ सकाळ दैनिकात कृषिविषयक बातम्या

डॉ. नानासाहेब परुळेकर यांनी १ जानेवारी १९३२ रोजी ‘सकाळ‘ या वृत्तपत्राचा आरंभ केला. १९८५ ला ‘सकाळ‘ची मालकी प्रसिध्द उद्योजक श्री. प्रतापराव पवार यांच्याकडे आली.[१०](कर्वे, २००५, पृ.क्र. ५५) गोव्यातील गोमंतक (मराठी) आणि गोमंतक टाईम्स (इंग्रजी) ही दोन्ही वृत्तपत्रे सकाळतर्फे चालविण्यात येतात.[११](कित्ता, पृ.क्र. १३३) १९ एप्रिल २००५ ला ॲग्रोवन हे मराठी भाषेतील एकमेव कृषि विषयक दैनिक सकाळ ने सुरू केले.[१२](कित्ता, पृ.क्र. १४८)

ABC Report च्या जानेवारी – जून २०१६ अहवालानुसार दैनिक सकाळ चा खप १२,८१,३०५ इतका आहे.[१३](en.m.wikipedia.org, २०१८) तर https://dgipr.maharahstra.gov महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या आकडेवारीनुसार सकाळच्या पुणे आवृत्तीचा खप ४,०४,६२७ आहे.[१४](dgipr.maharashtra.gov.in, २०१९) अहमदनगर जिल्ह्यात सकाळची पुणे आवृत्ती

वितरीत होत असते. या अभ्यासात कृषि विषयक १४ घटकांचा अभ्यास करण्यात आला. संशोधन कालावधीतील सर्व प्रकारचा एकूण छापील मजकूर १३,७७,९६० चौ.से.मी. असून यापैकी सर्व प्रकारच्या कृषि मजकुराला दिलेली एकूण जागा ३६,५७९.५८ चौ.से.मी. आहे. हे प्रमाण २.६५ टक्के एवढे आहे.

**तालिका : ४.७.१**

**सकाळ या दैनिकाने कृषिविषयक बातम्यांना घटकनिहाय दिलेली जागा**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).


| अ.न. | कृषि घटक | जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पीक | ३,२३६.५ | ०.२३४ |
| २ | रोगराई व खते | २४८ | ०.०१७ |
| ३ | कृषि व्यवसाय/उद्योग | | |
| | अ) साखर | ३,८२२ | ०.२७७ |
| | ब) दूध | १,१४४.५ | ०.०८३ |
| | क) पशू/शेळी/मेंढीपालन | १,४२० | ०.१०३ |
| ४ | पणन व बाजारभाव | ३,१७०.५ | ०.२३० |
| ५ | कृषि विद्यापीठ | १,०७० | ०.०७७ |
| ६ | शेतकरी आत्महत्या | ७५०.५ | ०.०५४ |
| ७ | लेख, अग्रलेख | २,३७४ | ०.१७२ |
| ८ | छायाचित्र | २७२ | ०.०१९ |
| ९ | जाहिरात | १,१२८ | ०.०८१ |
| १० | यशकथा | १,८७६ | ०.१३६ |
| ११ | आंदोलन | २,७३१ | ०.१९८ |
| १२ | दुष्काळ | ३९४.७५ | ०.०२८ |
| १३ | हवामान, पाऊस | ४,९५४.५ | ०.३५९ |
| १४ | जलसिंचन, जलसंवर्धन | ७,९८७.५ | ०.५७९ |

एकूण ३६,७९.७५ चौ.से.मी.

## आकृती : ४.७.१

## सकाळ या दैनिकाने कृषिविषयक बातम्यांना घटकनिहाय दिलेली जागा

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).




सकाळ दैनिकाने पीक वार्तांसाठी ३,२३६.५ चौ.से.मी. (०.२३ टक्के), रोगराई व खतांच्या वार्तांसाठी २४८ चौ.से.मी. (०.०१ टक्के), साखर उद्योगासाठी ३,८२२ चौ.से.मी. (०.२७ टक्के), दूध उद्योगासाठी १,१४४.५ चौ.से.मी. (०.०८ टक्के), शेळी–मेंढी–कोंबडी व पशूपालन वार्तांसाठी १,४२० चौ.से.मी. (०.१० टक्के), पणन व बाजारभाव वार्तांसाठी ३,१७०.५ चौ.से.मी. (०.२३ टक्के), कृषि विद्यापीठ वार्तांसाठी १,०७० चौ.से.मी. (०.०७ टक्के), शेतकरी आत्महत्या ७५०.५ चौ.से.मी. (०.०५ टक्के), लेख–अग्रलेखांसाठी २,३७४ चौ.से.मी. (०.१७ टक्के), छायाचित्रांसाठी २७२ चौ.से.मी. (०.०१ टक्के), जाहिरांतीसाठी १,१२८ चौ.से.मी. (०.०८ टक्के), कृषि यशकथांसाठी १,८७६ चौ.से.मी. (०.१३ टक्के), आंदोलनांसाठी २,७३१ चौ.से.मी. (०.१९ टक्के), दुष्काळ या घटकासाठी ३९४.७५ चौ.से.मी. (०.०२ टक्के), हवामान–पाऊस वार्तांसाठी ४,९५४.५ चौ.से.मी. (०.३५ टक्के) आणि जलसिंचन–जलसंवर्धन विषयक वार्तांसाठी ७,९८७.५ चौ.से.मी. (०.५७ टक्के) जागा दिली आहे.

**तालिका क्र : ४.७.२**

**सकाळ दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय प्राप्त जागा (चौ.से.मी.)**


(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).

| अ.न. | कृषि घटक | जागा | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पीक | ३,२३६.५ | ८.८४७ |
| २ | रोगराई व खते | २४८ | ०.६७७ |
| ३ | कृषि व्यवसाय/उद्योग | | |
| | अ) साखर | ३,८२२ | १०.४४८ |
| | ब) दूध | १,१४४.५ | ३.१२८ |
| | क) पशू/शेळी/मेंढीपालन | १,४२० | ३.८८१ |
| ४ | पणन व बाजारभाव | ३,१७०.५ | ८.६६७ |
| ५ | कृषि विद्यापीठ | १,०७० | २.९२५ |
| ६ | शेतकरी आत्महत्या | ७५०.५ | २.०५१ |
| ७ | लेख, अग्रलेख | २,३७४ | ६.४८९ |
| ८ | छायाचित्र | २७२ | ०.७४३ |
| ९ | जाहिरात | १,१२८ | ३.०८३ |
| १० | यशकथा | १,८७६ | ५.१२८ |
| ११ | आंदोलन | २,७३१ | ७.४६५ |
| १२ | दुष्काळ | ३९४.७५ | १.०७९ |
| १३ | हवामान, पाऊस | ४,९५४.५ | १३.५४४ |
| १४ | जलसिंचन, जलसंवर्धन | ७,९८७.५ | २१.८३५ |

**आकृती क्र : ४.७.२**

**सकाळ दैनिकात एकूण कृषिविषयक बातम्यांत १४ घटकनिहाय दिलेली जागा (चौ.से.मी.)**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७).




## ४.८ पीक वार्ता

शेती हंगामाच्या प्रारंभी पेरणीच्या कामाला सुरवात होते. ही एक नवीन घटना असते त्यामुळे त्या घटनेची बातमी होते. पेरणी सुरु झाली का? पेरण्या कशा झाल्या? यासंबंधी उत्सुकता असते कारण त्याचा परिणाम बाजारपेठेवर, एकूणच समाजाच्या आर्थिक जीवनावरही त्याचा होतो. या पार्श्वभूमीवर वृत्तपत्रातील पीक वार्तांचा तपशील हाती घेण्यात आला. तो पुढील तालिकेत दिला आहे. या तालिकेतून हे स्पष्ट होते की तीनही प्रकारच्या कालावधीत मिळून सर्वाधिक म्हणजे ०.२३ टक्के पीक वार्तांना दैनिक सकाळमध्ये जागा देण्यात आली आहे. तर दैनिक लोकमतने ०.१६ टक्के जागा दिलेली आहे. एक दिवसाच्या पीक वार्तांमध्ये मात्र लोकमतने ३५५ चौ.से.मी. म्हणजे ०.१९ टक्के जागा दिली आहे.

या अभ्यास काळात दैनिक सकाळमध्ये दि. ७ ऑक्टोबर २०१६ रोजी वृत्त संस्थेच्या हवाल्याने ‘जम्मूमधील सीमेलगत भातपीक वाचवण्याची धडपड’ ही ४० हजार हेक्टरवरील

पीक काढणीला असल्याने शेतकऱ्यांसमोर चिंता असल्याची बातमी तर दैनिक लोकमतच्या दि. ४ ऑक्टोबर २०१६ रोजी मुंबई येथील अतुल कुलकर्णी यांची 'मराठवाड्यातील पिके संकटात' ही १५ लाख हेक्टरवरील पीक संकटात असल्याची बातमी प्रकाशित झाली आहे.

दि. ९ ऑक्टोबर २०१६ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथील 'सहा एकरातील सोयाबीन शेंगाविना' ही शेतकरी जयंत काकडे यांच्या नुकसानीबाबत तसेच दि. १२ मार्च २०१७ ला 'जिल्ह्यामध्ये उन्हाळी पिकांची अवघी पाच टक्के पेरणी' ही बातमी सकाळने प्रसिध्द केली आहे. तर दै. लोकमतच्या २ नोव्हेंबर २०१६ च्या अंकात 'उस्मानबाद जिल्ह्यात फक्त ५ टक्के पेरणी' या बातम्या लक्ष वेधून घेतात. तालिका क्रमांक ४.८ मध्ये दिलेल्या या आकडेवारीनुसार पीक वार्ता देण्यात 'दैनिक सकाळ' हे अग्रेसर ठरले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानाबाबत मराठी वृत्तपत्रे दखल घेत असल्याचे दिसून येते. यात वैयक्तिक व सार्वजनिक पातळीवरील नुकसानाच्या बातम्या दोन्ही दैनिकात पहायला मिळतात.

**तालिका : ४.८**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पीक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)

| **अ.क्र.** | **कालावधी** | **देण्यात आलेली एकूण जागा** | | **(प्रमाण टक्के)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** |
| १ | एकदिवसीय वार्ता | ३५५ | --- | ०.१९ % | --- |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ३२८ | १,५९९ | ०.१६ % | ०.७३ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | १,५५१.३ | १,६३७.५ | ०.१६ % | ०.१६ % |
| | एकूण वार्ता | २,२३४.३ | ३,२३६.५ | ०.१६ % | ०.२३ % |

**आकृती : ४.८**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पीक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)



## ४.९ रोगराई, खत, बियाणे वार्ता

शेतीमधील पीक पेरणीच्या वेळी बी–बियाण्यांची आवश्यकता असते. यातही फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. काढणीपर्यंतच्या काळात विविध प्रकारच्या खतांची व कीटकनाशकांची आवश्यकता असते. रोगराईवर कोणते उपाय योजावेत यालाही महत्त्व आहे. दरवर्षी नवीन रोगांची निर्मिती होत आहे. खतांची टंचाई निर्माण होते. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. व्यापारी जादा दराने खतांची विक्री करतात. सुनील माळी म्हणतात, पीक व पिकांवरील रोगराईच्या वार्ता हंगामात नेहमी प्रकाशित होत असतात. हंगामाच्या वेळी त्या वार्ता नेहमी दैनिकांकडे येत असतात. तसेच शेतकऱ्यांकडूनही माहिती सतत मिळत असते. याबाबतच्या बातम्यांचा तपशील पुढील तालिका क्रमांक ४.९ मध्ये दिला आहे. तीन्ही प्रकारच्या कालावधीत मिळून रोगराई व खतांच्या वार्तांना सर्वाधिक म्हणजे १,७१७.२५ चौ.से.मी. जागा दैनिक लोकमत मध्ये जागा देण्यात आली आहे तर दैनिक सकाळने २४८ चौ.से.मी. जागा दिलेली आहे.

**तालिका : ४.९**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी रोगराई, खत, बियाणे वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ५७४ | --- | ०.३२ % | --- |
| २ | आठवड्याच्या वार्ता | १८० | --- | ०.०८ % | --- |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ९६३.२५ | २४८ | ०.१० % | ०.०२ % |
| | एकूण वार्ता | १,७१७.२५ | २४८ | ०.१२ % | ०.०१ % |

## आकृती : ४.९

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी रोगराई, खत, बियाणे वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३/०३/२०१७




एका दिवसाच्या वार्तांमध्ये लोकमत दि.२ डिसेंबर २०१६ रोजी 'पाचरट जाळण्याकडे कल, बहुमोल खताची राख' दि. २ जानेवारी २०१७ रोजी 'कृषि विद्यापीठाच्या ऊस बेण्यालाच कीड' दि. १० मार्च २०१७ रोजी 'कृषी केंद्र चालकांची सेवा पदवी विनाच, २३५८ जणांकडे पदवी नाही' या महत्त्वपूर्ण बातम्या प्रकाशित केल्या आहेत. दै. सकाळने दि. ३ ऑक्टोबर २०१६ च्या अंकात 'चाळीतील कांदा सडू लागला' तसेच १० ऑक्टोबर २०१६ ला 'शासनाच्या बियाणे वाटप' कार्यक्रमाला प्रसिध्दी दिली आहे. रोगराई, खत, बियाणे विषयक बातम्यांना दै. लोकमतने अधिक जागा दिली आहे.

### ४.१० कृषि पूरक व्यवसाय/प्रक्रिया उद्योग वार्ता

अहमदनगर जिल्ह्यात प्रकाशित होणाऱ्या सर्वच दैनिकांत ऊस या नगदी पिकावर आधारीत साखर उद्योगाच्या बातम्या मोठ्या प्रमाणात असतात. सहकारी साखर कारखानदारीची मातृभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्यात आता काही तालुक्यात खाजगी साखर कारखानदारीही काही प्रमाणात पुन्हा डोके वर काढीत आहे. सहकार, राजकारण व अर्थकारणाचे केंद्रबिंदू असल्याने या उद्योगांचे स्पष्ट प्रतिबींब वृत्तपत्रांमध्ये देखील

उमटल्याचे दिसून येते. भारताचे तत्कालीन कृषिमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी म्हटले आहे की सहकारी पध्दतीने शेतकऱ्यांना एकत्र आणून संघटीत केल्याने एक शक्ती निर्माण होऊ शकते व या शक्तीच्या सहाय्याने अर्थव्यवहारातील अनेक कामे जी व्यक्तीगत शेतकऱ्यांना शक्य होत नाही अशी कामे करणे शक्य आहे. पद्मश्री विखे पाटील यांचे सामाजिक योगदानातून अहमदनगर जिल्ह्यात पहिल्या सहकारी साखर कारखान्याचा जन्म झाला. या जोडीला सहकारी दूध व्यवसाय व प्रक्रिया उद्योगाने देखील मोठी किमया साधली आहे. जिल्ह्यात विविध प्रकारच्या मिळून एकूण ५,३८६ संस्था अस्तित्वात आहेत.[१५](अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. १२१) यामुळे प्रस्तुत अभ्यासात साखर, दूध उद्योग आणि कृषि पूरक असलेल्या पशू/कुक्कुट/शेळी/मेंढीपालन व इतर अशी स्वतंत्र दखल घेण्यात आली आहे.

अ) **साखर–** उसाची शेती म्हणजे उत्पन्नाची हमी असे समीकरण झाले आहे. त्यामुळे पाण्याची उपलब्धता कशाही प्रकारे करण्याकडे बागायतदार शेतकऱ्यांचा कल पाहायला मिळतो. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे राजकारण व अर्थकारण साखरेकडे झुकले आहे. हंगाम २०१६–१७ मध्ये ३५,०५,५७२ मेट्रीक टन ऊसाचे गाळप करून ३४,१९,६२५ मेट्रीक टन साखरेचे उत्पादन केले आहे. काही कारखान्यातून साखर उत्पादनाव्यतिरिक्त देशी दारु, कागद, औद्योगिक मद्यार्क आदि प्रकारची उत्पादने मोठ्या प्रमाणावर घेतली जातात.[१६](कित्ता, पृ.क्र. १०)

**तालिका : ४.१०.१**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी साखर उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)

| **अ.क्र.** | **कालावधी** | **देण्यात आलेली एकूण जागा** | | **(प्रमाण टक्के)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** |
| १ | एक दिवसीय वार्ता | ६६८ | २२८ | ०.३७ % | ०.१६ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | १४४ | --- | ०.०७ % | --- |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ३,५३८.८५ | ३,५९४ | ०.३७ % | ०.३६ % |
| | एकूण वार्ता | ४,३५०.८५ | ३,८२२ | ०.३२ % | ०.२७ % |

**आकृती : ४.१०.१**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी साखर उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)



दैनिक लोकमत मध्ये जवळपास ४,३५०.८५ चौ.से.मी. जागा देण्यात आली आहे, तर दैनिक सकाळने ३,८२२ चौ.से.मी जागा दिलेली आहे. या कालावधीत दै. सकाळने ५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'यंदाचा ऊस गाळप एक डिसेंबरपासून' तर २ नोव्हेंबर २०१६ रोजी 'उसाला इतर कारखान्यांच्या बरोबरीने भाव देऊ' आणि २ जानेवारी २०१७ रोजी 'जिल्ह्यात साखरेचे उत्पादन साडे एकोणीस लाख पोती' या महत्त्वपूर्ण बातम्या प्रसिध्द केल्या आहेत.

लोकमतने ५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'यंदाही ऊस खरेदीकर माफ होणार' तर २५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'कारखान्यामुळे तालुक्यात समृध्दी' आणि ९ मार्च २०१७ रोजी 'साखर आयुक्तांच्या आदेशाबाबतची ऊस तोडणी मजूरांना सुविधा देणे साखर कारखान्यांना बंधनकारक' या महत्त्वपूर्ण विषयांना प्राधान्य मिळाल्याचे दिसते. सहकारी साखर उद्योगातील कारखान्याच्या संचालक, अध्यक्ष पदानंतर अनेक पुढारी आमदारकी, खासदारकी व मंत्रिपदांपर्यंत मजल मारल्याचे चित्र अहमदनगरसह राज्यात पाहायला मिळते.

**ब) दूध** – साखरेनंतर दूधाच्या प्रक्रिया उद्योग–व्यवसायाबाबत जिल्हा अग्रणी आहे. अनेक शेतकरी जोडधंदा म्हणून दूग्धव्यवसाय करतात. मोठ्या प्रमाणात दैनंदिन दूध संकलन होते. अहमदनगर जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या माहिती नुसार वर्ष २०१६–१७ मध्ये जिल्ह्यात एकूण १,८०,१५४ हजार मे. टन इतके दुग्ध उत्पादन झाले असुन संगमनेर तालुका हा सलग तीन वर्षापासून प्रथम क्रमांकावर आहे.[१७](कित्ता, पृ.क्र. ८४) जिल्ह्यात सहकारी व खाजगी दूध संघ आणि प्रक्रिया उद्योग असून राज्यपातळीवर नावलौकिक कमावलेले राजहंस, गोदावरी, प्रभात, श्रीराम, प्रवरा हे ब्रँड प्रसिध्द आहेत.

**तालिका : ४.१०.२**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दूध उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| **अ.क्र.** | **कालावधी** | **देण्यात आलेली एकूण जागा** | | **(प्रमाण टक्के)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** |
| १ | एक दिवसीय वार्ता | १६५ | ७२ | ०.०९ % | ०.०४ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ७२ | --- | ०.०३ % | --- |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ७३१ | १,०७२.५ | ०.०७ % | ०.१० % |
| | एकूण वार्ता | ९६८ | १,१४४.५ | ०.०७ % | ०.०८ % |

**आकृती : ४.१०.२**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दूध उद्योगाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



दैनिक लोकमतकडून ९६८ चौ.से.मी. तर दैनिक सकाळने ११४४.५ चौ.से.मी. जागा दूध या घटकाला दिली आहे. या कालावधीत दै. सकाळने १२ ऑक्टोबर २०१६ रोजी 'शेतकरी हितासाठी प्रभात दूध प्रकल्प सक्रिय' तर २५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'नवे बदल स्वीकारुन दुधाची गुणवत्ता वाढवावी' या बातम्या प्रकाशित केल्या आहेत. लोकमतने ९ ऑक्टोबर २०१६ रोजी 'गोकूळ चा विक्रमी ७४ कोटीचा दरफरक' तर १८ ऑक्टोबर २०१६ रोजी 'गोदावरी दूध संघाकडे परदेशी सिमेन वापराचे तंत्र, भारतात पहिलीच सुरुवात' या विषयांना प्रसिध्दी मिळाल्याचे दिसते. शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दुभती जनावरे पाळण्याचे प्रमाण शेतकऱ्यांमध्ये असल्याचे स्पष्ट होते.

### क) पशू/कुक्कुट/शेळी/मेंढी पालन व इतर –

पशुधनात देशी–विदेशी गाई, म्हशी व रेडे, मेंढ्या, बकऱ्या, घोडे, शिंगरे, खेचरे, गाढवे, डुकरे, उंट, इमूंचे अस्तित्व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आहे. तर कुक्कुट प्रकारात कोंबड्या, बदके, टर्की पालन करणाऱ्यांचे प्रमाण आहे. त्यामुळे या विषयीच्या बातम्या वर्तमानपत्रात आढळतात. दैनिक लोकमतकडून १८५९ चौ.से.मी. तर दैनिक सकाळने १४२० चौ.से.मी. जागा या घटकाला दिली आहे. या कालावधीत दै. सकाळने १० ऑक्टोबर २०१६ रोजी 'कामधेनूमध्ये पंढरपूरी म्हैस, देवणी गाय याची आंध्र प्रदेशातील नेल्लूरमधील फर्ममध्ये होणार पैदास' ही पशुपालक शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण बातमी प्रसिध्द केली आहे तर ८ मार्च २०१७ रोजी टुडे पुरवणीत पान क्रमांक ३ वर 'पोल्ट्री व्यवसाय करा यशस्वी' ही बातमी प्रकाशित केली आहे.

**तालिकाः ४.१०.३**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पशू/कुक्कुट/शेळी/मेंढीपालन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | १२० | १५६ | ०.०६ % | ०.०८ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | १२० | ४०० | ०.०५ % | ०.१८ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | १,६१९ | ८६४ | ०.१६ % | ०.०८ % |
| | एकूण वार्ता | १,८५९ | १,४२० | ०.१३ % | ०.१० % |

**आकृती : ४.१०.३**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पशू/कुक्कुट/शेळी/मेंढीपालन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

(कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७)



लोकमतने १३ ऑक्टोबर २०१६ रोजी 'नगर तालुक्यातील वाळकी येथील १५० वर्ष जुना असलेल्या बैलबाजाराबाबत वाळकीच्या बाजाराला गतवैभव' ही बातमी प्रकाशित केली आहे. तर २८ ऑक्टोबर २०१६ रोजी 'मेंढपाळांचे कळप रवाना, सह्याद्रीच्या पर्वतरांगात मुक्काम' घडामोडींना प्रसिद्धी मिळाल्याचे दिसते. गाय, म्हैस आणि कोंबड्या पाळण्याचा व्यवसाय करण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसून येतो.

## ४.११ पणन व बाजारभाव

शेतीमधील सर्वाधिक कळीचा मुद्दा म्हणजे बाजारभाव. शेती उत्पादनांना हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी नागवला जात असल्याच्या बातम्या प्रकाशित होतात. या घटकांमध्ये सर्वाधिक जागा दैनिक लोकमतने दिली आहे. हे प्रमाण ०.३७ टक्के म्हणजेच ४,९६६.६ चौ.से.मी. एवढे आहे. दैनिक सकाळने ०.२३ टक्के म्हणजेच ३,१७०.५ टक्के जागा उपलब्ध केली आहे.

या कालावधीत दै. लोकमत मधील २७ ऑक्टोबर २०१६ रोजी 'खाजगी कापूस केंद्राचे पेव, मनमानी भावाने शेतकऱ्यांची लूट' आणि १२ मार्च २०१७ रोजी प्रकाशित 'बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांची लूट, लिलाव न करताच भाव तर बड्या शेतकऱ्यांना मात्र जादा बाजारभाव' या शेतकरी हिताच्या बातम्यांतून भ्रष्टाचार वेशीवर टांगल्याचे ठळकपणे दिसून येते.

**तालिका : ४.११**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पणन व बाजारभाव वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एकदिवसीय वार्ता | २,१९९.३५ | ८३६ | १.२३ % | ०.४७ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ३८० | १२६ | ०.१८ % | ०.०५ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | २,३८७.२५ | २,२०८.५ | ०.२४ % | ०.२२ % |
| | एकूण वार्ता | ४,९६६.६ | ३,१७०.५ | ०.३७ % | ०.२३ % |

**आकृती : ४.११**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी पणन व बाजारभाव वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७




दै. सकाळने १५ ऑक्टोबर २०१६ रोजी 'घाऊक चलनवाढीचा उतरला आलेख, भाज्यांचे भाव घसरल्याचे परिणाम' तर २० मार्च २०१७ रोजी 'रस्त्यावरचा चाराबाजार शेतकऱ्यांना आधार व जामखेडमध्ये तूरउत्पादकांचे हाल' या बातम्या शेतकऱ्यांची दैन्यावस्था

मांडताना दिसतात. कष्टाने पिकविलेला शेतमालाला योग्य बाजारभाव मिळत नसल्याचे चित्र अनेकदा पाहायला मिळते. आपल्या कृषिप्रधान अर्थव्यवस्थेत शेतकरी हा एकमेव असा घटक आहे की, ज्याने उत्पादित केलेल्या शेतमालाला बाजारभाव हा इतर घटकांकडून निश्चित केला जातो.[१८](macp.gov.in २०१८) त्यामुळे शेतकऱ्यांना अनेकदा तोट्याचा सामना करावा लागतो. वृत्तपत्रे या बातम्यांना स्थान देताना दिसतात.

## ४.१२ कृषि विद्यापीठातील वार्ता

कृषि विद्यापीठात होणारे संशोधन तसेच विविध कार्यक्रमातून शेतकऱ्यांना माहिती मिळत असते. वर्षभरात पीकांवर पडणाऱ्या रोगराईवर कोणते उपाय योजावेत याचेही मार्गदर्शन होत असते. प्रा. एव्हर्ट रॉजर्स यांनी कृषि शोधांचा विस्तार ही बाब निर्णायक असल्याचे म्हटले आहे.[१९](Rogers, १९८२, पृ.क्र. २०) नवीन रोग, कीड यावर कोणते उपाय करावेत याचीही माहिती विद्यापीठातून वेळोवेळी प्रसारीत केली जाते. त्यामुळे या वार्तांना विशेष महत्त्व आहे. याबाबतच्या बातम्यांचा तपशील पुढील तालिका क्रमांक ४.१२ मध्ये दिला आहे. तीनही प्रकारच्या कालावधीत मिळून कृषि विद्यापीठातील वार्तांना सर्वाधिक म्हणजे १,३७८ चौ.से.मी. जागा दैनिक लोकमतमध्ये देण्यात आली आहे तर दैनिक सकाळने १,०७० चौ.से.मी. जागा दिलेली आहे. एक दिवसीय वार्तांमध्ये मात्र सकाळने लोकमतच्या तुलनेत जास्त म्हणजे १०० चौ.से.मी. जागा दिलेली आहे.

## तालिका : ४.१२

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि विद्यापीठ वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ७२ | १०० | ०.०४ % | ०.०५ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ७६६ | ६८ | ०.३८ % | ०.०३ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ५४० | ९०२ | ०.०५ % | ०.०९ % |
| | एकूण वार्ता | १,३७८ | १,०७० | ०.१० % | ०.०७ % |

## आकृती : ४.१२

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि विद्यापीठ वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



या कालावधीत दै. लोकमत मधील २३ ऑक्टोबर २०१६ रोजी परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. बी. व्यंकटेश्वरलू यांचे 'अवर्षणावर होऊ शकते मात' आणि ०७ मार्च २०१७ रोजी 'अकोला कृषि विद्यापीठातील विदर्भात सफेद मुसळी, अश्वगंधा लागवडीवर भर' तर ०९ मार्च २०१७ रोजी प्रकाशित 'कांदा साठवणुकीसाठी डेसिकेटर उपयुक्त' या वार्ता महत्त्वाच्या वाटतात.

दै. सकाळने २ ऑक्टोबर २०१६ रोजी टूडे पान नंबर तीनवर राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या हवाल्याने दिलेली 'विद्यापीठाच्या चाऱ्याचा वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत', २३ ऑक्टोबर २०१६ रोजी 'कृषि पदवीधरांनी उद्योजक बनावे' असे मार्गदर्शन डॉ. त्रिलोचन महापात्र यांनी पदवीप्रदान समारंभात केले. विद्यार्थी, शेतकरी आणि कृषि व्यवसायातील सर्वांसाठीच या शोधाच्या व नवीन तंत्रज्ञानाच्या बातम्या दिशादर्शक ठरत असतात. त्यामुळे या बातम्यांची व्याप्ती व गरज ही आणखी वाढलेली आहे.

## ४.१३ शेतकरी आत्महत्या

विविध कारणांमुळे शेतकऱ्यांमध्ये नैराश्य येते. कर्जबाजारीपणा व नापिकी ही दोन प्रमुख कारणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे सांगितली जातात. या आत्महत्या थांबण्यासाठी सरकारी पातळीवरून प्रयत्न केले जातात तरिही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच आहेत. त्यामुळे या विषयावर आत्महत्यांच्या बातम्यांचे प्रमाणही वाढल्याचे दिसून येते. तालिका क्र. ४.१३ नुसार हे स्पष्ट होते की तिन्ही प्रकारच्या कालावधीत मिळून सर्वाधिक म्हणजे ७५०.५ चौ.से.मी. जागा दैनिक सकाळमध्ये देण्यात आली आहे, तर दैनिक लोकमतने ७१०.५ चौ.से.मी. जागा दिलेली आहे.

या अभ्यास काळात दैनिक लोकमतच्या दि. २ नोव्हेंबर २०१६ रोजी कर्जाच्या विवंचनेतून शेतकऱ्याची आत्महत्या दि. १२ ऑक्टोबर २०१६ रोजी ४१ वर्षीय रमाबाई आरोदे यांचेबाबत 'महिला शेतकऱ्याची लातूरमध्ये आत्महत्या' तर दि. २ जानेवारी २०१७ रोजी नंदुरबार येथील शेतकरी महिलेने तिच्या दोन लहान मुलांसह स्वतःचीही जीवनयात्रा संपविल्याची 'चिमुकल्यांसह आत्महत्या' ही बातमी डोळ्यात पाणी आणते.

## तालिका : ४.१३

## दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी शेतकरी आत्महत्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ८९.५ | १८१ | ०.०५ % | ०.१० % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ३२ | २८२.५ | ०.०१ % | ०.१२ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ५८९ | २८७ | ०.०६ % | ०.०२ % |
| | एकूण वार्ता | ७१०.५ | ७५०.५ | ०.०५ % | ०.०५ % |

## आकृती : ४.१३

## दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी शेतकरी आत्महत्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७




दैनिक सकाळमध्ये दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी 'तीन शेतकऱ्यांची विदर्भात आत्महत्या', दि. १७ ऑक्टोबर २०१६ रोजी नापिकी व कर्ज परतफेडीला कंटाळून 'दोन शेतकऱ्यांची नांदेडमध्ये

आत्महत्या' या बातम्या आढळतात. दि. २ जानेवारी २०१७ रोजीच्या नगर जिल्ह्यातील आदर्श गाव हिवरेबाजार येथे आयोजित ग्रामसंस्कृती साहित्य संमेलनात अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. सदानंद मोरे यांचे भाषणातील मजकुराचा 'जगाचा पोशिंदा मरतोय ही शोकांतिका' असा ठळक मथळा करीत १६० चौ.से.मी. जागेत मजकुराला स्थान देत विषयाचे गांभीर्य स्पष्ट केल्याचे दिसते. तसेच दि. ८ मार्च २०१७ ला नगर येथे शेतकरी नेते रघुनाथदादा पाटील यांनी सरकारवर तोफ डागताना 'वरवरच्या मदतीने आत्महत्या थांबणार नाहीत, शेतमालावरील निर्यातबंदी उठवावी' असे म्हटले ही बातमी सकाळने १६० चौ.से.मी. इतकी जागा देत प्रसिध्द करून सरकारच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न केला आहे. संवेदनशील असलेल्या या विषयावर अद्यापही औषध सापडले नसल्याने याबाबत आणखी सखोल प्रबोधन व उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

## ४.१४ लेख, अग्रलेख

कृषि हा अत्यंत व्यापक विषय आहे. शेतीबद्दलचे प्रश्न हे लेख व अग्रलेखाचे विषय होऊ शकतात. अग्रलेख म्हणजे वृत्तपत्राचा आवाज. अग्रलेखातून संपादकाचे मत प्रतिबिंबीत होत असते. इंग्रजीत ज्याला 'लिडर' म्हणतात तो हा अग्रलेख आहे. तर ताज्या घटनांवर त्या विषयातील तज्ज्ञांकडून तातडीने लेख लिहून घेतले जातात. लेखांच्या विषयामध्ये कोणताही ताजा विषय होऊ शकतो. लेख अथवा वृत्तलेख यांचे स्थान वृत्तपत्रात महत्त्वाचे ठरते. या बाबत ब्रिटीश पत्रकार लॉर्ड व्हायकाउंट नॉर्थक्लिफ म्हणतात It is hard news that catches readers, features hold them.[२०](गोखले, २०११, पृ.क्र. १०१) एखादी जोरदार बातमी वाचकाचे लक्ष वेधून घेते, पण वृत्तलेख वाचकाला खिळवून ठेवतो. या अभ्यासात शेतीविषयक लेख व अग्रलेख यांची नोंद घेण्यात आली आहे. त्या आधारे पुढील तालिका क्र. ४.१४ प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे.

## तालिकाः ४.१४

## दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी लेख, अग्रलेख यांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ५६७ | --- | ०.३१ % | --- |
| २ | आठवड्याच्या वार्ता | २१० | २७३ | ०.१० % | ०.१२ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ४,१५३ | २,१०१ | ०.४३ % | ०.२१ % |
| | एकूण वार्ता | ४,९३० | २,३७४ | ०.३६ % | ०.१७ % |

## आकृती : ४.१४

## दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी लेख, अग्रलेख यांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



वरील तालिकेवरुन स्पष्ट होते की, सर्वाधिक शेतीविषयक लेख, अग्रलेख लोकमत या दैनिकात प्रकाशित झालेले आहेत. त्याचे प्रमाण ०.३६ टक्के एवढे आहे. तर दैनिक सकाळने ०.१७ टक्के जागा दिलेली आहे. दैनिक लोकमतमध्ये ११ ऑक्टोबर २०१६ रोजीचा अकोला येथील रवी टाले यांचा 'अस्मानी , सुलतानी अपेक्षाभंग' तर २० ऑक्टोबर २०१६ रोजीचा संपादक विजय बाविस्कर यांचा 'शेतमालाला हमी भाव मिळावा' आणि २ फेब्रुवारी २०१७ ला महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा 'कृषी विकासाची गमावलेली संधी' हे प्रकाशित लेख अभ्यासपूर्ण म्हणून सांगता येतील.

दैनिक सकाळ मध्ये १० ऑक्टोबर २०१६ चा 'गाळपाचा तेरावा महिना' आणि ९ मार्च २०१७ चा 'कर्जमाफीची काडी नि कोंडी' हे संपादकीय लेख उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल. तर लेखांमध्ये २७ ऑक्टोबर २०१६ चा 'ऊस दर यंदाही ऐरणीवर' आणि डाळींची भाववाढ नैसर्गिक नाही असे सांगणारा सुरेश परांजपे यांचा अभ्यासपूर्ण असा 'राज्य सरकारची डाळ शिजेना' हे लेख महत्त्वपूर्ण वाटतात. लेख, अग्रलेखांबाबत कृषि संदर्भातील मजकूर दोन्ही दैनिकात कमी दिलेला आहे.

## ४.१५ छायाचित्रे

आधुनिक पत्रकारितेमध्ये छायाचित्रांना महत्त्व असते. शब्दांपेक्षाही ते अधिक माहिती देतात, व्यक्त होतात. या बाबत फ्रेड पॅरीश म्हणतात की Photography, from the Greek phas, meaning 'light', and graphein, meaning 'writing' has had a tremendous effect on the world since its introduction more than 160 years ago.[२१](Parrish, २००१, पृ.क्र. २९४) म्हणजेच छायाचित्रे जे 'लिहितात' ते शब्दांच्याही पलीकडचे असते हे या व्याख्येतून स्पष्ट होते. कृषि छायाचित्रांबाबत एकूण चित्र पुढील तालिका क्र. ४.१५ प्रमाणे स्पष्ट होते.

**तालिका : ४.१५**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी छायाचित्रांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | २७६ | १४४ | ०.१५ % | ०.०८ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | --- | --- | --- | --- |
| ३ | महिन्याच्या वार्ता | १,२२७.५८ | १२८ | ०.१२ % | ०.०१ % |
| | एकूण वार्ता | १,५०३.५८ | २७२ | ०.११ % | ०.०१ % |

**आकृती : ४.१५**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी छायाचित्रांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७




या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, सर्वाधिक कृषि छायाचित्रे दैनिक लोकमतने प्रकाशित केलेली आहेत. या दैनिकाने १५०३.५८ चौ.से.मी. जागा दिली असून हे प्रमाण ०.११

टक्के एवढे आहे. तर सकाळ मध्ये ०.०१ टक्के एवढे आहे. दैनिक लोकमतमध्ये ११ ऑक्टोबर २०१६ रोजीचा मुख्य अंकातील पान नंबर ४ वरील नागेश सोनवणे यांनी 'शेतातील बोअरवेलमधून १०० फूट उंचीचे पाणी' या बातमीतील झाकण असलेला बोअरवेल व पाणी उडणारा बोअरवेल ही छायाचित्रे लक्ष वेधून उत्कंठा वाढवतात. तर दैनिक सकाळमध्ये ४ ऑक्टोबर २०१६ रोजीचा टुडे पुरवणीतील पान नंबर ४ वर 'शेवगाव तालुक्यात पिके आणि रस्तेही पाण्याखाली' व 'श्रीरामपूर व बेलापूरमध्ये अतिवृष्टी' ही छायाचित्रे बरंच काही सांगतात. २ जानेवारी २०१७ रोजी शेवगाव येथून सात टायर बैलगाड्या एकमेकांना बांधून नेण्यात आल्या. त्यामुळे वाहतूक कोंडी व किरकोळ अपघाताचे प्रसंग झाले. हा फोटो मुख्य अंकात पान चारवर 'चल मेरी गाडी' या कॅप्शनखाली सकाळमध्ये प्रकाशित झाला आहे. अनेक वार्तांना पूरक असणारी छायाचित्रे संग्रहीत नावाने बातमीबरोबर प्रकाशित केली जातात. अशा प्रकारे कृषि छायाचित्रे वृत्तपत्रात मांडलेले असते हे अभ्यासावरून स्पष्ट होते.

## ४.१६ जाहिरात

आजचे युग हे जाहिरातींचे युग आहे असे म्हणता येईल. वृत्तपत्रातील जागा विकत घेऊन जाहिराती केल्या जातात. शेतीविषयक जाहिराती महत्त्वाचा घटक बनत आहे. सी.एल. बोसिंग यांच्या शब्दात Advertising is an art which creates demand for the Goods & Devices.[२२](सेवेकर, २००६, पृ.क्र. २) म्हणजेच वस्तू आणि सेवांसाठी मागणी निर्माण करणारी कला म्हणजे जाहिरात होय. शेतीविषयक जाहिरातींचा तपशील पुढे दिलेला आहे.

## तालिका: ४.१६

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जाहिरातींचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ७८.७५ | २४० | ०.०४ % | ०.१३ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ७४४ | ४० | ०.३६ % | ०.०१ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | २,२०० | ८४८ | ०.२३ % | ०.०८ % |
| | एकूण वार्ता | ३,०२२.७५ | १,१२८ | ०.२२ % | ०.०८ % |

## आकृती : ४.१६

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जाहिरातींचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



तालिका क्र. ४.१६ नुसार हे स्पष्ट होते की तिन्ही प्रकारच्या कालावधीत मिळून सर्वाधिक कृषि जाहिरातींचे प्रमाण दैनिक लोकमतमध्ये ०.२२ टक्के एवढे आहे. तर दैनिक सकाळने ०.०८ चौ.से.मी. जागा दिलेली आहे. दैनिक लोकमतच्या दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी UPL-Farmer First यांची फळांवर लेपन, बटाटा साठवण, धान्य साठवण, अन्न साठवण व अन्न संवर्धनाबाबत www.globalcitizen.in उल्लेख असलेली पूर्ण पानभर जाहिरात आहे तर दि. २ जानेवारी २०१७ रोजी 'अँड्रोन' या हरभऱ्याच्या किडीवर प्रतिबंध करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कीडनाशकाची आणि दि. १० मार्च २०१७ रोजी पान नंबर ९ वर 'महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या जाहिराती प्रकाशित झाल्या आहेत.

दैनिक सकाळमध्ये दि. १६ ऑक्टोबर २०१६ रोजी 'सेंद्रीय शेती आणि भाजीपाला लागवड', १७ ऑक्टोबर २०१६ ला 'Krishithon' यांचे नाशिक येथे भरणाऱ्या कृषिप्रदर्शनाची माहिती असलेली जाहिरात तर दि. २ नोव्हेंबर २०१६ च्या अंकात 'ॲग्रोवन दिवाळी २०१६' या जाहिराती शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या ठरतात. अनेक संस्था, उद्योजक, कंपन्या, शासन, विद्यापीठे, महामंडळे कृषिक्षेत्राशी संबंधित जाहिराती वृत्तपत्रांना देत असतात त्याचा उपयोग शेतकऱ्यांना होतो.

## ४.१७ कृषि यशकथा

कृषि क्षेत्रामधील यशकथांच्या बातम्या, लेख या शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणाऱ्या असतात. एखाद्या शेतकऱ्याने किंवा शेतकऱ्यांच्या गटाने केलेल्या विशिष्ट कार्यामुळे प्राप्त झालेले यश सगळ्यांच्या नजरेत भरते. असे यश मिळविण्यासाठी काय केले याची कथा म्हणजेच यशकथा. याबाबत सुनील माळी म्हणतात, या प्रकारच्या बातम्यांमुळे शेतकऱ्यांना हुरूप येतो. त्यांचे समाजातील स्थान उंचावते.[२३](माळी, २००८, पृ.क्र. २१३) कृषि यशकथांबाबत उपलब्ध माहिती पुढील तालिका क्र. ४.१७ मध्ये नोंदविली आहे.

### तालिकाः ४.१७

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि यशकथांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | १२३० | --- | ०.६९ % | --- |
| २ | आठवड्याच्या वार्ता | १,६६६.२५ | २०८ | ०.८२ % | ०.०९ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | २,१८९.५ | १,६६८ | ०.२२ % | ०.१६ % |
| | एकूण वार्ता | ५,०८५.७५ | १,८७६ | ०.३८ % | ०.१३ % |

### आकृती : ४.१७

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि यशकथांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



वरील तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, या प्रकारच्या बातम्यांना दैनिक लोकमतने एकूण ०.३८ टक्के म्हणजे ५,०८५.७५ चौ.से.मी. जागा दिली आहे. तर दैनिक सकाळने एकूण ०.१३ टक्के म्हणजे १,८७६ चौ.से.मी. जागा दिली आहे. लोकमतने दि. २ डिसेंबर २०१६ ला हॅलो पुरवणीत पान नंबर २ वर 'योग्य व्यवस्थापनातून फुलली तूर' आणि दि. २ मार्च २०१७ च्या मुख्य अंकात पान क्रमांक ५ वर ६७ लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळविणाऱ्या 'जिगरबाज शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर कंपनीला नमविले, सर्वोच्च न्यायालयात तब्बल २० वर्षे संघर्ष' या चांगल्या यशकथा म्हणता येतील.

दैनिक सकाळमध्ये दि. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दोन मंत्र्यांसह अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळातून समृध्दीकडे वाटचाल केलेल्या राळेगण सिध्दी व हिवरे बाजार येथील गावकरी, शेतकरी यांच्या सामुहिक यशाचे कौतुक केले. 'हिवरेबाजार ग्रामविकासाचे विद्यापीठ, सुधार मुनगंटीवार यांचे गौरवोद्गार; गाव शिवाराची पाहणी' आणि 'अण्णा जलसंधारणाचे गुरु, अर्थमंत्री; दोन मंत्र्यांसह राळेगणला भेट' या दोन्ही वार्तांना सकाळने ठळक प्रसिध्दी दिली आहे. तर ११ मार्च २०१७ ला सकाळने 'कोरडवाहू शेती झाली बागायती, पारनेर मध्ये '५ वर्षात ५०० हून अधिक शेततळी; फळबागा वाढल्या' ही इतर गावातल्या शेतकऱ्यांसाठी यशकथा प्रसिध्द केली आहे. या सर्वच कृषि यशकथा इतरांना प्रेरणा देत असतात.

## ४.१८ तक्रार/आंदोलनाच्या वार्ता

विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना वैयक्तिक किंवा सामुदायिकपणे वेगवेगळ्या प्रकारची आंदोलन करावे लागते. बऱ्याचवेळा यावरून शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल होतात. कधी शेतीमालाला भाववाढ मिळावी म्हणून रास्ता रोको आंदोलन तर कधी कर्जमाफी मिळावी म्हणून उपोषण, सत्याग्रह करताना शेतकरी दिसतात. याबाबत उपलब्ध माहिती पुढील तालिका क्र. ४.१८ मध्ये नोंदविली आहे.

## तालिका : ४.१८

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि तक्रार/आंदोलनाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | ३६ | १०४ | ०.०२ % | ०.०५ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | २,३५४ | १,९४२ | १.१६ % | ०.८८ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | १,३५५ | ६८५ | ०.१४ % | ०.०६ % |
| | एकूण वार्ता | ३,७४५ | २,७३१ | ०.२८ % | ०.१९ % |

## आकृती : ४.१८

### दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी कृषि तक्रार/आंदोलनाच्या वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



या तालिकेवरुन स्पष्ट होते की, शेतीमधील तक्रारी, आंदोलनांच्या बातम्यांना दैनिक लोकमतने ०.२८ टक्के तर दैनिक सकाळने ०.१९ टक्के जागा दिली आहे. दैनिक लोकमत मधील दि. १४ ऑक्टोबर २०१६ ची 'पुरंदरमधील हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा, विमानतळासाठी जागा देणार नाही', दि. २६ ऑक्टोबर २०१६ ची 'एकरकमी ३,२०० द्या; नसता हातात बुडका, ऊस परिषदेत दराचे रणशिंग आंदोलन', दि. ८ मार्च २०१७ 'मुंबई येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून मंत्र्यांच्या गाड्यांवर कांदे अन् तूर डाळीचा वर्षाव आंदोलन' तर दि. ९ मार्च २०१७ रोजीच्या प्रकाशित 'कुकडीच्या पाण्यासाठी धरणे आंदोलन', 'तुकाई चारीच्या मंजुरीसाठी बैठा सत्याग्रह, शेतकरी संघटनेचे कांदा फेको आंदोलन' या सर्व वार्ता शेतकऱ्यांच्या वेदना स्पष्ट करतात.

दैनिक सकाळ मधील दि. १८ ऑक्टोबर २०१६ ची चेन्नई येथील 'पाण्यासाठी शेतकऱ्यांचा रेल रोको, तामिळनाडूत मोठे आंदोलन ; विरोधी नेत्यासह २,००० जणांना अटक', दि. २० आक्टोबर २०१६ ची साईकृपा साखर कारखान्यासंबंधी 'साईकृपा कडील थकीत पैशांसाठी ऊस उत्पादकांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण ; ३८ कोटींची थकीत रक्कम' दि. २८ ऑक्टोबर २०१६ ची 'दुष्काळी अनुदानापासून अनेक शेतकरी वंचित ; उपोषणाचा इशारा', तर दि. १२ मार्च २०१७ ला शिर्डी येथे 'कर्जमाफीसाठी रास्ता रोको', 'शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी शिवसेनेचे घंटानाद आंदोलन', 'शेतकरी संघटनेचे नगरमध्ये मंगळवारी धरणे आंदोलन' या वार्ता शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे गांभीर्य स्पष्ट करतात.

## ४.१९ दुष्काळ

दुष्काळ म्हणजे वाईट काळ, दुष्काळ म्हणजे पाण्याची व त्यायोगे अन्नस्त्रोतांची अनुपलब्धता किंवा तीव्र टंचाई असलेला, अनेक महिन्यांचा वा वर्षाचा दीर्घ कालखंड होय. दुष्काळात अन्नपाण्याच्या अभावी माणसांसह बहुसंख्य सजीवांना प्राणसंकटास तोंड द्यावे लागते.[२४](Wikipedia.org, २०१८) सुका व ओला या पैकी सुका दुष्काळ मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतो. तालिका क्र. ४.१९ नुसार हे स्पष्ट होते की तीनही प्रकारच्या कालावधीत मिळून सर्वाधिक म्हणजे ३९४.७५ चौ.से.मी. जागा दैनिक सकाळमध्ये देण्यात आली आहे. तर दैनिक लोकमतने ७६६ चौ.से.मी. जागा दिलेली आहे.

**तालिका : ४.१९**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दुष्काळ विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एक दिवसीय वार्ता | --- | २६.२५ | --- | ०.०१ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | --- | ४२ | --- | ०.०१ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ७६६ | ३२६.५ | ०.०८ % | ०.०३ % |
| | एकूण वार्ता | ७६६ | ३९४.७५ | ०.०५ % | ०.०२ % |

**आकृती : ४.१९**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी दुष्काळ विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७




या अभ्यास काळात दैनिक लोकमतमधील दि. ५ ऑक्टोबर २०१६ च्या हॅलो पुरवणीत पान १ वर बारागाव नांदूर येथील 'ओला दुष्काळ सदृष्य परिस्थिती: बाजरी, तूर, कपाशी

संकटात', दि. ६ ऑक्टोबर २०१६ रोजी संभाव्य दुष्काळावर 'तहान लागल्यावरच विहीर खणू नका, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सुनावले', दि. २७ ऑक्टोबर २०१६ रोजी मागील वर्षीच्या भयंकर दुष्काळी पार्श्वभूमीवर नुकसान भरपाई प्रलंबित ठेवली जाते याबाबतची 'शेतकऱ्यांचे २९ कोटी पडून, महसूल प्रशासनाचा गलथान कारभार' या दोन्ही बातम्या दुष्काळाचा दाह व सरकारी अनास्था प्रकट करतात.

दैनिक सकाळमध्ये दि. ५ ऑक्टोबर २०१६ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त असलेल्या ५३ हजार ६०९ शेतकऱ्यांच्या बाबतीत 'रब्बीतील बाधितांसाठी अपेक्षित निधीचा प्रस्ताव पाठवा, राज्य सरकारचा जिल्हा प्रशासनाला आदेश', ११ ऑक्टोबर २०१६ ला संगमनेरहून 'दुष्काळ निवारण समिती गुरुवारपासून दौऱ्यावर', २ डिसेंबर २०१६ ची कोपरगाव येथील 'शेतकऱ्यांना प्रतीक्षा दुष्काळी अनुदानाची', तर १० मार्च २०१७ रोजीचा नागपूर येथून दुष्काळाबाबत उच्च न्यायालयाने 'दुष्काळ निधीच्या वितरणास विलंब का?' असा प्रश्न उपस्थित केल्याचे दिसते. एकंदरीत वृत्तपत्रे दुष्काळ या विषयावर जागरूक असतात हे या अभ्यासावरून स्पष्ट होते.

## ४.२० हवामान, पाऊस

संपूर्ण कृषि क्षेत्राचा डोलारा हवामान आणि पाऊस या दोन घटकांवर अवलंबून असतो. शेतात कोणते उत्पादन घ्यावे इथपासून तर ते कसे घ्यावे याचे आराखडे तज्ज्ञांना आखावे लागतात. भारतीय शेती मॉन्सूनवर आधारलेली आहे. पावसाच्या पाण्यावर खेळला जाणारा जुगार असाही उल्लेख या शेतीबाबत आढळतो. हवामान व पाऊस या अतिशय महत्त्वपूर्ण कृषि विषयक घटकाला सर्वाधिक जागा दैनिक सकाळने दिली आहे. हे प्रमाण ०.३५ टक्के म्हणजेच ४,९५४.५ चौ.से.मी. एवढे आहे. दैनिक लोकमत ने ०.३१ टक्के म्हणजेच ४,१७८ चौ.से.मी. जागा उपलब्ध केली आहे. माहिती पुढील तालिका क्र. ४.२० मध्ये नोंदविली आहे.

**तालिका : ४.२०**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी हवामान, पाऊस विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| अ.क्र. | कालावधी | देण्यात आलेली एकूण जागा | | (प्रमाण टक्के) | |
|---|---|---|---|---|---|
| | | दै. लोकमत | दै. सकाळ | दै. लोकमत | दै. सकाळ |
| १ | एकदिवसीय वार्ता | ३३० | --- | ०.१८ % | --- |
| २ | आठवड्याच्या वार्ता | ४५७ | --- | ०.२२ % | --- |
| ३ | महिन्याच्या वार्ता | ३,३९१ | ४,९५४.५ | ०.३५ % | ०.५० % |
| | एकूण वार्ता | ४,१७८ | ४,९५४.५ | ०.३१ % | ०.३५ % |

**आकृती : ४.२०**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी हवामान, पाऊस विषयक वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७



या कालावधीत दै. लोकमत मधील २ ऑक्टोबर २०१६ रोजी 'औरंगाबाद येथे पावसाचा कहर–मराठवाड्यात धुमाकूळ!' अहमदनगर येथे 'जिल्ह्यात सर्वदूर पाऊस, नेवासाफाटा येथे 'पावसामुळे धास्ती, जवळे येथे पावसामुळे पिकांचे नुकसान', १७ ऑक्टोबर २०१६ रोजीची हवामान खात्याच्या हवाल्याने पुणे येथून दिलेली 'मान्सूनची माघार देशातील नऊ विभागात यंदा कमी पाऊसमान,' ६ मार्च २०१७ ला नवी दिल्ली सूत्रांनुसार प्रकाशित 'अल निनोमुळे पावसाबद्दल यावर्षी काहीशी काळजी' आणि 'बंगळुरुत पाऊस पडावा म्हणून दोन मुलांचे लावले जाते लग्न' तर पुन्हा ९ मार्च २०१७ ला नवी दिल्लीच्या हवामान खात्याच्या सूत्रांनुसार प्रकाशित 'यंदा पावसाळ्यात 'अल निनो' नाही, विलंबाचे संकेत' अशा बातम्या प्रकाशित झाल्या.

'दैनिक सकाळ' मधील दि. २ ऑक्टोबर २०१६ ची पुणे येथील 'परतीच्या पावसाचे धुमशान, मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात दमदार हजेरी', ४ ऑक्टोबर २०१६ ला मुंबईहून 'मराठवाड्यात आता ओला दुष्काळ, पिकांचे पन्नास टक्के नुकसान', पुण्याहून 'राज्यात नऊ लाख हेक्टरवर नुकसान' जामखेड येथील 'आधी दुष्काळाने होरपळले, आता पावसाने झोडपले', श्रीरामपूर येथील 'श्रीरामपूर व बेलापूरमध्ये अतिवृष्टी', सिध्दटेक येथील 'आता पुरे झाला पाऊस' १७ ऑक्टोबर २०१६ ची पुणे येथील 'मॉन्सूनने घेतला महाराष्ट्राचा निरोप', २६ ऑक्टोबर २०१६ ची मुंबई सूत्रांनी दिलेली 'राज्यातील धरणांमध्ये ८३ टक्के पाणी, गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पट वाढ' या बातम्या प्रसिध्द केल्या गेल्या आहेत. दुष्काळानंतर पावसाने शेवटच्या टप्प्यात अनेक ठिकाणी जोरदार हजेरी लावल्याच्या सचित्र बातम्या मोठ्या प्रमाणात दोन्हीही वृत्तपत्रात दिसतात. या अभ्यासावरून सजीवांच्या जीवनाचा अत्यावश्यक असलेला हवामान हा घटक बराचसा उपेक्षित असल्याचे स्पष्ट होत आहे.

## ४.२१ जलसिंचन, जलसंवर्धन

पावसाच्या पाण्याव्यतिरिक्त पिकांना दिलेल्या पुरक पाण्याला जलसिंचन म्हणतात. विहीर, तलाव, उपसा, ठिबक, साठवण बंधारे आणि कालवे या प्रचलित प्रकाराद्वारे पाण्याचा वापर केला जातो. कोरडवाहू शेतीची जलसंवर्धनाच्या माध्यमातून सिंचन उपलब्धता वाढविण्यासाठी पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाते. अहमदनगर जिल्ह्यात विविध

प्रकल्पांतर्गत लघुपाटबंधारे, मध्यम प्रकल्प व मोठ्या प्रकल्पांमुळे सन २०१६–१७ मध्ये ६,५८,५०० हेक्टर इतके लाभक्षेत्र असून १,४४,०८० हेक्टर इतके ओलित क्षेत्र आहे.[२५](अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. ८) पावसानंतर सर्व भार या प्रकल्पांवर असल्याने शेती व शेतकऱ्यांसाठी या बातम्या महत्त्वाच्या असतात. जलसिंचन, जलसंवर्धन वार्तांचे उपलब्ध तपशील खालील तालिकेत दिलेला आहे.

**तालिका : ४.२१**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जलसिंचन, जलसंवर्धन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**


कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७

| **अ.क्र.** | **कालावधी** | **देण्यात आलेली एकूण जागा** | | **(प्रमाण टक्के)** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** | **दै. लोकमत** | **दै. सकाळ** |
| १ | एक दिवसीय वार्ता | ३५० | २,९३४.५ | ०.१९ % | १.६८ % |
| २ | आठवड्याच्या वार्ता | १२६ | ९४६ | ०.०६ % | ०.४३ % |
| ३ | महिन्याच्या वार्ता | २,३७७ | ४,१०७ | ०.२४ % | ०.४१ % |
| | एकूण वार्ता | २,८५३ | ७,९८७.५ | ०.२१ % | ०.५७ % |

**आकृती : ४.२१**

**दै. सकाळ व दै. लोकमतमधील प्रकाशित एकूण मजकुरापैकी जलसिंचन, जलसंवर्धन वार्तांचे चौ.से.मी. मध्ये प्रमाण**

कालावधी १/१०/२०१६ ते ३०/०३/२०१७




या तालिकेवरुन स्पष्ट होते की, जलसिंचन आणि जलसंवर्धनाच्या बातम्यांना सर्वाधिक स्थान दैनिक सकाळने दिलेले आहे. सकाळमध्ये या बातम्यांचे प्रमाण ०.५७ टक्के आहे. तर दैनिक लोकमतमध्ये जलसिंचन आणि जलसंवर्धनाच्या वार्तांचे प्रमाण ०.२१ टक्के एवढे आहे. दैनिक लोकमतमध्ये ८ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या अंकातील पान नंबर ३ वरील अहमदनगरचे मिलिंदकुमार साळवे यांनी सर्वाधिक पाण्याची उसावर उधळपट्टी होत असल्याने दिलेली 'उसाला थेंब थेंब पाणी, ३ लाख हेक्टर ठिबकाखाली',९ ऑक्टोबर २०१६ रोजीच्या अंकातील पान नंबर ६ वरील उस्मानाबादचे सुमेध वाघमारे यांनी दिलेली ठिबक सिंचनाद्वारे २ हजार हेक्टरवरील शेतीला लाभदायक ठरणारी 'इस्त्रायलच्या धर्तीवर महाराष्ट्रातील पहिला पथदर्शी प्रकल्प; पाईपलाईनद्वारे मिळणार शेतीला पाणी', २ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या

अंकातील ‘बंधाऱ्यामुळे सुटला पाणीप्रश्न’, ८ मार्च २०१७ रोजीच्या अंकातील ‘नाम’ फाऊंडेशन करणार जलसंधारणाची कामे’ या वार्ता जलसिंचनाचे महत्त्व स्पष्ट करतात.

दैनिक सकाळमध्ये १ ऑक्टोबर २०१६ रोजी पर्यावरण, सिंचन व जलविद्युत तज्ज्ञ राजेंद्र माहुलकर यांचा सिंचन पाणी व्यवस्थापनावरचा मानद संपादकीय लेख ’उदक चालवावे युक्ती‘, २ ऑक्टोबर २०१६ रोजी सप्तरंग पुरवणीत महेंद्र महाजन यांचा जलचेतना जागृतीबाबत जलतज्ज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या ’नीर–नारी–नदी संमेलन‘ वरील विशेष लेख जलसिंचन व जलसंवर्धनाचे महत्त्व स्पष्ट करतात. ८ ऑक्टोबर २०१६ ची सुपे येथील बातमीदाराची पारनेर तालुक्यातील भूगर्भातील पाणी स्थिती बाबत ’जलयुक्तचे परिणाम दिसू लागले’ , १० ऑक्टोबर २०१६ ची कर्जत येथे सकाळ रिलीफ फंड व तनिष्काच्या माध्यमातून ’नेटकेवाडीच्या बंधाऱ्यात ५० कोटी लिटर पाणी‘, १९ ऑक्टोबर २०१६ ची सोलापूर येथील प्रमोद बोडके यांची मुख्य अंकातील पान ७ वरील ’जलयुक्तने मिटवली दुष्काळाची चिंता‘, २४ ऑक्टोबर २०१६ ची नवी दिल्ली येथून ’सिंधू नदीवर जलदगतीने सिंचन प्रकल्पांची योजना, काश्मीरमधील २ लाख एकर क्षेत्राला फायदा’, सावळीविहीर येथील टुडे अंकातील पान ६ वरील ‘जलसंधारणामुळे झाली जलक्रांती’ आणि मुंबई येथील सिध्देश्वर डुकरे यांचा सकाळ विशेष मधील ‘जलयुक्त योजना प्रशासनाच्या जोखडातून मुक्त, गावकृती आराखड्यास मान्यता; तालुका पातळीवर स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष आमदार’, २९ ऑक्टोबर २०१६ ची टाकळी ढोकेश्वर येथील ‘नांदूर पठार गावाची पाणीटंचाईवर मात, शिरपूर पॅटर्नमुळे ५०० एकर क्षेत्राला फायदा!’, ३० ऑक्टोबर २०१६ ची टाकळी ढोकेश्वर येथील ‘जलसंधारणाची कामे झाल्याने, निवडूंगवाडी पाण्याबाबत स्वयंपूर्ण’ २ नोव्हेंबर २०१६ जळगाव येथून ‘सिंचनासाठी कर्जरोखे उभारणार’ आणि पुणतांबे येथील टुडे अंकातील पान ४ वरील ‘गोदावरी नदीवरील बंधारा भरला, रबी पिकांना फायदा’ या बातम्या महत्त्वाच्या ठरतात.

संशोधन कालावधीतील तिन्ही प्रकारच्या वार्तांमध्ये दैनिक सकाळने जलसिंचन आणि जलसंवर्धनाच्या बातम्यांना मोठी जागा देऊन या विषयाचे महत्त्व अधोरेखित तर केले आहेच पण त्याचबरोबर सकाळ रिलिफ फंडाद्वारे सक्रीय पुढाकार घेतल्याने गावकऱ्यांचा उत्साह वाढविला आहे.

## ४.२२ घटकनिहाय अनुमान

आशय विश्लेषण केल्यानंतर समोर आलेल्या तथ्यांच्या आधारे पुढील अनुमाने काढण्यात आली आहेत.

०१) पीक वार्ता हा कृषि पत्रकारितेचा महत्त्वाचा आधार होय. रबी, खरीप, उन्हाळी पीक वार्तांना महत्त्व असते. पाणी, खते, योग्य मशागत अशी सर्व प्रकारची काळजी घेणाऱ्या शेतकऱ्याच्या हाती पीक का लागत नाही याचे उत्कृष्ठ उदाहरण म्हणून 'सहा एकरातील सोयाबीन शेंगाविना' ही शेतकऱ्याच्या नुकसानी बाबतची माहिती उत्तम उदाहरण सांगता येईल.

०२) रोगराई, खत, बियाणे वार्ता या महत्त्वाच्या वार्ता ठरतात. या अभ्यासावरून शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत असते. शेतीमधील पीक पेरणीच्या वेळी बी-बियाण्यांची आवश्यकता असते. यातही फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. रोगराईवर कोणते उपाय योजावेत यालाही महत्त्व आहे. पाचरट जाळण्याकडे कल, बहुमोल खताची राख यातून शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारची माहिती मिळत असल्याचे उदाहरण म्हटले पाहिजे.

०३) कृषि पूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योगांच्या वार्ता म्हणजे वृत्तपत्रांचा जाहिरातदार वर्ग. अहमदनगर जिल्ह्यातून प्रकाशित होणाऱ्या सर्वच दैनिकांत ऊस या नगदी पिकावर आधारीत साखर उद्योगाच्या बातम्या मोठ्या प्रमाणात असतात. सहकारी साखर कारखानदारीची मातृभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या जिल्ह्यात सहकार, राजकारण व अर्थकारणाचे केंद्रबिंदू असल्याने या उद्योगांचे स्पष्ट प्रतिबींब वृत्तपत्रांमध्ये देखील उमटल्याचे दिसून येते. दूध हा देखील मोठ्या प्रमाणात सहकारी तत्त्वावर राबविला जाणारा उद्योग आहे. तर शेळी, मेंढी, कोंबडी पालन ही जोडधंदे शेतकरी वैयक्तिक तथा खाजगी पातळीवर मोठ्या प्रमाणात करतात.

०४) पणन व बाजारभाव वार्ता या घटकामध्ये सर्वाधिक जागा दैनिक लोकमतने दिली आहे. 'खासगी कापूस केंद्राचे पेव, मनमानी भावाने शेतकऱ्यांची लूट' होत असल्याची बातमी वृत्तपत्रांची शेतकऱ्यांप्रती जागरुकता निदर्शनास आणतात. या प्रकारच्या बातम्यांमुळे गैर प्रकारांना वचक बसण्यास मदत होते. अशा प्रकारच्या बातम्यांमुळे शेतकऱ्यांना मदत होते.

०५) कृषि विद्यापीठातील वार्तांमुळे विद्यापीठात होणारे संशोधन तसेच विविध कार्यक्रमातून शेतकऱ्यांना माहिती मिळत असते. वर्षभरात पीकांवर पडणारी रोगराई, नवीन रोग, कीड यावर कोणते उपाय करावेत याचीही माहिती विद्यापीठातून वेळोवेळी प्रसारीत केली जाते. त्यामुळे वृत्तपत्रातील या वार्तांना विशेष महत्त्व आहे. तिन्ही प्रकारच्या कालावधीत मिळून कृषि विद्यापीठातील वार्तांना सर्वाधिक म्हणजे १,३७८ चौ.से.मी. जागा दैनिक लोकमत मध्ये देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या चाऱ्याचा वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारित अशा प्रकारची बातमी प्रकाशित केली हे उत्तम उदाहरण होय.

०६) शेतकरी आत्महत्यांच्या बातम्यांमुळे सामाजिक व आर्थिक परिस्थितीचे भीषण वास्तव उभे राहिले आहे. अनेक प्रकारचे अभ्यास विविध समित्यांनी करुन सरकार समोर ठेवले आहे. कर्जबाजारीपणा व नापिकी ही दोन प्रमुख कारणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमागे सांगितल्याचे पुढे आल्याने सरकार त्यावर विविध प्रकारच्या उपाययोजना करीत आहे. दैनिक सकाळमध्ये तिन्ही प्रकारच्या कालावधीत मिळून सर्वाधिक जागा दिलेली आहे. सकाळने जगाचा पोशिंदा मरतोय ही शोकांतिका असा ठळक मथळा करीत १६० चौ.से.मी. जागेत मजकूराला स्थान देत विषयाचे गांभिर्य स्पष्ट केल्याचे दिसते.

०७) शेतीमध्ये लेख, अग्रलेखामधून हमीभाव कृषि विकासासाठी जागा दिली जाते. मानव निर्मित व नैसर्गिक संकटावर लेख प्रकाशित केले जात आहेत. हमीभाव, ऊसाचे गाळप, कर्जमाफी, कृषिमालाचे भाव या विषयांना वृत्तपत्रे जागा देत आहेत. गाळपाचा तेरावा महिना, कर्जमाफीची काडी नि कोंडी हे संपादकीय लेख उत्तम उदाहरण म्हणून सांगता येईल.

०८) छायाचित्रे कृषि विकासाला उत्तेजन देतात. वृत्तपत्रे विविध विषयांवर छायाचित्रे प्रकाशित करतात. अनेक बातम्यांमध्ये पूरक संग्रहित असलेली छायाचित्रे बातमीत प्रकाशित करतात. शेतातील बोअरवेलमधून १०० फूट उंचीचे पाणी आणि तालुक्यात पिके आणि रस्तेही पाण्याखाली ही चांगल्या छायाचित्राचे उदाहरण म्हणून पाहता येतील.

०९) शेतीच्या जाहिराती कृषि विकासासाठी पोषक वातावरण करतात. वृत्तपत्रातील जागा विकत घेऊन अनेक प्रकारच्या उत्पादनांच्या व कृषि प्रदर्शनाच्या जाहिराती केल्या जात

आहेत. नाशिक येथे भरणाऱ्या कृषिप्रदर्शनाची माहिती असलेली जाहिरात हे महत्त्वाचे उदाहरण म्हटले पाहिजे.

१०) कृषि क्षेत्रातील यशकथांच्या बातम्या, लेख वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना हुरुप येतो व शेतीमधील कामे जोमाने करतात. शेतकरी कौतुक किंवा सत्कारामुळे शेतीमध्ये नवीन प्रयोग करण्यासाठी उद्युक्त होतात. जिगरबाज शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर कंपनीला नमविले, सर्वोच्च न्यायालयात तब्बल २० वर्षे संघर्ष आणि कोरडवाहू शेती झाली बागायती या बातम्या वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आल्या हे त्याचे चांगले उदाहरण म्हणता येईल.

११) शेतकऱ्यांच्या ज्या समस्या निराकरण होत नाही त्याबाबतीत तक्रार/आंदोलनाच्या वार्ता प्रकाशित झाल्या आहेत. विविध कारणांमुळे शेतकऱ्यांना वैयक्तिक किंवा सामुदायिकपणे वेगवेगळ्या प्रकारची आंदोलन करावे लागले आहेत. यातून शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले आहेत. शेतीमालाला भाववाढ मिळावी म्हणून रास्ता रोको आंदोलन तर कधी कर्जमाफी मिळावी म्हणून उपोषण, सत्याग्रह करताना बातम्यांना प्रसिध्दी मिळाली आहे तर मंत्र्यांच्या गाड्यांवर कांदे अन् तूर डाळीचा वर्षाव आंदोलन या बातमीतून चीड व्यक्त केल्याचे दिसते.

१२) दुष्काळावरच्या बातम्यांना वृत्तपत्रे प्राधान्याने स्थान देत आहेत. पाणी व अन्न यावाचून मनुष्याचे, जनावरांचे होणारे हाल वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आले आहे. अतिवृष्टीने ओला दुष्काळ तर कधी पावसाच्या अभावाने कोरडा दुष्काळ, विलंबाने मिळणारी दुष्काळी मदत, पाण्याअभावी नागरिकांचे होणारे स्थलांतर, जनावरांच्या छावण्या यासह अनेक वार्ता वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आल्या आहेत. यावर कळस म्हणजे तहान लागल्यावरच विहीर खणू नका, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सुनावले तर मागील वर्षीच्या भयंकर दुष्काळी पार्श्वभूमीवर नुकसान भरपाई प्रलंबित ठेवली जाते याबाबतची शेतकऱ्यांचे २९ कोटी पडून, महसूल प्रशासनाचा गलथान कारभार या दोन्ही बातम्या उत्तम उदाहरण होय.

१३) कृषि क्षेत्राचे अविभाज्य अंग म्हणजे हवामान व पाऊस या घटकातील वार्तांना कृषि पत्रकारितेत महत्त्वाचे स्थान दिले जाते. कमी–अधिक पडणारा लहरी, अवकाळी, परतीचा

अथवा नुकसानीचा असा सर्वच प्रकारच्या पावसाच्या वार्ता प्रकाशित करण्यात आल्या. हवामान खात्याचे खरे खोटे ठरणारे विविध प्रकारचे अंदाजविषयीच्या बातम्यांना स्थान दिले आहे. 'पावसाचा कहर–मराठवाड्यात धुमाकूळ', अहमदनगर येथे 'जिल्ह्यात सर्वदूर पाऊस', नेवासाफाटा येथे 'पावसामुळे धास्ती, यंदा पावसाळ्यात अल निनो नाही', विलंबाचे संकेत अशा बातम्या प्रकाशित झाल्या.

१४) जलसिंचन, जलसंवर्धनाच्या वार्तांना कृषि पत्रकारितेमध्ये महत्त्वाचे स्थान दिले जाते. वर्तमानपत्रे पाणी आडवा व पाणी जिरवा याबाबतीत पुढाकार घेताना दिसतात. विहीर, तलाव, उपसा, ठिबक, साठवण बंधारे, धरणे आणि कालवे या सर्वच बातम्या प्रसिध्द करताना दिसतात. संशोधन कालावधीतील तीनही प्रकारच्या वार्तांमध्ये दैनिक सकाळने जलसिंचन आणि जलसंवर्धनाच्या बातम्यांना मोठी जागा देऊन या विषयाचे महत्त्व अधोरेखित तर केले आहेच पण त्याचबरोबर सकाळ रिलीफ फंडाद्वारे सक्रीय पुढाकार घेतल्याने गावकऱ्यांचा उत्साह वाढविला आहे.

## ४.२३ समारोप

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेमुळे विकासाला गती मिळत आहे. शेतीतल्या विविध विषय घटकांना स्थान दिले जात आहे. तरीही पुरेशी व सखोल अशा कृषि वार्ता दिसत नसल्याचे जाणवते. आगामी काळात कागद, छपाई, वितरण यासारख्या अनेक प्रकारच्या अडचणींवर मात करुन नवी वाटचाल करताना कृषि पत्रकारिता आणखी समृध्द आणि व्यापक करण्याची गरज आहे. या सर्व प्रश्नांचा विचार केल्यास आणखी प्रयत्न गरजेचे आहेत तरच हे चित्र बदलू शकेल. स्वातंत्र्यानंतरच्या काही योजनांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान व राहणीमान उंचावले आहे. परंतु सर्वांचेच नाही. कृषि पत्रकारितेचे घटकनिहाय महत्त्व या अभ्यासावरून लक्षात आले आहे.

## ब) शेतकरी वर्गाचे सर्वेक्षण

### ४.२४ प्रस्तावना

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेमुळे विकासाचा आलेख वाढत आहे. शेतीतल्या विविध घटकांना स्थान दिले जात आहे. संवाद झाल्याशिवाय कुठल्याही बाबीचा विकास होऊ शकत नाही आणि संवादाशिवाय शेतकरी भूमिका घेऊन त्या भूमिकेवर ठाम राहू शकत नाही या बाबत केवल कुमार म्हणतात की, विचार कल्पना आणि भावना तळागळातील शेतकऱ्यांपर्यंत किंवा जनतेपर्यंत पोहचविणे म्हणजे संवाद करणे होय.[२६](केवलकुमार, १९९४, पृ.क्र. ३)

हरितक्रांतीमुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली आहे. तसेच वृत्तपत्रांच्या माध्यमातून शेतीविषयक माहिती तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांचा विकास होत गेला. २१ व्या शतकात संवाद क्रांतीमुळे जगाला एका खेड्याचे स्वरुप प्राप्त झाले. ‘वर्ल्ड इज ए ग्लोबल व्हिलेज’ हे विश्वची माझे घर मार्शल मॅकलुहान यांच्या विधानाचे सत्य पटते.[२७](धारुरकर, १९७४, पृ.क्र. ९) जनसंवादाच्या माध्यमाने जवळ आले आहे. त्यामुळे विचारांची देवाण–घेवाण करता येते. त्यामुळे कृषी संवादामध्ये शेतकऱ्यांची भूमिका दिसून आलेली आहे.

प्रकरणाच्या या भागात कृषि संवादामध्ये आजच्या वर्तमानपत्रांची भूमिका काय आहे? शेतकऱ्यांचे प्रश्न कोणते आहेत, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे कारण काय? शेतकऱ्यांच्या समस्यांना वर्तमानपत्रे पुरेशी जागा देतात का? सरकारी मदत शेतकऱ्यांना मिळते का? बाजारभाव, हवामान, पाणी, कर्जफेड या बाबतीत शेतकऱ्यांचे काय म्हणणे आहे आणि वृत्तपत्रांकडून त्याच्या काय अपेक्षा आहेत आदि विविध यादृष्टीने सर्वेक्षणाद्वारे तीनशे शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे.

### ४.२५ वृत्तपत्रांचा कृषि संवाद

आजच्या परिस्थितीमध्ये कृषि या शब्दाचा अर्थ व्यापक झालेला आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी कृषिप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. कारण उपजीविका व रोजगार यासाठी फार मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या कृषि क्षेत्रावर अवलंबून आहे. सद्यस्थितीत शेतीवर

अवलंबून असलेली लोकसंख्या ५२ टक्के आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात स्थूल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये कृषि क्षेत्राचा वाटा आढळत नाही ही वस्तुस्थिती दिसून येते.[२८] (कदम आणि गावडे, २०१३, पृ.क्र. १४) त्यामुळे कृषि पत्रकारितेला आगळे वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. शेती विकासाची जाणीव भाषिक वृत्तपत्रांद्वारे होऊ शकते.

कृषिचा व्यवहार, कार्य सुरु राहण्यासाठी कृषि संवाद करणे आवश्यक असते. हा संवाद करणे म्हणजे संकेत चिन्हांचा समुदाय, समुह असतो. या माध्यमाद्वारे कृषि संवाद साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. दुसऱ्या व्यक्तीकडील माहिती, विचार, भावना, श्रद्धा, हेतू वर्तनात बदल घडवून आणणे म्हणजे संवादाचे कार्य होय. समाजातील प्रत्येकजण आपल्या हेतूनुसार बदल घडवू इच्छिणारी एक व्यक्ती असते. त्याचवेळी दुसरी एखादी व्यक्ती देखील संवादकार्य घडवून आणू शकते. संवादाच्या कार्याचा संबंध संवादाच्या फल निष्पत्तीशी असतो. संवाद व्यवहाराच्या निरीक्षण, अभ्यासावरून या बाबी लक्षात येतात.[२९] (पवार, २०००, पृ.क्र. ३)

कृषि वृत्तपत्राच्या संवादामुळे शेतीचा विकास काही प्रमाणात झालेला आहे. एकविसाव्या शतकात ग्रामीण भागात सर्वच ठिकाणी कृषि वृत्तपत्र पोहचत नाही. यावेळी तीनशे शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतलेली आहे. यामध्ये ४५ टक्के शेतकरी शेतीविषयक वृत्तपत्राचे वाचन करतात तर उर्वरीत ५५ टक्के शेतकरी कृषिविषयक वृत्तपत्र वाचनापासून दूर आहेत. यामुळे प्रसारमाध्यमांची भूमिका चिकित्सक स्वरुपात समजून घेणे आणि मांडणे अगत्याची बाब आहे. राजकारणाच्या पलिकडे जाऊन शेतीचा मागोवा घेतला पाहिजे. शेतकरी दुःखी, कष्टी, नाराज, दारिद्र्यामध्ये दिसून येतो. या बाबीचा विचार गांभीर्याने व्हायला पाहिजे.

### ४.२६ शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणाची उद्दिष्ट

१ कृषि पत्रकारितबद्दल प्रत्यक्ष शेती क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या शेतकऱ्यांशी चर्चा करूनच याची इत्यंभूत माहिती संकलित होऊ शकते. उत्तरदात्या शेतकऱ्याचे शिक्षण, कुटुंबातील सदस्य, वयोगट आर्थिक स्तर आदी प्रकारची सर्वसाधारण माहिती मिळणे महत्त्वाचे होते.

२ वेगवेगळ्या प्रकारच्या कृषि वार्तांना मुद्रित प्रसारमाध्यमांद्वारे कसे व कोणते स्थान दिले जाते. कृषि वार्तांकनामुळे शेती व्यवसायाची वाढ होते का? तसेच यात मराठी वृत्तपत्रांचे

योगदान व जागरुकता आहे का? यादृष्टीने सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा करण्यासाठी सर्वेक्षण करणे आवश्यक होते.

३ मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन विषयाच्या दृष्टीने कृषि पत्रकारिता योग्य दिशेने सुरु आहे का? शेतीक्षेत्रातील प्रत्यक्ष कार्यरत शेतकऱ्याला कोणत्या प्रकारचे मुद्रित माध्यम वाचायला जास्त आवडते व शेतीमधील कोणत्या विषयाचे लेखन आवडते याची सर्वसमावेशक माहिती संग्रहित करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण घेणे आवश्यक होते.

४ कृषि पत्रकारितेबद्दल शेतकऱ्यांचे आणखी काय म्हणणे आहे? पाणी, बाजारभाव, हवामान बदल यासह ते आणखी काय उपाय व सुचना सुचवू इच्छितात? या दुष्टिकोनातून सर्वेक्षणाद्वारे माहिती घेणे गरजेचे होते.

### ४.२७ सर्वेक्षणाचा अहवाल

या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील तीनशे शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे. सर्वेक्षणाचा कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९ असा आहे. या प्रश्नावलीमध्ये ३५ प्रश्न मांडण्यात आले आहेत. या प्रश्नावलीमुळे सर्वच शेतकरी किमान दहा मिनिटे तरी वृत्तपत्र वाचत असल्याचे स्पष्ट झाले असून ९५ टक्के शेतकऱ्यांच्या मते कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होते.

या प्रश्नावलीमध्ये अ, ब, क, ड, इ, ई असे सहा गट तयार करण्यात आलेले आहेत. या प्रश्नावलीमध्ये थेट शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हात घालून त्यांना बोलते केले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावलीमुळे कृषि जागृती, मराठी वृत्तपत्रांचे योगदान, शेती व शेतकऱ्यांबद्दल माहिती, नवा मजकूर, पुरेशी जागा, महत्त्वाचा विषय, कर्जफेड, बाजारभाव, हवामान बदल, सरकारी मदत, कृषि विद्यापीठाचा उपयोग, कृषि पत्रकारितेतील समस्या आदि बाबी समोर आल्या आहेत. कृषि पत्रकारितेचा कितपत फायदा होतो याचाही अभ्यास करण्यात आला आहे. या सर्वेक्षणावरुन शेतकऱ्यांची भूमिका स्पष्ट झाली आहे.

## अ) सर्वसाधारण माहिती

### ४.२८ उत्तरदात्यांचा वयोगट

वयोगट हा सामाजिक पाहणीमध्ये महत्त्वाचा पैलू असतो. वयाबाबत सुरेंद्रकुमार शर्मा म्हणतात वय हा सामाजिक स्तरीकरणाचा आधार होय.[३०](घाटोळे, २००५, पृ.क्र. २४) या पार्श्वभूमीवर उत्तरदात्यांचा वयोगट तपासला असता पुढील माहिती समोर आली आहे.

**तालिकाः ४.२८**

**शेतकरी उत्तरदात्यांचा वयोगट**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वयोगट | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २० ते ४० वर्षे | ९१ | ३०.३३ |
| २ | ४१ ते ६० वर्षे | १८२ | ६६.६६ |
| ३ | ६१ ते ७० वर्षे | २७ | ९ |

या तालिकेवरून असे स्पष्ट दिसते की, २० ते ४० या वयोगटातील ३० टक्के उत्तरदाते, तर ४१ ते ६० मध्ये ६० टक्के तर ६१ ते ७० या वयोगटात ९ टक्के शेतकरी शेतामध्ये काम करीत असतात. याचा अर्थ असा की, ४१ ते ६० या वयोगटातील सर्वाधिक उत्तरदाते शेतीमध्ये काम करीत असतात. हे अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे.

### ४.२९ उत्तरदात्यांचा धर्म

भारतीय समाज हा धर्म व जातीने विभागलेला असून त्याची पाहणी करताना धार्मिक प्रवाह लक्षात घ्यावे लागतात. प्रा. जी. एस. धुर्ये यांच्या मते धार्मिक विविधता हे भारतीय समाजाचे लक्षण आहे.[३१](घुर्ये, १९३२, पृ.क्र. १) हे सूत्र लक्षात घेऊन समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याची माहिती पुढे दिलेली आहे.

**तालिकाः ४.२९**

**शेतकरी उत्तरदात्यांचा धर्म**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | धर्म | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हिंदू | २७५ | ९१.६६ |
| २ | बौध्द | ६ | २ |
| ३ | मुस्लिम | १२ | ४ |
| ४ | ख्रिश्चन | ७ | २.३३ |

**आकृती ः ४.२९**

**शेतकरी उत्तरदात्यांचा धर्म**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, उत्तरदात्यांपैकी २७५ हे हिंदू धर्माचे आहे. त्यानंतर मुस्लिम ४ टक्के तर बौध्द २ टक्के आणि ख्रिश्चन २.३३ टक्के एवढे आहेत. सर्वाधिक हिंदू धर्मातील लोक शेती हा व्यवसाय करतात. तर सर्वात कमी बौध्द धर्मातील लोक शेती हा व्यवसाय करतात. हे अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे.

## ४.३० उत्तरदात्यांची जात

समाजशास्त्रीय अभ्यासात धर्म या प्रमाणे जात व पोटजात हा सुध्दा अभ्यासाचा महत्त्वाचा घटक आहे. लेनीनच्या मते शेतकऱ्यांचे वर्गीय विश्लेषण करण्यासाठी त्यांच्या जात व व्यवसायाचा विचार करावा लागतो.[३२](गुरुसॅमी, १९९५, पृ.क्र. १३) हे सूत्र लक्षात घेऊन समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्याची माहिती पुढे दिलेली आहे.

**तालिका : ४.३०**

**शेतकरी उत्तरदात्यांची जात**


एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९

| अ.क्र. | जात | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठा | १३५ | ४५ |
| २ | माळी | ६१ | २०.३३ |
| ३ | धनगर | २९ | ९.६६ |
| ४ | वंजारी | ०७ | २.३३ |
| ५ | महार | २२ | ७.३३ |
| ६ | इतर हिंदू जाती | २१ | ७ |
| ७ | इतर धर्म | २५ | ८.३३ |

आकृती : ४.३०

**शेतकरी उत्तरदात्यांची जात**

एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९




या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे १३५ उत्तरदाते मराठा या जातीतले असून त्यांचे प्रमाण ४५ टक्के इतके आहे. त्यानंतर माळी २०.३३ टक्के, धनगर ९.६६ टक्के, वंजारी २.३३ टक्के, महार ७.३३ टक्के, इतर ७ टक्के असे प्रमाण आहे. मराठा आणि माळी समाजाचे शेती करण्यात प्राबल्य असल्याचे स्पष्ट होते.

## ४.३१ उत्तरदात्यांचे शिक्षण

शिक्षण हा सामाजिक पाहणीतील एक महत्त्वाचा घटक होय. शिक्षणामुळे उत्तरदात्यांचे जीवन कसे आहे ते लक्षात येण्यास मदत होते. गुरुसॅमी यांच्या मते शिक्षणामुळे सहकार, अर्थ, व्यवसाय याबाबतीत एक नवा दृष्टीकोन विकसित होतो.[33](कित्ता, पृ.क्र. ९३) या पाहणीतील उत्तरदात्यांच्या शिक्षणाचा तपशिल पुढे दिला आहे.

**तालिकाः ४.३१**

**शेतकऱ्यांचे शिक्षण**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | जात | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सातवीपर्यंत | १६८ | ५६ |
| २ | सातवी ते दहावी | ६८ | २२.६६ |
| ३ | दहावी ते बारावी | २२ | ७.३३ |
| ४ | बारावी ते पदवी | २९ | ९.६६ |
| ५ | पदवी ते पदव्युत्तर | १३ | ४.६६ |
| ६ | निरक्षर | ० | -- |

**आकृती : ४.३१**

**शेतकऱ्यांचे शिक्षण**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक म्हणजे १६८ उत्तरदाते हे सातवीपर्यंत शिकलेले आहेत. हे प्रमाण ५६ टक्के एवढे प्रमाण आहे. सातवी ते दहावी २२.६६ टक्के, दहावी ते बारावी ७.३३ टक्के, बारावी ते पदवीपर्यंत ९.६६ टक्के, पदव्युत्तर ४.६६ टक्के एवढे प्रमाण आहे. याचा अर्थ असा की, पहिली ते सातवी पर्यंत शेती करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. तर सर्वांत कमी पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांचा अभाव आहे.

## ४.३२ शहरी, ग्रामीण वर्गीकरण

उत्तरदाते कुठल्या भागात राहतात याला सामाजिक पाहणीत महत्त्व असते. त्यावरुन त्याची परिस्थिती लक्षात येते. प्राध्यापक बा. भा. पाटील यांच्या मते संशोधकाला आपल्या निष्कर्षाची व्यापकता जेवढी असावी असे वाटते. तेवढ्या प्रमाणात अभ्यास विषयातील घटकांशी संबंध संशोधकाने प्रस्थापित करावयास हवा.[३४](पाटील, २००६, पृ.क्र. १४२) या पार्श्वभूमीवर येथे उत्तरदात्यांचे शहरी व ग्रामीण असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते पुढील तालिकेत दिसले आहे.

**तालिका : ४.३२**

**शेतकऱ्यांचे राहण्याचे ठिकाण**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | भागाचे नाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शहरी | ५३ | १७.६६ |
| २ | ग्रामीण | २४७ | ८२.३३ |

उपरोक्त तालिकेवरून स्पष्ट होते की, ८२.३३ टक्के शेतकरी हे ग्रामीण भागात तर १७.६६ टक्के शेतकरी शहरात राहातात. याचा अर्थ असा की, ग्रामीण कृषक उत्तरदात्यांचे प्रमाण अधिक आहेत. ग्रामीण भागामध्ये राहून शेतकरी शेती करीत असल्याचे अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे.

### ४.३३ उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या

उत्तरदात्याच्या कुटुंबात किती सदस्य राहातात? किती जणांचे पोषण त्याच्यावर अवलंबून आहे? संयुक्त की विभक्त कुटुंब पदध्ती त्यावरुन त्याची परिस्थिती लक्षात येते. उत्पन्न आणि खर्चाची सांगड याचा अंदाज यातून येऊ शकतो. लोकसंख्या हा घटक सुक्ष्म नियोजनात विकासाच्या संदर्भात महत्त्वाचा आहे. याबाबत डॉ. वि. ल. धारुरकर म्हणतात, सुक्ष्म नियोजन हे थेट लोकसहभाग वाढविणारे लोक रेषा अर्थशास्त्र आहे. त्यात लोकजीवन बदलण्याचे सामर्थ्य असते हे लक्षात घेऊन विकास प्रकल्पांची रचना मांडणी व कार्यान्वयन यात बदल घडविले तरच परिवर्तन शक्य आहे.[३५](धारुरकर, २०१२, पृ.क्र. १२१) या पार्श्वभूमीवर येथे उत्तरदात्यांचे कुटुंबातील सदस्य संख्येनुसार वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते पुढीलप्रमाणे आहे.

**तालिका : ४.३३**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | सदस्य संख्या | कुटूंब | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २ ते ४ | १८४ | ६१.३३ |
| २ | ४ ते ६ | ४७ | १५.६६ |
| ३ | ६ ते १० | ४० | १३.३३ |
| ४ | १० पेक्षा जास्त | २९ | ९.६६ |

**आकृती : ४.३३**

**उत्तरदात्यांच्या कुटुंबातील सदस्य संख्या**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, २ ते ४ सदस्यसंख्या असलेली सर्वाधिक कुटूंब आहेत. त्यांची संख्या १८४ असून प्रमाण ६१.३३ टक्के एवढे आहे. त्यानंतर ४ ते ६ सदस्यसंख्या असलेली १५.६६ टक्के, ६ ते १० सदस्यसंख्या असलेली १३.३३ तर १० पेक्षा जास्त सदस्यसंख्या असलेली ९.६६ टक्के कुटूंब आहेत.

## ४.३४ उत्तरदात्यांच्या मुलांचे/पाल्याचे शिक्षण

शेतकऱ्याच्या कुटुंबातील मुलांचा शिक्षणाचा स्तर काय आहे. त्याची मुले कोणत्या इयत्तेत शिक्षण घेतात. हादेखील महत्त्वाचा प्रश्न आहे. किती मुलांचे शिक्षण त्याच्यावर अवलंबून आहे? त्यावरून त्याची व मुलांची शिक्षणाबद्दलची मानसिकता व परिस्थिती लक्षात येते. शिक्षणाबाबत प्रा. वा. भा. पाटील म्हणतात सामाजिक सर्वेक्षणात लोकसंख्येचा अभ्यास केला जातो यामध्ये लोकसंख्येचा वैज्ञानिक दृष्टीने अभ्यास करणाऱ्या लोक विज्ञानाची मदत घेतली

जाते.[३६](पाटील, २००६, पृ.क्र. १४१) या पार्श्वभूमीवर येथे उत्तरदात्यांचे कुटुंबातील मुलांचे शिक्षण किती आहे यासाठी वर्गीकरण करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे आहे.

**तालिकाः ४.३४**

**शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | मुलांचे शिक्षण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सातवीपर्यंत | १२ | ४ |
| २ | सातवी ते दहावी | २८ | ९.३३ |
| ३ | दहावी ते बारावी | १७८ | ५९.३३ |
| ४ | बारावी ते पदवी | ४२ | १४ |
| ५ | पदव्युत्तर | १७ | ५.६६ |
| ६ | व्यावसायिक पदवी | २३ | ७.६६ |

**आकृती : ४.३४**

**शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



वरील तालिकेवरून हे स्पष्ट होते की, दहावी ते बारावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांची कुटूंब संख्या सर्वाधिक आहे. त्यांची संख्या १७८ असून प्रमाण ५९.३३ टक्के एवढे आहे. त्यानंतर बारावी ते पदवी शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १४ टक्के, सातवी ते दहावीत शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९.३३ टक्के, व्यावसायिक पदवी शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ७.६६ टक्के, पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ५.६६ टक्के तर पहिली ते सातवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ४ टक्के आहे. सर्वच शेतकरी मुलांच्या शिक्षणाबद्दल जागरुक असल्याचे स्पष्ट होते.

## ब) वृत्तपत्र वाचनाच्या सवयी

## ४.३५ वृत्तपत्रांचे नियमित वाचन

वाचनाच्या सवयी या विकासासाठी योग्य प्रेरणा निर्माण करतात. शेतकरी वर्ग कशाचे वाचन करतात हा महत्त्वाचा मुद्दा आहे. स्वातंत्र्यापूर्वी निरक्षर असलेला शेतकरी २१ व्या शतकामध्ये साक्षर झालेला आहे. तो नुसता साक्षर झाला नसून तो नवीन ज्ञान, माहिती वाचनाबद्दल जागरुक आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या मते शेतकऱ्यांच्या अगतिकतेचे मूळ त्यांच्या अज्ञानात आहे. याबाबत त्यांनी म्हटले आहे की विद्येविना गती गेली, मती विना नीती गेली, नीती विना गती गेली,गती विना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.[३७](पांढरे, २००९, पृ.क्र. १८) या संदर्भात वृत्तपत्राच्या नियमित वाचन सवयीबाबत प्रश्न विचारला असता पुढील माहिती उपलब्ध झाली.

**तालिका : ४.३५**

**वृत्तपत्रे नियमित वाचन**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वृत्तपत्राचे वाचक | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | होय | १०० |
| २ | नाही | ०० |

या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की १०० टक्के उत्तरदात्यांनी वृत्तपत्र नियमित वाचन असल्याचे प्रतिपादन केले आहे. याचा अर्थ सर्वच शेतकऱ्यांना वृत्तपत्र नियमित वाचण्याची सवय आहे. कृषि विषयक माहिती ते वृत्तपत्रातून मिळवतात.

## ४.३६ विशिष्ट वृत्तपत्रांचे वाचन

वाचक आवड आणि विशिष्ट हेतूने वृत्तपत्रे वाचतात. शेतकरी माहिती मिळण्यासाठी कोणत्या वृत्तपत्राचे वाचन करतात हा महत्त्वाचा मुद्दा आहे. अँथोनी डेव्हिस यांच्या मते प्रत्येक नियतकालिकाची स्वतंत्र प्रकृती असते व त्या प्रमाणे त्यातील आशय दिला जातो.[३८](डेविस, १९७९, पृ.क्र. ५१) या संदर्भात आपण कोणते वृत्तपत्र वाचता? असा प्रश्न विचारला असता खालील प्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका : ४.३६**

**शेतकऱ्यांकडून विशिष्ट वृत्तपत्रांचे वाचन**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लोकमत | २२१ | ७३.६६ |
| २ | सकाळ | २१० | ७० |
| ३ | ॲग्रोवन | १३५ | ४५ |
| ४ | पुण्यनगरी | १४० | ४६.६६ |
| ५ | पुढारी | १२७ | ४२.३३ |
| ६ | महाराष्ट्र टाईम्स | २८ | ९.३३ |
| ७ | लोकसत्ता | ४५ | १५ |
| ८ | अन्य वृत्तपत्रे | ११२ | ३७.३३ |

**आकृती क्र : ४.३६**

**शेतकऱ्यांकडून विशिष्ट वृत्तपत्रांचे वाचन**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




तीनशे शेतकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे. यावेळी तीनशे शेतकऱ्यांपैकी २२१ शेतकरी दैनिक लोकमत हे पत्र वाचतात. हे प्रमाण ७३.६६ टक्के आहे तर सकाळ ७० टक्के, पुण्यनगरी ४६.६६ टक्के, ॲग्रोवन ४५ टक्के, पुढारी ४२.३३ टक्के, लोकसत्ता १५ टक्के, महाराष्ट्र टाइम्स ९.३३ टक्के तर अन्य वृत्तपत्रे ३७.३३ टक्के वाचतात. या तालिकेवरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक शेतकरी दैनिक लोकमत वाचतात तर सर्वात कमी दैनिक महाराष्ट्र टाइम्स वाचतात. ज्या वृत्तपत्रामध्ये शेतीविषयक मजकूर जास्त प्रमाणात येतो अशी वृत्तपत्रे शेतकरी आवर्जून वाचतात असे अभ्यासावरून स्पष्ट होते.

## ४.३७ वृत्तपत्र वाचनासाठी दिलेला वेळ

शेतकरी माहिती मिळण्यासाठी वृत्तपत्र किती वेळ वाचतात हे समजावून घेणे महत्त्वाचे ठरते. वृत्तपत्रातील नावीन्यपूर्ण घटना सर्वाधिक वाचकांनी वाचावा असा मजकूर तसेच मानवाशी निगडीत घडामोडी, झालेला बदल यामुळे वृत्तपत्र वाचनीय बनते.[३९](माळी, २००८,

पृ.क्र. ३) या संदर्भात आपण किती वेळ वृत्तपत्रे वाचता? असा प्रश्न विचारला असता खालील प्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र : ४.३७**

**शेतकऱ्यांकडून वृत्तपत्र वाचनासाठी दिला जाणारा वेळ**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वृत्तपत्र वाचक | मिनिटे | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३०० | १० | १०० |
| २ | २४० | १५ | ८० |
| ३ | २२० | २० | ७३.३३ |
| ४ | २०४ | ३० | ६८ |

**आकृती क्र : ४.३७**

**शेतकऱ्यांकडून वृत्तपत्र वाचनासाठी दिला जाणारा वेळ**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



आपण किती वेळ वृत्तपत्रे वाचता? असा प्रश्न तीनशे शेतकऱ्यांना विचारला असता सर्वच शेतकऱ्यांनी कमीत कमी १० मिनिटे वृत्तपत्र वाचतो असे सांगितले. २४० शेतकऱ्यांनी १५ मिनिटे, २२० शेतकऱ्यांनी २० मिनिटे तर २०४ शेतकरी ३० मिनिटे वृत्तपत्र वाचनासाठी देत असल्याचे सांगितले. याचा अर्थ असा की निम्याहून अधिक म्हणजे ६८ टक्के शेतकरी ३० मिनिटे वृत्तपत्र वाचनासाठी देत असल्याने उपलब्ध वृत्तपत्र जास्तीत जास्त वाचण्यावर शेतकऱ्यांचा भर आहे.

## क) कृषि पत्रकारिता

## ४.३८ स्वतंत्र वृत्तमूल्य

कृषि पत्रकारिता ही स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. शेतीतल्या अनेक विषयांचा अंतर्भाव तिच्यात होतो. वृत्तमूल्य म्हणजे नेमक्या कोणत्या घटकांची एखादी घटना म्हणजे बातमी होती त्याला वृत्तमूल्य असे म्हणतात.[४०](माळी, २००८, पृ.क्र. ४) या अभ्यासामध्ये कृषि पत्रकारितेमध्ये स्वतंत्र वृत्तमूल्य आहे का? असा प्रश्न विचारला असता खालील प्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.३८**

**कृषि पत्रकारिता आणि स्वतंत्र वृत्तमूल्य**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २६८ | होय | ८९.३३ |
| २ | ३२ | नाही | १०.६६ |

कृषि पत्रकारितेमध्ये स्वतंत्र वृत्तमूल्य असल्याचे मत २६८ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ८९.३३ टक्के आहे. तर उर्वरीत १०.६६ टक्के शेतकऱ्यांनी कृषिपत्रकारितेमध्ये स्वतंत्र वृत्तमूल्य नाहीत असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की निम्म्याहून अधिक म्हणजे ८९.३३ टक्के शेतकरी कृषि पत्रकारितेतल्या वृत्तमूल्याबाबत सजग आहेत आणि तसा विचार करतात.

## ४.३९ शेती व्यवसायातील वाढ

कृषि पत्रकारितेमुळे संवाद साधला जातो. शेतीचा विकास होणे एक निरंतन प्रक्रिया असते. त्याबाबत माध्यमातून सतत पडसाद उमटतात. चौधरी यांच्या मते सामाजिक रचनेत जसा बदल होतो तशी विकासविषयक जाणीव बदलते.[४१](चौधरी, १९८७, पृ.क्र. ११५) या अभ्यासामध्ये कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होते असे वाटते का ? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.३९**

**कृषि पत्रकारितेमुळे होणाऱ्या कृषिविषयक जागृती बद्दल शेतकऱ्यांचे मत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २८७ | होय | ९५.६६ |
| २ | १३ | नाही | ४.३३ |

कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होत असल्याचे मत २८७ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ९५.६६ टक्के आहे. तर उर्वरित ४.३३ टक्के शेतकऱ्यांनी कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होत नाही असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की निम्याहून अधिक म्हणजे ९५.६६ टक्के शेतकरी त्यांच्या शेती व्यवसाय वाढ ही कृषि पत्रकारितेमुळे झाल्याचे मान्य करतात.

## ४.४० कृषि जागृती

कृषि पत्रकारितेमुळे विविध प्रकारच्या विषयावर बातम्या, लेख प्रकाशित होत असतात. अर्थसंकल्प आणि सरकारी धोरणांबाबतही मजकूर प्रकाशित केला जातो. विलबूर श्रॅम यांच्या मते प्रसारमाध्यमे आधुनिक काळात जादूचा गुणाकार करतात. त्याला मॅजिक मल्टिप्लायर इफेक्ट असे म्हटले जाते.[४२](कुमार, २०११, पृ.क्र. ५२३) या पार्श्वभूमीवर कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होण्यास मदत होते असे वाटते का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४०**

**कृषि पत्रकारिता आणि कृषि जागृती**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २८९ | होय | ९६.३३ |
| २ | ११ | नाही | ३.६६ |

कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होण्यास मदत होत असल्याचे मत २८९ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ९६.३३ टक्के आहे. तर ३.६६ टक्के शेतकऱ्यांनी कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होण्यास मदत होत नाही असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की निम्याहून अधिक म्हणजे ९६.३३ टक्के शेतकरी समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होण्यास कृषि पत्रकारितेचा मजकूर प्रभाव टाकत असल्याचे मान्य करतात.

## ४.४१ मराठी वृत्तपत्रांचे योगदान

मराठी वृत्तपत्रांचे स्वरुप बदलत आहे. ग्रामीण भागातसुध्दा वृत्तपत्राचे वाचन वाढत आहे. त्यांना नवे महत्त्व प्राप्त होत आहे. भारतामध्ये कृषि पत्रकारितेस दूरचा पल्ला गाठावा लागेल. प्रादेशिक भाषांतील वृत्तपत्रे यासंदर्भात मोलाची भूमिका पार पाडू शकतात. त्यांचे विचार प्रवर्तन कार्य समग्र समाजाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी पोषक ठरु शकते.[४३](कामथ, १९८०, पृ.क्र. ५) मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान आहे का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४१**

**कृषि पत्रकारितेत मराठी वृत्तपत्रांचे योगदान याबद्दल शेतकऱ्यांचे मत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २९४ | होय | ९८ |
| २ | ०६ | नाही | ०२ |

मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान असल्याचे मत २९४ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ९८ टक्के आहे. तर दोन टक्के शेतकऱ्यांनी मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान नाही असे सांगितले आहे. याचा अर्थ असा ९८ टक्के शेतकरी मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान असल्याचे मान्य करतात.

## ४.४२ मराठी वृत्तपत्रांची कृषि पत्रकारितेबद्दलची जागरुकता

अहमदनगर जिल्ह्यात राहुरी तालुक्यात महात्मा फुले कृषि विद्यापीठ आहे. साखर उत्पादनात अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर आहे. संदर्भ वर्ष २०१६–१७ मध्ये अहमदनगर जिल्ह्यात ५२ दैनिक तर १४६ साप्ताहिके प्रकाशित झालेली आहेत.[४४] (जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २०१७, पृ.क्र. १० व २३२) या पार्श्वभूमिवर अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरुक आहेत का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४२**

**अहमदनगर जिल्ह्यातील मराठी वृत्तपत्रांची कृषी पत्रकारिते बद्दलची जागरुकता :**

**शेतकऱ्यांचे मत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २३२ | होय | ७७.३३ |
| २ | ६८ | नाही | २२.६६ |

अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरुक असल्याचे मत २३२ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ७७.३३ टक्के आहे. तर २२.६६ टक्के शेतकऱ्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरुक नाही असे सांगितले आहे. याचा अर्थ असा की निम्याहून अधिक शेतकरी म्हणजे ७७.३३ टक्के उत्तरदाते हे अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक असल्याचे मान्य करतात.

## ४.४३ शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देणारे दैनिक

कृषि पत्रकारिता सर्वस्पर्शी व व्यापक बनत आहे. प्रत्येक वृत्तपत्र वेगवेगळ्या प्रकारे मजकूर प्रकाशित करत असते. अहमदनगर जिल्ह्यात प्रकाशित आणि वितरीत होणाऱ्या दैनिकांपैकी कोणत्या दैनिकातून शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती मिळते? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४३**

**शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देणारे दैनिक : शेतकऱ्याचे मत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वृत्तपत्राचे नाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लोकमत | २१० | ७० |
| २ | सकाळ | २१५ | ७१.६६ |
| ३ | ॲग्रोवन | १३२ | ४४ |
| ४ | अन्य वृत्तपत्रे | १२० | ४० |

वरील तालिकेवरुन स्पष्ट होते की, घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात दैनिक सकाळ हे शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देत असल्याचे मत ७१.६६ टक्के शेतकऱ्यांनी नोंदविले आहे. त्यानंतर अनुक्रमे दैनिक लोकमत ७० टक्के, दैनिक ॲग्रोवन ४४ टक्के तर अन्य वृत्तपत्रे ४०

टक्के असा प्राधान्यक्रम उत्तरदात्या शेतकऱ्यांनी नोंदविला आहे. याचा अर्थ असा की सकाळ आणि लोकमत या दैनिकात शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देण्याबाबत स्पर्धा आहे.

## ड) नव्या कृषि पत्रकारितेचा आराखडा

### ४.४४ आवडते लेखन

वृत्तपत्रे अनेक प्रकारच्या बातम्या व माहितीचा मजकूर प्रकाशित करीत असतात. त्यापैकी शेतकऱ्यांना काही विशिष्ट सदरे व साहित्य वाचायला आवडते. या अभ्यासामध्ये शेतीमधील कोणत्या विषयाचे लेखन आवडते ? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४४**

**शेतकऱ्यांचे आवडते लेखन प्रकार**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | लेखनाचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | यशकथा | २६८ | ८९.३३ |
| २ | नवीन तंत्रज्ञान | २३१ | ७७ |
| ३ | दुग्धव्यवसाय | १७८ | ५९.३३ |
| ४ | पणन व बाजारभाव | २९० | ९६.६६ |
| ५ | अन्य/इतर | २१० | ७० |

**आकृती क्र. : ४.४४**

**शेतकऱ्यांचे आवडते लेखन प्रकार**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




वरील तालिकेवरून स्पष्ट होते की घेण्यात आलेल्या सर्वेक्षणात पणन व बाजारभाव या विषयावरचे लेखन २९० शेतकऱ्यांना वाचायला आवडते. हे प्रमाण ९६.६६ टक्के इतके आहे. तर यशकथा ८९.३३ टक्के, नवीन तंत्रज्ञान ७७ टक्के, दुग्धव्यवसाय ५९.३३ टक्के आणि ७० टक्के शेतकऱ्यांना इतर मजकूर वाचायला आवडते. वाचनाच्या या आवड प्राधान्यक्रमानुसार शेतीतल्या उत्पादनाची बाजारपेठ कशी आहे किंवा असणार या माहितीची उत्सुकता सर्वाधिक उत्तरदात्यांना आहे. हे या अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे.

## ४.४५ राजकारण की शेती

विविध कार्यकारी सोसायट्या, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानमंडळ, संसद या निवडणूकांसाठी शेती व्यवसाय असलेले अनेक दिग्गज शेतकरी सक्रीय असतात. मूळ शेतीतल्या प्रश्नांची सोडवूणक करणाऱ्या बातम्या, माहिती प्रकाशित होण्याऐवजी निवडणूकांच्या अनुषंगाने जाहिरात देणाऱ्या घटकांच्या पत्रकार परिषदा, आंदोलने यांना जास्त

प्रसिध्दी मिळते का या पार्श्वभूमीवर आजची वर्तमानपत्रे शेतीपेक्षा राजकारणाला जास्त महत्त्व देतात का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र : ४.४५**

**मराठी वृत्तपत्रे राजकारण की शेतीला महत्त्व देतात?**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २०३ | होय | ६७.६६ |
| २ | ९७ | नाही | ३२.३३ |

वर्तमानपत्रे शेती पेक्षा राजकारणाला जास्त महत्त्व देत असल्याचे मत २०३ शेतकऱ्यांनी मांडले. हे प्रमाण ६७.६६ टक्के आहे. तर ३२.३३ टक्के शेतकऱ्यांनी विरोधात मत नोंदविले. याचा अर्थ असा की निम्म्याहून अधिक शेतकरी उत्तरदात्यांच्या मते शेती ऐवजी राजकारण हा विषय वृत्तपत्रांकडून जास्त मांडला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## ४.४६ महत्त्वाचा विषय

कृषि पत्रकारितेत शेतीच्या अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर सातत्याने लेखन केले जाते. सेंद्रिय प्रमाणीकरण अधिकारी प्रशांत नाईकवाडी यांच्या मते भारतातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे मॉन्सूनच्या लहरीपणाचा तडाखा तिला सोसावा लागतो. सरकारी आकडेवारी नूसार १९९५ ते २०१३ या अठरा वर्षामध्ये देशात दोन लाख ८४ हजार ६९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.३५(नाईकवाडी, २०१६, पृ.क्र. २) या पार्श्वभूमीवर शेतीविषयातल्या पाणी, नापिकी, अवकाळी पाऊस, कर्जमाफी, कर्जबाजारीकरण यापैकी कोणता विषय तुम्हाला प्राधान्यक्रमाने सर्वाधिक महत्त्वाचा आहे असे वाटते ? असा प्रश्न विचारला आसता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४६**

**शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून शेतीतला सर्वाधिक महत्त्वाचा विषय**


(एकूण उत्तरदाते : ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | विषयाचे नाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पाणी | २९८ | ९९.३३ |
| २ | नापिकी | ३३ | ११ |
| ३ | अवकाळी पाऊस | २३७ | ७९ |
| ४ | कर्जमाफी | २९० | ९६.६६ |
| ५ | कर्जबाजारीपणा | २३५ | ७८.३३ |

**आकृती क्र. : ४.४६**

**शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून शेतीतला सर्वाधिक महत्त्वाचा विषय**

(एकूण उत्तरदाते : ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




प्रस्तुत तालिकेवरुन हे स्पष्ट होते की पाणी हा विषय सर्वाधिक महत्त्वाचा असल्याचे मत २९८ शेतकऱ्यांनी मांडले असून त्याचे प्रमाण ९९.३३ एवढे आहे. त्यानंतर कर्जमाफी ९६.६६ टक्के, अवकाळी पाऊस ७९ टक्के, कर्जबाजारीपणा ७८.३३ टक्के तर नापिकी ११

टक्के असे प्रमाण आहे. या सर्वेक्षणावरुन अनुक्रमे पाणी आणि कर्जमाफी हे विषय शेतकऱ्यांच्या सर्वात जिव्हाळ्याचे असल्याचे स्पष्ट होते.

## ४.४७ पुरेशी जागा

कृषि पत्रकारितेत वेगवेगळ्या घटकांवर माहिती देऊन प्रकाशझोत टाकला जात असतो. कमी अधिक प्रमाणात प्रसिध्द होणाऱ्या या मजकुराबाबत डॉ. वि. ल. धारुरकर म्हणतात की कृषी संशोधनाचा विस्तार जेवढ्या गतीने होतो तेवढ्या गतीने शेतीचे आधुनिकीकरण होते पण वृत्तपत्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा व कृषी संशोधनाचा गंभीरपणे विचार करीत नाहीत.[४६](धारुरकर, २०१२, पृ.क्र. ८) या अभ्यासामध्ये शेतकरी या घटकासाठी वर्तमानपत्रात पुरेशी जागा मिळते का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४७**

**वृत्तपत्रात शेतकरी वर्गाला पुरेशी जागा**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २६ | होय | ८.६६ |
| २ | २७४ | नाही | ९१.३३ |

वर्तमानपत्रे शेतकरी या घटकाला पुरेशी जागा देत नसल्याचे मत २७४ उत्तरदात्यांनी नोंदविले आहे. असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ९१.३३ टक्के इतके आहे. तर शेतकरी या घटकासाठी पुरेशी जागा मिळत असल्याचे ८.६६ टक्के शेतकऱ्यांना वाटते. यावरून असे दिसते की वृत्तपत्रे शेतकरी या घटकाबाबतच्या मजकुराकडे पुरेसे लक्ष देत नाहीत.

## ४.४८ दैनिक 'ॲग्रोवन' बद्दल माहिती

भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतीविषयक वार्ता या वृत्तपत्रात महत्त्वाची भूमिका पार पाडतात. ज्येष्ठ पत्रकार एस.के. कुलकर्णी यांच्या मते ग्रामीण परिसरातील शेती हा एक विषय हाताळावयाचा ठरवला तरी, त्याचा पल्ला मोठा आहे. त्यामुळे कृषि पत्रकारिता असा स्वतंत्र

विषयच पुढे येतो.[४०](कुलकर्णी, २००४, पृ.क्र. १४४) त्यामुळे अशा प्रकारच्या बातम्यांना प्राधान्य देण्यासाठी स्वतंत्र कृषि वृत्तपत्र हे निश्चितच वरदान ठरते. या अभ्यासामध्ये 'ॲग्रोवन' या दैनिकाची आपणाला माहिती आहे का ? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४८**

**शेतकरी वर्गास दैनिक 'ॲग्रोवन' बद्दल असणारी माहिती**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २७२ | होय | ९०.६६ |
| २ | २८ | नाही | ९.३३ |

२७२ शेतकऱ्यांना 'ॲग्रोवन' या दैनिकाची माहिती आहे. असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९०.६६ टक्के इतके आहे. तर ९.३३ टक्के शेतकऱ्यांना या दैनिकाबद्दल माहिती नसल्याचे स्पष्ट झाले. यावरुन असे दिसते की 'ॲग्रोवन' या दैनिकाची माहिती आणि प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

### ४.४९ दैनिक 'ॲग्रोवन' शी स्पर्धा करणारे आणखी एखादे दैनिक

कृषि विषयक माहितीत परिपूर्णता यावी म्हणून सकाळने दोन अभिनव प्रकाशने सुरु केली आहेत. १८ मार्च २००५ रोजी 'ॲग्रोवन' या कृषि विषयक संकेत स्थळाचे उद्‌घाटन मा. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या हस्ते करण्यात आले. १९ एप्रिल २००५ ला 'ॲग्रोवन' हे कृषि विषयक दैनिक सुरु झाले. दैनिक आणि वेबसाईट या दोन्हीची जबाबदारी श्री. निशिकांत भालेराव यांनी स्वीकारली आहेत.[४८](कर्वे, २००५, पृ.क्र. १४८) 'ॲग्रोवन' दैनिकाच्या स्पर्धेत आणखी एखादे शेतीविषयक दैनिक असावे का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.४९**

**शेतकरी सर्वेक्षण : दैनिक 'ॲग्रोवन' शी स्पर्धा करणारे आणखी एखादे मराठी कृषि दैनिक असण्याची गरज**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३८ | होय | १२.६७ |
| २ | २६२ | नाही | ८७.३३ |

'ॲग्रोवन' या १४ वर्षाचा टप्पा ओलांडलेल्या दैनिकाच्या स्पर्धेत आणखी एखादे शेतीविषयक दैनिक असावे का? असा प्रश्न विचारला असता २६२ आणखी शेतकऱ्यांनी नाही असे उत्तर दिले. त्याचे प्रमाण ८७.३३ टक्के एवढे आहे. तर 'ॲग्रोवन' या दैनिकाशी स्पर्धा करणाऱ्या आणखी एखाद्या दैनिकाची आवश्यकता असल्याचे मत १२.६७ टक्के शेतकऱ्यांनी नोंदविले. यावरुन दैनिक 'ॲग्रोवन' हे कृषि दैनिक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय असल्याचे स्पष्ट होते.

## ४.५० नवा मजकूर

कृषि पत्रकारिता हा व्यापक विषय आहे. सजीवांसाठी अन्न आणि पाणी या जीवनावश्यक बाबी आहेत. त्यामुळे या क्षेत्रात जगभरात नवीन संशोधन होत असते. याचे अदययावत ज्ञान असणे काळाची गरज आहे. ज्येष्ठ पत्रकार एस. के. कुलकर्णी म्हणतात पाणी हा नेहमीचा विषय असल्याने आणि शेती हा अर्थव्यवस्थेचा कणाच असल्यामुळे पाटबंधारे योजना, पिण्याचे पाणी, शेतीसाठी विविध पाणी पध्दती, पिकांचे नियोजन, पाण्याचे एकूण व्यवस्थापन, कमी पावसात व कमी दिवसात येणारी पिक, या साऱ्यांचा ग्रामीण पत्रकारितेशी बारमाही सर्वार्थाने संबंध आहे.[४९](कुलकर्णी, २००४, पृ.क्र. १४८) या अभ्यासामध्ये सध्याच्या कृषि पत्रकारितेत आहे त्यापेक्षा अधिक नवा मजकूर हवा असे वाटते का ? असा प्रश्न विचारला असता खालील प्रमाणेमाहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५०**

**कृषि विषयी अधिक नव्या मजकुराची गरज : शेतकऱ्यांचे मत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २७३ | होय | ९१ |
| २ | २७ | नाही | ९ |

सध्याच्या कृषि पत्रकारितेत आहे त्यापेक्षा अधिक नवा मजकूर हवा असल्याची गरज २७३ शेतकऱ्यांनी व्यक्त केली. असे सांगणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ९१ टक्के इतके आहे. तर ९ टक्के शेतकऱ्यांनी नाही असे उत्तर दिले. नव्या मजकुराबाबत शेतकरी सजग असल्याचे या अभ्यासातून सिद्ध झाले आहे.

## इ) आर्थिक स्थिती

### ४.५१ उत्पन्न

सामाजिक अभ्यासात आर्थिक उत्पन्न हा एक महत्त्वाचा घटक असतो. व्यंकटेश यांच्या मते उत्पन्न हा व्यक्तीच्या नित्य जीवनावर प्रकाश टाकणारा प्रभावी घटक होय. कारण कामाचे समाधान हे मिळणाऱ्या उत्पन्नावर अवलंबून असते.[५०](व्यंकटेश, १९९२, पृ.क्र. १५५) या अभ्यासामध्ये उत्पन्नाबाबत खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५१**

**शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न (रूपयांमध्ये)**


(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न रुपये | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दोन लाखापेक्षा जास्त | २४ | ८.६६ |
| २ | दीड लाख ते दोन लाख | ९५ | ३१.६६ |
| ३ | एक ते दीड लाख | १०३ | ३४.३३ |
| ४ | पन्नास हजार ते एक लाख | ५९ | १९.६६ |
| ५ | पन्नास हजार पेक्षा कमी | १९ | ६.३३ |

**आकृती क्र. : ४.५१**

**शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न (रूपयांमध्ये)**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



वार्षिक एक ते दीड लाख रुपये उत्पन्न असलेला गट ३४.३३ टक्के तर दीड लाख ते दोन लाख उत्पन्न असलेले उत्तरदाते ३१.६६ टक्के आहेत. त्यानंतर पन्नास हजार ते एक लाख रुपये या उत्पन्न गटात १९.६६ टक्के, पन्नास हजारापेक्षा कमी उत्पन्न असलेले ६.३३ टक्के उत्तरदाते मोडतात तर दोन लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेले उत्तरदाते ८.६६ टक्के एवढे आहेत. यावरुन पन्नास हजारापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या उत्तरदात्यांची सर्वाधिक असल्याचे स्पष्ट होते.

## ४.५२ कर्ज

दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी शेतकरी प्रयत्न करीत असतो. विविध समस्यातून बाहेर पडण्यासाठी कर्ज काढण्याचा मार्ग त्याला स्वीकारावा लागतो. डॉ. रजनी टंडन यांच्या मते गरिबी हा आर्थिक विकासाच्या संदर्भात एक महत्त्वाचा निकष होय. किती कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत त्यावरुन त्या देशाची आर्थिक स्थिती लक्षात येते.[५१](टंडन, १९८९, पृ.क्र. ३३) या अभ्यासामध्ये कर्ज किती रुपये आहे? असा प्रश्न विचारला असता खालील प्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५२**

**शेतकऱ्यांवरील कर्जाचे स्वरुप (रूपयांमध्ये)**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | वार्षिक उत्पन्न रुपये | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दोन लाखापेक्षा जास्त | १४ | ४.६६ |
| २ | दीड लाख ते दोन लाख | ८५ | २८.३३ |
| ३ | एक ते दीड लाख | ९३ | ३१ |
| ४ | पन्नास हजार ते एक लाख | ४९ | १६.३३ |
| ५ | बिगर कर्जदार | ५९ | १९.६६ |

आकृती क्र. : ४.५२

**शेतकऱ्यांवरील कर्जाचे स्वरुप (रूपयांमध्ये)**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




या तालिकेवरुन हे स्पष्ट होते की, वार्षिक एक ते दीड लाख रुपये कर्ज असलेला गट ३१ टक्के तर दीड लाख ते दोन लाख कर्ज असलेले उत्तरदाते २८.३३ टक्के आहेत. त्यानंतर पन्नास हजार ते एक लाख रुपये या कर्ज गटात १६.३३ टक्के तर दोन लाखापेक्षा जास्त कर्ज असलेले शेतकरी ४.६६ टक्के आहेत. १९.६६ टक्के शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नाही. यावरुन बिगर कर्जदार असलेला शेतकरी गट देखील कृषि क्षेत्रात असल्याने स्पष्ट होते.

## ४.५३ कर्ज देणारी संस्था

सरकारी व सहकारी पतपुरवठ्याचा लाभ सर्वच शेतकऱ्यांना मिळत नाही. त्यामुळे त्यांना खाजगी वित्त पुरवठा देणारे सावकार, व्यापारी अथवा नातेवाईक यांचे दरवाजे ठोठवावे लागतात. नाबार्डच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सब घोडे १२ टक्के ह्या नियमाप्रमाणे गाववार, पिकाप्रमाणे, परिस्थितीप्रमाणे जरी पीकाला लागणारा खर्च बदलत असला तरी कर्ज देण्याची मर्यादा तीच असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या इतर कर्जासाठी खासगी सावकाराचे दार

ठोठावतो.[५२] (गायकवाड, २००८, पृ.क्र. १३६) या अभ्यासामध्ये कर्ज कुणाकडून घेतले आहे? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५३**

**शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | कर्ज देणारी संस्था | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सावकार | १४९ | ४९.६६ |
| २ | सहकारी पतसंस्था | २४१ | ८० |
| ३ | सरकारी बँका | १३२ | ४४ |
| ४ | सहकारी बँका | ९७ | ३२.३३ |
| ५ | बिगर कर्जदार | ५९ | १९.६६ |

**आकृती क्र. : ४.५३**

**शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्था**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



तब्बल २४१ उत्तरदाते सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेतल्याचे सांगतात. याचे प्रमाण ८० टक्के आहे. त्यानंतर अनुक्रमे सावकाराकडून ४९.६६ टक्के, सरकारी बँकेकडून ४४ टक्के, सहकारी बँकेकडून ३२.३३ टक्के कर्ज मिळाल्याची माहिती शेतकरी देतात. उत्तरदाते एकाहून अधिक पुरवठादाराकडून कर्ज उचलत असल्याचेही आढळून आले आहे. सरकारी बँका सर्वच शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करीत नाहीत यामुळे शेतकऱ्याला कर्जासाठी खासगी सावकाराच्या दारात जावे लागते. जवळपास ५० टक्के इतके हे प्रमाण आहे.

## ४.५४ कर्जफेड

पाणी, तंत्रज्ञान व हवामानावर शेतकरी अवलंबून असल्याने नियमित कर्जफेड सर्वांनाच शक्य होत नाही. डॉ. मुकुंदराव गायकवाड यांच्या मते शेतकरी जोपर्यंत शेती व्यवसाय किफायतशीररीत्या करू शकत नाही तोपर्यंत तो कुणाचेही कर्ज फेडू शकत नाही. लग्नाकरिता, दशपिंडाकरिता, पिकाकरिता, किंवा कोणत्याही कारणाने कर्ज काढले की तो खड्डा भरूनच येत नाही.[५३](गायकवाड, २००८, पृ.क्र. १३४) या अभ्यासामध्ये कर्ज फेड नियमित आहे का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५४**

**शेतकऱ्याकडून कर्जाची होणारी फेड**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २१७ | नाही | ७२.३३ |
| २ | २४ | होय | ८ |

तब्बल २१७ उत्तरदाते घेतलेल्या कर्ज परतफेड नियमित होत नाही असे सांगतात. हे प्रमाण ७२.३३ टक्के एवढे आहे. तर ८ टक्के उत्तरदात्यांकडून नियमित कर्जफेड होण्याचे प्रमाण आहे. शेतकरी आत्महत्यांच्या प्रमुख कारणांमध्ये कर्जफेडीला कंटाळून जीवन संपवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने ७२.३३ टक्के हे प्रमाण चिंताजनक आहे.

## ई) समस्या आणि मदत

## ४.५५ पाणी

पाण्याशिवाय शेती अशक्य आहे. शेतकऱ्यांकडून पाण्याच्या उपलब्धतेवरच वेगवेगळ्या प्रकारची पीकं, फळबागांचे नियोजन केले जाते. गेल्या वर्षात पाण्याच्या दूष्काळाने नगर जिल्हा होरपळला गेला आहे. जलतज्ज्ञ सतीष खाडे म्हणतात की, जोपर्यंत पाण्याच्या आर्थिक मूल्यांबाबत ज्ञानी होणार नाही, तोपर्यंत दरिद्रीपणातून आपण बाहेर पडूच शकणार नाही.[५४](खाडे, २०१६, पृ.क्र. १२) या अभ्यासामध्ये वर्षभर पाण्याची स्थिती कशी असते? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५५**

**शेतीसाठी पाण्याची उपलब्धता**


(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | पाणी उपलब्धता प्रमाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | खूप चांगली | ० | ० |
| २ | चांगली | ३ | १ |
| ३ | समाधानकारक | १५ | ५ |
| ४ | अतिशय कमी | २५९ | ८६.३३ |

**आकृती क्र. : ४.५५**

**शेतीसाठी पाण्याची उपलब्धता**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




वरील तालिकेवरून स्पष्ट होते की, २५९ उत्तरदाते पाणी उपलब्धतेची स्थिती अतिशय कमी असल्याचे सांगतात. हे प्रमाण सुमारे ८६.३३ टक्के एवढे आहे. तर समाधानकारक पाणी असल्याचे ५ टक्के, पाण्याची चांगली उपलब्धता असल्याचे मत १ टक्का शेतकरी सांगतात. पाटपाणी वाटप कायदा आणि कमी होत असलेले पर्जन्यमान यामुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता कमी होत असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे.

## ४.५६ बाजारभाव

शेतकऱ्यांनी पिकविलेल्या उत्पादनाला मिळणारा बाजारभाव हा अतिशय महत्त्वाचा विषय आहे. डॉ. मुकुंदराव गायकवाड म्हणतात शेतकऱ्याच्या प्रमुख पिकांना पुरेशी भाववाढ मिळत नसताना इतरांची उत्पादने अव्वाच्या सव्वा दराने खरेदी करताना त्याच्या मनाला किती वेदना होत असतील. परिणामतः त्याच्या उत्पन्नात वाढ झाली नाही. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या रास्त भावाकडे दुर्लक्ष केले जात असेल तर ती शोकांतिका नाही का?

[५५](गायकवाड, २००८, पृ.क्र. ४८) या अभ्यासामध्ये तुमच्या उत्पादनाला बाजारपेठेत भाव कसा मिळतो? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५६**

**शेती उत्पादनाला मिळणारे बाजारमूल्य**


(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेती उत्पादनाचा बाजारभाव | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | खूप चांगला | ० | ० |
| २ | चांगला | ० | ० |
| ३ | समाधानकारक | ३ | १ |
| ४ | अतिशय कमी | २९७ | ९९ |

**आकृती क्र. : ४.५६**

**शेती उत्पादनाला मिळणारे बाजारमूल्य**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)



शेतमालाला मिळणारा बाजारभाव हा अतिशय कमी असल्याचे उत्तर २९७ शेतकऱ्यांनी दिले. हे प्रमाण ९९ टक्के आहे. तर समाधानकारक भाव मिळतो असे सांगणाऱ्यांचे प्रमाण १ टक्का आहे. अनुक्रमे खूप चांगला व चांगला भाव मिळतो असे सांगणारा एकही उत्तरदाता या सर्वेक्षणात आढळलेला नाही. शेतमालाला अतिशय कमी बाजारभाव मिळत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

## ४.५७ हवामान बदल

हवामानात होणाऱ्या बदलाचे अदययावत ज्ञान असणे काळाची गरज आहे. अवेळी पाऊस, गारपीट, तापमानात वाढ इ. अनेक कारणांनी शेतकऱ्यांनी तयार केलेला शेतमाल, त्यांच्यापर्यंत पैसा घेऊन येऊ शकत नाही. उलट नैसर्गिक आपत्तीमुळे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते.[५६](गायकवाड, २००८, पृ.क्र. २२२) या अभ्यासामध्ये हवामान बदलाची माहिती वेळेवर मिळते का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५७**

**शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या माहितीची वेळेवर उपलब्धता**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३०० | नाही | १०० |
| २ | ० | होय | ० |

हवामान बदलाची माहिती वेळेवर मिळत नसल्याचा प्रतिसाद सर्वच उत्तरदात्यांनी नोंदविला आहे. १०० टक्के शेतकऱ्यांनी हवामानाबद्दलची अचूक माहिती वेळेवर कधीच मिळत नसल्याचे सांगितल्याने हवामान शास्त्रातील संशोधन आणि संप्रेषणाबाबत मोठे प्रश्नचिन्ह उभे असल्याचे या अभ्यासात सिध्द झाले आहे.

## ४.५८ सरकारी मदत

शेतकऱ्यांना कधी आसमानी तर कधी सुलतानी संकटांना सामोरे जावे लागते. अवकाळी पाऊस, गारपीट, ओला व सुका दुष्काळ, नापीकी, फसवणूक करणाऱ्या खते, बियाणं व विमा कंपन्या, आदीमुळे शेतकरी कोंडीत सापडतो. २००१ ते मार्च २०१९ पर्यंतच्या ३०,३३४ जणांपैकी १५,१९८ आत्महत्या केलेल्यांच्या वारसांना प्रत्येकी एक लाखाची मदत शासनाने केली आहे. उर्वरित १५,१३५ पैकी काहींना चौकशीअभावी मदतीसाठी प्रलंबित तर काहींना अपात्र ठरविण्यात आले आहे.[५७](लोकमत, २०१९, पृ.क्र. ७) या अभ्यासामध्ये सरकारची मदत वेळेवर मिळते का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.५८**

**शेतकऱ्यांना वेळेवर मिळणारी शासनाची मदत**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २८८ | वेळेवर मिळत नाही | ९६ |
| २ | १२ | वेळेवर मिळते | ४ |

सरकारी मदत वेळेवर मिळत नसल्याचे उत्तर २८८ शेतकऱ्यांनी दिले. त्याचे प्रमाण ९६ टक्के एवढे आहे. तर मदत वेळेत मिळते असे मत ४ टक्के शेतकऱ्यांनी नोंदविले. यावरून वेळेत मदत करण्याबाबत सरकार हलगर्जीपणा करते हे स्पष्ट होते.

## ४.५९ पीक पध्दती

पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असणारी शेती म्हणजे कोरडवाहू शेती तर विहीर अगर कालव्याच्या माध्यमातून केली जाणारी शेती बागायती ओळखली जाते. शिरपूर पॅटर्नचे प्रणेते आणि वरिष्ठ भूवैज्ञानिक सुरेश खानापूरकर यांच्या मते महाराष्ट्रात अंदाजे १४ टक्के बागायती क्षेत्र आहे. याचा अर्थ असा की ८६ टक्के जमीन पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. पावसाच्या या लहरीपणामुळे ८६ टक्के जमिनीवर केलेली खरिपाची लागवड दरवर्षीच

शेतकऱ्यांचा मनस्ताप वाढविते. थोडक्यात काय तर खरिपाची शाश्वती नाही; रब्बीचे पीक घ्यायला पुरेसे पाणी नाही. उन्हाळ्यात तर प्यायलाच पाणी नाही, तर शेतीला कुठून मिळणार? शेतकरी आता अशा कात्रीत सापडलेला आहे.[५८](खानापूरकर, २०१६, पृ.क्र. ६) या अभ्यासामध्ये वर्षभरात कोणती पिके घेतात? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळली.

**तालिका क्र. : ४.५९**

**शेतकऱ्याकडून अमलात आणली जाणारी वर्षभरातील पीक पध्दती**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतीचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बागायती | ८७ | २९ |
| २ | जिरायती | २१३ | ७१ |

प्रस्तूत तालिकेवरुन हे स्पष्ट होते की पाणी हा विषय सर्वाधिक महत्त्वाचा असल्याने बागायती शेती करणाऱ्या उत्तरदात्यांची संख्या ८७ असून त्याचे प्रमाण २९ टक्के आहे. तर जिरायती शेती करण्याचे प्रमाण ७१ टक्के प्रमाण आहे. या सर्वेक्षणावरुन ७१ टक्के उत्तरदाते पावसाच्या भरवशावर शेती करीत असून त्यांच्याकडे सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते. यासाठी वृत्तपत्रांनी अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

## ४.६० कृषि विद्यापीठाचा उपयोग

अहमदनगर जिल्ह्यात राहुरी तालुक्यात गुरुवार दिनांक २० ऑक्टोबर १९६८ साली महाराष्ट्र कृषि विद्यापीठाची स्थापना झाली. त्यानंतर १९६९ साली हे विद्यापीठ महात्मा फुले कृषि विद्यापीठ या  नावाने उदयास आले. पश्चिम महाराष्ट्रातील १० जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या या विद्यापीठाच्या कृषि शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याची विशेष नोंद घेऊन विद्यापीठास भारत सरकारने १०० कोटी रुपयांचे विशेष अनुदान २००८ सालातील देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठ असा गौरव केला आहे.[५९](कृषिदर्शनी, २०१७, पृ.क्र. १) या

अभ्यासामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या संस्थेचा उपयोग तुम्हाला होतो का? असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.६०**

**शेतकऱ्यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा उपयोग**

(एकूण उत्तरदातेः ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | शेतकऱ्यांची संख्या | पर्याय | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १७२ | नाही | ५७.३३ |
| २ | १२८ | होय | ४२.६६ |

तब्बल १७२ उत्तरदाते महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या संस्थेचा उपयोग होत नाही असे सांगतात. याचे प्रमाण ५७.३३ टक्के आहे. तर ४२.६६ टक्के शेतकऱ्यांना कृषि विद्यापीठाचा उपयोग होतो असे या पाहणीत आढळते. कृषि विद्यापीठासारखी मोठी संस्था जिल्ह्यात असूनही तिचा उपयोग होत नसणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे दिसून येते. त्यामुळे विद्यापीठ, शेतकरी व वृत्तपत्रे यात सुयोग्य समन्वय नसल्याचे दिसते.

## ४.६१ कृषि पत्रकारितसाठी उपाय व सूचना

कृषि पत्रकारितेमुळे शेतकऱ्यांना माहिती मिळते. मराठी वृत्तपत्रांद्वारे हा संवाद आणखी वाढणे गरजेचे आहे. जॉनी जोसेफ यांच्या मते Media can help to bridge the gape between government and people.[६०](जोसेफ, १९९७, पृ.क्र. २८) सरकार आणि जनतेमधील सेतू होण्यासाठी माध्यमसंस्था मदत करू शकतात. या अभ्यासामध्ये कृषि पत्रकारिता सुधारण्यासाठी कशावर भर दिला पाहिजे ? आणखी काही सूचना असा प्रश्न विचारला असता खालीलप्रमाणे माहिती मिळाली.

**तालिका क्र. : ४.६१**

**कृषि पत्रकारितेसाठी उपाय व सूचना**


(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)

| अ.क्र. | विषय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | योग्य बातम्या | २८७ | ९५.६६ |
| २ | नेमके संपादन | ३६ | १२ |
| ३ | छायाचित्रांचा वापर | २३५ | ७८.३३ |
| ४ | नव्या शोधांचा विस्तार | २४७ | ८२.३३ |

**आकृती क्र. : ४.६१**

**कृषि पत्रकारितेसाठी उपाय व सूचना**

(एकूण उत्तरदाते: ३०० आणि सर्वेक्षण कालावधी नोव्हेंबर २०१८ ते मार्च २०१९)




या तालिकेवरून असे स्पष्ट होते की, कृषि पत्रकारिता सुधारण्यासाठी ३०० शेतकऱ्यांपैकी २८७ शेतकऱ्यांनी योग्य बातम्या असाव्यात असे मत मांडले. हे प्रमाण ९५.६६ टक्के एवढे आहे. तर नेमके संपादन करण्यासाठी १२ टक्के, छायाचित्रांचा वापर ७८.३३

टक्के आणि नव्या शोधांचा विस्तारासाठी ८२.३३ टक्के शेतकरी आग्रही आहेत. या सर्व उपायांची योजना केली तर कृषि पत्रकारिता सुधारू शकते.

## ४.६२ शेतकऱ्यांच्या सूचना

०१) अल्पभूधारक व तळागळातील शेतकऱ्यांच्या बातम्या स्थानिक वृत्तपत्रांनी प्रकाशित करणे.

०२) शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण राबविणे गरजेचे आहे.

०३) आधुनिक शेती, नवे प्रयोग व आधुनिक तंत्रज्ञान यावर भर दिला पाहिजे.

०४) शेतीविषयक समस्यांचा वापर राजकारणासाठी करू नये.

०५) कृषिविषयक मजकूर अदययावत माहितीसह जास्तीत जास्त छापणे आवश्यक आहे.

०६) शेतकऱ्यांना समजेल अशा सोप्या आणि स्थानिक भाषेत बातम्या प्रकाशित झाल्या पाहिजेत.

०७) आधुनिक तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पत्रकारांनी सतर्क राहिले पाहिजे.

०८) शेतीची माहिती असणाऱ्या शेतकऱ्यांना पत्रकार म्हणून संधी देणे गरजेचे आहे.

०९) हवामान बदलाची माहिती वेळेवर मिळणे महत्त्वाचे आहे.

१०) शेती पूरक व्यवसायाला शासनाने कर्ज उपलब्ध करून दिले पाहिजे.

११) पत्रकारांनी शेतीविषयक छायाचित्रे, आकृत्या, तक्ते यांचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे.

१२) कृषि क्षेत्रातील खते, बी-बियाणे यात फसवणूक करणाऱ्या जाहिरातींवर सरकारचे नियंत्रण हवे.

१३) सरकारी पातळीवरून शेतकरी व कृषि पत्रकारांना अदययावत प्रशिक्षणे आयोजित केली पाहिजेत.

१४) शेतकरी व कृषि पत्रकारांसाठी अभ्यास व प्रबोधन दौऱ्यांवर भर दिला पाहिजे. शेतीच्या विकासाला प्राधान्य मिळाले पाहिजे.

१५) दुष्काळ, वीज व पाणी टंचाई आदी समस्यांवर तोडगा काढला पाहिजे.

१६) कृषि उत्पादनांसह दुधाला योग्य बाजारपेठ व बाजारभाव मिळाला पाहिजे.

१७) कृषि विद्यापीठांनी फिरत्या सल्ला केंद्राद्वारे खेड्यापाड्यात माहिती, ज्ञान सेवा दिली पाहिजे.

१८) शासनाने प्रत्येक तालुक्यात आवश्यकतेनुसार अल्प मुदतीचे अभ्यासक्रम सुरु केले पाहिजेत.

१९) शेती क्षेत्रातील शोधवार्ता, यशकथाद्वारे जागृती निर्माण करणाऱ्या सक्रिय कृषि पत्रकाराला व आदर्श शेतकऱ्याला शासनाने पुरस्कार, सन्मान देऊन त्यांचे कार्य उजेडात आणले पाहिजे.

२०) सरकार व कृषि पत्रकारांनी शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्तमानपत्रे, दूरचित्रवाणी यासह नवे आधुनिक तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वापर वाढविणे आवश्यक आहे.

## ४.६३ समारोप

अहमदनगर जिल्ह्यातील तीनशे शेतकऱ्यांचा सर्वे करण्यात आला. या पाहणीतून शेतकऱ्यांची कौटुंबिक परिस्थिती, शैक्षणिक व आर्थिक स्तर, वृत्तपत्र वाचन सवयी, कृषि पत्रकारितेचे योगदान व मराठी वृत्तपत्रांविषयीचे मत, शेतीक्षेत्रातील महत्त्वाचे विषय, दैनिक ॲग्रोवन, कर्जमाफी, पाणी , हवामान, बाजारपेठ, पीक पध्दती, कृषि विद्यापीठाचा उपयोग, सध्याची कृषि पत्रकारिता व अपेक्षित असलेले बदल व सूचना आदि बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. या सर्व घटकांचा सकारात्मक विचार होणे गरजेचे आहे. तसे झाले तर मराठी वृत्तपत्रांतील कृषि क्षेत्रासाठी पोषक मजकुराची वाढ होणे शक्य आहे.

## संदर्भसूची


०१) जैन, रमेश (२००७) जनसंचार विश्वकोश, नॅशनल पब्लिकेशन टाऊन, जयपूर, पृष्ठ क्र. २०

०२) Kumar, Arvind (2002) Research Methodology in Social Science, Sarup & Sons Publishers, New Delhi पृ.क. १६९

०३) भांडारकर पु. ल. (१९८७) सामाजिक संशोधन पद्धती. महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, महात्मा गांधी मार्ग नागपूर, पृ.क. २३३

०४) कित्ता, पृ.क्र. २३७

०५) नाडगोंडे, गुरुनाथ (१९९९) सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर पृष्ठ क्र. २२७

०६) कित्ता, पृ.क्र. २२९

०७) Neal James M. & Brown Suzanne S. (१९७६) News writing and Reporting, The Lowa State University Press पृष्ठ क्र. २६

०८) www.outlookindia.com 2018

०९) www.dgipr.maharashtra.gov.in 2019

१०) कर्वे, स्वाती सुहास (२००५) अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण. क्र. ७ राज्य मराठी विकास संस्था, पुणे पृ.क्र. ५५

११) कित्ता, पृ.क्र. १३३

१२) कित्ता, पृ.क्र. १४८

१३) www.wikipedia.org 2018

१४) www.dgipr.maharashtra.gov.in 2019

१५) अहमदनगर जिल्हा समाजिक व आर्थिक समालोचन (२०१७) महाराष्ट्र शासन, मुंबई पृ.क्र. १२१

१६) कित्ता, पृ.क्र. १०

१७) कित्ता, पृ.क्र. ८४

१८) www.macp.gov.in/sites/AMIS (2018)

१९) Rogers Everett M. (१९८२) Diffusion of Innovations. Free Press पृष्ठ क्र. २०

२०) गोखले, अरविंद व्य. (२०११) संपादन (पुनर्मुद्रण–नोंव्हेबर–२०११) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४११ ०३७ पृ.क्र. १०१

२१) Parrish Fred S. (2001) Photojournalism. Belmont, CA, Wordsworth-Thomson Learning, P – 294

२२) सेवेकर, सुधीर राधाकृष्ण (२००६) जाहिरात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२ पृ.क्र. २

२३) माळी, सुनील (२००८) बातमीदारी. राजहंस प्रकाशन,कोल्हापूर पृष्ठ क्र. २१३

२४) www.wikipedia.org

२५) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१७) महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.क्र. ८

२६) कुमार, केवल जे (१९९४) मास कम्युनिकेशन इन इंडिया, जयको पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ३

२७) धारुरकर, डॉ. वि. ल. (१९७४) आजकालची पत्रकारिता, रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ९

२८) कदम, डॉ. विश्वास., गावंडे, डॉ. गणेश. (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था. कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. पृ.क्र. १४

२९) पवार, डॉ. सुधाकर (२०००) संवादशास्त्र, मानसन्मान प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती. पृ.क्र. ३

३०) घाटोळे, रा. ना. (२००५) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. २४

३१) घुर्ये जी. एस. (१९३२) कास्ट अँड रेस इन इंडिया. २००८ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. १

३२) गुरुसॅमी, एस (१९९५) डेव्हलपमेंट सोशॅलॉजीः ए रिडर. स्टर्लिंग पब्लिशर्स, नवी दिल्ली, पृ.क्र. १३

३३) कित्ता, पृ.क्र. ९३

३४) पाटील, वा. भा. (२००६) संशोधन पद्धती. प्रशांत पब्लिकेशन, पुणे, पृ.क्र. १४२

३५) धारुरकर, डॉ. वि. ल. (२०१२) शाश्वत विकास संवादाची नवी क्षितिजे. चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र. १२१

३६) पाटील, वा. भा. उपरोक्त, पृ.क्र. १४१

३७) पांढरे, डॉ. नीला (२००९) तृतीय रत्न नाटक. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे पृ.क्र. १८

३८) डेविस, अँथोनी (१९७९) वर्किंग इन जर्नलिझम. बॅट्सफोर्ड लि. लंडन पृ.क्र. ५१

३९) माळी सुनील, उपरोक्त, पृष्ठ क्र. ३

४०) माळी सुनील, उपरोक्त, पृष्ठ क्र. ४

४१) चौधरी, एस. एन. (१९८७) डायनामिक्स ऑफ रुरल पॉवर स्ट्रक्चर, उमर प्रकाशन, नवी दिल्ली पृ.क्र. ११५

४२) कुमार, केवल जे. (२०११) मास कम्युनिकेशन इन इंडिया, जयको पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ५२३

४३) कामथ, एम. व्ही. (१९८०) प्रोफेशनल जर्नेलिझम, विकास  नवी दिल्ली, पृष्ठ क्र. ५

४४) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१७) अहमदनगर, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ.क्र. १० व २३२

४५) दै. सकाळ (११ ऑगस्ट २०१६). पुणे आवृत्ती, प्रशांत नाईकवाडी. सेंद्रीय शेतीच आहे भविष्य, नगर वर्धापनदिन विशेष कृषिजीवन, पृ.क्र. २

४६) धारुरकर, डॉ. वि. ल. (२०१२) शाश्वत विकास संवादाची नवी क्षितिजे. चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद पृ.क्र. ८

४७) कुलकर्णी, एस. के. (२००४) बातमीदार. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे पृ.क्र. १४४

४८) कर्वे, स्वाती सुहास (२००५) अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण. क्र. ७ राज्य मराठी विकास संस्था, पुणे पृ.क्र. १४८

४९) कुलकर्णी, एस. के. (२००४) बातमीदार. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे पृ.क्र. १४८

५०) व्यंकटेश एम. (१९९२) फॅक्टर्स विच ॲफेक्ट जॉब डिझाईन. संपादक जैन एस. सी. मॅनेजिंग ह्यूमन रिसोर्सेस, जयपूर, पृ.क्र. १५५

५१) टंडन, रजनी (१९८९) अलाईड ह्यूमॅनीटीज. स्टर्लिंग पब्लिशर्स, नवी दिल्ली, पृ.क्र. १३३

५२) गायकवाड, प्रा. डॉ. मुकुंदराव (२००८) भारताचे कृषी–अर्थशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे पृ.क्र. १३६

५३) कित्ता, पृ.क्र. १३४

५४) दै. सकाळ (११ ऑगस्ट २०१६) पुणे आवृत्ती, खाडे, सतिश. नगर वर्धापनदिन विशेष कृषिजीवन, पृ.क्र. १२

५५) उपरोक्त, गायकवाड प्रा. डॉ. मुकुंदराव, पृ.क्र. ४८

५६) उपरोक्त, गायकवाड प्रा. डॉ. मुकुंदराव, पृ.क्र. २२२

५७) दैनिक लोकमत (२९ मे २०१९) अहमदनगर आवृत्ती, पृ.क्र. ७

५८) दै. सकाळ (१० ऑगस्ट २०१६) पुणे आवृत्ती, नगर वर्धापनदिन विशेष कृषिजीवन, पृ.क्र. ६

५९) कृषिदर्शनी (२०१७) प्रकाशक व मुख्य संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी पृ.क्र. १

६०) जोसेफ, जॉनी सी. (१९९७) मास मीडिया अँड रुरल डेव्हलपमेंट. रावत पब्लिशर्स, नवी दिल्ली, पृ.क्र. २८

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष व शिफारसी

## ५.१ प्रस्तावना

विकास संज्ञापनात भाषिक वृत्तपत्रे विचार प्रवर्तनाचे कार्य पार पाडतात. त्यांच्या या भूमिकेचे अध्ययन या प्रबंधात करण्यात आले आहे. प्रस्तुत संशोधन मराठी वृत्तपत्रांतील शेतिविषयक लेखनाचे व सामग्रीचे १४ विविध घटक पाडून चिकित्सक मूल्यमापन करून पूर्ण केले आहे. त्यामुळे कृषिविषयक वार्तांची रचना, उगमस्थाने, विषयानुरूप मांडणी आणि त्यांच्या हाताळणीबाबत शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. हे संशोधन शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी निगडित असून वृत्तपत्रांनी शेतीच्या प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टीकोन कसा आहे याचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे विद्यापीठामधील शेती संशोधन आणि प्रत्यक्ष शेतकऱ्यांचे प्रश्न यातील अंतर भरून काढणे शक्य झाले आहे.

शेतीव्यवसायाचा आर्थिक विकास जलद गतीने होण्यासाठी मराठी वृत्तपत्रे पूरक भूमिका पार पाडू शकतात. माहिती सेवा देण्यामध्ये माध्यमांचा परिणामकारक वापर करणे शक्य आहे. अशा भूमिकेतून वृत्तपत्रांची जबाबदारी फार महत्त्वाची असते. मराठी वृत्तपत्रे हे प्रभावी माध्यम आहे. वृत्तपत्राद्वारे शेतीव्यवसायाबाबतची माहिती देणे शक्य आहे. त्यातून शेतीव्यवसायांबाबत नवीन दृष्टीकोन व जागृती निर्माण होईल. कृषि पत्रकारितेविषयक वृत्तपत्रांची भूमिका काय आहे.? वृत्तपत्रांद्वारे ही भूमिका पार पाडली जाते का ? कृषि पत्रकारितेविषयक मराठी वृत्तपत्रांची भूमिका काय आहे. मराठी वृत्तपत्रांत सर्वसाधारण वार्ता व कृषि वार्ता यांचे तुलनात्मक प्रमाण कसे आहे ? शेतकऱ्यांना कृषि पत्रकारितेचा फायदा होतो का ? यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन विषयातून केला आहे.

प्रस्तुत संशोधनात मराठी वृत्तपत्रांचा कृषि विषयक लेखनांचा कृषि विकासासाठी कसा संबंध आहे ? जनसंवाद म्हणून वृत्तपत्रे कसे प्रभावीपणे कृषि संशोधन विस्ताराला प्रेरक ठरत आहे हे प्रामुख्याने तपासले आहे. धान्य उत्पादनासह फळे व फुले यांच्या उत्पादनावर अधिक भर देऊन शेतीत व्यापक परिवर्तन करणे आणि यातून कृषि क्षेत्र अधिक शक्तीशाली बनविणे

शक्य आहे का? शाश्वत कृषि विकासासाठी हे माध्यम कितपत उपयुक्त आहे हे समाजशास्त्रीय दृष्ट्या अभ्यासले आहे. वृत्तपत्रांचे कार्य लक्षात घेता मराठी वृत्तपत्रांचे कार्य कृषिविषयक संवादाबाबतीत तपासून पाहणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू आहे. मराठी वृत्तपत्रे कृषि विकासाला पोषक कार्य करताना ज्ञान कौशल्ये आणि माहितीच्या आधारे नवजीवनाला आकार देण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांच्या प्रबोधनामुळे कृतिप्रवण शेतकरी पुढे येत आहे.

मराठी कृषि पत्रकरितेमुळे शेतीव्यवसायाची वाढ, समाजामध्ये जागृती, समतोलपणा या संबंधातले योगदान काय आहे ते या प्रबंधामध्ये तपासले आहे. या संदर्भात विविध पैलूंवर नव्याने प्रकाश टाकण्यात आला आहे. संशोधकाने मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेच्या तुलनात्मक अभ्यास या समस्येची निवड केली. मराठी वृत्तपत्रांचे चौदा प्रकारे घटकनिहाय आशय विश्लेषण कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकार यांचेसह आणि ३०० शेतकऱ्यांच्या थेट मुलाखती शास्त्रीय पद्धतीने अभ्यासण्यात आल्या आहेत. या माहितीच्या आधारे संशोधकाने जे निष्कर्ष काढले आहेत ते निष्कर्ष व त्या आधारावर काही शिफारसी प्रस्तुत प्रकरणात समाविष्ट केल्या आहेत. हे ठळक निष्कर्ष पुढील प्रमाणे.

## ५.२ ठळक निरीक्षणे

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना संशोधन साहित्याचा आढावा, शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणातील माहिती, वृत्तपत्रातील आशय विश्लेषण, कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकार यांच्या घेतलेल्या मुलाखती, संदर्भ साहित्याचा आढावा तसेच प्रत्यक्ष भेटीतील निरीक्षणे या माहितीच्या आधारे खालीलप्रमाणे प्रमुख निष्कर्ष आले आहेत.

०१) दैनिक लोकमत चा संशोधन कालावधीतील सर्व प्रकारचा एकूण छापील मजकूर १३,३४,६०० चौ.से.मी. असून यापैकी सर्व प्रकारच्या कृषि विषयक मजकुराला दिलेली एकूण जागा ४४,२६८.५८ चौ.से.मी. आहे. हे प्रमाण ३.३१ टक्के एवढे आहे.

०२) दैनिक सकाळ चा संशोधन कालावधीतील सर्व प्रकारचा एकूण छापील मजकूर १३,७७,९६० चौ.से.मी. असून यापैकी सर्व प्रकारच्या कृषि मजकुराला दिलेली एकूण जागा ३६,५७९.५८ चौ.सें.मी. आहे. हे प्रमाण २.६५ टक्के एवढे आहे.

०३) सर्वेक्षणानुसार शेती व्यवसायात मराठा या जातीतल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ४५ टक्के इतके आहे. त्यानंतर माळी २०.३३ टक्के, धनगर ९.६६ टक्के, वंजारी २.३३ टक्के, महार ७.३३ टक्के, इतर ७ टक्के असे प्रमाण आहे.

०४) सातवीपर्यंत शिक्षण झालेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ५६ टक्के आहे. तर सातवी ते दहावी पर्यंत २२.६६ टक्के शेतकऱ्यांनी शिक्षण घेतलेले आहे. कुणीही शेतकरी निरक्षर नाही.

०५) ग्रामीण भागात राहाणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण ८२.३३ टक्के आहे. तर शहरी भागात राहाणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण १७.६६ टक्के आहे.

०६) शेती करणाऱ्या कुटूंबात २ ते ४ सदस्यसंख्या असलेली सर्वाधिक कुटुंब असून प्रमाण ६१.३३ टक्के एवढे आहे. त्यानंतर ४ ते ६ सदस्य संख्या असलेली १५.६६ टक्के, ६ ते १० सदस्य संख्या असलेली १३.३३ तर १० पेक्षा जास्त सदस्य संख्या असलेली ९.६६ टक्के कुटूंब आहेत.

०७) दहावी ते बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांची असणारी कुटुंब संख्या सर्वाधिक असून ते प्रमाण ५९.३३ टक्के एवढे आहे. त्यानंतर बारावी ते पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १४ टक्के, सातवी ते दहावीत शिक्षण घेणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण ९.३३ टक्के, व्यावसायिक पदवी शिक्षण घेणाऱ्या कुटूंबाचे प्रमाण ७.६६ टक्के, पदव्युत्तर पदवी शिक्षण घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ५.६६ टक्के तर पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या ४ टक्के आहे. सर्वच शेतकरी मुलांच्या शिक्षणाबद्दल जागरूक असल्याचे स्पष्ट होते.

०८) सर्वच शेतकरी वृत्तपत्र नियमित वाचत असून हे प्रमाण १०० टक्के आहे. याचा अर्थ सर्वच शेतकऱ्यांना वृत्तपत्र नियमित वाचण्याची सवय आहे. कृषि विषयक माहिती ते वृत्तपत्रातून मिळवतात.

०९) दैनिक लोकमत हे पत्र ७३.६६ टक्के शेतकरी वाचतात. तर सकाळ ७० टक्के, पुण्यनगरी ४६.६६ टक्के, ॲग्रोवन ४५ टक्के, पुढारी ४२.३३ टक्के, लोकसत्ता १५

टक्के, महाराष्ट्र टाइम्स ९.३३ टक्के तर अन्य वृत्तपत्रे ३७.३३ टक्के वाचतात. सर्वाधिक शेतकरी दैनिक लोकमत वाचतात तर सर्वांत कमी दैनिक महाराष्ट्र टाइम्स वाचतात असे अभ्यासावरून स्पष्ट होते.

१०) कृषि पत्रकारितेतल्या वृत्तमूल्याबाबत ८९.३३ टक्के शेतकरी सजग आहेत आणि तसा विचार करतात.

११) कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होत असल्याचे मत ९५.६६ टक्के शेतकऱ्यांनी मांडले. तर निम्याहून अधिक म्हणजे ९५.६६ टक्के शेतकरी त्यांच्या शेती व्यवसायातील वाढ ही कृषि पत्रकारितेमुळे झाल्याचे मान्य करतात.

१२) कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होण्यास मदत होत असल्याचे मत ९६.३३ टक्के शेतकरी मान्य करतात. कृषि पत्रकारितेचा मजकूर शेतीतल्या घटकांवर प्रभाव टाकतो.

१३) मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान असल्याचे मत ९८ टक्के शेतकरी मान्य करतात.

१४) निम्याहून अधिक शेतकरी म्हणजे ७७.३३ टक्के उत्तरदाते हे अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक असल्याचे मान्य करतात.

१५) दैनिक सकाळ हे शती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देत असल्याचे मत ७१.६६ टक्के शेतकऱ्यांनी नोंदविले आहे. त्यानंतर अनुक्रमे दैनिक लोकमत ७० टक्के, दैनिक ॲग्रोवन ४४ टक्के तर अन्य वृत्तपत्रे ४० टक्के असा प्राधान्यक्रम उत्तरदात्या शेतकऱ्यांनी नोंदविला आहे. याचा अर्थ असा की सकाळ आणि लोकमत या दैनिकात शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती देण्याबाबत स्पर्धा आहे.

१६) प्राधान्य क्रमाने पणन व बाजारभाव या विषयावरचे लेखन ९६.६६ टक्के शेतकऱ्यांना वाचायला आवडते. तर यशकथा ८९.३३ टक्के, नवीन तंत्रज्ञान ७७ टक्के, दुग्धव्यवसाय ५९.३३ टक्के आणि ७० टक्के शेतकऱ्यांना इतर मजकूर वाचायला आवडते. वाचनाच्या या आवड प्राधान्यक्रमानुसार शेतीतल्या उत्पादनाची बाजारपेठ कशी आहे किंवा असणार या माहितीची उत्सुकता सर्वाधिक उत्तरदात्यांना आहे.

१७) वर्तमानपत्रे शेतीपेक्षा राजकारणाला जास्त महत्त्व देत असल्याचे मत ६७.६६ टक्के शेतकऱ्यांनी मांडले. याचा अर्थ असा की निम्याहून अधिक शेतकरी उत्तरदात्यांच्या मते शेती ऐवजी राजकारण हा विषय वृत्तपत्रांकडून जास्त मांडला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

१८) पाणी हा विषय सर्वाधिक महत्त्वाचा असल्याचे मत ९९.३३ टक्के शेतकऱ्यांनी मांडले असून त्यानंतर कर्जमाफी ९६.६६ टक्के, अवकाळी पाऊस ७९ टक्के, कर्जबाजारीपणा ७८.३३ टक्के तर नापिकी ११ टक्के असे प्रमाण आहे. या सर्वेक्षणावरून अनुक्रमे पाणी आणि कर्जमाफी हे विषय शेतकऱ्यांच्या सर्वात जिव्हाळ्याचे असल्याचे स्पष्ट होते.

१९) वृत्तपत्रे शेतकरी या घटकाला पुरेशी जागा देत नसल्याचे मत ९१.३३ टक्के उत्तरदात्यांनी नोंदविले आहे. यावरून असे दिसते की वृत्तपत्रे शेतकरी या घटकाबाबतच्या मजकूराकडे पुरेसे लक्ष देत नाहीत.

२०) 'ॲग्रोवन' या दैनिकाशी स्पर्धा करणाऱ्या आणखी एखाद्या दैनिकाची आवश्यकता असल्याचे मत १२.६७ टक्के शेतकऱ्यांनी नोंदविले. यावरून 'ॲग्रोवन' हे कृषि दैनिक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय असल्याचे स्पष्ट होते.

२१) सध्याच्या कृषि पत्रकारितेत आहे त्यापेक्षा अधिक नवा मजकूर हवा असल्याची गरज ९१ टक्के शेतकऱ्यांनी व्यक्त केली. नव्या मजकूराबाबत शेतकरी सजग असल्याचे या अभ्यासातून सिध्द झाले आहे.

२२) वार्षिक एक ते दिड लाख रूपये उत्पन्न असलेला गट ३४.३३ टक्के तर दीड लाख ते दोन लाख उत्पन्न असलेले शेतकरी ३१.६६ टक्के आहेत. त्यानंतर पन्नास हजार ते एक लाख रूपये या उत्पन्न गटात १९.६६ टक्के, पन्नास हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेले ६.३३ टक्के उत्तरदाते मोडतात तर दोन लाखापेक्षा जास्त उत्पन्न असलेले उत्तरदाते ८.६६ टक्के एवढे आहेत. यावरून पन्नास हजारापेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे स्पष्ट होते.

२३) वार्षिक एक ते दिड लाख रूपये कर्ज असलेला गट ३१ टक्के तर दिड लाख ते दोन लाख कर्ज असलेले उत्तरदाते २८.३३ टक्के आहेत. त्यानंतर पन्नास हजार ते एक लाख रूपये या कर्ज गटात १६.३३ टक्के तर दोन लाखापेक्षा जास्त कर्ज असलेले शेतकरी

४.६६ टक्के आहेत. १९.६६ टक्के शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले नाही. यावरून बिगर कर्जदार असलेले शेतकरी गट देखील कृषि क्षेत्रात असल्याचे स्पष्ट होते.

२४) सहकारी पतसंस्थेकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण ८० टक्के आहे. त्या नंतर अनुक्रमे सावकराकडून ४९.६६ टक्के, सरकारी बँकेकडून ४४ टक्के, सहकारी बँकेकडून ३२.३३ टक्के कर्ज मिळाल्याची माहिती शेतकरी देतात. उत्तरदाते एकाहून अधिक पुरवठादाराकडून कर्ज उचलत असल्याचेही आढळून आले आहे. सरकारी बँका सर्वच शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करीत नाहीत त्यामुळे शेतकऱ्याला कर्जासाठी खासगी सावकाराच्या दारात जावे लागते. जवळपास ५० टक्के इतके हे प्रमाण आहे.

२५) कर्जदार शेतकऱ्यांपैकी ७२.३३ टक्के शेतकरी कर्ज रकमेची परतफेड नियमीत होत नसल्याचे सांगतात. शेतकरी आत्महत्यांच्या प्रमुख कारणांमध्ये कर्जफेडीला कंटाळून जीवन संपवणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असल्याने ७२.३३ टक्के हे प्रमाण चिंताजनक आहे.

२६) पाणी उपलब्धतेची स्थिती अतिशय कमी असल्याचे ८६.३३ टक्के शेतकरी सांगतात. पाटपाणी वाटप कायदा आणि कमी होत असलेले पर्जन्यमान यामुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता कमी होत असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे.

२७) शेतमालाला मिळणारा बाजारभाव हा अतिशय कमी असल्याचे उत्तर ९९ टक्के शेतकऱ्यांनी दिले. तर समाधानकारक भाव मिळतो असे सांगणाऱ्यांचे प्रमाण १ टक्का आहे. अनुक्रमे खूप चांगला व चांगला भाव मिळतो असे सांगणारा एकही उत्तरदाता या सर्वेक्षणात आढळलेला नाही. शेतमालाला अतिशय कमी बाजारभाव मिळत असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

२८) हवामान बदलाची माहिती वेळेवर मिळत नसल्याचा प्रतिसाद सर्वच म्हणजे १०० टक्के शेतकऱ्यांनी नोंदविला आहे. हवामानाबद्दलची अचूक माहिती वेळेवर कधीच मिळत नसल्याचे सांगितल्याने हवामान शास्त्रातील संशोधन आणि संप्रेशनाबाबत मोठे प्रश्नचिन्ह उभे असल्याचे या अभ्यासात सिध्द झाले आहे. हवामान, पाऊसकाळ, पीकपद्धती आदिंचे अचूक व वेळेवर मार्गदर्शन करणे सध्या तंत्रज्ञानाच्या मदतीने सहज शक्य आहे. तरीही ही अवस्था आहे. शेतकऱ्यांना माहितीचा अधिकार मिळत नाही.

२९) सरकारची मदत वेळेवर मिळत नसल्याचे मत ९६ टक्के शेतकऱ्यांनी दिले. यावरून सरकारी यंत्रणांचा बेजबाबदारपणा दिसून येतो. शासनाच्या योजना प्रत्यक्ष शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाहीत हे यावरून स्पष्ट होते.

३०) जिरायती शेती करण्याचे प्रमाण ७१ टक्के आहे. यावरून पावसाच्या भरवशावर शेती करणाऱ्यांकडे सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

३१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या संस्थेचा उपयोग होत नसल्याची खंत ५७.३३ टक्के शेतकऱ्यांना आहे. कृषि विद्यापीठासारखी मोठी संस्था जिल्ह्यात असूनही तिचा उपयोग होत नसणाऱ्या शेकतकऱ्यांचे प्रमाण मोठे दिसून येते. शेती आणि ग्रामीण विकासात मोठे योगदान असणारे अहमदनगर जिल्ह्यातील ज्येष्ठ समाजसेवक पद्म भूषण अण्णा हजारे यांनी देखील प्रस्तुत संशोधकाने त्यांच्या घेतलेल्या मुलाखतीत महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे विद्यापीठ, शेतकरी व वृत्तपत्रे यात सुयोग्य समन्वय व धोरण नसल्याचे दिसते.

३२) आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार म्हणतात की शेती व शेतकरी जगवण्यासाठी सरकारी व खाजगी माध्यमांनी हेतू शुध्द ठेवून कृषि पत्रकारिता केली पाहिजे. कृषि विद्यापीठांनी केलेले यशस्वी संशोधन कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांपर्यंत गेले पाहिजे. त्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना भाव मिळवून दिला पाहिजे. परंतु इथेही जो शेतकरी पिकवतो तो देव होण्याऐवजी व्यापारी देव झालाय, दुर्दैवाने आज कृषि विद्यापीठे स्पर्धा परिक्षा केंद्रे झालीत तसेच गुणवत्ते ऐवजी वशिलेबाजीने ती पोखरली गेली आहेत. त्यामुळे गेल्या २५ वर्षात आपल्याकडे कृषि विस्तार कार्य शुन्यावर आले आहे.

३३) कृषि पत्रकारिता सुधारण्यासाठी योग्य बातम्या असाव्यात असे मत ९५.६६ टक्के शेतकऱ्यांनी मांडले. तर नेमके संपादन करण्यासाठी १२ टक्के, छायाचित्रांचा वापर ७८.३३ टक्के आणि नव्या शोधांच्या विस्तारासाठी ८२.३३ टक्के शेतकरी आग्रही आहेत. या सर्व उपायांची योजना केली तर कृषि पत्रकारिता सुधारू शकते.

३४) पत्रकार संतोष गोरे यांच्या मते कृषि क्षेत्राला 'डाऊन मार्केट' समजले जाते. ही मुख्य समस्या आहे. हा विचार बदलण्यसाठी मानिसिकता बदलण्याची गरज आहे. कृषि

पत्रकारिता या घटकाला मुख्य प्रवाहातील माध्यमांनी महत्त्व देणे अत्यंत आवश्यक आहे. ठराविक पत्तत्रकार व मोजके माध्यमसमूह कृषि पत्रकारितेबाबतीत जागरूक असल्याचे चित्र आज दिसते. वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होत आहे. शहरी भागातल्या समस्या, प्रश्न यांना जास्त जागा मिळते. परंतु शेतीतल्या संदर्भात विविध प्रश्नांबाबत वृत्तपत्रांनी शिक्षण देण्याचे काम केले पाहिजे. आपली कृषि प्रधान अर्थव्यवस्था असल्याचे वारंवार आपण ऐकतो मग शेतीच्या रक्षणासाठी, विकासाठीची जागरुकता वाढणे गरजेचे आहे. यासाठी कृषि विषयक बीट प्रत्येक माध्यमाने निर्माण करणे आवश्यक आहे.

३५) जेष्ठ पत्रकार अशोक पटारे म्हणतात की सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबाबत म्हणावे तसे जागरूक नाहीत. विदर्भ, मराठवाड्यात होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांचे लोण आता पश्चिम महाराष्ट्रातही आले आहे. अन्नधान्य पिकविणारा हा घटक पत्रकारितेत आणखी जोरकसपणे मांडला जाणे गरजेचे आहे. याचा अर्थ कृषि घटकातल्या धोरणांचा म्हणावा तसा फायदा होत नाही की काय ? सर्वच कृषि योजनांचा फेर आढावा आणि मुल्यमापन होणे गरजेचे आहे. कष्ट करणारा गरीब शेतकरी आपला वाचक नाही असा अनेक वृत्तपत्रांचा समज आहे. खते, बियाणे, किटकनायके यांचा शेतकरी ग्राहक आहे. कृषि क्षेत्रातल्या बातम्या, माहिती संदर्भातल्या मजकूराला प्राधान्य दिल्यास वृत्तपत्रांना त्याचा फायदा होवू शकतो. कारण खते, बियाणे, किटकनाशके यांचा शेतकरी ग्राहक असल्योन या उत्पादक कंपन्याच्या जाहिराती मिळू शकतात हे या वृत्तपत्रांना पटवून द्यावे लागेल.

३६) जेष्ठ पत्रकार मिलिंदकुमार साळवे म्हणतात की सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबाबत जागृत आहेत असे चित्र दुर्दैवाने दिसत नाही. याचे कारण पत्रकारितेत आलेली व्यवसायकिता होय. अनेकदा मजकूर अथवा बातमी छापण्यापूर्वी त्यातील व्यावसायिक मूल्यमापन केले जाते. अंक वाढीचे लक्ष आणि जाहिरातींसारखे निकष लावून प्रसिध्दी बाबत धोरण आखले जाते. कार्यालयीन धोरणाचा भाग म्हणून ती किती विकावू आहे यावर त्या बातमीचे मुल्य ठरवले जाते. अशा वेळी एखाद्या शेतकऱ्याची यशोकथा छापायची असेल तर तो शेतकरी किती अंक विकत घेणार असा प्रश्न त्याला

विचारला जातो अशी आजच्या काही ठिकाणच्या वृत्तपत्रांची अवस्था आहे. यासाठी वृत्तपत्रांनी अंकवाढीच्या धोरणाचा विचार करताना जया भागात आपल्या वृत्तपत्र चालवतो त्या भागातील शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याचे व सोडवण्याचे काम केले पाहिजे. स्वागतार्ह बाब म्हणजे अपवाद असलेली काही दैनिकं खरोखर आठवड्यातून एखादे की होईना पान, सदर कृषि पत्रकारितेसाठी राखीव ठेवताना दिसतात. परंतु व्यापक असलेल्या कृषि पत्रकारितेसाठी इतक्याशा जागेने समाधान होईल असे वाटत नाही.

३७) कृषि पत्रकारांच्या घेतलेल्या मुलाखतीतल्या मतानुसार शेतकरी मोसमी पाऊस आणि पारंपरिक ज्ञानावर विसंबून आहे. नव्या प्रयोगाला सामोरे जाण्याची तयारी नसल्याने शेतकऱ्याची आर्थिक प्रगती होत नाही. पत्रकार मिथिलेश जोशी यांच्या मते कृषि पत्रकारिता ही अल्प भूधारक शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून केली जात नाही की ज्यांची संख्या मोठी आहे. कृषि उत्पादनांचा जास्त फायदा व्यापारी वर्गाला होतो. सामान्य ग्राहक व उत्पादक शेतकरी यांचेच अनेकदा नुकसान होते.

३८) कृषि तज्ज्ञ प्रा. माधव देसाई यांच्या मतानुसार सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक नाहीत, कारण शेतकऱ्यांना कोणता मजकूर आवश्यक व उपयोगी आहे याबाबत त्यांचे निश्चित असे धोरण नाही. वृत्तपत्र चालविणे हा नफा तोट्याचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे मराठी वृत्तपत्रांचे कृषि पत्रकारितेत योगदान दिवसेंदिवस कमी होत आहे. काही वृत्तपत्रे वगळता बहुतेक वृत्तपत्रे कृषिविषयक मजकूर अतिशय कमी प्रमाणात देतात. शेतीक्षेत्राच्या विकासासाठी कृषि विषयक महत्त्वाचा असलेला मजकूर अधिक प्रमाणात देणे आवश्यक आहे. मुलाखतीत कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकारांनी व्यक्त केलेल्या मतानुसार ग्रामीण भागातल्या सर्वच शेतकऱ्यांपर्यंत वृत्तपत्रे अद्याप पोहोचलेली नाहीत. ग्रामीण भागात वृत्तपत्रांचे वितरण करणे ही खर्चिक बाब आहे. तसेच या वर्गाकडून मिळणाऱ्या जाहिरातींचे प्रमाण अल्प असल्याने हे आव्हान अद्याप टिकून आहे.

३९) कृषि तज्ज्ञ डॉ. पंडित खर्डे यांच्या मते कृषि पत्रकारितेमुळे शेतीतल्या प्रश्नांवर होणारी आंदोलने, मेळावे यांची माहिती मिळत असल्याने एक चांगला प्लॅटफॉर्म मिळतो. परंतु अपवाद वगळता सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक नसल्याचे चित्र आहे.

अशा वृत्तपत्रांनी सामाजिक जबाबदारी घेतली पाहिजे. शेती विषयक बातम्यांना, कार्याला आपल्या वृत्तपत्रात योग्य जागा दिली पाहिजे. शेतकऱ्यांचे प्रश्न समाजापुढे निर्भिडपणे मांडले पाहिजे. अधिकाधिक शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया मांडण्यासाठी आठवड्यातून किमान एक पान मजकूर शेतीच्या यशोगाथा, तज्ज्ञांचे लेख यावर असायला हवेत.

४०) संदर्भ साहित्य तसेच इतर घटकांच्या निरिक्षणातून संशोधक या निष्कर्षापर्यंत पोहोचला आहे की, कृषि पत्रकारितेतल्या संवादात तथा मजकूरात अनेकदा समस्या सांगितल्या जातात परंतु त्यावरील उपाय योजनांबाबत ऊहापोह, मार्गदर्शन करण्याचे प्रमाण अतिशय नगण्य आहे. त्याचबरोबर कृषि पत्रकारितेच्या अभ्यासाचे प्रमाण अतिशय कमी आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेतीसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या पाणी, पीक, हवामान, सिंचन, पणन, दुष्काळ, नापिकी, खते, बि–बियाणे, पाऊस, शाश्वत शेती, सरकार राबवित असलेल्या विविध योजना, विश्लेषण आदि विषयांची जाणीव जाणवते.

## ५.३ गृहितक पडताळणी व निष्कर्ष

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास करताना संशोधन साहित्याचा आढावा, शेतकऱ्यांचे सर्वेक्षणातील माहिती, वृत्तपत्रातील आशय विश्लेषण, कृषि तज्ज्ञ व कृषि पत्रकार यांच्या घेतलेल्या मुलाखती, संदर्भ साहित्याचा आढावा तसेच प्रत्यक्ष भेटीतील निरीक्षणे या माहितीच्या आधारे गृहितकांची पडताळणी केली आहे. ती पुढील प्रमाणे आहे.

**गृहितक : १ कृषि पत्रकारितेमुळे शेतीव्यवसायात वाढ होते.**

या गृहितकाची पडताळणी करताना संशोधकाने वृत्तपत्रात प्रकाशित अनेक प्रकारच्या कृषि वार्तांचा आधार घेतला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी रेडिओ, दुरचित्रवाणी, वृत्तपत्रांद्वारे शेती विषयक माहिती घेतात. कृषि पत्रकारिता आणि शेती व्यवसायातील वाढ या तालिका क्रमांक ४.३९ नुसार कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होत असलयाचे मत २८७ शेतकऱ्यांनी मांडले आहे. हे प्रमाण ९५.६६ टक्के आहे. त्यामुळे हे गृहितक वैध ठरले आहे.

**गृहितक : २ कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषि जागृती निर्माण होते.**

कृषि पत्रकारितेमुळे संवाद झाल्याने शेतकरी सुज्ञ होत असल्याचे अनेक तज्ज्ञांनी मुलाखतीत सांगितले आहे. अनेक प्रकारच्या कृषि वार्तांमुळे शेतकऱ्यांना शेतीतील पिकांचे नियोजन करणे सोपे जाते. तालिका क्रमांक ४.४० नुसार कृषि पत्रकारितेतून कृषि जागृती होत असल्याचे मत २८९ शेतकऱ्यांनी मांडले आहे. हे प्रमाण ९६.३३ टक्के आहे. त्यामुळे हे गृहितक वैध ठरले आहे.

**गृहितक : ३ मराठी वृत्तपत्रांचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान आहे.**

शेतीविषयक माहितीवर आधारित लेख, बातम्या, छायाचित्रे प्रसिध्द करण्याचे धोरण अनेक वर्षांपासून मराठी वृत्तपत्रे राबविताना दिसतात. सर्वच मराठी वृत्तपत्रे शेतीविषयक मजकूर देतात. या गृहितकाची पडताळणी करताना संशोधकाने वृत्तपत्रात प्रकाशित अनेक प्रकारच्या कृषि वार्तांचा आधार घेतला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी मराठी वृत्तपत्रे वाचतात. कृषि पत्रकारितेत मराठी वृत्तपत्रांचे योगदान असल्याचे मत २९४ शेतकऱ्यांनी मांडले आहे. तालिका क्रमांक ४.४१ नुसार हे प्रमाण ९८ टक्के इतके आहे. त्यामुळे हे गृहितक वैध ठरले आहे.

**गृहितक : ४  मराठी वृत्तपत्रांच्या कृषि पत्रकारितेच्या योगदानामध्ये असमतोलपणा दिसून येतो.**

प्रत्येक मराठी वृत्तपत्राचे कृषि विषयक वृत्त देण्याचे प्रमाण कमी अधिक असल्याचे मत कृषितज्ज्ञ व कृषि पत्रकारांनी मुलाखतीत मांडले आहे. प्रस्तुत संशोधनातही वृत्तपत्रांचा तुलनात्मक अभ्यास करताना याबाबतचा मराठी वृत्तपत्रांचा असमतोलपणा स्पष्ट झाला आहे. तालिका क्रमांक ४.४३ व ४.५० चे अभ्यासावरून हे गृहितक वैध ठरले आहे.

## ५.४ नवी सैध्दांतिक मांडणी

मराठी वृत्तपत्रांच्या या अभ्यासात सिध्दांताचा विकास करणे आणि त्यातून नवी प्रमेय मांडणे याला विशेष महत्त्व आहे. प्रा. विलबुर श्रॅम यांनी चार सिध्दांत मांडले आहेत. मुख्य सिध्दांत, उदारमतवादी सिध्दांत, भांडवलवादी सिध्दांत आणि साम्यवादी सिध्दांत हे चार मुख्य

सिध्दांत आहेत. त्यात डेनिस मॅक्विल यांनी विकास सहभागाच्या सिध्दांताची नव्याने भर टाकली आहे. तर टी. न्यूकॉम्ब यांनी १९५३ मध्ये सामाजिक संदर्भाचे मांडलेले प्रतिमान संज्ञापनाच्या भूमिकेचा विचार करणारे आहे.

कृषि संवादशास्त्रात प्रशिक्षण आणि शिवार भेट विस्तारातील गुंतागुंत व परस्परसंबंधांचा अभ्यास डॅनियल बेनोर व जेम्स हॅरीसन यांनी १९७७ साली केला. त्यांच्या मते शेतकरी, विस्तार व संशोधन या तीनही घटकातील संवादचक्र सतत गतिमान असणे आवश्यक आहे. विस्तार विभागाच्या नियमित आणि निश्चित अशा थेट कृषिक्षेत्र भेटी प्रभावी संवादात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. भारतातील १३ मोठी राज्ये व जगभरातील चाळीस देशांनी ही कृषि संवादातली प्रशिक्षण आणि भेट विस्तार प्रणाली The Training & Visit System (T & V) स्वीकारली. कृषि संवादशास्त्र हे सतत बदलत जाणारे नित्यनूतन शास्त्र आहे. या शास्त्रामध्ये संशोधन (Research) संवाद (Communication) कृती (Action) मूल्यमापन (Evaluation) या चतुःसूत्रीस अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. संशोधनाशिवाय कोणत्याही यंत्रणेतील दोष दूर करता येत नाहीत. यासाठी योग्य कृती कार्यक्रम आखावा लागतो. तसेच वारंवार मूल्यमापन करावे लागते. कृषि पत्रकारितेतील संवाद साखळीतील काही यंत्रणांच्या अकार्यक्षमतेमुळे प्रभावी कृषि संवाद लोप पावला आहे. यासाठी जबाबदार संवाद संपर्क यंत्रणा उभी करावी लागेल. त्यासाठी वर्तुळाकार अशी विविध घटकांना परस्परांस जोडणारी सुसंवादी यंत्रणा आवश्यक आहे.

मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यासावरून असा एक सिध्दांत समोर येतो की, कृषि पत्रकारितेबाबतीत जर वृत्तपत्रे सजग असतील तर त्यांच्या वैचारिक जागृतीमुळे शेतीक्षेत्रातील कृषिजीवनात विकासाला पोषक पार्श्वभूमी तयार होते. त्यातूनच शाश्वत विकासाची प्रक्रिया राबविली जाते. त्यामुळे या संशोधन विषयातून ग्रामीण विकास, सरकारी यंत्रणा, शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विषय कृषि पत्रकारितेच्या अंगाने पुढे आला आहे. या अभ्यासात प्रकर्षाने जाणवलेली बाब म्हणजे मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेतल्या संवादातून शेतीच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम करतात. त्यानंतरच अनेकदा सरकारी यंत्रणांना माहिती होते अथवा त्या खडबडून जाग्या झाल्याचे कळते. परंतु शेतकऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात असणाऱ्या महसूल, ग्रामविकास, कृषि, सिंचन, गृह, जिल्हा

माहिती कार्यालय या यंत्रणात समन्वय नसल्याने त्या सतर्क नसल्याचे आढळते. त्यामुळे कृषिजीवनाशी निगडीत पत्रकारिता करताना वृत्तपत्रांना अनेकदा अडचणींचा सामना करावा लागतो. सरकारी यंत्रणांच्या अनास्थेचा, बेफिकिरीचा उल्लेख पत्रकारितेत अनेकदा आढळतो. या सरकारी अनास्थेबद्दलचा संताप शेतकरी माध्यामांजवळ व्यक्त करताना दिसतात. या सर्वच बाबी कळत–नकळत कृषि पत्रकारितेवर परिणाम करीत असतात. शाश्वत कृषि विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी कृषि व अकृषि क्षेत्रातल्या घटकांचे सुयोग्य माहितीचे आदान–प्रदान होणे आवश्यक आहे. यासाठी मराठी वृत्तपत्रे, सरकार, शेती व शेतकरी यांच्या सर्वांगिण विकासासाठी कृषि पत्रकारितेची आदर्श संवाद प्रतिकृती कशी असावी या बाबत या संशोधन प्रबंधात विचार करणे गरजेचे आहे. सर्व प्रकारच्या सरकारी व खासगी यंत्रणांचा सुयोग्य समन्वय होणेकामी या संशोधनातून पुढे आलेले नवे समीकरण व प्रतिमानाचा वापर होणे गजरेचे आहे.

## ५.५ शिफारसी

०१) वृत्तपत्रांनी एकूण छापील मजकुरात कृषि विषयक मजकुराचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. कृषि विषयक मजकुराबाबतीत निश्चित धोरण व हंगामास पोषक अशा पूरक माहिती सेवा द्याव्यात.

०२) ग्रामीण भागात कार्यरत कृषि पत्रकारांसाठी प्रशिक्षण वर्ग व मार्गदर्शक कार्यशाळा आयोजित कराव्यात.

०३) ग्रामीण व शहरी भागात राहाणाऱ्या शेतकऱ्यांच्या काही समस्या पीक, पाणी, हवामान, जमिनीची वर्गवारी यानुसार वेगवेगळ्या असल्याने त्याप्रमाणे वृत्तपत्रात स्थान द्यावे.

०४) शेती करणाऱ्या कुटूंबातील सदस्यसंख्या व प्रमाण लक्षात घेऊन सरकारने कृषिविषयक धोरणे आखावीत.

०५) शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेती व कृषि पत्रकारितेतील उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांच्यासाठी प्रोत्साहन योजना द्याव्यात.

०६) सर्वच शेतकऱ्यांना कृषि विषयक माहिती मिळावी यासाठी प्रत्येक गावात कृषि विषयक मजकूर असणारी वृत्तपत्रे, नियतकालिके व संदर्भसेवांनी परिपूर्ण वाचनालय आणि ग्रंथालये स्थापन करावीत.

०७) सरकारी जाहिराती देताना सर्वच वृत्तपत्रांना कृषि विषयक किमान मजकूर छापणे बाबतचे प्रमाण बंधनकारक करावे. कृषि पत्रकारितेतल्या मजकुराबाबत कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे, शासनाचा कृषि विभाग अधिक क्रियाशील करून वृत्तपत्रांना पीक व हंगाम निहाय माहिती देण्यासाठी जिल्हानिहाय कृती गट स्थापन करावेत.

०८) मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेमध्ये योगदान असणारी वृत्तपत्रे, संपादक, पत्रकार, संशोधक, लेखक यांचेसाठी शासनाने दरवर्षी प्रत्येक जिल्ह्यात प्रोत्साहनपर योजना राबवावी.

०९) वृत्तपत्रांनी तसेच सरकारने आता यापुढे प्राधान्य क्रमाने विषय निहाय कृषि वार्ता लेख सेवा कराव्यात. महत्त्वाच्या वार्तांना पान एकवर जागा द्यावी. यासाठी सरकारी माध्यमांचा कुशलतेने वापर करावा.

१०) दुष्काळ, कर्जमाफी, नापिकी, पाणी, हवामान, नवे तंत्रज्ञान, शेतकरी आत्महत्या, कर्ज पुरवठा, शासकीय योजना, बाजारभाव या सारख्या महत्त्वाच्या विषयांवर प्रत्यक्ष प्रश्नांवर आधारित शिबिरे मराठी वृत्तपत्रांनी आयोजित करावीत.

११) कृषि विद्यापीठे, शेतकरी व मराठी वृत्तपत्रे यात प्रभावी समन्वय असण्यासाठी उच्चस्तरीय समितीची नेमणूक करावी. सामान्य शेतकरी, कृषि शास्त्रज्ञ, संपादक, पत्रकार आणि सरकारी कृषि विभागातील अधिकारी यांचा समावेश असलेल्या या समितीची मासिक आढावा बैठक नियमित झाली पाहिजे.

१२) मराठी भाषेतली कृषि पत्रकारिता सुधारण्यासाठी योग्य बातम्या, नेमके संपादन, देशी–परदेशी तंत्रज्ञानाची माहिती व छायाचित्रे, नव्या शोधांचा विस्तार होणेकामी प्रत्येक मराठी वृत्तपत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची भरती करावी.

१३) महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या कृषि व अकृषि विद्यापीठांत तसेच संलग्न महाविद्यालयात प्रादेशिक गरजांनूसार पदविका, पदवी, पदव्युत्तर कृषि पत्रकारिता अभ्यासक्रम सुरू करण्यात यावेत.

१४) अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण डोळ्यासमोर ठेवून सरकारी व खासगी वृत्तपत्रांनी समन्वयातून विशेष उपाययोजना करावी. मोठी संख्या असल्याने सरकारने अल्प भूधारक शेतकऱ्यांचे मार्गदर्शनपर मेळावे आयोजित करावेत. यासाठी सरकारने समाजपयोगी अशासकीय कृषिसंस्थांना विविध माध्यामातून अनुदान व विशेष सवलती द्याव्यात.

१५) प्रत्येक तालुक्यात असणाऱ्या ग्रामसेवक, तलाठी, ग्रामविकास अधिकारी, कृषि सहाय्यक, कृषिदूत, मंडळ अधिकारी, तालुका कृषि अधिकारी यांचेकडून प्रत्येक शेतकऱ्याची पीक निहाय अद्ययावत माहिती संकलित करून नेमक्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी वेळेत अंमलबजावणी करणारी प्रणाली सरकारी कृषि विभाग आणि कृषि विद्यापीठे यांचे मदतीने तत्काळ सुरू करावी. तसेच या उपायांची दैनंदिन माहिती वृत्तपत्रांना जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत देणारी सक्षम यंत्रणा तसेच आधार कार्डाच्या मदतीने उभारावी. तसेच याबाबतची दैनंदिन माहिती वृत्तपत्रांना जिल्हा माहिती कार्यालयांमार्फत देणारी सक्षम यंत्रणा तयार करावी.

१६) वृत्तपत्रांमध्ये आलेल्या कृषिविषयक सर्व प्रकारच्या बातम्या, माहिती यांची तालुकानिहाय नोंद सरकारने घ्यावी. या नोंदीवर त्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणींचे निवारण सरकारच्या संबंधित खात्याकडून केले जावे. याबाबतीत बेफिकिरी, हलगर्जीपणा करणाऱ्या लोकसेवकास दंड, कारावास, सेवा समाप्ती अशा प्रकारच्या शिक्षांची तरतूद करावी.

१७) शेतीतल्या शाश्वत विकासासाठी व्यापक कृषि जनसंवाद गरजेचा असल्याने शक्य तिथे रेडिओ, टेलिव्हिजन आणि सोशल मीडियाचा वापर करण्याचे धोरण सरकारी पातळीवरून राबवावे. यासाठी वेळ प्रसंगी वृत्तपत्रांनाही नवीन आचारसंहिता लागू करावी.

## ५.६ नवे समीकरण व प्रतिमान

दर्जेदार कृषि पत्रकारितेच्या विकासाची जबाबदारी ही फक्त वृत्तपत्रांची नाही. त्याला जोड देऊ शकणाऱ्या खालील सरकारी यंत्रणांचा विधायक वापर होणे शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत येणारे अनेक विभाग ग्रामीण विकास, कृषि,

पाणी पुरवठा, जलसंपदा, कृषि विद्यापीठे, पशुसंवर्धन, सहकार, दुग्धविकास, मत्स्य विभाग प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या हे थेट कृषि क्षेत्राशी निगडीत विषयांवर कार्यरत आहेत. तर नोंदणीकृत वृत्तपत्रे, दृकश्राव्य माध्यमे ही देखील केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याच्या नियंत्रणाखाली आहेत. तसेच अनेक प्रकारच्या जाहिराती देण्याचे धोरण महाराष्ट्र सरकारचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालय ठरवत असते. त्यामुळे या सर्व घटकात सुयोग्य समन्वय साधून वापर करण्याची गरज आजमितीला निर्माण झाली आहे. विविध घटकांकडून सातत्याने माहिती घेणे व ती प्रसिध्दीसाठी अद्ययावत केले पाहिजे. कृषि पत्रकारितेतल्या संवाद साखळीतला मोठा घटक आज या प्रतिमानात फक्त प्रतिक्रिये पूरताच उरला की काय अशी शंका येते. सरकारी वेतन व फायदे घेणारा हा मोठा प्रशिक्षित व उच्च शिक्षित वर्ग या संवादात कार्यप्रवण करण्यासाठी धोरणात्मक पावले उचलावीत.

या संशोधनातल्या सामाजिक पाहणीतून सर्वच शेतकरी हवामान बदलाची माहिती वेळेवर कधीच मिळत नाही असे सांगतात. पाण्याची उपलब्धता, सरकारी मदत, शेती उत्पादनाला हमीभाव या सर्वच बाबींवर कृषिक्षेत्र विसंबून आहे. सरकारचे थेट नियंत्रण असलेले हे सर्वच विषय सुनियोजितपणे कृषि कल्याणासाठी वापरल्यास कृषिक्षेत्रातल्या समस्या सुटतील. विधीमंडळात केलेले कायदे, शासन निर्णय, नियम आदिंची नुसती अंमलबजावणी जरी केली तरी बहुतेक समस्या सुटू शकतात. यासाठी गरज आहे सत्तेतल्या राजकीय इच्छाशक्तीची. त्यातून वृत्तपत्रातील अनावश्यक मजकूराचे प्रमाण बरेचसे कमी होण्यास मदत होईल. याकामी वारण्यात येणारा वेळ, पैसा आणि मनुष्यबळ यांची बचत आणि कृषि पत्रकारितेसाठी गुणवत्तापूर्ण मजकूराची निर्मिती होईल. वृत्तपत्रासारख्या मुद्रित माध्यमातून लोकांसोबत दीर्घकाळ टिकून राहता येते. कारण या माध्यमातून साधलेला संवाद पुन्हा पुन्हा वाचता येतो आणि त्यानुसार कृतीप्रवण होता येते. शेतकऱ्यांचा प्रतिसाद या दोन्ही प्रकारचा असू शकतो. तेव्हा संज्ञापनाद्वारे समजून उमजले पाहिजे, तरच शेतकरी एखादा संदेश ग्रहण करतात.

संज्ञापनाचा हेतू शेतकऱ्यांनी संदेश समजून घेऊन त्यावर अपेक्षित कृती करावी असा आहे. संज्ञापनाच्या हेतूप्रमाणे जर कार्य झाली नाही किंवा प्रतिसाद मिळाला नाही तर संदेशवहन प्रक्रियेत बदल करण्याची गरज असते. उदाहरणार्थ संदेशवाहकाने बीजप्रक्रियेचा

संदेश जर शेतकऱ्यांना दिला तर त्यांनी बुरशीनाशकाचे ठरावीक प्रमाण घेऊन त्याप्रमाणे बीजप्रक्रिया करायला हवी बुरशीनाशक आणि बी यांचा ठरावीक प्रमाणातच उपयोग करून ती बीजप्रक्रिया केली तरच ते फायदेशीर राहील. शेतकऱ्यांनी आपल्या मताने त्यात बदल केला तर त्याचा उपयोग होणार नाही. हा संदेशवहनाला मिळालेला प्रतिसाद चुकीचा राहील. अशा प्रकारे अनेक उदाहरणे देता येतील. तेव्हा फक्त कृती करावयाची ही पुरेशी नाही. त्याने संज्ञापनात पुर्ण यशस्वीता येत नाही. तेव्हा चांगल्या संज्ञापनासाठी अपेक्षित कार्य सांगितल्यानुसार असणे महत्त्वाचे आहे. या व्यवहार्य संशोधनातून शाश्वत विकासासाठी व कृषि पत्रकारितेत गुणवत्तापूर्ण कृषि मजकूरासाठी या संशोधनात पुढील समीकरण व नवे संवाद प्रतिमान विकसित केले आहे. त्याचा वापर आणि अंमजबजावणी केली पाहिजे.

कृषि समस्या संकलन + कृषि समस्यांवर उपाय आणि संशोधन + भौगोलिक पार्श्वभूमी व लोकभाषा + कृषि माहिती संकलन, संपादन, वितरण व प्रसिध्दी + प्रत्याभरण = शाश्वत कृषि संवाद

संज्ञापनाच्या मूळ गुणधर्मात संदेशवाहक, संदेश,संदेशमार्ग किंवा माध्यमे, संदेशावरील संस्कार, प्रेक्षक, श्रोते, त्यांची प्रतिक्रिया किंवा प्रतिसाद आणि प्रत्याभरण यांचा समावेश असतो. संज्ञापनाच्या महत्त्वाच्या कार्यात माहिती, सूचना, पाठपुरावा, एकात्मिक प्रकटीकरण आणि एकमेकांतील समज उमज यांचा समावेश होतो. संज्ञापन ही दोन्ही मार्गांनी चालणारी क्रिया आहे. तिच्यामध्ये निश्चितपणा आणि कुशलतेचा वापर, संस्काराची मुल्ये आणि सामाजिक संघटना, संज्ञापनाद्वारे प्रयत्नपूर्वक निश्चित प्रकारचे संज्ञापनाचे ज्ञान, इत्यादींचा समावेश असायला हवा. त्याचा वापर केल्याने संज्ञापन परिणामकारक होते.

मराठी वृत्तपत्रांचे कृषि पत्रकारितेसाठी अधिक प्रभावी संज्ञापन होणेकामी तथा संवादातील अडथळे दूर होण्यासाठी पुढील प्रश्नांचे उत्तर समर्पकपणे मिळणे आवश्यक ठरते. जसे की संदेश कोण पाठवितो ? कोणता सेदेश पाठवितो ? कोणत्या प्रकारच्या ग्राहकांसाठी संदेश आहे ? संदेश पाठविण्याचा हेतू काय आहे ? कोणत्या माध्यमातून व कोणत्या परिणामांसाठी संदेश आहे ? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संदेशातील सत्यता शास्त्रीयदृष्ट्या बरोबर आहे का ? या सर्व प्रश्नांबरोबरच कृषि पत्रकारितेच्या शाश्वत विकासासाठी मराठी

वृत्तपत्रांनी प्रत्याभरणाकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे. कृषि संवादातील प्रत्यभरणानंतर मुल्यमापन करून आणखी चांगला परिणाम साधण्यासाठी संदेशात बदल करणे शक्य आहे. या सर्व बाजुंनी विचार करून प्रस्तुत संशोधनाद्वारे संशोधकाने संवादाचे नवे संवाद प्रतिमान विकसित केले आहे. कृषि संवाद व पत्रकारितेच्या विकासासाठी हे नवे संवाद प्रतिमान तालुका, जिल्हा, प्रांतात वापरले तर शेतीतल्या शाश्वत विकासाच्या दृष्टीने निश्चितच उपयोगी ठरेल. कृषि पत्रकारितेच्या या नव्या संवाद प्रतिमानाचे पाच प्रमुख घटक खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) कृषि समस्या संकलन**

प्रत्येक तालुका निहाय ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद, छावणी परिषद, महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या पीकांच्या माहितीचा आराखडा अद्यावत ठेवणे, यासाठी ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, कृषि सहाय्यक, तलाठी, मुख्याधिकारी, आयुक्त यांची तालुकास्तरीय सुची तयार करणे, याद्वारे सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांच्या पाणी, खते, बियाणे, दुष्काळ, रोगराई, कीटकनाशके, सिंचन, पशुधन आदि सर्व प्रकारच्या समस्यांचे दैनंदिन संकलन केले पाहिजे.

**२) कृषि समस्यांवर उपाय आणि संशोधन**

वरील प्रकारे दैनंदिन समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सरकार नियंत्रित कृषि विभाग, कृषि विद्यापीठे, कृषि महाविद्यालये, कृषि विज्ञान केंद्रे, पंचायत समिती, जिल्हा परिषदांत कार्यरत असलेले कृषि व पशू संवर्धन विभागातील तज्ज्ञ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, संशोधन केंद्रे आदि यंत्रणांकडून शेती समस्यांवर तत्काळ शोध मोहीम राबविली पाहिजे.

**३) भौगोलिक पार्श्वभूमी**

प्रत्येक तालुक्यात भूमी, मातीचा पोत, हवामान, पाण्याची उपलब्धता, पीक पध्दती, पर्यावरण, लोकभाषा आदि प्रकारे विविधता आहे याचा विचार करता कृषि जनसंवाद एक व्यापक व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. यातील कृषि विस्तारासाठी त्या-त्या क्षेत्रातील वातावरण,

भौगोलिक परिस्थिती, पिकांची आखणी, अडचणी व उपाय निहाय वार्तांकनाच्या मजकुराची निर्मिती केली पाहिजे.

**४) कृषि माहितीच्या माध्यमातून प्रसार**

वरील घटकांकडून प्राप्त संकलित त्या त्या तालुक्यातील पिकांची आणेवारी, प्रत्यक्ष पीक परिस्थिती, त्यातील नवे प्रयोग, संशोधनाअंती समोर आलेले काही निष्कर्ष या सर्वांची आखणी करून अचूक समर्पक आणि नेमके संपादन, संस्करण जिल्हा माहिती कार्यालयातील प्रशिक्षित मनुष्यबळाचा वापर करून सुसुत्रता आणली पाहिजे. प्रत्यक्ष हंगाम व शेतीविषयक वार्तांचा उपयोग तळागळातील शेतकऱ्यांना होण्यासाठी या माहितीचा विविध माध्यमांतून प्रसार, प्रचार नियंत्रण करणारी यंत्रणा विविध सरकारी विभागांच्या समन्वयातून उभारली पाहिजे. प्रत्येक पत्रकाराला माहितीच्या मुळ स्त्रोतापर्यंत पोहोचणे नेहमीच शक्य नसते. त्यामुळे विषयतज्ज्ञ, विशेषज्ञ, जाणकार, साक्षीदार, अभ्यासक, शास्त्रज्ञ अशा व्यक्तींकडे जाऊन त्यांच्या हवाल्याने बातमी कृषि वार्ता द्याव्या लागतात. पत्रकारांना बऱ्याच गोष्टींची माहिती असते पण ती अनेकदा वरपांगी, उथळ असण्याची शक्यता असते. यातून अर्धवट, चुकीची, खोटी माहिती प्रसिध्द होण्याचा धोका असतो. ऐकीव माहिती, अफवा, सांगीवांगी, बोलवा, प्रचार, टवाळी, निंदा, अपसमज आदिंपासून बचाव करणे या समिकरणामुळे नक्की शक्य होईल.


**५) शेतकऱ्यांचा प्रतिसाद आणि प्रत्याभरण**

कृषि पत्रकारितेतील संज्ञापनाचा मूळ हेतू शेतकऱ्यांकडून उत्तर मिळविणे किंवा प्रतिसाद मिळविणे हा असतो. या प्रतिसादालाच प्रत्याभरण म्हणतात. हा प्रतिसाद शेतकऱ्यांनी केलेल्या तक्रारी विचारलेल्या प्रश्नातून किंवा कृतीतून दिसतात. माहितीमुळे त्यांच्यात झालेल्या बदलाची कल्पना येते. परंतु सर्वच शेतकऱ्यांसाठी एकच माहिती वेळोवेळी उपयुक्त ठरत नाही. याकरिता शेतकऱ्यांच्या गरजेनुसार माहिती, वार्तांकन झाले पाहिजे. यातील सत्याची प्रचिती आली तर शेतकरी कार्य करण्यास उद्युक्त होतात. समजण्याची क्रिया दिलेल्या सत्य माहिती समजल्यानंतर केली जाते. त्या सत्याला शेतकऱ्यांकडून प्रतिसाद दिला जातो. ते सत्ययुक्त माहितीसाठी तुलनात्मकरित्या इतर बाबींकडे पाहतात. म्हणजेच त्यांच्या दृष्टीने समस्यांकडे पाहतात. शेतकऱ्यांच्या मनातील बदल हे नेहमीच प्रत्यक्ष कृती करण्यामध्ये होतात. त्यामुळे

कृषिविषयक माहिती फक्त समजून घेऊन व ग्रहण करून भागणार नाही, तर त्याप्रमाणे त्यांनी कार्य करावयास पाहिजे.

प्रस्तुत संशोधनातल्या प्रतिमानात व समीकरणात मांडलेल्या प्रत्येक घटकाचे प्रशासकीय व शेतातल्या प्रत्यक्ष क्षेत्रभेटींचे (फिल्ड ऑडिट) सर्व प्रकारचे लेखापरिक्षण होणे गरजेचे आहे. अशा प्रकारे सर्वच यंत्रणांचे (खाजगी व सरकारी) सर्वकश परिक्षण कधीच झाले नाही. होत नाही. ते होणे अत्यंत गरजेचे आहे. शाश्वत कृषि विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू असताना हजारो कोटी रूपये जुन्या व नवनवीन योजनांवर खर्च झाल्याचे व होत असल्याचे लेखापरिक्षणात दिसते. परंतु कागदी घोडे नाचवण्यात पटाईत असलेल्या काही यंत्रणांमुळे यातील प्रत्याभरण प्रक्रिया कोलमडून पडलेली आढळते. वेतन आणि वेतनेतर निधीवर होणारा प्रचंड खर्च प्रत्यक्ष लाभार्थी क्षेत्रास प्राप्त होतो का ? आणि त्याचे फलित काय याचा नियमित आढावा घेणे आवश्यक असल्याचे या संशोधनात स्पष्ट झाले आहे. कारण या विकास संवाद प्रतिमानातले अनेक घटक त्यांचे कार्य करीत नसल्याने असून नसल्यासारखे असल्याचे या अभ्यासात स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या साखळीतले आजारी तथा निद्रीस्त घटकांचे प्रशासकीय व फिल्ड ऑडिट करणे आवश्यक आहे. घेतलेले निर्णय व कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी या नव्या प्रतिमानातल्या प्रत्येक घटकासाठी संजीवनी ठरणार आहे. ते झाल्यास शाश्वत कृषि विकास, संवाद आणि कृषि पत्रकारितेतल्या नेमक्या समस्यांवर पर्यायी व्यवस्था निर्मिती करणे शक्य होणार आहे. विकासप्रक्रिया गतिमान करण्यासाठी सकारात्मक दृष्टी, चौकटीबाह्य विचार, जलद निर्णय, मुक्त वातावरण आदिंसह या संशोधन प्रबंधात मांडलेल्या नव्या प्रतिमानाच्या प्रभावी अंमलबजावणीची नितांत गरज आहे.

# प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रांसाठी कृषि संवादाचे आदर्श प्रतिमान



## ५.७ पुढील संशोधनाची दिशा

माझे संशोधन हे मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेच्या तुलनात्मक अभ्यासावर आहे. मराठी वृत्तपत्रातील कृषि पत्रकारितेतील घटकनिहाय सखोल आशय विश्लेषण आणि शेतकऱ्यांचे विविध प्रश्नांद्वारे सुक्ष्म सामाजिक अभ्यास यात अनेक बाजुंनी करण्यात आला आहे. या संशोधनातील सर्वच १४ घटकांचे विशेष असे महत्त्व शेती आणि जनसंज्ञापनात निश्चितच आहे. त्यामुळे हा महत्त्वपूर्ण असलेला संशोधन अहवाल नवसंशोधकांसाठी भविष्यात नवीन विषयांचे संशोधन करण्यासाठी निश्चित उपयोगी आहे. कृषि पत्रकारितेतील विविध घटक आणि भौगोलिक मर्यादांचे बंधन या संशोधनात मी पाळले आहे. परंतु भविष्यात संशोधकांसाठी या संदर्भात काही नवीन संशोधन विषय पुढीलप्रमाणे आहेत.

०१) महाराष्ट्रातील कृषि पत्रकारितेचे बदलते स्वरूप : एक अभ्यास

०२) नवीन सहस्त्रकातील कृषि पत्रकारिता : विशेष संदर्भ दैनिक सकाळ, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दैनिक लोकसत्ता

०३) कृषि पत्रकारितेचा विदर्भातील शेतीक्षेत्रावर परिणाम : एक चिकित्सक अभ्यास

०४) महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या आणि प्रसारमाध्यमांची भूमिका

०५) एकविसाव्या शतकातील कृषि संवादाची बदलती संकल्पना

०६) हरितक्रांतीतील कृषि संवादाचा चिकित्सक अभ्यास

०७) मराठी वृत्तपत्रांतील कृषि संज्ञापनाची संकल्पना : एक विवेचक अभ्यास

०८) कृषि विज्ञान केंद्रातील माहिती संज्ञापनाचा तुलनात्मक अभ्यास

०९) मराठवाड्यातील विकास योजनांतील कृषि पत्रकारितेचे स्थान

१०) पश्चिम महाराष्ट्रातील कृषि पत्रकारिता आणि सहकार क्षेत्र

११) मराठी वृत्तवाहिन्यांमधील कृषि पत्रकारिताचा अभ्यास

१२) ग्रामीण विकास आणि मराठी प्रसारमाध्यमे : एक अध्ययन

१३) दृकश्राव्य माध्यमांचा कृषि संवाद : विशेष संदर्भ पश्चिम महाराष्ट्र

१४) प्रसारमाध्यमांचा कृषि क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा तुलनात्मक अभ्यास

## ५.८ समारोप

वृत्तपत्रांनी  कृषि पत्रकारितेला पोषक असे कृती सामर्थ्य दिल्यास शेती व ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला अधिक गती लाभू शकत असल्याचे अहमदनगर जिल्ह्यतील वृत्तपत्रांनी सप्रमाण सिध्द केले आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे राळेगण सिध्दी व पोपटराव पवार यांचे हिवरे बाजार ही गावे समृध्द झाली असल्याची उदाहरणे याच अहमदनगर जिल्ह्यातील आहेत. अनेक वर्ष दुष्काळ, दारिद्र्य, बेकारी, अस्वच्छता, अंधश्रद्धा, व्यसनाधिनता असणाऱ्या या दोनही गावांच्या कृषिजीवनाचा कायापालट आणि विकासाची यशकथा आज केवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचली आहे. या गावांचे आदर्श स्वरुप वृत्तपत्रांतून पुढे आल्यामुळे त्यातुन देशभरातील ग्रामविकासाच्या प्रकल्पांना नवी दृष्टी जरी लाभली असली तरी ही दोनच गावे विकासाच्या वाटेवर का व कशी पोहचली ? स्वातंत्र्यानंतर अहमदनगर जिल्ह्यातील एकूण १,६०३ शहर, गावे असणाऱ्या या जिल्ह्यात दोनच गावे आदर्श आणि स्वयंपूर्ण कशी काय बनली ? तर यासाठी शाश्वत कृषि विकासाच्या दृष्टीने शेती आणि शेतकरी यांच्या प्रश्नांचा विचार संवादमाध्यमातून झाला. त्यातून कृषि संज्ञापनात येणारे सर्व प्रकारचे अडथळे दूर केल्यानेच या दोन गावात समृध्दी आली आहे.

नव्या प्रतिमानाच्या अनुषंगाने कार्यवाही केल्यास शाश्वत कृषि विकासातला दूरचा पल्ला आपण सहज गाठू शकतो. त्या दृष्टीने या प्रबंधात केलेली मांडणी अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयुक्त अशी आहे. त्याची व्यवहार्य अंमलबजावणी केल्यास शाश्वत कृषि विकासाची पहाट दूर नाही. वृत्तपत्रे व इतर प्रसारमाध्यमे यांच्या जोडीला सरकारच्या सर्वच थरातील यंत्रणांचा सहभाग याकामी आवश्यक आहे. कृषि, पशुसवंर्धन व मत्स्य विभाग, ग्रामविकास विभाग, जलसंपदा व सिंचन विभाग यासह प्रत्येक जिल्ह्यातील कार्यरत या सरकारी खात्यांचे जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील अधिकारी कर्मचारी कृषि विद्यापीठे, संशोधक, अभ्यासक तसेच शेतीत प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष संबंध असणाऱ्यांनी या संवाद प्रतिमानास सक्रिय होणे आवश्यक आहे. कल्पना, नाविण्य आणि सकारात्मक दृष्टीकोन यांच्या आधारे हा बदल अशक्य नाही. गरज आहे ती खऱ्याखुऱ्या अंमलबजावणीची व सरकारी पातळीवरील राजकीय इच्छाशक्तीची.

प्रस्तुत प्रकरणात संशोधकाने गोळा केलेल्या माहितीच्या आधारे तिचे अर्थनिर्वचन करून विश्लेषणावरून जे काही ठळक निष्कर्ष काढले आहे त्यांची मांडणी केली आहे. त्याच बरोबर गृहितकांची पडताळणी व शिफारसी यांचा समावेश केलेला आहे. नव्या प्रतिमानासह पुढील संशोधनासाठीचे विषय याची देखील मांडणी केलेली आहे. कृषि पत्रकारितेतल्या पुढील शोधाच्या वळणावर नवी दिशा देणारे असे हे उपयुक्त समाजपयोगी संशोधन आहे.

# संदर्भसूची


01) Barroch S. (1995) Modern Fruit Cultivation, Kalyani Publication, New Delhi

02) Berger A.A. (2013) Mass Analysis Techniques, SAGE Publications, Fourth Edition

03) Berlon B. (1952) Content Analysis in Communication Research, Preen Press New York

04) Conften Felix (1994) The Methodology of Social Sciences, Oxford University Press, Oxford

05) Dhillon (1982) Sampreshan – Seminar papers - Print Media and Agricutlral Development, Dr. Ranjit Singh, National Council of Development Communication, July, 1986

06) Expenditure Budget (2017-18) Union Budget 2006-07 to 2017-18

07) Feroze Varun Gandhi (2008) A RURAL MANIFESTO – REALIZING INDIAS FUTURE THROUGH HER VILLAGES

08) Ghosh B.N. (1985) Scientific Method and Social Research, Sterling Publishers

09) Greenwood Arnest (1945) Experimental Sociology, New York

10) Handbook of Agriculture (2008) Directorate of Inforamtion and publication of Agriculture Indian Council of Agricultural Research, New Delhi

11) Howard H. Martin and C. William colburn (1972) Communication and Consensus: An introducation to Theorotical Discourse, Har Court Brace Jovanovich

12) INS Press Hand Book (2010-11).

13) Karl Pearson (1911) The Grammar of Science, Third Edition, A and C. Blak, London

14) Kumar, Arvind (2002) Research Methodology in Social Science, Sarup & Sons Publishers, New Delhi

15) Meena, R.K. & Yadav, J.S. (2001) Horticulture Marketing and Post Harves Management Pointing Publisher, Jaipur

16) Neal, James M. & Brown, Suzanne S. (1976) News writing and Reporting, The Lowa State University Press

17) Pawar, B.P. (2003) Content Analysis of Post Harvest Technology Information in Leading Farm Magazine Shetkari form Maharshtra, Ph.D. Thesis submitted to Mahatma Phule Agricultural University, Rahuri

18) Prof. Ramswami (1975) Professional Journalism, Editor M.V. Kamath

19) Report of the Expert Advisory Group on Improvement and Strenthening of Interanl Audit Systems and Processes (2018) by Government of India, Ministry of Rural Development

20) Report on area coverage under Kharif crops (19/05/2017), Crops Division, Department of Agriculture,Government of India

21) Rogers Everett M.(1982)Diffusion of Innovations, Free Press

22) Rural Development Report (2016) Published by International Fund for Agricultural Development

23) Samantara, Samir (2010) Kisan Credit Card – A Study. Department of Economics & Analysis & Research. NABARD Mumbai

24) Schramm, Wilbuir (1964) Mass Communication and National Development, Stanford University Press, Stanford

25) Sharma, Awantika. (2006) Textbook of Food Science and Technology. Publication Internatioanal Book Distribution Co.

26) Sodhi (1982) Sampreshan – Seminar papers – Print Media and Agricultural Development, Dr. Ranjit Singh, National Council of Development Communication, July, 1986

27) Sustainable Development, Linking Economy, Society, Environment Report (2008) Published by Organistion for Economic Co-operation And Development (OCED)

28) The Press in India (2017-18).

29) Thomson T. Aurther (1952) Introduction to Science, Jeffery Comberlage, Oxford University Press, Oxford

30) Treies D & Weigold M. F. (2002). Advancing Science Communication A Survey of Science Communications. Science Communication

31) Unnithan T.K.N., Indra Deva and Yogendra Singh (1966) Towards a sociology of culture in India, Prentice Hall, New Delhi

32) Venkateshwarlu K. & Raman K. V. (1993). Project Management Techniques for R & D in Agriculture, Sterling Publishers, New Delhi

33) Wilson Gee (1968) Elements of Social Research. Pre Press, New York

34) World Development Report (2008) Agriculture for Development Published by World Bank

35) अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन २०१७, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

36) अकलुजकर, प्रसन्नकुमार, (१९८८) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, मराठी विश्वकोष खंड १७, संपा. वाड, विजया मुंबईः मराठी विश्वकोष खंड १७, संपा. वाड, विजया मुंबईः मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ

37) अनंदकवळस, एम.बी. (२०१३) अर्थसंवाद खंड ३६, अंक ४

38) इकॉनॉमिक सर्वे (२०१२–१३) भारत सरकार प्रकाशन, नवी दिल्ली

39) कानडे, रा. गो. (१९३८) मराठी नियतकालिकांचा इतिहास, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस पुणे

40) कर्वे, स्वाती (२००५) अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण क्र. ७. राज्य मराठी विकास संस्था, पुणे

41) काळे, भानू ऑक्टो. (२००९) अंतर्नाद, शरद जोशी विशेषांक, औंध, पुणे–४११००७

42) कृषिदर्शनी (२०१९) संपादक डॉ.किरण कोकाटे,महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, २०१९

43) करवंदे, चंद्रशेखर (१७ सप्टेंबर २०१७) अहमदनगरचे सिंचन वैभव, दै. लोकमत, अहमदनगर आवृत्ती

44) कृषिदर्शनी (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, २०१७

45) कुऱ्हाडकर, गजानन (२०१४) कृषि जनसंवाद आणि इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांची भूमिका : एक अभ्यास. पीएच.डी प्रबंध, वृत्तपत्र विद्या विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

46) कऱ्हाडे, डॉ. बी.एम.(२०११) शास्त्रीय संशोधन पद्धती. पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, तृतिय आवृत्ती

47) कुमार, केवल जे (१९९४) मास कम्युनिकेशन इन इंडिया, जयको पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली

48) कदम, डॉ. विश्वास., गावंडे, डॉ. गणेश. (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था. कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद

49) कुमार, केवल जे. (२०११) मास कम्युनिकेशन इन इंडिया, जयको पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली

50) कामथ, एम. व्ही. (१९८०) प्रोफेशनल जर्नालिक्षम, विकास नवी दिल्ली

51) कुलकर्णी, एस. के. (२००४) बातमीदीर. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे

52) कर्वे, स्वाती सुहास (२००५) अर्वाचीन महाराष्ट्राची जडणघडण क्र. ७ राज्य मराठी विकास संस्था, पुणे

53) कुलकर्णी, एस. के. (२००४) बातमीदीर. पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे

54) कृषिदर्शनी (२०१७) प्रकाशक व मुख्य संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ

55) खतीब, के. ए. (१९९९), भारताचा भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे–३०

56) गव्हाणे, डॉ. सुधीर (१९९९) इम्पॅक्ट ऑफ मोनोपोलायझेशन ऑफ चैन न्यूजपेपर्स ऑन इकॉनॉमिक व्हायेबलिटी ऑफ स्मॉल न्यूजपेपर्स इन महाराष्ट्र. पीएच. डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

57) गुप्ता, आर. (२००५) भुगोल नेट/सेट, रमेश पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली ११०००२

58) गायकवाड, प्रा. डॉ. मुकुंदराव (२००८) भारताचे कृषि–अर्थशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

59) गंधे, नारायण ( १९८७) प्रवरा काठची संस्कृती, प्रकाशक चंद्रकिमार गंधे, ज्ञानेश प्रिंटर्स, संगमनेर

60) गायकवाड, प्रा.डॉ. मुकुंदराव (२००८) भारताचे कृषि – अर्थशास्त्र. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

61) गुंजाळ, सुर्या. (संपादक)(एप्रिल २००७) फळांची काढणी, हाताळणी आणि विक्री व्यवस्था यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक प्रकाशन

62) गायकवाड, जयंत डी. (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे संशोधन नियतकालिक खंड ९, अंक १

63) गोखले, अरविंद व्य. (२०११) संपादन (पुनर्मद्रण–नोंव्हेबर–२०११) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे ४११ ०३७

64) गुरुसॅमी, एस (१९९५) डेव्हलपमेंट सोशॅलॉजीः ए रिडर. स्टर्लिंग पब्लिशर्स, नवी दिल्ली

65) गायकवाड, प्रा. डॉ. मुकुंदराव  (२००८) भारताचे कृषी–अर्थशास्त्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

66) घोटाळे, रा.ना. (२००५) समाजशास्त्रीय संशोधन पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५

67) घोष, बी.एन.

68) घुर्ये जी. एस. (१९३२) कास्ट अँड रेस इन इंडिया. २००८ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

69) चौधरी, एस. एन. (१९८७) डायनामिक्सव ऑफ रुरल पॉवर स्ट्रक्चर, उमर प्रकाशन, नवी दिल्ली

70) जैन, रमेश (२००७) जनसंचार विश्वकोश, नॅशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर

71) जहोड सॅल्टीश व कुक (२००४) सोशल रिलेशन्स रिसर्च

72) जोसेफ, जॉनी सी. (१९९७) मास मीडिया अँड रुरल डेव्हलपमेंट. रावत पब्लिशर्स, नवी दिल्ली

73) टंडन, रजनी (१९८९) अलाईड ह्यूमॅनीटीज. स्टर्लिंग पब्लिशर्स, नवी दिल्ली

74) डेविस, अँथोनी (१९७९) वर्किंग इन जर्नलिझम. बॅट्सफोर्ड लि. लंडन

75) दै. ॲग्रोवन (३० जून २०१७) पुणे आवृत्ती, ३० जून २०१७

76) दैनिक लोकमत (२९ मे २०१९) अहमदनगर आवृत्ती

77) दत्त, गौरव आणि महाजन, अश्विनी (२०१४) भारतीय अर्थव्यवस्था. ५२ वी सुधारीत आवृत्ती, एस. चांद अँड कंपनी, नवी दिल्ली

78) देशमुख, प्रकाश पुंडलिक (१९८६) भारतातील फळझाडांची लागवड

79) देऊळगावकर, अतुल (२०१४) विश्वाचे आर्त, द्वितीय आवृत्ती, मनोविकास प्रकाशन, पुणे

80) दत्त आणि सुंदरम (२०१२) इंडियन इकॉनॉमी. एस.चांद प्रकाशन, नवी दिल्ली

81) दै. सकाळ (११ ऑगस्ट २०१६) पुणे आवृत्ती, नगर वर्धापनदिन विशेष कृषिजीवन

82) धादवड एम.बी., रूपाली गोरे, राठोड के.एस. व नरखेडे एम.बी. (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका

83) धारुरकर, डॉ. वि. ल. (१९७४) आज कालची पत्रकारिता, रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद

84) धारुरकर, डॉ. वि. ल. (२०१२) शाश्वत विकास संवादाची नवी क्षितिजे. चैतन्य प्रकाशन, औरंगाबाद

85) नाडगोंडे, डॉ.गुरूनाथ (१९९९) सामाजिक संशोधन पद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर

86) प्रेस इन इंडिया ६२ वा अहवाल (२०१७–१८). रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर इंडिया

87) पाटील, डॉ.किशोर (२०१९) ग्रंथपाल, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांची मुलाखत, जयंत गायकवाड २५–०२–२०१९

88) पवार, डॉ. सुधाकर (२०१७) कृषि पत्रकार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे–३०

89) पाटील, वा.भा. (२००६) संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, पुणे प्रथम आवृत्ती

90) पवार, डॉ. सुधाकर (२०००) संवादशास्त्र मानसमान प्रकाशन,पुणे,प्रथमावृत्ती

91) पाटील, वा. भा. (२००६) संशोधन पध्दती. प्रशांत पब्लिकेशन, पुणे

92) पांढरे, डॉ. नीला (२००९) तृतीय रत्न नाटक. स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

93) बोराडे, मिलिंद (२०१७) माध्यम संशोधन पत्रिका

94) भालेराव, निशिकांत (२००८) आधुनिक पत्रकारिता, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

95) भोसले, शिवाजी (२०१२) अर्थसंवाद खंड ३६, अंक १

96) भांडारकर, पु.ल. (१९८७) सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, महात्मा गांधी मार्ग नागपूर

97) भालेराव व देसाई (२०१३) भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे

98) माळी, सुनील (२००८) बातमीदारी, राजहंस, प्रकाशन

99) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी (२०१७–१८) अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

100) मासिक शेतकरी जानेवारी – (२०१८) संपादक व्ही. एन. देशमुख

101) मुलानी, उमराव (२००९) कृषि अर्थशास्त्र. सक्सेस पब्लिकेशन राधाकृष्ण अपार्टमेंट, ५३५, शनिवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे

102) रॅली रॉबर्ट (१९८७) पब्लिक रिलेशन इन ॲक्शन. पिंटवेल हॉल, न्यू जर्सी

103) लेले, रा. के. (२००९) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती,

104) लेविस आॅर्थर (१९५४) इकॉनॉमिक डेव्हेलपमेंट वुइथ अनलिमिटेड सप्लाई ऑफ लेबर

105) वाटाणे, दिलीप (१९९७) कृषिवृत्त–एक अभ्यास, पीएच. डी. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

106) विदुरा अंक (१९४७)

107) वेदपाठक, मधुकर (२०१४) अर्थसंवाद खंड ३६, अंक १

108) व्यंकटेश एम. (१९९२) फॅक्टर्स विच ॲफेक्ट जॉब डिझाईन. संपादक जैन एस. सी. मॅनेजिंग ह्यूमन रिसोर्सेस, जयपूर

109) शिंदे, डॉ. अण्णासाहेब (१९८९) महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन, प्रकाशक यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

110) शंभरकर, अर्चना (२०१४) हरित क्रांतिचा नवा अध्याय. लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

111) शिंदे, बालाजी (२००९) हरितक्रांतीमधील कृषि संवाद : मराठी वृत्तपत्रांचा तौलनिक अभ्यास. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

112) सिंग, रणजित. (१९८६) स्थीच सेमिनार पेपर्स, नॅशनल कौन्सिल ऑफ डेव्हलपमेंट, वाराणसी, संपादन, व्ही. के. दुबे, डॉ. के. एन. पाम्टे, सुनील कुमार

113) सरकारिया, आर. एम. (१९९३). पी. आर. अँड प्रेस रिलेशन द प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया, रिव्ह्यू व जर्नल, खंड १४
114) सिन्हा, अरविंद (१९८५) मास मिडिया अँड रुरल डेव्हलपमेंट कन्सेप्ट, नवी दिल्ली
115) सकाळ इयर बुक-(२०१७), प्रकाशक सकाळ पेपर्स प्रा. लि. पुणे
116) साबळे, डॉ.रामचंद्र (२०१४) शेती आणि हवामान बदल, प्रथम आवृत्ती, सकाळ प्रकाशन, पुणे
117) सॅम ब्लॅक (१९७२) प्रॅक्टीकल पब्लिक रिलेशन इन ॲक्शन. द इंग्लिश लँग्वेज बुक सोसायटी, लंडन
118) सेवेकर, सुधीर राधाकृष्ण (२००६) जाहिरात. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२
119) हजारे, अण्णा (१९९९) यांची विशेष मुलाखत. चित्रन गुप्ता १९९९
120) श्री सुगी खरीप (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी
121) श्री सुगी रब्बी (२०१७) संपादक डॉ. किरण कोकाटे, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी

## संकेतस्थळे

1) www.agrihorticultureindia.com
2) www.corporate.agrowon.com
3) www.facebook.com
4) www.agrieculture.blogspot.com
5) www.krushiking.com
6) www.foo.com
7) www.worldbank.org/en/topic/agriulture
8) www.un.org
9) www.mpkv.mah.nic.in
10) www.ycmou.ac.in

11) www.mafsu.in

12) www.crro/nic.in

13) www.ipinida.nic.in,

14) www.maharashtra.gov.in

15) www.ifoam.bio

16) www.Kvk.icar.gov.in

17) www.ddsindia.com

18) www.sewa.org

19) www.adatfarmersbank.com

20) www.buchkewadi-vaishnavdham.com

21) www.ifpri.org/publication/2017-global-hunger-index-severtiy

22) www.sanskrit.org/specials/chanakya-neeti-darpan.html 2018

23) www.macp.gov.in

24) www.wikipedia.org

25) www.outlookindia.com

26) www.dgipr.maharashtra.gov.in

# परिशिष्ट – १

## मुलाखतींचा संपादित अंश

- ❖ अण्णा हजारे
- ❖ पोपटराव पवार
- ❖ मिथिलेश जोशी
- ❖ संतोष गोरे
- ❖ अशोक पटारे
- ❖ मिलिंदकुमार साळवे
- ❖ प्रा. माधव मनोहर देसाई
- ❖ डॉ. पंडित खर्डे

## अण्णा हजारे

### पद्मश्री, पद्म भूषण पुरस्काराने सन्मानीत ज्येष्ठ समाजसेवक

---

विकास संज्ञापनात भाषिक वृत्तपत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्याच्या इतक्या वर्षानंतर जो विकास झाला आहे तो बऱ्याच प्रमाणात निसर्गाचे शोषण करून झाला आहे. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. तो विकास नसून विनाशाकडे नेणारा मार्ग आहे. त्यामुळे तापमानात वाढ, दुष्काळ, महापूर असे अनेक प्रकारचे धोके निर्माण झाले आहेत. शाश्वत शेतीसाठी ग्रामीण भागातल्या जलसंधारण आणि पाणलोटक्षेत्र विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. देशाचा विकास होण्यासाठी प्रत्येक खेडी ही स्वयंपूर्ण बनली पाहिजेत. यासाठी मराठी वृत्तपत्रांनी शेती क्षेत्राकडे प्राधान्याने लक्ष देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे प्रबोधन करणाऱ्या बातम्या, माहिती याचे सखोल ज्ञान वृत्तपत्रांनी देणे गरजेचे आहे. इस्त्रायल सारखा देश पाण्याची कमतरता असताना शेतीक्षेत्रात मोठी प्रगती करीत आहे. जगभरात तिथली शेती हा कौतुकाचा विषय बनली आहे. त्या तुलनेत आल्याकडे परिस्थिती चांगली असताना वैचारीक अभाव आहे. कृषि विकासाबाबत आपली दुर्दैवी अवस्था आहे.

राळेगण सिध्दी सारख्या गावात लोक सहभागातून जमिन आणि पाण्याचे नियोजन कसे केले आहे. कुणाची मदत नसतानाही राळेगण सिध्दीने विकास साधला आहे. बेरोजगारी, दुष्काळ, व्यसनाधीनता यावर मात करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. फक्त मिळणाऱ्या अनुदानापुरते काम कृषि विद्यापीठाने करणे योग्य नाही. अनेक कमी शिकलेले लोक शेतीतल्या अनुभवातून विविध शोध लावतात. अशा लोकांच्या संशोधनाकडे लक्ष दिले पाहिजे. त्यावर अधिक संशोधन कृषि विद्यापीठांनी करायला हवे. देशाचा आणि समाजाचा विचार त्यांनी केला पाहिजे.

कृषि प्रधान संस्कृती असल्याचे फक्त सांगण्यापेक्षा कृषि विकासासाठी वृत्तपत्रांनी आणखी व्यापक भूमिका पार पाडणे गरजेचे आहे. आज शहरांची वाढलेली लोकसंख्या याचे कारण काय आहे ? खेड्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. महात्मा गांधींच्या स्वप्नातला भारत बनविण्यासाठी शेतीच्या प्रगतीकडे गांभिर्याने पाहिले पाहिजे. ग्रामीण विकासाची दृष्टी रूजली

पाहिजे. वृत्तपत्रांनी शेतीच्या बातम्या जास्तीत जास्त दिल्या पाहिजेत. क्रिकेट, सिनेमा, प्रसाधनांच्या जाहिरातींनी आज पहिल्या पानावर स्थान पटकावल्याचे दिसते. यातून विकास अशक्य आहे. कृषि वार्तांना पहिल्या पानावर स्थान मिळाले पाहिजे. शेतकऱ्यांच्या यशकथांना प्राधान्य दिले पाहिजे. यातून इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळेल. शाश्वत कृषि विकासासाठी वृत्तपत्रांनी आणखी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

# पोपटराव पवार

**हिवरे बाजार, अहमदनगर**

**कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, महाराष्ट्र राज्य**

कृषि पत्रकारिते बाबत मराठी वृत्तपत्रांच्या सगळ्याच गोष्टी समाधानकारक नाही. पत्रकारिता हा लोकशाहिचा चौथा स्तंभ आहे. राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक स्तंभाने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. यासाठी सकारात्मक पत्रकारिता आवश्यक आहे. दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, कुठे अतिवृष्टी अशा समस्यांमुळे प्रत्येक माणूस सरकारी अनुदानाची वाट पाहू लागला आहे. निव्वळ अनुदानाने कधीच स्थिरता येवू शकत नाही. यामुळे समाजात पंगूत्व येते हा माझा वैयक्तिक हिवरे बाजारच्या संदर्भातला २८–३० वर्षातला अनुभव आहे. जे गाव आणि शेतकरी पुढाकार घेऊन शेती आणि पाण्याचे नियोजन करतील याची सकारात्मक मांडणी करणे हे खरं पत्रकारितेचं महत्त्वाचं काम आहे. शेती उत्तम पध्दतीने होण्यासाठी कृषि पत्रकारांनी शेतीतली संशोधने, खते, बियाणे, औषधे, ठिबक सिंचन, पॉली हाऊस, शेडनेट सारख्या विविध योजनांची मांडणी वृत्तपत्रांद्वारे केली पाहिजे जेणेकरून शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडेल. अशा प्रकारच्या संवादातून उत्तम शेती शक्य आहे. त्या दृष्टीने काही पत्रकार काम करतात. शेतीतल्या यशोगाथांची चळवळ होणे खूप गरजेचे आहे.

गेल्या दहा पंधरा वर्षात शेती समोरील आव्हाने वाढली आहेत. पावसाची अनियमितता, शेतमालासाठीची बाजारपेठ, बाजारात विकू शकेल तेच उत्पादन घेण्याचा प्रयत्न, नगदी पीक घेण्याकडे कल बघता त्यात अभ्यास जरूरी आहे. फक्त शेतकरी आत्महत्यांच्या बातम्या देण्याऐवजी त्यावर उपाययोजना काय आहेत, कशा करता येतील यावर उत्तर मिळणारी बातमीदारी होणे आवश्यक आहे. खूप संकटे असतानाही आत्महत्येचा पर्याय नाकारणारे शेतकरी आहेत. त्यांच्या संघर्षाची माहिति होणे गरजेचे आहे. काही पत्रकार हे काम करीत सुध्दा आहेत.

शेती व शेतकरी जगवण्यासाठी सरकारी व खाजगी माध्यमांनी हेतू शुध्द ठेवून कृषि पत्रकारिता केली पाहिजे. कृषि विद्यापीठांनी केलेले यशस्वी संशोधन कृषि विभागामार्फत

शेतकऱ्यांपर्यंत गेले पाहिजे. त्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना भाव मिळवून दिला पाहिजे. परंतु इथेही जो शेतकरी पिकवतो तो देव होण्याऐवजी व्यापारी देव झालाय, दुर्दैवाने आज कृषि विद्यापीठे स्पर्धा परिक्षा केंद्रे झालीत तसेच गुणवत्ते ऐवजी वशिलेबाजीने ती पोखरली गेली आहेत. त्यामुळे गेल्या २५ वर्षात आपल्याकडे कृषि विस्तार कार्य शुन्यावर आले आहे. सरकार, शेतकरी आणि संशोधन ही साखळी तुटली आहे. या विषयांचे प्रतिबींब कृषि पत्रकारितेत उमटले पाहिजे.

## मिथिलेश जोशी, पुणे

### सकाळ, लोकमत, पुढारी सह विविध दैनिकात २३ वर्षाहून अधिक काळ संपादनाचा अनुभव

कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात होणारी वाढ ही अत्यंत अल्पशी आहे. याचे कारण म्हणजे भारतातला शेतकरी पारंपरिक ज्ञानावर आधारीत शेती करतो. यामुळे शेतकरी कृषि क्षेत्रातल्या नव्या प्रयोगाला सामोरे जायला नकार देतो. त्यातच कृषि क्षेत्रात होणारे मोठे प्रयोग जे असतात ते मोठ्या प्रमाणात शेती असलेल्यांसाठी असतात. आपल्याकडे अल्प भूधारक शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे कृषि पत्रकारितेचा म्हणावा तसा उपयोग होत नाही. कृषि पत्रकारिता ही अल्प भूधारक शेतकऱ्यांना डोळ्यासमोर ठेवून केली जात नाही. संशोधन करताना यंत्रे तथा तंत्रज्ञान याचा विकास मोठ्या प्रमाणात शेतीक्षेत्र असलेल्या लाभधारक शेतकऱ्यांना समोर ठेवून केले जाते. त्यामुळे मोठ्या संख्येने असलेला अल्प भूधारक शेतकरी वर्ग यापासून वंचित राहातो. आणि असे तंत्रज्ञान खर्चिक असल्याने अल्प भूधारक शेतकऱ्यांना परवडणारे नाही. यामुळे कृषि पत्रकारिता ही अल्प भहूधारकांसाठी होत नाही हे सगळ्यात मोठे वैशम्य आहे. दूसरे कारण म्हणजे आपल्याकडे रब्बीचे पीक घेण्याचे प्रमाण खूप कमी आहे. मोसमी पावसावरच आपल्याकडे खरीपाची पीकं घेतली जातात. सिंचनाच्या सुविधांचा अभाव व पाण्याची कमतरता यामुळे शेतकऱ्याची आर्थिक उन्नती होण्याचे प्रमाण देखील कमी आहे.

आपल्याकडे कृषि क्षेत्राकडे बघण्याचा दृष्टीकोन बदण्याची गरज आहे. शेतीमालाच्या भावाबद्दल बोलायचे झाल्यास उदाहरणार्थ कांद्याचे भाव वाढल्यावर येणाऱ्या बातम्या की कांद्याने आणले डोळ्यात पाणी. यामध्ये फायदा कुणाचा व तोटा कुणाचा याची वस्तूस्थिती मांडली जात नाही. यामुळे शेतकऱ्यांना फायदा होण्याऐवजी व्यापाऱ्यांनाच होतो. आणि नुकसान सामान्य माणसांचे होते. कृषि पत्रकारितेत आर्थिक साक्षरता येण्याची गरज आहे. याच्या अभावामूळे कृषि जागृती समाजापर्यंत पोहचत नाही.

वृत्तपत्रे चालविणे हा व्यवसाय आहे. आणि प्रत्येक व्यवसायात आपला संभाव्य ग्राहक समोर ठेवला जातो. त्यामुळे शेती क्षेत्राकडे फारसे गांभिर्याने पाहिले जात नाही. एक हवामानाचा

अंदाज देण्यापलिकडे कृषि क्षेत्रात होणारे नवनवीन बदल, प्रयोगाच्या बातम्या अभावाने येतात. त्यामुळे मराठी पत्रकारितेचे कृषि पत्रकारितेतले योगदान वाढवण्यसासाठभ कृषिक्षेत्र डोळ्यासमोर ठेवून मजकूराची जागा वाढविणे आवश्यक आहे. बातम्यांचे स्थानिकीकरण टाळून पाणी आणि दुष्काळाबाबत राज्यव्यापी वास्तववादी व्यापक चित्र पत्रकारितेतून उमटायला हवे. कृषि क्षेत्रातल्या राज्यस्तरीय समस्यांचे सातत्याने संकलन व मांडणी करून सरकारला जागे करणे आवश्यक आहे. तरच सरकारला देखील उपाययोजना करणे शक्य होईल.

## संतोष विठ्ठलराव गोरे, मुंबई

### ई टीव्ही, झी २४ तास, टीव्ही ९, आयबीएन लोकमत सह विविध दैनिकात १६ वर्षाहून अधिक काळ संपादन व वार्तांकनाचा अनुभव

नव्या तंत्रज्ञानाची माहिती मिळण्यासाठी कृषि पत्रकारिता महत्त्वाची भूमिका बजावते. या माहितीमुळे शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर पडत असते. यातून कृषि शिक्षणाचा प्रचार, प्रसार होतो. वाढत्या माध्यमांच्या संख्येमुळे देखील समाजात कृषि जागृती व्हायला मोठ्या प्रमाणात मदत होते. अन्नधान्य क्षेत्राशी निगडीत देशातील मोठ्यासंख्येचा वर्ग हा खऱ्या अर्थाने कृषि विषयाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या संबंधीत आहेत. यामुळे कृषि पत्रकारितेची गरज दिवसेंदिवस वाढत आहे.

कृषि क्षेत्राला 'डाऊन मार्केट' समजले जाते. ही मुख्य समस्या आहे. हा विचार बदलण्यसाठी मानिसिकता बदलण्याची गरज आहे. कृषि पत्रकारिता या घटकाला मुख्य प्रवाहातील माध्यमांनी महत्त्व देणे अत्यंत आवश्यक आहे. ठराविक पत्तत्रकार व मोजके माध्यमसमूह कृषि पत्रकारितेबाबतीत जागरूक असल्याचे चित्र आज दिसते. वाढत्या शहरीकरणामुळे ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष होत आहे. शहरी भागातल्या समस्या, प्रश्न यांना जास्त जागा मिळते. परंतु शेतीतल्या संदर्भात विविध प्रश्नांबाबत वृत्तपत्रांनी शिक्षण देण्याचे काम केले पाहिजे. आपली कृषि प्रधान अर्थव्यवस्था असल्याचे वारंवार आपण ऐकतो मग शेतीच्या रक्षणासाठी, विकासाठीची जागरुकता वाढणे गरजेचे आहे. यासाठी कृषि विषयक बीट प्रत्येक माध्यमाने निर्माण करणे आवश्यक आहे. शेतकरी आत्महत्या, नापिकी, कर्ज बाजारीपणा,कधी सुलतानी तर कधी येणारे आसमानी संकट यावर शाश्वत विकासासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. राज्यातील कृषि विद्यापीठे, कृषि महाविद्यालये यांच्या समन्वयातून कृषि पत्रकारितेसाठी आवश्यक असलेला मजकूर तयार होणे आवश्यक आहे. सरकारी माध्यमांनी देखील नेमक्या समस्या काय आहेत याचा विविध अंगांनी शोध घेत अहवाल तयार केले पाहिजे. सरकारी व खासगी क्षेत्रातल्या माध्यमांचे योग्य समन्वय होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालये आणि सरकारच्या ग्रामविकास, कृषि मंत्रालयाने एकत्रित किमान सामायिक कार्यक्रम आखले पाहिजेत.

पाणी आणि शेती उत्पादनाला किमान हमीभाव या मुख्य समस्यांवर मात करणारे देश परदेशातील नव नवीन तंत्रज्ञानाचा इथल्या स्थानिक बोलीभाषेत वापर व प्रसार वाढला पाहिजे. कमी पाण्यात शेती कशी करावी तसेच उत्पादन केलेला शेतीमालासाठी नवी बाजारपेठ शोधून माल कसा विकायचा यांचे मार्गदर्शन व्हायला हवे. यासाठी कृषि कार्यरत पत्रकार, तज्ज्ञ, जाणकार, अशासकीय संस्था, व्यक्ती यांचे सहकार्य सरकारने व वृत्तपत्रांनी घेणे आवश्यक आहे.

## अशोक बबनराव पटारे, अहमदनगर

## २३ वर्षाहून अधिक काळ कृषि पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत

कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होते. कारण शेतकऱ्यांच्या खऱ्या अडचणी, शेतीविषयक समस्यांना वाचा फोडली जाते. त्यामुळे त्यावर उपाययोजना करण्यास मदत होते. त्यामुळे शेतीचे संभाव्य नुकसान टळते. कृषि पत्रकारितेतल्या संवादामुळे नवीन–पीक–पाणी, लागवड पद्धती, नवीन तंत्रज्ञान, बियाणांच्या सुधारीत जाती याची माहिती शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतात, कृषि यशकथांमुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणात कृषि जागृती होण्यास मदत होते.

सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबाबत म्हणावे तसे जागरूक नाहीत. विदर्भ, मराठवाड्यात होणाऱ्या शेतकरी आत्महत्यांचे लोण आता पश्चिम महाराष्ट्रातही आले आहे. अन्नधान्य पिकविणारा हा घटक पत्रकारितेत आणखी जोरकसपणे मांडला जाणे गरजेचे आहे. याचा अर्थ कृषि घटकातल्या धोरणांचा म्हणावा तसा फायदा होत नाही की काय ? सर्वच कृषि योजनांचा फेर आढावा आणि मुल्यमापन होणे गरजेचे आहे. कष्ट करणारा गरीब शेतकरी आपला वाचक नाही असा अनेक वृत्तपत्रांचा समज आहे. खते, बियाणे, किटकनायके यांचा शेतकरी ग्राहक आहे. कृषि क्षेत्रातल्या बातम्या, माहिती संदर्भातल्या मजकूराला प्राधान्य दिल्यास वृत्तपत्रांना त्याचा फायदा होवू शकतो. कारण खते, बियाणे, किटकनाशके यांचा शेतकरी ग्राहक असल्योन या उत्पादक कंपन्याच्या जाहिराती मिळू शकतात हे या वृत्तपत्रांना पटवून द्यावे लागेल.

कृषि पत्रकारितेच्या विकासासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अनेकदा ग्रामीण सामान्य शेतकऱ्यांच्या मांडलेल्या व्यथांची शहरी मानसिकतेच्या मंडळीकडून कुचेष्टाच होते. शेतीतल्या अनेक समस्यांचा ऊहापोह, वार्तांकन योग्य पातळीवर होताना दिसत नाही. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत हमीभाव नाही. सरकारची बदलती धोरणे, नैसर्गिक आपत्ती या समस्यांचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. हमीभावापेक्षा कमी दरात शेती उत्पादने खरेदी करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होत नाहीत. प्रथम शेतकरी, नंतर ग्राहक व शेवटी व्यापाऱ्याच्या

फायद्याचा विचार होणे गरजेचे आहे. अनेक वृत्तपत्रात कृषि पत्रकारितेतील सुयोग्य प्रशिक्षित मनुष्यबख कार्यरत नाही. त्यामुळे शेतीची माहिती व जाण नसलेला वर्ग अनेकदा शेतकऱ्यांना सल्ला देतानाचे प्रकार घडतात. काही वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेला नक्कीच स्थान देतात. काही स्वतंत्र कृषि दैनिकेही आहेत. परंतु कृषिचा मजकूर देण्यात प्रचंड तफावत दिसते. यासाठी सामान्य शेतकरी प्रगतीशील झाला तर वृत्तपत्रांनाही मोठा ग्राहकवर्ग मिळण्यास वाव आहे. सरकारी पातळीवरून कृषिसंवाद क्षेत्रात कार्यरत संपादक, वार्ताहर, विस्तार कार्यकर्ते यांना प्रोत्साहनासाठी पुरस्कार देणे गरजेचे आहे.

**मिलिंदकुमार साळवे, अहमदनगर**

**दै. लोकमत सह विविध दैनिकात २२ वर्षाहून अधिक काळ संपादन व वार्तांकनाचा अनुभव**

---

कृषि पत्रकारितेचा शेतकऱ्यांच्या वाटचालीमध्ये निश्चितच मोठा सहभाग आहे. मोठे योगदान आहे. जिल्ह्यात असणाऱ्या महात्मा फुले कृषि विद्यापीठात होणारे संशोधन शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाहोचवण्याचेक काम वृत्तपत्रे निश्चितपणे करतात. विविध संशोधना बरोबरच केंद्र व राज्य सरकारतर्फे राबविण्यात येणाऱ्या कृषि खाताच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविल्या जातात. कृषि पत्रकारितेमुळे समाजमध्ये कृषि जागृती निर्माण होते. सरकारची धोरण असोत वा शेतकऱ्यांचे प्रश्न यातल्या चांगल्या वाईट मुद्यांवर लोकांचं मंथन होते. शेतकऱ्यांचे प्रबोधन झाल्याने त्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत होते.

सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबाबत जागृत आहेत असे चित्र दुर्दैवाने दिसत नाही. याचे कारण पत्रकारितेत आलेली व्यवसायकिता होय. अनेकदा मजकूर अथवा बातमी छापण्यापूर्वी त्यातील व्यावसायिक मूल्यमापन केले जाते. अंक वाढीचे लक्ष आणि जाहिरातींसारखे निकष लावून प्रसिध्दी बाबत धोरण आखले जाते. कार्यालयीन धोरणाचा भाग म्हणून ती किती विकावू आहे यावर त्या बातमीचे मुल्य ठरवले जाते. अशा वेळी एखाद्या शेतकऱ्याची यशोकथा छापायची असेल तर तो शेतकरी किती अंक विकत घेणार असा प्रश्न त्याला विचारला जातो अशी आजच्या काही ठिकाणच्या वृत्तपत्रांची अवस्था आहे. यासाठी वृत्तपत्रांनी अंकवाढीच्या धोरणाचा विचार करताना जया भागात आपल्या वृत्तपत्र चालवतो त्या भागातील शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्याचे व सोडवण्याचे काम केले पाहिजे. स्वागतार्ह बाब म्हणजे अपवाद असलेली काही दैनिकं खरोखर आठवड्यातून एखादे की होईना पान, सदर कृषि पत्रकारितेसाठी राखीव ठेवताना दिसतात. परंतु व्यापक असलेल्या कृषि पत्रकारितेसाठी इतक्याशा जागेने समाधान होईल असे वाटत नाही. एकंदरीतच सध्याची होणारी कृषि पत्रकारिता माझ्या मते अजिबात समाधानकारक नाही.

विविध हंगामात शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे व काय करायला नको ? पीक आराखडा पद्धती कशी असावी ? कमी क्षेत्रात जास्त उत्पादन देणारी बी–बियाणे व खते कोणती ? याविषयीचे मार्गदर्शन वृत्तपत्रांशिवाय दुसरे माध्यम करू शकत नाही. काही वृत्तपत्रे कृषि पत्तत्रकारितेच्या नावाखाली 'पाट्या' टाकण्याचे काम करताना दिसत आहेत. परंतु काही वृत्तपत्रे मात्र अभ्यासपूर्ण बातम्या, लेख दिले जातात. कृषिक्षेत्रातल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांवर कुठे कृषि पत्रकारांनी मोठो आवाज उठवल्याचे दिसत नाही. यातल्या बेजबाबदार घटकांवर कृषि पत्रकारांनी प्रकाश टाकला पाहिजे. पाठपुरावा केला पाहिजे. कृषिक्षेत्राच्या हितासाठी 'हिवरेबाजार' सारख्या गावाचा पॅटर्न प्रत्यक्ष राबविण्याच्या दृष्टीने वृत्तपत्रांनी पत्रकारिता करणे आवश्यक आहे.

**प्रा. माधव देसाई**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**कृषि शिक्षण, संशोधन, विस्तार क्षेत्रात ३७ वर्षाहून अधिक सेवा अनुभव**

---

कृषि पत्रकारितेमुळे आधुनिक कृषि तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना त्वरीत मिळते. शेतमाल विक्री करण्यासाठीच्या बाजारा संबंधी दैनंदिन माहिती मिळते. शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठा बाबत योग्य ती माहिती मिळाल्याने शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होते. वृत्तपत्र माध्यम अतिशय महत्त्वाचे आहे. या माध्यमामुळे एकाच वेळी लाखो शेतकऱ्यांशी संपर्क करता योतो. करितक्रांती हाण्यासाठभ कृषि पत्रकारितेचा मोठा हातभार आहे. कृषिक्षेत्रासाठी हे अतिशय महत्त्वाचे साधन असल्याचे वेळोवेळी स्पष्ट झाले आहे. शेतकऱ्यांच्या वाटचालीमध्ये निश्चितच मोठा सहभाग आहे. मोठे योगदान आहे.

सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारिताबाबत जागृत नाही. ही जागरूकता वाढणे आवश्यक आहे. यासाठी कृषि विषयक बातम्या लेख इत्यादींसाठी एक पान राखीव ठेवणेसाठी नियमांचा आधार घेतला पाहिजे. यासाठी आवश्यक ती तरतूद करणे गरजेचे आहे. वृत्तपत्रांकडून जलसिंचनाच्या प्रश्नाला प्राधान्य दिले गेले पाहिजे. राज्यातील बहुतांश शेती पावसाच्या पाण्यावर आधारीत आहे. सिंचन सुविधा वाढविल्यास मोठे क्षेत्र ओलिताखाली येऊ शकते. अनेक ठिकाणी शेतीच्या कामाला मजुरांची उपलब्धता होत नाही. या समस्यांमुळे अनेकदा शेतकरी हतबल होताना दिसतात. पावसाचे पाणी अडविण्यावर वृत्तपत्रांकडून प्रबोधन होणे आवश्यक आहे. उत्पादीत शेतमालास हमीभाव मिळणे कामी प्रयत्न झाले पाहिजेत.

मराठी वृत्तपत्रांचे कृषि पत्रकारितेमध्ये असलेले योगदान आणखी वाढले पाहिजे. कृषि हा विषय ग्रामीण भागाशी जास्त निगडीत आहे. कृषिक्षेत्रात अनेक प्रकारचे घटकनिहाय उपविषय आहेत. या सर्वच विषयांची माहिती गरजेप्रमाणे वृत्तपत्रात दिली पाहिजे. परिस्थितीनुरूप शेतकऱ्यांना माहिती वेळेत पोचल्यास त्याचा शेतकऱ्यांना उपयोग होतो. यासाठी शेतकरी, शास्त्रज्ञ, कृषि विभाग व विद्यापीठे यांचेसाठी एखादी समन्वय समिती असणे गरजेचे आहे.

वृत्तपत्रांच्या वितरणात वाहतुकीची साधने महत्त्वाची ठरतात. वृत्तपत्रे गावागावात वेळेत पोहचण्यासाठी प्रयत्न करतात. दुर्गम व रस्ते समस्या असलेल्या भागात वृत्तपत्रे पोचण्यासाठी आणखी उपाययोजना व्हायला हव्यात. या दृष्टिने कृषि विभाग, विद्यापीठे आणि वृत्तपत्रे यांच्यात समन्वय आखणे गरजेचे आहे.

**डॉ. पंडित खर्डे**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

**कृषि विभाग, संशोधन, विस्तार क्षेत्रात २३ वर्षांहून अधिक सेवा अनुभव**

---

वृत्तपत्रांमुळे कृषिविषयक माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचते. विविध प्रकारच्या बातम्या, लेख, जाहिराती ठिकठिकाणचे बाजारभाव यातून शेतकऱ्यांना अद्यावत माहितीचा पुरवठा वृत्तपत्रे सातत्याने करीत असतात. यामध्ये कृषि यशकथांचाही समावेश आहे. विविध प्रकारच्या यशकथांमुळे इतर शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासात वाढ होते. त्यातून प्रेरणा मिळाल्याने अशा यशोगाथांतील ज्ञान आणि माहितीचा वापर करून शेतकरी नव नवीन प्रयोग करतात. कृषि विकासाला पूरक वातावरण तयार करण्याचे काम वृत्तपत्रे करतात.

कृषि पत्रकारितेमुळे शेतीतल्या प्रश्नांवर होणारी आंदोलने, मेळावे यांची माहिती मिळत असल्याने एक चांगला प्लॅटफॉर्म मिळतो. परंतु अपवाद वगळता सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक नसल्याचे चित्र आहे. अशा वृत्तपत्रांनी सामाजिक जबाबदारी घेतली पाहिजे. शेती विषयक बातम्यांना, कार्याला आपल्या वृत्तपत्रात योग्य जागा दिली पाहिजे. शेतकऱ्यांचे प्रश्न समाजापुढे निर्भिडपणे मांडले पाहिजे. अधिकाधिक शेतकऱ्यांच्या प्रतिक्रिया मांडण्यासाठी आठवड्यातून किमान एक पान मजकूर शेतीच्या यशोगाथा, तज्ज्ञांचे लेख यावर असायला हवेत. एक दोन वृत्तपत्रे याबाबतीत आठवड्यातून कृषि विषयक सदरांसाठी व मजकूरसाठी विशिष्ट पानावर जागा राखीव ठेवतात हे अतिशय चांगले धोरण आहे. विविध हंगामात शेतकऱ्यांनी काय केले पाहिजे व काय करायला नको ? पीक आराखडा पद्धती यावर अभ्यासपूर्ण बातम्या आणि लेखांना जागा द्यायला हवी.

कृषिक्षेत्रातील भेडसावणाऱ्या समस्या म्हणजे शेतमालाला योग्य भाव नाही. पाणी, जलसिंचन तसेच शेतीमध्ये दळणवळण, मार्केट, काढणीपश्चात तंत्रज्ञानाचा अभाव यावर मात करणे आवश्यक आहे. कोणत्या बाजारपेठेत कोणत्या शेतमालाला चांगला भाव मिळतो. यासाठीचे मार्गदर्शनपर लेख आणि वस्तुनिष्ठ माहिती काही वृत्तपत्रे देतातही अतिशय चांगली बाब असुन इतर वृत्तपत्रांनी त्याचे अनुकरण करणे गरजेचे वाटते. वृत्तपत्र माध्यमांच्या सहाय्याने

माहितीची सुलभ देवाण–घेवाण होते. मात्र वृत्तपत्रांनी सुशिक्षित कृषि पत्रकारांची नेमणूक केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो. कृषि विषय मांडताना शेतकऱ्यांना समजेल अशी सोपी व बोली भाषेतल्या लिखाणाची गरज आहे. यामुळे ती माहिती अनेक शेतकऱ्यापर्यंत सहजपणे घेणे शक्य होईल. यासाठी कृषि क्षेत्रातल्या प्रशिक्षित मनुष्यबळाची निवड वृत्तपत्रांनी करणे गरजेचे आहे.

# परिशिष्ट – २

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

पीएच.डी. पत्रकारिता पदवीच्या शोध प्रबंधाच्या अभ्यास विषयाच्या संदर्भातील प्रश्नावली

## मराठी वृत्तपत्रांतील कृषि पत्रकारितेचा तुलनात्मक अभ्यास


मार्गदर्शक
**प्रो.डॉ. सुधीर गव्हाणे**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

संशोधक
**जयंत दामोधर गायकवाड**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


## शेतकऱ्यांसाठी प्रश्नावली

---

### अ–गट (सर्वसाधारण माहिती)

संपूर्ण नाव :---------------------------------- वय : -----

गाव :--------------- ता.-------------------- जिल्हा : ----

धर्म :-------------- जात :----------------------------

शिक्षण :------------- रहिवास : शहरी / ग्रामीण ----------------

कुटुंब सदस्य संख्याः ----------- मुलांचे शिक्षणः १)---------------

२)-------------- ३)---------------४)--------------

### ब–गट (वृत्तपत्र वाचन सवयी)

०१) आपण वृत्तपत्र नियमित वाचता का?

१) होय २) नाही

०२) आपण कोणती वृत्तपत्रे वाचता?

१) लोकमत २) सकाळ ३) ॲग्रोवन ४) पुण्यनगरी

४) पुढारी ६) महाराष्ट्र टाईम्स ७) लोकसत्ता ८) अन्य

०३) आपण किती वेळ वृत्तपत्र वाचता?

१) १० मिनिटे २) १५ मिनिटे ३) २० मिनिटे ४) ३० मिनिटे

**क–गट (कृषि पत्रकारिता)**

०४) कृषि पत्रकारितेमध्ये स्वतंत्र वृत्तमूल्ये आहेत असे वाटते का?

१) होय २) नाही

०५) कृषि पत्रकारितेमुळे शेती व्यवसायात वाढ होण्यास मदत होते असे वाटते का?

१) होय २) नाही

०६) कृषि पत्रकारितेमुळे समाजामध्ये कृषी जागृती निर्माण होण्यास मदत होते असे वाटते का?

१) होय २) नाही

०७) मराठी वृत्तपत्राचे कृषि पत्रकारितेमध्ये योगदान आहे का?

१) होय २) नाही

०८) अहमदनगर जिल्ह्यातील सर्वच मराठी वृत्तपत्रे कृषि पत्रकारितेबद्दल जागरूक आहेत का?

१) होय २) नाही

०९) कोणत्या दैनिकातून शेती व शेतकऱ्यांविषयी जास्त माहिती मिळते?

१)सकाळ २) लोकमत ३) ॲग्रोवन ४) इतर

**ड– गट (नव्या कृषि पत्रकारितेचा आराखडा)**

१०) शेतीमधील कोणत्या विषयाचे लेखन आवडते?

१) यशकथा  २) नवीन तंत्रज्ञान  ३) दुग्धव्यवसाय

४) पणन व बाजारभाव ५) अन्य/इतर

११) आजच्या वृत्तपत्रांत शेतीपेक्षा राजकारणाला जास्त महत्त्व दिले जाते का?

१) होय  २) नाही

१२) शेतीविषयातल्या खालीलपैकी कोणता विषय तुम्हाला सर्वाधिक महत्त्वाचा आहे असे वाटते?

१) पाणी  २) नापीकी  ३) अवकाळी पाऊस

३) शेतकऱ्यांना कर्जमाफी  ५) कर्जबाजारीपणा

१३) शेतकरी या घटकासाठी वर्तमानपत्रात पुरेशी जागा मिळते का?

१) होय  २) नाही

१४) दै. ॲग्रोवन या दैनिकाची आपणाला माहिती आहे का?

१) होय  २) नाही

१५) दै. ॲग्रोवनच्या स्पर्धेत आणखी एखादे शेतीविषयक दैनिक असावे का?

१)होय  २) नाही

१६) सध्याच्या कृषि पत्रकारितेत आहे त्यापेक्षा अधिक नवा मजकूर हवा असे वाटते का?

१) होय  २) नाही

**इ–गट (आर्थिक स्थिती)**

१७) शेतीतून वार्षिक उत्पन्न किती रुपये होते?

१) दोन लाखापेक्षा जास्त  २) दीड लाख ते दोन लाखापर्यंत

३) एक ते दीड लाखापर्यंत  ४) पन्नास हजार ते एक लाखापर्यंत

५) पन्नास हजार पेक्षा कमी

१८) कर्ज किती रुपये आहे?

१) दोन लाखापेक्षा जास्त २) दीड लाख ते दोन लाखापर्यंत

३) एक ते दीड लाखापर्यंत ४) पन्नास हजार ते एक लाखापर्यंत

५) बिगर कर्जदार

१९) कर्ज कुणाकडून घेतले आहे?

१) सावकार २) सहकारी पतसंस्था

३) सरकारी बँक ४) सहकारी बँका ५) बिगर कर्जदार

२०) कर्जफेड नियमीत आहे का?

१)होय २) नाही

**ई–गट (समस्या आणि मदत)**

२१) वर्षभर पाण्याची स्थिती कशी असते?

१) खूप चांगली २) चांगली

३) समाधानकारक ४) अतिशय कमी प्रमाण

२२) तुमच्या उत्पादनाला बाजारपेठेत भाव कसा मिळतो?

१) खूप चांगला २) चांगला

३) समाधानकारक ४) अतिशय कमी

२३) हवामान बदलाची माहिती वेळेवर मिळते का?

१) होय २) नाही

२४) सरकारची मदत वेळेवर मिळते का?

१) होय २) नाही

२५) वर्षभरात कोणती पिके घेतात?

१) ---------------- २)----------------

२६) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी या संस्थेचा उपयोग तुम्हाला होतो का?

१) होय २) नाही

२७) कृषि पत्रकारिता सुधारण्यासाठी कशावर भर दिला पाहिजे ? आणखी काही

सूचना

१) योग्य बातम्या   २) नेमके संपादन   ३) छायाचित्रांचा वापर

४) नव्या शोधांचा विस्तार

--------------------------------------------------

--------------------------------------------------

--------------------------------------------------

स्थळः

दिनांकः

**सर्वेक्षणकर्त्याची स्वाक्षरी**   **उत्तरदात्याची स्वाक्षरी**